म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र. ९

१९८७

निरंजन माधव - विरचित

सुभद्रास्वयंवर

卐

संपादक

रामचंद्र चिंतामण ढेरे

REFBK-0016301

REFBK-0016301

नीलकंठ प्रकाशन, पुणें ९

काव्य
गोंदणकर
४४०६१
१७४८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

R/3/64
23 MAR 1975
7 MAY 1975

[कृ. मा. प.]

निरंजन माधव - विरचित

सुभद्रा स्वयंवर

निरंजन माधव - विरचित

सुभद्रास्वयंवर

REFBK-0016301

संपादक

रामचंद्र चिंतामण ढेरे

नीलकंठ प्रकाशन, पुणें ९

मूल्य आठ रुपये पन्नास पैसे

प्रकाशक :

प्रकाश दामोदर रानडे

नीलकंठ प्रकाशन,

१६४३ (न.) सदाशिव पेठ,

टिळक रोड, पुणें ९

© रामचंद्र चिंतामण ढेरे

प्रथमावृत्ति : सप्टेंबर १९६७

मुद्रक :

राजाराम नागेश सरनाईक

सुलभ मुद्रणालय,

२९१ शनिवार पेठ, पुणे २

माझे ज्येष्ठ स्नेही

श्री. तात्यासाहेब ढमढेरे

यांस सस्नेहादर समर्पण

संपादकीय निवेदन

निरंजन माधवांच्या 'सुभद्रास्वयंवरा'ची ही सुसंपादित आवृत्ति मराठी वाचकांच्या हातीं देतांना मला अतीव आनंद लाभत आहे. निरंजन माधवांची कविता, विशेषतः त्यांचें हें 'सुभद्रास्वयंवर' चंपूकाव्य प्राचीन मराठी पंडिती काव्यांच्या संभारांत सरस असूनहि उपेक्षित राहिलें आहे. ही उपेक्षा आजकालची नसून, कविकालापासूनची आहे. कारण, या काव्याचें एकमेव हस्तलिखित महाराष्ट्रांत उपलब्ध झालें आणि त्याचें प्रथम प्रकाशन झाल्यानंतर गेल्या चाळीस वर्षांत त्याला पुनर्मुद्रणाचें अथवा विशेष अध्ययनाचें भाग्य लाभूं शकलें नाहीं.

सन १९०१ च्या सुमारास हरिभक्तिपरायण श्री. ल. रा. पांगारकर यांना नाशिक येथें एका भिक्षुकाच्या घरचीं जुनीं दप्तरें चाळीत असतांना निरंजन माधवांच्या कवितेचा हस्तलिखित-संग्रह अचानकपणें सापडला. त्यांच्या मतें, हा 'कविलिखित अस्सल संग्रह' आहे. त्यांचें म्हणणें खरें असो-नसो, एवढें मात्र खरें कीं, यांपैकीं अनेक काव्यांचें 'लेखन' कविसमकालीन आहे. प्रस्तुत 'सुभद्रास्वयंवरा'ची प्रत रचनेनंतर अवघ्या दोन महिन्यांच्या आंत तयार झालेली आहे.

निरंजन माधवांची कविता 'उच्च प्रती'ची आहे, हें जाणवतांच श्री. पांगारकरांनीं सन १९०३ मध्यें या कवीचें चरित्र व ग्रंथ यांवर 'केसरीं'त दोन-तीन लेख लिहिले आणि पुढें आपल्या 'मुमुक्षु' साप्ताहिकांतून (वर्ष ९, अंक १९–१० जून १९१५ पासून) निरंजन माधवांचीं काव्यें क्रमशः छापून काढलीं. त्यांनीं या कवितेचे एकूण तीन भाग अनुक्रमें सन १९१९, १९२५ व १९२७ मध्यें पुस्तकरूपानें प्रकाशित केले. प्रस्तुत 'सुभद्रास्वयंवर' तिसऱ्या भागांत आहे.

गेल्या चाळीस वर्षांत 'सुभद्रास्वयंवरा'ची अन्य प्रत उपलब्ध झाली नाहीं. त्यामुळें प्रस्तुत आवृत्तींत पांगारकरी संहितेचेंच पुनःसंपादन केलें आहे. निरंजन माधवांचें चरित्र व वाङ्मय यांविषयींची प्रदीर्घ विवेचक प्रस्तावना, संहितेंतील सर्व वृत्तांचे निर्देश, विस्तृत अर्थ-स्पष्टीकरण, तसेंच वृत्तलक्षणें, चूर्णिका आणि निरंजन माधवांचें घर, देवघर व घराणें, इ. उपयुक्त परिशिष्टें या विशेषांनीं समृद्ध असें हें संपादन प्राचीन मराठीच्या रसिक-अभ्यासकांना रुचेल, असा विश्वास वाटतो.

'सुभद्रास्वयंवरा'चें हें प्रकाशन इतक्या आकर्षक स्वरूपांत होण्यांत नीलकंठ प्रकाशनाचे श्री. दामुअण्णा रानडे, चित्रकार श्री. अनंतराव सालकर, निरंजन माधवांचे एक सत्प्रवृत्त वंशज श्री. शरच्चंद्र कृष्णाजी पारसनीस आणि सुलभ मुद्रणालयाचे व्यवस्थापक श्री. राजाभाऊ सरनाईक यांचा मोठा वांटा आहे. त्यांचा मी अत्यंत ऋणी आहें.

—संपादक

अनुक्रमणिका

निरंजन माधव : व्यक्ति आणि वाङ्मय १–५८

आगळी व्यक्ति : आगळें काव्य ३, घराण्याचें भ्रमण ३, निरंजनांचें बालपण अज्ञात ४, गुरुबोधाचा लाभ ५, तंजावरा-कडील राजकीय कामगिरी ६, गुरुनिधन आणि द्वितीय गुरूचा लाभ ७, पोर्तुगीजांकडे पेशव्यांचे वकील ८, दक्षिणयात्रेंत सुंदर कृष्णाचा लाभ ८, नानासाहेबांचा संशयनिरास १०, गुरुबोधाची त्रिवेणी १३, दत्त संप्रदाय १४, सिद्धेश्वर संप्रदाय १८, राममंत्र-विद्या २१, निरंजन संप्रदायाचें उदार स्वरूप २१, निरंजन माधवांची ग्रंथरचना २३, चंपू : 'गद्यपद्यमयं काव्यम्' ३४, काव्याचें नांव ३६, काव्यरचनेची प्रेरणा ३७, सुभद्रास्वयंवराचे मूलस्रोत ३९, चंपू नव्हे–विदग्ध महाकाव्य ४७, ऐसा रमणीय रैवतगिरी ४८, व्यक्तिरेखांचा चौखांबी मंडप ५०, पंडितकविमंडळ आणि निरंजन माधव ५८.

सुभद्रास्वयंवर : संहिता ५९–१२४

सर्ग पहिला ६१, सर्ग दुसरा ६९, सर्ग तिसरा ७८, सर्ग चौथा ८६, सर्ग पांचवा ९३, सर्ग सहावा १०३, सर्ग सातवा १०९–१२४.

सुभद्रास्वयंवर : शब्दार्थ व टीपा १२५–१७०

सर्ग पहिला १२७, सर्ग दुसरा १३४, सर्ग तिसरा १४१, सर्ग चौथा १४७, सर्ग पांचवा १५१, सर्ग सहावा १५८, सर्ग सातवा १६३–१७०.

सुभद्रास्वयंवर : परिशिष्टें १७१–१८४

सुभद्रास्वयंवरांतील वृत्तें १७३, सुभद्रास्वयंवरांतील चूर्णिका १७६, निरंजन माधवांचें घर, देवघर आणि घराणें (वंशावळीसह) १८१, संदर्भ-साहित्य १८३–१८४.

♠ ♠ ♠

निरंजन माधव

व्यक्ति आणि वाङ्मय

ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १६३०१
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

निरंजन माधव

व्यक्ति आणि वाङ्मय

आगळी व्यक्ति : आगळें काव्य

'सुभद्रास्वयंवर' हें मराठी साहित्यांतील एकमेव चंपूकाव्य आहे. या काव्याचा कर्ता निरंजन माधव हा महाराष्ट्राबाहेर दक्षिणेंत जन्मला, वयाच्या एकविशीनंतर साताऱ्यास छत्रपति शाहूंच्या आश्रयाला आला, तिथेंच एका साधुवृत्तीच्या महापुरुषाकडे संस्कृत शिकला, त्याच पंडिताकडून त्यानें परमार्थाचे पहिलेवहिले पाठ घेतले आणि पुढें बाजीराव पेशव्यांतर्फे तो दक्षिणेंतील अनेक राज्यांत राजकीय वकील म्हणून काम करीत राहिला. या पुढल्या राजकीय कर्तृत्वाच्या काळांत पुणें हें प्रमुख निवासस्थान ठेवून तो दक्षिणेंत वावरला आणि या काळांत राजकारणाबरोबरच त्यानें परमार्थ साधून शारदेची उपासना केली. त्याच्या शारदोपासनेंतहि वैशिष्ट्य आहे : त्याच्या वाङ्मय-संभारांत ज्ञानेश्वरचरित्रावरचें महाकाव्य आहे, अध्यात्म रामायणाच्या वळणाचें 'चिद्बोध रामायण' आहे, शंकराचार्यांच्या ग्रंथांवरचीं गद्य भाष्यें आहेत, शंकराचार्यांच्या स्तोत्रांसारखीं श्रुतिमधुर, कल्पनारम्य व वेदान्तविचारांनीं भारलेलीं स्तोत्रें आहेत आणि सुभद्रास्वयंवराच्या कथेवरचें चंपूकाव्य आहे. शिवाय, त्याची बहुतेक रचना अतिरूढ अशा ओवीछंदांत नसून श्लोकबद्ध आहे.

अशा प्रकारें प्राचीन मराठी साहित्यसृष्टींत आपल्या आगळ्या काव्यरचनेनें उठून दिसणारा हा आगळ्या व्यक्तिमत्त्वाचा आणि साधुवृत्तीचा विदग्धकवि आधुनिक मराठी रसिकांच्याहि आदराचा विषय बनण्याइतका समर्थ आहे.

घराण्याचें भ्रमण

निरंजन माधव या कविनामांत निरंजन हें या कवीचें सांप्रदायिक नांव असून, माधव हें त्याच्या पित्याचें नांव आहे. निरंजनांचें मूळ नांव बनाजी असें आहे. निरंजन हे विश्वामित्रगोत्री देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण असून, त्यांचें घराणें पैठणच्या पश्चिमेस दोन योजनांवर असलेल्या रामडोह या गांवीं कुलकर्णपण करीत होतें. या घराण्यांतील महादो बनाजी नामक पुरुषाला कुलकर्णपणाची वृत्ति सोडून

देऊन नशीब काढण्याची इच्छा निर्माण झाली आणि तो गांव सोडून विजापूरला गेला. तेथील 'पृथ्वीपतीचें सेवन' केल्यामुळें त्याची प्रतिष्ठा वाढली; परंतु या प्रतिष्ठेच्या अहंकारानें त्याची साधुवृत्ति चळली नाहीं. तो 'वैष्णवांमाजी धुरीण' होता, असें 'संप्रदायपरिमळा'च्या कर्त्यानें म्हटलें आहे.[1] या महादो बनाजीला चार पुत्र होते—'तेही साधू परम निपुण। दीन वत्सल सज्जनमान्य। कुशल पंडित सकळकळीं॥' असे होते. ते वयांत येतांच त्यांच्याकडे सर्व अधिकार सोपवून महादो बनाजी तीर्थयात्रेला गेला आणि अखेरीस 'शूर्पारक्षेत्र कृष्णातीरीं। जेथें अश्वत्थरूपें वसे नरहरी।' त्या ठिकाणीं निजधाम पावला.

महादो बनाजीच्या चौघां पुत्रांपैकीं मधला पुत्र तिमाजी हा वृत्तीनें अत्यंत भक्तिप्रवण असून मराठी व फारसी व्यवहारांत सारखाच कुशल होता. तसेंच त्याच्या व्यावहारिक सव्यसाचित्वाला संगीतकलेचीहि जोड होती. औरंगजेबानें विजापूरचें राज्य बुडविल्यानंतर त्यानें विजापूर सोडलें आणि तो परिवारासह तिरुपति येथें आला. तिरुपतीचा व्यंकटेश हा या घराण्याचा कुलदेव आणि बदामीची बनशंकरी ही कुलदेवी होय.

तिमाजीच्या पत्नीचें नांव गोदावरी असें होतें. त्याला भीमराय, व्यंकटेश, माधवराय व हनुमंतराय असे चार पुत्र आणि भगवती नामक एक कन्या होती. व्यंकटेशाच्या कृपेनें तिमाजीचा ज्येष्ठ पुत्र भीमराय याला कर्नाटकांत मोठें स्थान लाभलें. तिमाजीपंतानें पुढें 'न करितां मनुजांचें सेवन,' आपला सर्व काळ भगवद्भजन आणि पुस्तकलेखन यांत व्यतीत केला. गीता, भारत, भागवत, उपनिषदें, इ. अनेक ग्रंथांच्या प्रती करून, त्या त्यानें सत्पात्र ब्राह्मणांना अर्पण करण्याचा क्रम चालू ठेवला होता.

निरंजनांचें बालपण अज्ञात

तिमाजीचा तृतीय पुत्र माधवराय हा निरंजनांचा पिता होय. निरंजनांच्या मातेचें नांव भागीरथी असें होतें. हीं दोघेंहि वृत्तीनें भक्तिपरायण होतीं. अशा सात्त्विक मातापित्यांच्या पोटीं बनाजी ऊर्फ निरंजन यांचा जन्म कंचीप्रांतीं वेगवती नदीच्या तीरावर पक्षितीर्थासन्निध झाला. शके १६२४ (इ. स. १७०२) हें त्यांच्या जन्माचें वर्ष असावें.

---

१. निरंजन माधवांच्या कवितेचे आद्य संशोधक-संपादक-प्रकाशक श्री. ल. रा. पांगारकर यांनीं 'संप्रदायपरिमळ' ग्रंथ 'निरंजन माधवांचा कवितासंग्रह'—भाग १-मध्यें निरंजन माधवांचा म्हणून समाविष्ट केला आहे. वास्तविक हा ग्रंथ निरंजनांचा नसून, निरंजनदास नामक त्यांच्या शिष्याचा आहे. या ग्रंथांत निरंजनांच्या चरित्राविषयीं व गुरुपरंपरेविषयीं बरीच ऐतिहासिक माहिती आहे.

वयाच्या एकविशीपर्यंतचें निरंजनांचें जीवन अज्ञात आहे. परंतु त्यांच्या ज्येष्ठ चुलत्याकडे कर्नाटकांत राजकीय अधिकार होते आणि त्यांचा पिताहि 'लेखनकर्मीं अप्रतिम' असा होता, त्यामुळें त्यांना अल्पवयांतच मराठी-फारसी कारकुनीचें आणि राजकीय व्यवहाराचें शिक्षण लाभलें असावें, असें अनुमान केलें तर तें चुकीचें ठरणार नाहीं. निरंजनांच्या चुलत्याच्या कर्तृत्वाचा दाक्षिणेंतील इतिहास शोधला, तर कदाचित् यासंबंधीं तपशीलवार लिहिणें शक्य होईल.

वयाची एकविशी ओलांडतांच निरंजनांनीं आपल्या ज्येष्ठ बंधूसह कर्नाटक सोडला आणि ते दोघेहि बाजीराव पेशव्यांतर्फे साताऱ्यास छत्रपति शाहूंच्या आश्रयाला आले—

काळकर्मऋणानुबंधें । तो देश सुटला सत्सिद्ध ।
आम्हां येणें घडलें शुद्ध । महाराष्ट्र देशांतरीं ॥ (सं. प. १.८८)

पुढें निरंजनांचें गुरुपद भूषविणारे बापदेवपंडित नामक पुरुषच निरंजनांच्या महाराष्ट्रांतील आगमनाला कारणीभूत झाले असावेत. ते बाजीरावाच्या मर्जीतले असून निरंजनांच्या ज्येष्ठ बंधूचे स्नेही होते. निरंजन महाराष्ट्रांत आले ते आपल्या ज्येष्ठ बंधूसह. या वेळीं त्यांचे आईबाप विद्यमान होते कीं नाहीं, हें सांगतां येत नाहीं. तत्कालीन पद्धतीप्रमाणें त्यांचें लग्न मात्र महाराष्ट्रांत येण्यापूर्वीच झालें असावें. त्यांच्या पत्नीचें नांव गंगावती असें होतें.

गुरुबोधाचा लाभ

साताऱ्यास आल्यावर निरंजनांची संस्कृत विद्येचा अभ्यास करण्याची ओढ तीव्र बनली. त्यासाठीं योग्य मार्गदर्शकाचा शोध घेत असतां त्यांना लक्ष्मीधर बर्वे यांची कीर्ति समजली आणि निरंजनांनीं त्यांच्याकडे जाऊन त्यांना संस्कृत शिकविण्याची विनंती केली. निरंजनांची विद्याभ्यासाची तळमळ पाहून—

म्हणती अवश्य यावें नित्य । व्याकरण पढत जा, पढवीन सत्य ।
हेंचि आमुचें आहे कृत्य । विद्या दीजे विद्यार्थियां ॥ (सं. प. १.१०१)

अशा शब्दांत लक्ष्मीधरांनीं संमति दिली. लक्ष्मीधर हे 'अर्थकामातुर' गुरु नव्हते. अशा निःस्वार्थी व विद्याप्रेमी गुरूच्या मार्गदर्शनाखालीं निरंजनांनीं 'सिद्धान्त-कौमुदी'चा अभ्यास आरंभिला. लक्ष्मीधरांकडे अनेक विद्यार्थी शिकायला येत असत; परंतु नित्य सहवासांत निरंजनांची 'अर्थग्रहणाची बुद्धि' जाणवतांच त्यांचें निरंजनांवर विशेष प्रेम जडलें.

निरंजनांनीं गुरुसहवासांत सहा महिने घालविल्यावर 'परस्परें मनांचा अद्वंद्व । प्रेमा वाढला चंद्रचकोरवत् ॥' असें त्यांच्या स्पष्ट अनुभवास आलें. एके

दिवशीं लक्ष्मीधरांना देवीचा स्वप्नदृष्टान्त झाला कीं, 'तूं या विद्यार्थ्याला महाविद्येचा मंत्र दे.' हा स्वप्नदृष्टान्त होतांच लक्ष्मीधरांनीं निरंजनांना जवळ बोलावलें आणि 'तुजवरि श्रीची कृपा पूर्ण। कळों आलें आम्हां निदर्शन' असें म्हणून त्यांनीं त्यांना प्रेमपडिभरानें आलिंगन दिलें.

दुसऱ्या दिवशीं पहाटे साक्षात् त्रिपुरसुंदरीनें निरंजनांना स्वप्नदर्शन देऊन त्यांच्या हातीं प्रसाद म्हणून एक मत्स्य दिला. जागृत होतांच निरंजनांनीं तो स्वप्नवृत्तान्त गुरूंना सांगितला. ही दुसरी खूण पटतांच लक्ष्मीधरांनीं निरंजनांना तत्काळ द्वादशाक्षरी वासुदेवमंत्रासह महाविद्या प्रदान केली. या घटनेमुळें निरंजनांचा श्रीविद्याप्रधान अशा दत्त संप्रदायांत प्रवेश घडला. कदाचित् त्यांना 'निरंजन' या नांवाची प्राप्तिहि याच वेळीं झाली असावी. शके १६४६ हें या घटनेचें वर्ष असावें.

तंजावराकडील राजकीय कामगिरी

निरंजनांना श्रीविद्येचा लाभ झाला तेव्हां त्यांचें वय अवघें बावीस वर्षांचें होतें. परंतु राजकीय क्षेत्रांत जबाबदारीनें भाग घेणाऱ्या घराण्याचे संस्कार अल्पवयांतच त्यांना लाभलेले होते. 'गुणरत्नांचा परीक्षक' असलेल्या बाजीरावानें त्यांचे गुण अचूकपणें हेरले होते. त्यानें शके १६४६ (इ. स. १७२४) मध्यें निरंजनांना तंजावरच्या दरबारांत आपले राजकीय वकील म्हणून पाठविलें.

या वेळीं तंजावरला सरफोजी भोसले (इ. स. १७२१–१७२७) राज्य करीत होता. साखरखेड्याच्या लढाईंत निजाम व मराठे यांच्यांत कमालीचें वितुष्ट निर्माण झालें होतें. इ. स. १७२३ च्या पावसाळ्यांत त्रिचनापल्लीकडे निजामाचा शह आल्यामुळें सरफोजीचा बचाव करणें आवश्यक होतें. त्यासाठीं शाहूनें कर्नाटकांत फौज पाठविली होती. दक्षिणेंत अशी अवघडलेली परिस्थिति असल्यामुळें बाजीरावानें निरंजनांची तिकडे रवानगी केली.

निरंजन माधव तंजावर दरबारांत तीन वर्षें होते. या अवधींत स्वतः बाजीराव दोन वेळां (इ. स. १७२५-२६) कर्नाटकाच्या स्वारीवर गेला होता. बाजीरावाला अपेक्षित असलेली राजकीय कामगिरी तर निरंजनांनीं उत्तम प्रकारें पार पाडलीच, परंतु या कर्नाटक-निवासाच्या काळांत त्यांनीं स्वतःचीहि खूप प्रगति केली. त्यांना तिथें दरबारी वातावरणाचा जवळून परिचय घडला; पंडितजनांच्या सान्निध्यांत काव्य-शास्त्र-विनोद केल्यामुळें त्यांच्या रसिकतेला तरलता प्राप्त झाली; संगीत-नाट्यादि ललितकलांचे प्रयोग प्रत्यक्ष पहायला मिळाले; नटनकलाकोविद अशा देवदासींचीं नयनमनोहर नृत्यें हि त्यांना राजसभेंत पहायला मिळालीं; अनेक शास्त्रांचें अवलोकन करायला मिळालें आणि अनेक भाषांचें ज्ञान झालें.

या चातुर्यवृद्धीबरोबरच त्यांची श्रीविद्येची उपासनाहि चालूच होती. पुणें-साताऱ्याकडे चारदोन दिवसांसाठीं फेरी मारतांना गुरुदर्शन घडत होतें, पण गुरुसेवा आणि गुरुसहवास मात्र अशक्य होता. ही उणीव त्यांनीं सत्संगानें भरून काढली.

गुरुनिधन आणि द्वितीय गुरूचा लाभ

इ. स. १७२७ मध्यें तंजावरची कामगिरी पार पाडून पुण्यास येतांच त्यांना गुरुनिधनांची दुःखद वार्ता समजली. ही वार्ता कळतांच ते साताऱ्याला गेले आणि तिथें गुरुगृहीं भग्नहृदय अवस्थेंत त्यांनीं सात दिवसपर्यंत अन्न-पाणी वर्ज्य केलें. या सात दिवसांत त्यांना झोपहि आली नाहीं. त्यांच्या शोकाकुल मनःस्थितीचें वर्णन संप्रदायपरिमळकारानें केलें आहे—

न घडतां मनासि पूर्णार्थ । नावलोकितां चरणकमळांतें ।
प्रारब्धहीन मी भ्रांत । उदरकार्यार्थ परिभ्रमी ॥
बालक असतां स्तनंधय । मातृवियोगें जैसा होय ।
तैसा हाही पर्याय । घडों आणिला श्रीकांतें ॥
माझा मनोरथ न जातां सिद्धी । न पुरतां असोशी निरवधी ।
वियोगघटणा करी विधि । म्हणोनि बुद्धि स्तब्ध झाली ॥
दुःखें अशन प्राशन । वर्जिलें शरीरसौख्यकारण ।
वृत्तीस न घडतां समाधान । नेत्रीं जीवन अच्छिन्न ॥

(सं. प. ४. ३८–४१)

निरंजन माधव अशा भग्न मनःस्थितींत असतांना सातव्या दिवशीं रात्रीं त्यांना पहाटेच्या वेळीं थोडी निद्रा लागली आणि त्या अल्पनिद्रेच्या काळांत सद्गुरूंनीं ब्राह्मणरूपानें स्वप्नदर्शन देऊन सांगितलें कीं, " आजपासून सातव्या दिवशीं तुला माझी विभूति भेटेल. दुःख करूं नकोस. माझ्या वचनावर विश्वास ठेवून त्यांना शरण जा आणि समाधानानें रहा. " या स्वप्नादेशानें त्यांना अल्प दिलासा मिळाला; परंतु ' स्वप्नवाक्याचा विश्वास । न मानिती प्राज्ञ पुरुष ' या न्यायानें ते स्वाभाविकपणेंच उदास मनानें पुण्यास आले.

पण गुरूंचा स्वप्नादेश विफल ठरला नाहीं. बाजीरावांचे एक विश्वासू राजकीय वकील आणि निरंजनांच्या ज्येष्ठ बंधूचे मित्र बापजी पंडित हे लौकरच एका महत्कार्यासाठीं पुण्यास आले. तें नेहमींप्रमाणें निरंजनांकडेच उतरले. त्यांचीं बाजीरावांशीं बोलणीं झाल्यावर बाजीरावांनीं त्यांना व निरंजनांना एकाच कामगिरीवर (बहुधा पुनः दक्षिणेंतच) पाठविलें. या कामगिरीवर एकत्र असतांना निरंजनांना बापजी पंडितांचा घनिष्ठ सहवास घडला आणि त्यांचा पारमार्थिक अधिकार

जवळून प्रत्ययास येतांच ते त्यांना सर्वभावें शरण गेले. जें कोटिजन्मांतहि साधणें कठिण असतें, तें बापजी पंडितांनीं निरंजनांना 'एका पळांतरीं' देऊन 'कृतार्थ केलें!' या घटनेनें निरंजनांचा दत्त संप्रदाय बापजी पंडितांच्या सिद्धेश्वर संप्रदायांत विलीन झाला. ही घटना शके १६५० (इ. स. १७२८) च्या सुमारास घडली.

पोर्तुगीजांकडे पेशव्यांचे वकील

प्रथम तंजावर दरबारांत एकट्याच्या हिमतीवर पार पाडलेल्या कामगिरीमुळें निरंजनांचा आत्मविश्वास वाढला होता आणि बाजीरावांचाहि त्यांच्यावरील विश्वास वृद्धिंगत झाला होता. बापजी पंडितांबरोबर पुनः तशाच कामाचा अनुभव त्यांना आला. या दुसऱ्या कामगिरीवरून परतल्यावर इ. स. १७३३ च्या मेमध्यें बाजीरावांनीं त्यांना फिरंगियांकडे वकील म्हणून पाठविलें. २४ मे १७३३ च्या पेशवे दप्तरांतील नोंदीवरून ही गोष्ट स्पष्ट होते —

"बनाजी माधवराऊ रवाना फिरंगीयाकडे व वाळाजी विसाजी वकील रवाना सोंदे बिदरूर."[२]

इ. स. १७३१ पासूनच मराठ्यांचें पोर्तुगीजांशीं युद्ध चालू होतें. इ. स. १७३३ च्या प्रारंभीं पोर्तुगीज व हिंदु यांच्यांत मोठा धार्मिक संघर्ष निर्माण झाला होता. ह्या संबंधांत बाजीरावानें १३ फेब्रुवारी १७३३ मध्यें मालाडच्या अंताजी रघुनाथाला पत्र लिहिलें होतें.[३] तसेंच, निरंजनांना फिरंगियांकडे रवाना करण्याच्या आदल्याच दिवशीं त्यानें अंताजी रघुनाथाकडे 'नाजुक खर्चा'साठीं मोहरा पाठवल्याची नोंद आहे. या संघर्षमय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर निरंजनांची फिरंगियांकडे वकील म्हणून झालेली पाठवणी त्यांच्या राजकीय कर्तृत्वाची सूचक आहे, यांत संशय नाहीं.[४]

दक्षिणयात्रेंत सुंदरकृष्णाचा लाभ

इ. स. १७३९ मध्यें चिमाजीअप्पांनीं वसईची मोहीम फत्ते केल्यावर पोर्तुगीजांचा प्रश्न कांहीं काळ मिटला आणि त्यामुळें निरंजन माधव पुण्याकडे परतले असावे. इ. स. १७४० मध्यें बाजीरावांचें निधन घडलें आणि पेशवेपद बाळाजी बाजीरावाकडे आलें. बाळाजी बाजीरावांनींहि निरंजन माधवांचा पूर्वाधिकार चालू ठेवला. त्यांच्या कारकीर्दीच्या प्रारंभींहि निरंजनांना पुनः दक्षिणेंत जावें लागलें असावें, असें 'संप्रदायपरिमळां'तील पुढील उल्लेखावरून दिसतें—

---

२. पेशवे दप्तर, भाग ३०, पृ. ३७८.

३. मराठी रियासत, मध्यविभाग, परिच्छेद ११.

४. प्राचीन मराठी कविपंचक, पृ. १२२.

बाजी भूपाळनंदन । नानाप्रभू अति प्रवीण ।
तत्सेवनीं रात्रिदिन । अवकाश न घडे सुटाया ॥
सर्व संस्थानीं मजप्रति । पाठवितां राजकार्यार्थीं ।
दाक्षिणात्य सर्व नृपति । करिती प्रीति गुणग्राही ॥

(सं. प. ३. १८६-१८७)

दाक्षिणात्य भूपतींच्या प्रीतीला पात्र झालेल्या निरंजनांना दक्षिणेंतील तीर्थक्षेत्रें पाहण्याची अतीव ओढ वाटत होती; परंतु ' बहुत कार्यभागभारा 'मुळें ' सुटावया नसे अवसर ', अशी परिस्थिति निर्माण झालेली होती. त्यांनीं ' काशीप्रयागादि त्रिस्थळी यात्रा ' पूर्वीच केलेली होती; परंतु दक्षिणयात्रेची उत्कंठा तशीच दाबून ठेवावी लागली होती. विशेषतः त्याच्या दत्त संप्रदायाचें मूळपीठ असलेल्या बेलूरचें[५] दर्शन त्यांना व्यावयाचें होतें. त्यांच्या या उत्कंठेला तृप्तीचें वरदान लाभावें म्हणून एक आपत्ति—इष्टापत्तिच होती ती—निर्माण झाली.

या सुमारास कांहीं दुष्ट मत्सरी लोकांनीं निरंजनांविरुद्ध खोटेंनाटें सांगून नानासाहेबांच्या मनांत त्यांच्याविषयीं अप्रीति निर्माण केली. निरंजन माधव फार चाणाक्ष होते. त्यांनीं या कलुषित वातावरणाचा रंग ओळखला आणि नानासाहेबांकडून कांहीं प्रतिकूल सूचना येण्यापूर्वीच तीर्थयात्रेच्या निमित्तानें त्यांनीं पेशव्यांच्या सेवेंतून मुक्तता करून घेतली. या संबंधांत प्रा. पंगूंनीं असें अनुमान केलें आहे कीं, " इ. स. १७४०-४१ च्या दरम्यान नानासाहेबांचें बाबूजी नाइकांशीं व रघूजी भोसल्यांशीं जें वैमनस्य पडलें होतें, त्यावरून वनाजी या दोघांना पेशव्यांविरुद्ध सामील आहे, अशी खोटी गोष्ट कोणीं तरी दुष्टाव्यानें नानासाहेबांना सांगितली असणें शक्य आहे."[६] नानासाहेबांची इतराजी ही इष्टापत्ति मानून निरंजनांनीं दक्षिणेंतील ' सर्व देवतादर्शनें, महानदी-तीर्थस्नानें आणि महाक्षेत्रसेवनें ' केलीं. ही तीर्थयात्रा आटोपून ते गोकर्णप्रांतीं बेलूरला आले. बेलूर येथें त्यांच्या दत्त संप्रदायाचें मूळपीठ होतें. तेथील मठांत त्यांचे परमगुरु सच्चिदानंदस्वामी यांनीं स्थापिलेलें श्रीचक्र आणि सुंदरकृष्णाची मूर्ति होती. ही मूर्ति त्यांना नारदाकडून विंध्य पर्वतावर मिळाली होती, असें म्हणतात. ती पुराणप्रसिद्ध मुचकुंदानें पूजिलेली होती, अशीहि सांप्रदायिक श्रद्धा चालत आलेली होती. सच्चिदानंदस्वामींच्या मागें तिची उपासना ब्रह्मानंदांनीं केली आणि त्यानंतर त्यांचे पुत्र व शिष्य शिवानंद यांनीं केली. परंतु शिवानंदांनीं मात्र संप्रदाय वाढविण्यांत रस घेतला नाहीं आणि कोणालाहि शिष्य बनविलें नाहीं; त्यामुळें उपासना खंडित झाली होती. त्यांच्या-

---

५. हें स्थान कारवारमधील सुप्रसिद्ध गोकर्ण-महाबळेश्वरापासून अवघें १२ मैल दूर आहे. दक्षिणेंतील एक शिल्पकेंद्र म्हणून याची ख्याति आहे.

६. प्राचीन मराठी कविपंचक, पृ. १२२.

नंतर मठांत केवळ कांहीं स्त्रिया राहिल्या होत्या. त्यांना पूजेचा अधिकार नव्हता. अशा परिस्थितींत मंदिराचें दार बंद झालें. तें बलवंतांनाहि उघडणें अशक्य होऊन बसलें. तेव्हांपासून मंदिराच्या दाराची पूजा करण्याचीच प्रथा पडलेली होती. दार उघडण्याचा प्रयत्न करणाऱ्या लोकांना असा दृष्टान्त झाला होता कीं, 'येतां पूजाधिकारी। कपाट उघडेल निर्धारीं।' तेथील लोक या दृष्टान्ताचा प्रत्यय येण्याची वाट पाहत होते. निरंजन माधव तिथें पोंचल्यावर त्यांनीं श्रीचक्राचें दर्शन घेतलें आणि सुंदरकृष्णाच्या मंदिरासमोर जाऊन त्यांनीं देवाला नमस्कार केला, तोंच —

अमाप कपाटबंधन। मुक्त होतां झालें दर्शन।
तत्रत्य जनां निदर्शन। घडतां आल्हाद सर्वांसी॥ (सं. प. ३.२०७)

प्रत्यक्ष मूर्तीची पूजा दीर्घ काळपर्यंत झालेली नव्हती. निरंजन माधव हे बेलूरच्याच परंपरेंतील असून, 'पूजाधिकारी' असल्याचा अद्भुत प्रत्यय तिथल्या लोकांना आलेला होता. त्यांनीं निरंजनांना कांहीं काळ तिथें राहून घेतलें. ते त्या ठिकाणीं शंभर दिवस राहिले; त्यांनीं त्रिकाळ देवाची पूजाअर्चा केली; वेदान्त-ग्रंथांवर प्रवचनें केलीं आणि आपल्या पांडित्यानें, रसिकतेनें व भक्तिप्रवणतेनें स्थानिक लोकांना भारून टाकलें.

बेलूर येथें तीन महिन्यांहून अधिक काळ राहिल्यानंतर तेथील लोकांना स्वप्नदृष्टान्त झाला कीं, 'हे मूर्ति अर्पिजे निरंजनासी।' लोकांनीं तो दिव्य आदेश मानला आणि ती परंपरापुनीत कृष्णमूर्ति घेऊन निरंजन माधव पुण्याकडे निघाले. येतांना त्यांनीं गोकर्ण-महाबळेश्वराचें दर्शन घेतलें. त्या ठिकाणीं एका ब्राह्मणानें त्यांना लक्ष्मीनारायणाची मूर्ति अर्पण केली. वाटेंत कोल्हापूरच्या महालक्ष्मीचें दर्शन घेऊन या दोन्ही मूर्ति त्यांनीं पुण्यास आणल्या आणि मोठ्या भक्तिभावानें आपल्या घरांत त्यांची विधिपूर्वक स्थापना केली.

नानासाहेबांचा संशयनिरास

निरंजन माधव दक्षिणयात्रा संपवून पुण्यास आले, तेव्हां नानासाहेबांच्या मनांतील किल्मिष दूर झालें होतें.

बाळाजीपंडित प्रभुवर। मुख्यप्रधान परी राजेश्वर।
कृपा करोनि महत्तर। स्वाधिकार यथापूर्वक॥
शिबिकादि सकळसंपदा। देवोनि अर्पिलें महत्पदा।
श्रीरंगपट्टणीं नियोगधंदा। कथिला जेणें॥ (सं. प. ३. २२४-२२५)

मुख्य प्रधान असूनहि राजराजेश्वराचें वैभव प्राप्त केलेल्या नानासाहेबानें निरंजन माधवांना पुनः महत्पदावर चढविलें; त्यांना पालखीपदाचा मान पूर्ववत्

अर्पण केला आणि अधिकाराला साजेशा वैभवानिशीं त्यांना श्रीरंगपट्टणास वकील म्हणून पाठविलें.

इ. स. १७४६ ते १७५८ अशीं बारा-तेरा वर्षें निरंजन माधव श्रीरंग-पट्टणकडच्या राजकीय उलाढालींत जबाबदारीनें भाग घेत होते. इ. स. १७४६ ते १७५२ पर्यंत ते तिकडच्या खंडणीवसुलीच्या वाटाघाटी करीत होते. अर्थात् या काळांत त्यांना राजकीय कामांसाठीं महाराष्ट्रांतहि यावें लागत असे. दि. २६ ऑक्टोबर १७४९ रोजीं तेरढोकीजवळील जवळें गांवाहून लिहिलेल्या पत्रांत त्यांनीं नानासाहेबांना नासिरजंगाच्या हालचाली कळविल्या आहेत.[७] इ. स. १७५१ च्या सुमारास ते औरंगाबादला पेशव्यांचे वकील म्हणून काम पाहत होते. दि. २४ मार्च १७५१ रोजीं औरंगाबादहून लिहिलेल्या पत्रांत, पेशव्यांनीं दमाजी गायकवाडावर मिळविलेल्या विजयाबद्दल त्यांनीं आनंद व्यक्त केला आहे.[८] याच पत्राच्या अखेरीस 'पुत्राचे मनसबेविषईं स्मरणार्थ लिहिलें आहे' असें एक वाक्य आहे. यावरून निरंजन माधव आपल्या पुत्रालाहि पेशव्यांच्या सेवेंत प्रविष्ट करण्याच्या विचारांत होतें, असें दिसतें.

दि. १८ एप्रिल १७५१ मध्यें निरंजनांनीं सलाबतजंगाविषयींची वार्ता कळविली असून, त्याच्याशीं सख्य ठेवण्याचा सल्ला पेशव्यांना दिला आहे. या पत्राच्या प्रारंभींचा पुढील कांहीं भाग पहा, म्हणजे निरंजनांच्या दरबारी गद्यशैलीचें स्वरूप कळून येईल—

"काडलूरसंगमचें पत्र सादर जालें त्यावरून सेवकास परम हर्ष जाला. स्वामींनीं सीघ्रच सलाबतजंगासी स्नेह संपादून आमित्राचे पारपत्यास आगमन केलें हें ईश्वरें मोठें कार्य केलें. पुढेंही येश शत्रुपराभवाचें व राज्याचे बंदोबस्तीचें स्वामीस प्राप्त होईल. सर्व सरदार आश्रा स्वामीचा इछितात. सर्वांस स्वामीवाचून दुसरा भरवसा आणिकांचा नाहीं. पुण्यप्रतापें सर्व घडून येईल."[९]

दि. २६ एप्रिल १७५१ च्या पत्रांत त्यांनीं दमाजीविरुद्ध पेशव्यांना सहकार्य देण्याची सलाबतजंगाची तयारी कळविली आहे.[१०] आणि पुढच्याच महिन्यांत सलाबतजंगाच्या घरसोडपणाचें वर्णन केलें आहे.[११] दि. ७ फेब्रुवारी १७५२ रोजीं निरंजनांनीं राणोजी नायकाच्या द्वारां म्हैसूरचा सेनापति दलवाई व

७. पेशवे दप्तर, भाग २६, पृ. ७७-७८.
८. पेशवे दप्तर, भाग २६, पृ. १२५.
९. पेशवे दप्तर, भाग २६, पृ. १३७-१३८.
१०. पेशवे दप्तर, भाग २६, पृ. १४२-१४३.
११. पेशवे दप्तर, भाग २६, पृ. १४५.

हैदरअली यांच्या हालचालींची वार्ता कळविली आहे.[१२] दि. १५ जानेवारी १७५५ रोजीं पेशव्यांनीं निरंजन माधवांच्या हस्तें श्रीरंगपट्टणच्या राजाला वस्त्रें पाठविल्याचा उल्लेख मिळतो.[१३] इ. स. १७५६ च्या मार्चमध्यें कडूरहून महादोबा पुरंदरे यांना लिहिलेल्या पत्रांत त्यांनीं कळविलें आहे कीं, श्रीरंगपट्टणची स्थिति आर्थिक हलाखीची असून, तुंगभद्रेवर सैन्य पाठवावें—

" रामरायांसी यांसी बोलणेंहि जाले आहे, परंतु संस्थान वोढीखालें पडलें. दुसरें मोगलाचा शहहि आहेच. घाटाखालील फौजेस खर्चास पाठवावें. स्वामींनी वरचेवर पत्रांची रेज लावावी. सांडणीस्वार पाठवावे. जितकें आपलें आगमन समीप होईल तितके कार्य साधतें, यास्तव तुंगभद्रातीरीं आलियाचें वर्तमान सीघ्र लिहून पाठविलें पाहिजे. "[१४]

दि. २९ एप्रिल १७५८ च्या पत्रांत, निरंजनांनीं, आपण बळवंतराव मेहेंदळ्यांना देवनहळ्ळी येथें मिळाल्याचें कळविलें आहे आणि म्हैसूरचा राजा नंदराज याच्या धोरणाविषयींहि लिहिलें आहे.[१५] याच सुमारास निरंजनांना तांतडीनें पुण्यास येण्याचें पत्र पेशव्यांनीं पाठविलें होतें. परंतु त्यांचा मुक्काम नागमुगळी येथें हालल्यामुळें त्यांना हें पत्र मिळूं शकलें नाहीं.

पुढें इ. स. १७५८ च्या ऑगस्टपर्यंत निरंजन माधव म्हैसूरच्या राजाकडे खंडणीच्या वसुलीचा प्रयत्न करीत होते. त्यानंतर ते पुण्यास परतले असावेत. ऑक्टोबरांत हैदरनें बंगलोरवर केलेल्या स्वारीला तोंड देण्यासाठीं गोपाळराव पटवर्धन पुढें झाले, परंतु त्यांनीं हैदरकडून ' सलाबत खाऊन ' मोर्चे उठविल्यामुळें म्हैसूरच्या राजानें शिरजोरीनें खंडणी नाकारली.

श्रीरंगपट्टणाहून परतल्यानंतर निरंजन माधव राजकारणांतून निवृत्त झाले आणि त्यांनीं आपला उर्वरित सर्व जीवनकाल उपासनेंत आणि ग्रंथरचनेंत व्यतीत केला. निवृत्त होतांच त्यांच्या मूळच्या ओढी उफाळल्या—

महाकार्यभागघटना । प्रारब्धप्रवाहें घडली पूर्णा ।
परि मुख्य विश्रांति या मना । अध्यात्मचिंतन हरिभक्ति ॥
नित्य ब्राह्मणसहवास । अखंड असतां अभ्यास ।
कविताप्रेरणा मनास । घडे विलास शारदेचा ॥

(सं. प. ३. २२६–२२७)

---

१२. पेशवे दप्तर, भाग २८, पृ. १०१-१०२.
१३. पेशवे दप्तर, भाग २८, पृ. १०२.
१४. पेशवे दप्तर, भाग २८, पृ. १४८-१४९.
१५. पेशवे दप्तर, भाग २८, पृ. १५०-१५१.

इ. स. १७५८ नंतर सुमारें पंधरा-वीस वर्षें भक्तीच्या मंचावर शारदेचा मुक्त विलास चालू राहिला आणि त्या विलासाचीं वर्णनें शब्दबद्ध करून निरंजन माधवांनीं कृतार्थ मनानें या जगाचा निरोप घेतला.

गुरुबोधाची त्रिवेणी

निरंजनांनीं लक्ष्मीधर बरवे आणि वापदेव पंडित हे दोन गुरु केले होते, असें 'संप्रदायपरिमळा' वरून दिसतें. 'मी मूढ असून, लक्ष्मीधर व वापदेव यांच्या करुणेच्या बळावरच काव्यरचना करूं शकलों,' असें उद्‌गार त्यांनीं 'सुभद्राचंपू'च्या अखेरीस काढले आहेत. प्रथम गुरु लक्ष्मीधर समाधिस्थ झाल्यावर त्यांनीं पहिल्या गुरूच्या स्वप्नादेशावरूनच दुसरा गुरु केला. त्यामुळें गुरुद्रोहाच्या पातकांतून त्यांची मुक्तता झालेली आहे. परंतु दोन गुरुपरंपरांमुळें आपल्या शिष्यांचा आणि शिष्य-परंपरेंतील भावी व्यक्तींचा बुद्धिभेद होऊं नये, म्हणून त्यांनीं या संदर्भांत कांहीं निश्चित मार्गदर्शन केलें आहे—

आह्मांपासुनि इतःपर । ऐसा संकेत निर्धार ।
मंत्रमार्गीं लक्ष्मीधर । गुरु परमगुरु उच्चारिजे ॥
ज्ञानमार्गीं बापदेव । त्यांचा कथावा सांप्रदाव ।
हा संकेतदृढाव । धरावा आमुच्या शिष्यकुळीं ॥
मंत्रयोगीं लक्ष्मीधर । ज्ञानयोगीं बापदेव गुरुवर ।
दोघेही एकाकार । मंगळाचरणीं वंदिजे ॥ (सं. प. ४. ११५-११७)

आपल्या शिष्यकुळानें मंत्रमार्गांतील साधनेच्या क्षेत्रांत लक्ष्मीधर व त्यांची गुरुपरंपरा यांचा उच्चार करावा आणि ज्ञानमार्गांतील साधनेच्या क्षेत्रांत बापदेव व त्यांची गुरुपरंपरा यांचा उच्चार करावा, असें स्पष्ट मार्गदर्शन निरंजनांनीं केलें आहे. लक्ष्मीधर आणि बापदेव हे 'दोघेहि एकाकार' आहेत, हा आपला श्रद्धाभाव त्यांनीं व्यक्त केला आहे. या उभय बोधप्रवाहांच्या समरसीकरणावर त्यांनीं गंगा-यमुनासंगमाचें मनोहर रूपक केलें आहे. ते म्हणतात—

लक्ष्मीधरपर्यंत सांप्रदाय । पूर्वीं आहेचि निश्चय ।
तो या लोकीं यमुनाप्राय । सर्व अपायनाशक ॥
सिद्धेश्वर सांप्रदाय भागीरथी । तेही मिळाली यमुनेप्रती ।
पूर्वीं यमुना असतां ख्याती । भागीरथीचि यापुढें ॥
दोहीं वोघांचा संगम । घडला प्रयाग सांगे निगम ।
सिता-असिता-सरितायोग उत्तम । जगदोद्धारक ॥
राममंत्रविद्या पावन । हे गुप्त सरस्वती जाण ।
त्रिवेणी हे प्रमाण । मुक्तिदात्री ॥ (सं. प. ४. १०५-१०८)

लक्ष्मीधरांचा दत्त संप्रदाय ही यमुना आणि बापदेवांचा सिद्धेश्वर संप्रदाय ही भागीरथी असून, उभय प्रवाहांच्या संगमानंतर केवळ भागीरथी हेंच नांव जसें रूढ झालें, तसेंच सिद्धेश्वर संप्रदायांत दत्त संप्रदाय विलीन झाल्यावर सिद्धेश्वर संप्रदायाचेंच आपल्या पारमार्थिक जीवनांत प्राधान्य राहिलें, असें निरंजनांना सुचवावयाचें आहे. या दोन प्रवाहांच्या संगमांत राममंत्रविद्येची गुप्त सरस्वती येऊन मिळाल्यानंतर या तीन प्रवाहांची त्रिवेणी निर्माण झाली, असेंहि निरंजन सांगतात. 'संप्रदायपरिमळां'त या तीनहि प्रवाहांचा परिचय कमीअधिक प्रमाणांत घडविलेला आहे, तो आपण क्रमशः पाहूं.

दत्त संप्रदाय : दत्तात्रेय – विमलानंद – अमृतानंद – ब्रह्मानंद – विमलानंद– सच्चिदानंद – ब्रह्मानंद – लक्ष्मीधर – निरंजन अशी निरंजनांची दत्त-संप्रदायी परंपरा आहे. या परंपरेंतील पहिले ऐतिहासिक पुरुष विमलानंद यांना निरंजनांनीं 'साक्षात् शिवावतार' म्हटलें आहे. यांपैकीं सच्चिदानंदस्वामी हे महान् योगी होते. त्यांची समाधि सहा-सहा महिने टिकत असे. त्यांनीं गोकर्ण-महाबळेश्वरानजिक शुभोदा नदीच्या कांठीं असलेल्या महावनांत तप आचरलें होतें. हें तप आचरीत असतां त्यांना नारदाचें दर्शन झालें. नारदानें त्यांना द्वादशाक्षरी वासुदेवविद्येचें रहस्य स्पष्ट केलें आणि विंध्य पर्वतावर नेऊन तिथें मुचकुंद-पूजित अशी सुंदरकृष्णाची मूर्ति प्राप्त करून दिली—

त्यानंतर ते परममूर्ती । पूजिती सच्चिदानंद अतिभक्तीं ।
झाली सर्वलोकीं ख्याती । सर्व देखती अभिनव ॥
तयांच्या प्रसादें कलिजनां । भक्ति लाधली सद्गुणा ।
तरले जे भजले अनन्या । भक्तियोगें पावनें ॥

(सं. प. ३. १७१–१७२)

ही सुंदर कृष्णाची मूर्ति सच्चिदानंदांकडून ब्रह्मानंदांकडे आली. ते तिची उपासना बेलूर येथील स्वमठांत करीत असत. त्यांच्यानंतर त्यांचे सुपुत्र आणि शिष्य शिवानंद यांनीं तिची उपासना केली; परंतु ते 'शिष्य न करतां । संप्रदायविस्तार न पावतां' शिवलोकाला गेल्यामुळें सुंदरकृष्णाच्या उपासनेंत खंड पडला. पुढें कांहीं काळानें अत्यंत अद्भुत रीतीनें निरंजनांना या मूर्तीचा लाभ झाला आणि त्यांनीं तिची स्थापना पुण्यांतील आपल्या घरांत केली, याचा वृत्तान्त आपण वर पाहिलाच आहे.

निरंजनांचे गुरु लक्ष्मीधर यांचे गुरुबंधु शिवानंद १७४० पूर्वीच समाधिस्थ झाले असावेत. त्यांचा 'देवीमाहात्म्य' हा ग्रंथ व अन्य रचनासंभार प्रकाशित झालेला आहे. शुंभ दैत्यानें मातृकांसह युद्धाला आलेल्या देवीचा अधिक्षेप केला

असतां, देवीनें त्याला कोणतें उत्तर दिलें, तें शिवानंदांच्या प्रभावी शब्दांत पाहण्यासारखें आहे—

अंबा म्हणे रे दुरात्मका । तूं काय मातें भिडसी मशका ।
घेऊनि आलासि थोर कटका । भीतोसि अटका मातृकांच्या ॥
मूर्खाधमा तूं नेणें कांहीं । अब्धोसि लहऱ्या भिन्न काई ।
मजवेगळी शक्ती कोणी नाहीं । मी एकांगी पाहीं प्रत्यक्ष ॥
म्हणोनि लीलाविनोदसृष्टी । मातृका वरिल्या निजांगपृष्ठीं ।
एकली अंबा सादृष्टी । शुंभाच्या दृष्टीं भासली ॥

या शिवानंदांच्या कुळांतील विठ्ठल कृष्णाजी कायकिणी यांनीं रचलेले 'गोकर्णमाहात्म्य' व 'मंगेशमाहात्म्य' हे दोन ग्रंथ उपलब्ध आहेत.'[१६]

ब्रह्मानंदांचे शिष्य लक्ष्मीधर हे एक विलक्षण अधिकाराचे पुरुष होते, असें 'संप्रदायपरिमळां'तील वर्णनावरून दिसतें. त्यांच्या वर्णनाच्या ओव्या येथें उद्धृत करण्याचा मोह आवरत नाहीं—

सकळ विद्या सकळ कळा । तेहीं येथेंचि आश्रय केला ।
सारांश मुख्य ज्ञानकळा । व्यासवासिष्ठवाल्मिकितुल्य ॥
मंत्रशास्त्रीं दक्षिणामूर्ती । व्याख्यानकथनीं बृहस्पती ।
स्वरूप पाहतां मदनमूर्ती । त्रैलोक्यप्रमदामोहक ॥
आचार महाऋषीप्रमाणें । नारद तैसें वीणावादन ।
आलाप गंधर्वांसमान । कविता प्रत्यक्ष कालिदास ॥
ज्यांची कविता ऐकतां श्रवणीं । ब्रह्मानंदस्वामी सद्गुरूनीं ।
लक्ष्मीधर कालिदास या अभिधानीं । गौरविलें सत्कृपें ॥
ज्याचे ग्रंथ गीतप्रबंध । सर्व गाताति गायक सुविद्द ।
जैसे पूर्वीं रामानंद । वरदराज तत्तुल्य ॥
भूतदया निःसंगता । संसारविषयीं अलोलुपता ।
लक्ष्मी आनंदी उभयता । महासती असतां कळत्र ॥
त्याहीं परस्परें अभेदपणीं । प्रीतीनें वर्तती जैशा बहिणी ।
एकास एक न देखतां क्षणीं । हानि वाटे परस्परें ॥
श्रीमंत कीर्तिमंत प्रतापवंत । विद्याकुळशीळ आचारवंत ।
सर्व येवोनि संतमहंत । नित्य दर्शन सेविती ॥

---

१६. प्रा. अ. का. प्रियोळकर यांचें कारवार येथील महाराष्ट्र साहित्य संमेलनांत झालेलें अध्यक्षीय भाषण, पृ. ३-५.

जितुके कळाधर पृथ्वीवरी । जे जे आले शाहूनगरीं ।
तेहीं प्रथम येवोनियां मंदिरीं । कृपा पावोनि उद्धरावें ॥
ऐशी अनंत गुणांची ख्याती । किती मी वर्णीन मूढमती ।
बरवे उपनाम कोंकण प्रांतीं । उत्पन्न चित्तपावन सत्कुळीं ॥
ज्ञानेश्वरीचा करोनि शोध । लोकीं केली प्रसिद्ध ।
ते गोविंदभट्ट बरवे सत्सिद्ध । तीर्थस्वरूप या स्वामीचे ॥
प्रसिद्ध नाम बापूभट्ट । ऐसें आळविती श्रेष्ठ श्रेष्ठ ।
सकळ राजप्रधान इष्ट । दैवततुल्य मानिती ।
शाहूराजयांची परमप्रीती । ग्रामभूमि देऊन स्थिति ।
चालविती जैशी निश्चिती । घडे यांच्या तपाची ॥

(सं. प. १.११०-१२२)

बापूभट्ट या नांवानें ओळखले जाणारे हे लक्ष्मीधर बरवे गोविंदभट्ट बरव्यांचे पुतणे होत, ही गोष्ट महत्त्वाची आहे. ज्यांनीं 'ज्ञानेश्वरीचा करोनि शोध, लोकीं केली प्रसिद्ध' ते गोविंदभट्ट बरवे प्राचीन मराठीच्या अभ्यासकांना परिचित आहेत. ज्ञानेश्वरीची 'पदपद्धति' करणारे गोविंद बरवे ते हेच होत, असें निश्चयपूर्वक मानायला जागा आहे.

शके सोळा शतें तेरोत्तरें । तैं पद्धती केली ज्ञानेश्वरें ।
गोविंदबरवामुखान्तरें । जगज्जीवन लेखक ॥

अशी नोंद प्रत्येक अध्यायाच्या अंतीं असणाऱ्या पदपद्धतियुक्त पोथ्या संशोधकांना उपलब्ध झालेल्या आहेत. अशाच एका प्रतीचा परिचय इतिहासाचार्य राजवाडे यांनीं भा. इ. सं. मंडळाच्या शके १८३४ च्या इतिवृत्तांत करून दिलेला आहे. ही प्रत इ. राजवाडे यांना औरंगाबाद येथील दत्तोपंत थत्ते यांच्या वाड्यांत उपलब्ध झाली होती. हीच प्रत सध्यां धुळें येथें राजवाडे संशोधन मंडळाच्या संग्रहांत (क्र. ३४६) सुरक्षित आहे. डॉ. हर्षे यांना पहावयास मिळालेल्या ज्ञानेश्वरीच्या प्रतींपैकी श्री. केशव नारायण विप्र यांच्याकडील प्रतहि अशीच पदपद्धतियुक्त असून, तिच्या शेवटीं पुढील संस्कृत श्लोक दिलेले आहेत—

गीतागंगावगाहार्थं रामभूरसभूमिते ।
शाकेऽकरोत्त्रितापार्त्तः पदसोपानपद्धतिं ॥ १ ॥
प्रजापतौ शुभे वर्षे पंचम्यां शुक्लमाधवे ।
भावार्थदीपिकां धृत्वा ज्ञानदेवविनिर्मितां ॥ २ ॥

[गीतागंगेंत अवगाहन करण्यासाठीं, ज्ञानदेवांनीं निर्मिलेली भावार्थदीपिका (हातीं) धरून, वैशाख शु. ५, प्रजापति नाम संवत्सर, शके १६१३ या दिवशीं पदपद्धतीचा घाट तयार केला.]

'श्रीशिवराज्याभिषेककल्पतरु' हा शिवछत्रपतींच्या तांत्रिक पद्धतीच्या अभिषेकाविषयींचा ग्रंथ कोण्या गोविंद नारायण बरव्यांनीं लिहिला आहे. हे गोविंद नारायण बरवे गागाभट्टविरोधक निश्चळपुरीचे सहकारी दिसतात. हा ग्रंथ निश्चळपुरी आणि गोविंद बरवे यांच्या संवादरूपानें लिहिलेला आहे. या ग्रंथाच्या रचनाकाल आश्विन शु. ५, बुधवार, आनंद नाम संवत्सर, शके १५९६ असा ग्रंथाच्या शेवटीं दिलेला आहे. या ग्रंथाचे कर्ते गोविंदभट्ट वरवे हे विद्वान् असून, त्यांची आणि निश्चलपुरीची भेट शिवराज्याभिषेककालापूर्वी काशी येथें झाली होती. तसेंच, त्यांनीं सपत्नीक कोंकणांतील तीर्थस्थळांची यात्रा केलेली होती, असें त्यांच्या प्रस्तुत ग्रंथांतील उल्लेखांवरून दिसतें.

'पदपद्धतिकार' गोविंद बरवे आणि 'श्रीशिवराज्याभिषेककल्पतरुकार' गोविंदभट्ट वरवे हे दोघे एकच कीं वेगळे ? या दोन ग्रंथांच्या रचनाकालांत केवळ अठरा वर्षांचें अंतर आहे त्यामुळें कालदृष्ट्या त्यांच्या ऐक्यात्म्याला प्रत्यवाय येत नाहीं श्री. ग. ह, खरे आपल्या 'पदपद्धति' विषयक एका टिपणांत ('ज्ञानेश्वर', २. २, पृ. ४८) लिहितात : "या दोन घटनांत अंतर सारें अठरा वर्षांचें आहे. एकच गोविंद बरवे दोन्ही सालांत जिवंत असणें अगदीं शक्य आहे. तेव्हां, 'पदपद्धति' याच गोविंद बरव्यानें केली, असें सध्यां गृहीत धरण्यास हरकत नाहीं." श्री. खरे यांच्या या अनुमानाला पुष्टि देणारी आणि गोविंद बरव्यांच्या घराण्यासंबंधीं विशेष सांगणारी माहिती 'संप्रदायपरिमळां'तील वरील उताऱ्यांत आहे.

गोविंद बरवे यांचे हे पुतणे श्रीविद्येचे वा महाविद्येचे अधिकारी होते आणि मंत्रशास्त्रांत केवळ 'अपर दक्षिणामूर्ति' होते, हा संप्रदायपरिमळकाराचा अभिप्राय 'श्रीशिवराज्याभिषेककार' गोविंद बरव्यांच्या परंपरेतील तंत्रविद्येशीं जुळणारा आहे शिवाय, हे गोविंद बरव्यांचे पुतणे लक्ष्मीधर बरवे 'शाहू राजाच्या परम प्रीतीस पात्र' होऊन साताऱ्यास स्थायिक झालेले होते, हें 'संप्रदायपरिमळां'तील वृत्त शिवछत्रपतींशीं संबंध प्रस्थापित करणाऱ्या गोविंद बरव्यांच्या पुतण्याच्या बाबतींत संभवनीय वाटतें. त्यामुळें, 'श्रीशिवराज्याभिषेककल्पतरु' आणि 'ज्ञानेश्वरीपदपद्धति' या दोन्ही कृतींचे कर्ते असलेले गोविंद बरवे वेगळे नसून एकच होत, असें मानावयास अडचण उरत नाही. [१७]

अशा या ज्ञानेश्वरीसंशोधक गोविंद बरव्यांचे पुतणे लक्ष्मीधर बरवे यांचें पहिलें दर्शन निरंजनांना झालें, तें त्यांचें ज्ञानेश्वरीच्या आधारें गीतेवर प्रवचन चालू असतांनाच !—

---

१७. 'इंद्रायणी', जानेवारी १९६३, पृ. ४७-५१.

हातीं महा रुद्रवीणा । स्वरें ज्ञानेश्वरीपारायणा ।
करित असतां आनंद मना । झाला ज्यांच्या श्लोकार्थें ॥
' अनन्याश्चिन्तयन्तो मां ' हा श्लोक । जेथें व्याख्यान सम्यक ।
त्याच समयीं मज दीनाचा उल्लेख । ऐकतां हरिख वाटला ॥

रूपांत मदन, स्वरांत गंधर्व, काव्यकर्तृत्वांत कालिदास व वीणावादनांत नारद असलेले लक्ष्मीधर आचाराच्या बाबतींत महर्षि होते. साताऱ्यांत येणारे कलावंत लक्ष्मीधरांना मानाचा मुजरा करण्यासाठीं आवर्जून येत असत आणि दूरवरचे गायक त्यांचे गीतप्रबंध गात असत स्वतः छत्रपति आणि अनेक राजेरजवाडे व सरदार-दरकदार त्यांच्या योगक्षेमाची चिंता वाहत असत.

अशा या महापुरुषाच्या चरणांशीं बसून, निरंजनांनीं प्रथम सिद्धान्त-कौमुदीचा अभ्यास केला आणि पुढें सहा महिन्यांच्या काळांत लक्ष्मीधरांना या शिष्याविषयीं विशेष प्रीति वाटूं लागली. त्यांनीं निरंजनांना महावाक्याचा उपदेश करून श्रीविद्येंतील शिष्य म्हणून अंगीकारलें.

अशा प्रकारें निरंजनांच्या पारमार्थिक जीवनाचें पायाभरण दत्त संप्रदायानें केलें. दत्त संप्रदायाची ही धारा श्रीविद्याप्रधान आहे–तींत मंत्रविद्येला आणि श्रीचक्राच्या पूजेला अत्यंत महत्त्व आहे, हें ध्यानीं व्यावयास हवें. दत्त संप्रदायाच्या या धारेचें मूळपीठ असलेल्या बेलूरमधील मठांत श्रीचक्र असल्याचा उल्लेख ' संप्रदायपरिमळां 'त (३.२०६) आलेला आहे.

लक्ष्मीधरांच्या ज्ञानेश्वरभक्तीचा वारसा निरंजन माधवांनीं केवळ सांभाळला नाहीं, तर वाढवलाहि.

ज्याच्या द्वारीं पिंपळ शोभे सोन्याचा ।
ज्यांच्या गांवीं डंका वाजे पुण्याचा ॥

अशा ज्ञानेश्वरांचें चित्तीं चिंतन करण्यासाठीं त्यांनीं एक अष्टक रचलें असून, त्यांच्या जीवनगाथेवर एक महाकाव्यहि रचलें आहे.

सिद्धेश्वर संप्रदाय : सद्गुरु बापदेवांच्या द्वारां निरजनांच्या जीवनांत सिद्धेश्वर संप्रदायाचा प्रवेश झाला. सिद्धेश्वर शिव हा या संप्रदायाचा प्रेरक असल्यामुळें याला सिद्धेश्वर संप्रदाय असें नांव प्राप्त झालें आहे. या परंपरेंतील आद्य पुरुष त्र्यंबकराज हा होय. त्र्यंबकराज-परानंद–विज्ञानानंद–कमळानंद–शिवानंद–चिन्मयानंद–महामौळी–निरंजन अशी या संप्रदायाची निरंजनांपर्यंतची परंपरा आहे. महामौळी हें बापदेवांचें सांप्रदायिक नाव असून, चिन्मयानंद हें त्यांचा पिता गणेश याचें सांप्रदायिक नांव आहे.

आदिगुरु त्र्यंबकराज हा प्राचीन मराठी वाङ्मयांत आपल्या 'बालावबोध' अथवा 'वालवोध' या ग्रंथामुळें अत्यंत प्रसिद्ध आहे.[१८] यानें आपल्या ग्रंथाच्या उपसंहारांत स्थूल आत्मचरित्र दिलें असून, त्याच्याविषयींच्या 'संप्रदायपरिमळां'-तील माहितीचा आधार तोच आहे. त्र्यंबकाच्या पितामहाचें नांव कृष्णदेव असून, पित्याचें नांव भैरव असें होतें. त्याची शाखा माध्यंदिन असून, गोत्र सांतत्य होतें. त्याच्या मातेचें नांव अंबावती. ती भारद्वाज गोत्रांतील होती. पुत्रप्राप्तीसाठीं त्याच्या पित्यानें तुळजापुरीं अनुष्ठान केलें आणि भवानीच्या प्रसादानें त्याला नृसिंह, त्र्यंबक व कौंडिण्य असे तीन पुत्र झाले. त्र्यंबकाच्या हातावर योगी पुरुषाचें चिन्ह म्हणून जन्मतःच त्रिशूळाची खूण होती.

पित्याच्या मृत्यूनंतर त्र्यंबकानें विवाह केला. त्यानें प्रथम आपला ज्येष्ठ बंधु नृसिंह याच्याकडून गुरूपदेश घेतला. पुढें कोणा कमळाकर नामक ज्ञानी पुरुषाकडून पुनः उपदेश घेतला. परंतु त्याचें समाधान झालें नाहीं. अखेरीस त्यानें सर्वभावेंकरून 'शक्तिशंकराचें चिंतन' केलें आणि सप्तशृंगगडावर शक्तिसहित सिद्धेश्वर प्रकट होऊन 'मस्तकीं ठेविला करु। द्विजवेषें॥' साक्षात् सिद्धेश्वराकडून परमवस्तूचा लाभ झाल्यानंतर कृतकृत्य होऊन त्र्यंबक घरीं आला आणि त्यानें नृसिंह व कमळाकर या उभयगुरूंच्या आदेशानें, आपल्याला प्राप्त झालेलें ज्ञान ग्रथित करण्यासाठीं 'बालबोध' नामक ग्रंथ रचला.

तेणें देवें त्रिलोचनें। मज उपदेशिलीं पांच वचनें।
जेवी जेवी विस्तरलीं गहनें। ये ग्रंथभूमिके॥ (बालबोध, ३. १५.८०)

अशा शब्दांत त्र्यंबकानें आपल्या ग्रंथाचें प्रासादिक स्वरूप स्पष्ट केलें आहे. या ग्रंथाच्या रचनेचा आरंभ शके १४९४ मध्यें झाला असून सांगता १५०२ मध्यें झाली. यांत तीन खंड मिळून ४५ कथनें असून ओवीसंख्या ५२४० आहे. हा ग्रंथ म्हणजे दासबोधाच्या पूर्वावतारच आहे.

त्र्यंबकानंतरच्या पांच सिद्धपुरुषांची माहिती 'संप्रदायपरिमळां'त नाहीं. ती निरंजनांनीं ज्या ग्रंथांत ग्रथित केली होती, तो त्यांचा 'ज्ञानसुधा' नामक ग्रंथ आज उपलब्ध नाहीं.

निरंजनांचे गुरु बापदेव पंडित अथवा बापजी पंडित हे बाजीरावांच्या स्नेहांतले राजकारणी पुरुष होते. त्यांचा आणि निरंजनांच्या बंधूंचा विशेष स्नेह-संबंध असल्यामुळें ते पुण्यास आले म्हणजे निरंजनांच्याच घरीं उतरत असत.

---

१८. 'बालबोध' हा ग्रंथ श्री. गो. का. चांदोरकर यांनीं संशोधिला व संपादित केला असून धुळें येथील सत्कार्योत्तेजक सभेनें श. १८३५ मध्यें प्रकाशित केला आहे.

एकदां ते 'महाकार्यार्थ' पुण्यास आले होते. त्या वेळीं निरंजनांचे प्रथम गुरु लक्ष्मीधर नुकतेच समाधिस्थ झाले होते. त्यांच्या वियोगानें निरंजनांचें हृदय तळमळत होतें. अशा मनःस्थितींत असतांनाच बाजीरावांनीं त्या दोघांनाहि एकाच कामगिरीवर पाठविलें. अशा प्रकारें बापजींचा अनायासें सहवास घडला असतां निरंजनांना त्यांचा पारमार्थिक अधिकार जाणवला आणि ते त्यांना शरण गेले. लक्ष्मीधरांच्या वियोगानें विव्हळ होऊन साताऱ्यास निरंजनांनीं सात दिवस उपवास केला असतां त्यांनीं निरंजनांना स्वप्नादेश दिलाच होता कीं, सात दिवसांनंतर माझी विभूति तुला भेटेल. लक्ष्मीधरांची ही विभूति म्हणजे बापदेवच होत, अशी निरंजनांची श्रद्धा होती. बापदेवांनीं केलेल्या अनुग्रहाच्या प्रसंगाचें वर्णन 'संप्रदायपरिमळां'त आलें आहे :

करितां सर्व व्यवहार । समाधि जयाची सुस्थिर ।
तुर्येमाजीं मानस स्थिर । अमनस्कपणें अखंड ॥
जितेंद्रियता शुभवत । कपिलासमान योगवंत ।
करतळामळकवत । सांख्यसिद्धान्त जयातें ॥
शांतीची घडली मूर्ती । सहज निर्विकला स्थिति ।
बोधनसामर्थ्यें बृहस्पति । तत्काळ शिष्यांसी प्रबोध ॥
बाळबोध महाग्रंथ । अखंड समागमीं वर्तत ।
नित्य शिष्यांस पढवित । अध्यात्मविद्या अति गहन ॥
सकळ सद्गुणसंपत्ती । येथें विश्रामली निश्चितीं ।
ऐसियांची सहज स्थिती । समाधि निश्चितीं ते होय ॥
असो मजला स्वप्नस्मरण । झालें, तयाचें निदर्शन ।
म्यांही मिठी घातली चरणां । कमळयुगुळीं मधुपवत् ।
बाळबोध कपिलगीता । प्रणवार्थ बोधिला यथार्थता ।
पंचीकरण महावाक्य सर्वथा । बोधिला समर्पक व्यक्तार्थें ॥
षण्मुखी खेचरी मुद्रा दोनी । दावोनि लक्ष नादानुसंधानीं ।
मुक्त केलें अर्धक्षणीं । कोटिजन्मीं जें साधिजे ।
तें एका पळांतरीं । देवोनि कृतार्थ केलें परी ।
तारक होवोनि संसारीं । तारिलें कृपाकटाक्षें ॥

(सं. प. ४. ५६–५९, ६३–६७)

बापदेवांचा गुरु म्हणून लाभ झाल्यानंतर 'परमार्थविषयीं कोठें कांहीं। अणुमात्र गुंता राहिला नाहीं।' असें निरंजनांनीं म्हटलें आहे.

शके १६४६ च्या सुमारास निरंजनांना लक्ष्मीधर बरवे यांचा बोध प्राप्त झाला. त्यानंतर तीनच वर्षांनीं म्हणजे शके १६४९ च्या सुमारास लक्ष्मीधर समाधिस्थ झाले आणि निरंजनांनीं लगेच त्यांच्या स्वप्नादेशानुसार बापदेव पंडितांना गुरु केलें. बापदेवांचें मार्गदर्शन मात्र त्यांना दीर्घ काळ लाभलें असावें, असें दिसतें. शके १६६८ च्या सुमारास निरंजनांना तिसऱ्या गुरूचा लाभ होण्यापूर्वीं कांहीं काळ बापदेव समाधिस्थ झाले असावेत, असें अनुमान करतां येतें. निरंजनांच्या या तिसऱ्या गुरूचें नांव आपण्णापंडित असें असून, त्यांचा संप्रदाय रामोपासनेचा होता. त्यांचा बोध निरंजनांना केव्हां व कसा लाभला, तें आतां पहावयाचें आहे.

राममंत्रविद्या : निरंजनांनीं आपल्या गुरुबोधाच्या त्रिवेणींतील तिसऱ्या धारेचा उल्लेख ' राममंत्रविद्या पावन । ते गुप्त गुरस्वती जाण ' अशा शब्दांत केला आहे, हें आपण पाहिलेंच आहे. या गुप्त सरस्वतीचा प्रवर्तक कोणी आपण्णा-पंडित नामक आहे.

शके १६८० च्या थोडें पूर्वी (श. १६७८ च्या सुमारास)' चिद्बोध रामायण ' या ग्रंथाची रचना चालू असतांना, सुंदरकांडाच्या पूर्तीनंतर निरंजनांना आपण्णा-पंडित भेटले आणि त्यांनीं षडक्षर राममंत्राचा उपदेश करून रामरहस्य प्रकट केलें. निरंजनांना दोन वर्षेपर्यंत त्यांचा सहवास लाभला. त्यांच्याच सान्निध्यांत निरंजनांनीं ' चिद्बोध रामायणा 'च्या रचनेची सांगता केली. आपण्णापंडितांना संप्रदायपरिमळ-कारानें विद्यानिधि, महंत, शांत, दांत, रामतत्त्वविचक्षण, वेदशास्त्रसंपन्न, जगन्मित्र आणि गुणराशि या विशेषणांनीं गौरविलें आहे. या वेळीं लक्ष्मीधर व बापदेव हे निरंजनांचे दोन्ही पूर्वगुरु समाधिस्थ झालेले होते. ' लक्ष्मीधर बापदेव दोन्ही । या रूपें अवतार पावोनि ' आपणांस रामतत्त्वाचा बोध करण्यासाठीं आले, अशी निरंजनांची श्रद्धा होती.

निरंजन संप्रदायाचें उदार स्वरूप

निरंजन माधवांच्या पारमार्थिक जीवनांत गुरुबोधाची त्रिवेणी कशी निर्माण झाली, तें आपण पाहिलें. या त्रिवेणींत मूळच्या तीनहि बोधप्रवाहांचें संपूर्ण समरसी-करण झालें असल्यामुळें त्यांचें वेगळेपण दाखवितां येणार नाहीं. म्हणूनच या त्रिवेणी-संगमानंतरच्या प्रवाहाला ' निरंजन संप्रदाय ' या नांवानें ओळखणें सोयीचें ठरेल. संप्रदायपरिमळकाराला ही गोष्ट जाणवली आहे आणि त्यानें निरंजन-मुखानें या समन्वित संप्रदायाचें उदार स्वरूप विशद केलें आहे.

निरंजन माधवांचें उपास्य दैवत कृष्ण हें असल्यामुळें उपासनादृष्ट्या ते वैष्णव ठरतात. ' वैष्णवधर्मीं सदां असावें । हेंचि आमुचें मत बरवें । ' असें त्यांनीं स्पष्ट म्हटलें आहे. परंतु त्यांच्या या वैष्णवत्वाला एकांतिकतेचा स्पर्शहि नाहीं.

सर्वां मतीं सर्वां दर्शनीं । जें उत्तम असेल साजणी ।
तो संग्रह करावा शोधोनी । मुख्य आमुचा संप्रदाय ॥
(सं. प. ५.१३९)

निरंजनांची ही उदार दृष्टि सर्वधर्मसमन्वयाच्या कार्याला गवसणी घालण्याइतकी व्यापक आहे. याच दृष्टींतून—

शैव शांभव वैष्णव । गाणपत्य सौर शाक्त महानुभाव ।
घरां येतां मानिजे देव । भेदमत्सर त्यागोनि ॥ (सं. प. ५. ११८

असा संप्रदायातीत समभाव त्यांनीं पुरस्कारिला आहे. ' अनेक मार्गदर्शक । ईश्वर सर्व ॥ ' हें त्यांना स्वानुभवानें पटलेलें असल्यामुळें आपल्या मार्गाविषयीं त्यांना निष्ठा असली, तरी दुसरे मार्ग चुकीचेच, असा त्यांचा आग्रह नाहीं.

सर्व धर्मांची सहायता । करावी सामर्थ्य असतां ।
आपुल्या धर्मविहिता । सदां फार जपावें ॥ (सं. प. ५. ४३)

हा त्यांचा संदेश त्यांच्या विवेकनिष्ठ समतोल दृष्टीची साक्ष पटविणारा आहे. ' परधर्माचें आचरण । कदापि न कीजे जाण । ' असें ते स्पष्ट बजावतात, परंतु त्याचबरोबर ' परंतु परधर्म पाहोन । संतोष मानावा मानसीं ॥ ' (सं. प. ५. ४४) असेंहि सांगायला विसरत नाहींत. अन्यमार्गीयांच्या किंवा परधर्मीयांच्या निंदेवर आपलें श्रेष्ठत्व अधिष्ठित करणें त्यांच्या मनाला रुचत नाहीं. ' परधर्म-उच्छेद निःसंदेह करूं नये, ' असें सांगून, ' अद्रोह असावें भूतीं ' (सं. प. ५. ४२) अशी समदृष्टि बाणवण्याचा उपदेश त्यानीं केला आहे.

निरंजन माधव आपल्यापूर्वीच्या भागवतधर्मी संतांप्रमाणेंच चातुर्वर्ण्याविषयीं आदर दाखवितात, परंतु परमार्थक्षेत्रांत भेदभाव मानीत नाहींत. ' शुद्र जरी भगवद्-भक्त । त्यासी पूजिजे यथोक्त । ' असें ते म्हणतात. हाच भाव त्यांनीं आणखी स्पष्टपणें व्यक्त केला आहे—

वैष्णवचिन्हचिन्हित । तो शूद्र चांडाळ जरी प्राप्त ।
त्यासी मानसपूजा, स्वार्थ । टाकोनि, कीजे हरिबुद्धीं ॥
(सं. प. ५. ११६)

एखादा शूद्रातिशूद्र जर हरिभक्त असेल, तर त्याला साक्षात् हरि समजून हृदयीं साठवावें, असें सांगणाऱ्या निरंजनांचा दृष्टिकोन किती व्यापक आहे, हें आपल्या ध्यानीं येईल. त्यांच्या या व्यापक दृष्टिकोनाचें प्रत्यंतर त्यांनीं केलेल्या संत-स्वरूपवर्णनांत प्रकर्षानें घडतें. ' संतपण तें कांहीं । बीदोबीद सांडलें नाहीं । ' हें त्यांना माहीत आहे. ' जनाचे आघात सोसूं जाणे ' तोच संत होय, अशी तुकोबांनीं

केलेल्या व्याख्येसारखीच-त्यांची संताची व्याख्या आहे. ' बाहेरीं संतपण मिरविलें । धनदारार्थीं वेचिलें । ' असें संतपण वाऱ्याबरोबर रानोमाळ उडणाऱ्या सायरीच्या कापसासारखें व्यर्थ आहे, हें त्यांना पुरेपूर माहीत आहे. म्हणूनच त्यांनीं संतपणाचा आदर्श सांगतांना म्हटलें आहे कीं—

आपुल्या दारपुत्रीं आवडी । संकटीं कैसा चरफडी ।
तैसाचि परहितीं लवडसवडी । धांवे तो गडी मुक्तीचा ॥
जयासी झालें ज्ञान । तयाचें हेंचि निदर्शन ।
सर्वभूतीं आत्मा समान । पाहोनि वर्तिजे यथास्थित ॥
मनःपूर्वक कळवळा । असावा, दीन देखतां डोळां ।
तोचि मुक्तीचा सोहळा । भोगी संत ॥ (सं. प. ५ १२१-१२३)

अद्वैतवेदान्ताच्या अधिष्ठानावर गुरूपदिष्ट मार्गानें उपासनेचें सातत्य ठेवून ब्रह्मभावना दृढ करीत जाणें – हेंच निरंजनांच्या संप्रदायाचें प्राणतत्त्व आहे परमार्थासाठीं घरदार सोडण्याची जरूरी नाहीं, हा विचार त्यांनीं वारंवार आणि अत्यंत निश्चयात्मक वाणीनें विशद केला आहे. ' घेवोनि दंडकाषाय । वेषमात्र संन्यासी होय ' हें त्यांना निषेधार्ह वाटतें. ' काम्यकर्म टाकितां । संन्यास घडे ॥ ' हा गीताविचार त्यांनीं आपल्या हृदयांत मुरविला आहे आणि आचारांत रुजविला आहे. त्याचमुळें ' वस्तुमात्र परहितार्थ वेचणारा ' गृहस्थ त्यांना शतसंन्याशांहून वरिष्ठ वाटतो. परमार्थाच्या नांवानें मठमंदिरांचा व्याप वाढवून आणि त्यासाठीं इनाम जमिनी मिळवून नवाच प्रपंच थाटणाऱ्या दांभिकांना प्रपंच आणि परमार्थ या दोहींनाहि मुकावें लागतें. म्हणूनच निरंजन माधव सांगतात—

जें जें सहजाचरण । तें तें निष्कामभावनें करणें ।
अहंकारकामना न धरणें । तेचि कृष्णार्पण सद्भक्ति ॥ (सं. प. ५. ५३)

निरंजन माधवांची ग्रंथरचना

राजकारणाच्या रणधुमाळींतहि निरंजनांची परमार्थप्रवणता आणि काव्यरसिकता अम्लान राहिली, हें विशेष आहे. ज्याच्या पृष्ठभागावर गगनवेधी लाटांचें तांडव चाललें आहे, तो सागर अंतरीं जसा शांत असतो, त्याचप्रमाणें निरंजनांचें चित्त राजकारणाच्या बाह्य व्यग्रतेंतहि आंतरिक शांति राखूं शकलें. आपला बाह्य जीवनव्यापार हा केवळ प्रारब्धप्रवाह आहे, अशीच त्यांची संतसहज धारणा होती. संप्रदायपरिमळकारानें त्यांच्या मुखानें हा विचार व्यक्त केला आहे—

महाकार्यभागघटणा । प्रारब्धप्रवाहें घडली पूर्णा ।
परि मुख्य विश्रांति या मना । अध्यात्मचिंतन हरिभक्ति ॥

नित्य ब्राह्मण-सहवास । अखंड असतां अभ्यास ।
कवितापेरणा मनास । घडे विलास शारदेचा ॥

(सं. प. ३. २२६-२२७)

यावरून हें स्पष्ट होतें कीं, निरंजन माधव ज्या वेळीं बाह्यतः 'प्रारब्ध-प्रवाहां'त अवगाहन करीत होते– पेशव्यांचे वकील म्हणून दक्षिणेंतील राजांच्या दरबारांत राजकीय खलबतें करीत होते, त्याच वेळीं त्यांच्या हृदयमंडपांत हरि-भक्तीनें मंडित झालेल्या अध्यात्मचिंतनाच्या सुस्थिर मंचावर शारदेचा रमणीय विलास चालू होता.

निरंजन माधवांनीं आपल्या जीवनांतील राजकीय धकाधकीच्या काळांतच ग्रंथरचनेला आरंभ केला आणि पुढें इ. स. १७५८ मध्यें राजकारणांतून निवृत्त झाल्यापासून जीवनाच्या अखेरपर्यंत सर्व काळ अध्यात्मचिंतनांत आणि तत्पोषक ग्रंथरचनेंत व्यतीत केला. त्यांची ग्रंथरचना विपुल आणि विविध आहे. त्यांच्या ग्रंथांचीं नांवें अशीं—

(१) कृष्णानंदसिंधु
(२) चिद्बोधरामायण
(३) ज्ञानेश्वरविजय
(४) ज्ञानसुधा
(५) सुभद्रास्वयंवर
(६) रामकर्णामृतादि वीस स्तोत्रें व पदें
(७) बोधप्रदीपिका
(८) अद्वैतामृत
(९) चिद्रत्न
(१०) भार्गवरामचरित्र
(११) अद्वैतबोध
(१२) यतिनृपतिसंवाद
(१३) अद्वैतभावनापंचदशी
(१४) वसिष्ठसुशर्मासंवाद
(१५) सद्वृत्तमुक्तावली
(१६) वृत्तावतंस
(१७) प्रयागवर्णन

यांतील 'सुभद्रास्वयंवरा'शिवाय अन्य ग्रंथांचा स्थूल परिचय पुढें देत आहें.

कृष्णानंदसिंधु : हा निरंजनांचा आद्य ग्रंथ आज उपलब्ध नाहीं; त्यामुळें त्याच्या स्वरूपाविषयीं कांहींहि सांगतां येत नाहीं. 'संप्रदायपरिमळां'त या ग्रंथाविषयीं उल्लेख आहे, तो असा—

आधीं कृष्णानंदसिंधु । रचावया हा प्रबंधु ।
उल्हास घडला सच्चिदानंदु । स्वप्नश्लोकस्फुरण होतां ॥
पुण्यग्रामीं ग्रंथोत्पत्ति । श्रीरंगपट्टणीं समाप्ति ।
कृष्णानंदसिंधु श्रेष्ठ अति । आनंददाता सर्व जनां ॥

(सं. प. ३. २२८-२२९)

हा प्रबंध स्वप्नश्लोकस्फुरणांतून निर्माण झाला आहे, या उल्लेखावरून इतकेंच स्पष्ट होतें कीं, हा ग्रंथ श्लोकबद्ध असून 'प्रासादिक' होता. तसेंच त्याच्या रचनेचा आरंभ पुण्यास झाला असून, समाप्ति मात्र श्रीरंगपट्टणास झाली. परंतु, या एवढ्या उल्लेखावरून या 'अतिश्रेष्ठ' आणि 'सर्व जनां आनंददाता' असलेल्या ग्रंथाचें अंतरंग कसें होतें, तें कळत नाहीं. निरंजनांच्या संप्रदायांत सांप्रदायिक प्रतिष्ठा पावलेल्या पांच ग्रंथांत याचा समावेश होता, असें 'संप्रदायपरिमळां'तील आणखी एका उल्लेखावरून (५ १६१) दिसून येतें. या ग्रंथाच्या रचनाकाळाविषयीं प्रा. पंगूनीं म्हटलें आहे कीं, "याचा प्रारंभ सन १७३५ त पुण्यास करून पुढें श्रीरंगपट्टण मुक्कामीं सन १७४६-१७५२ पर्यंत केव्हां तरी पुरा केला असावा." [१९]

ज्ञानसुधा : निरंजनांचा हाहि ग्रंथ अनुपलब्धच आहे. या ग्रंथाला निरंजन संप्रदायाच्या ग्रंथपंचरत्नांत प्रतिष्ठा लाभलेली होती (सं. प. ५. १६१). यांत निरंजनांनीं आपल्या उभयविध गुरुपरंपरांचा इतिहास आणि परंपराप्राप्त ज्ञानाचें स्वरूप यांचें ग्रथन केलेलें असावें, असें 'संप्रदायपरिमळां'तील पुढील उल्लेखांवरून दिसतें.

आपल्या दत्तसंप्रदायी गुरुपरंपरेंतील सच्चिदानंदस्वामींच्या समाधिकळेसंबंधीं निरंजन म्हणतात—

यीचा करितां विस्तार । ग्रंथ वाढेल फार ।
ज्ञानसुधेमाजीं प्रकार । आहे पूर्वीं वदला हा ॥ (सं. प. २. ३६)

पुढें दुसऱ्या परंपरेचा इतिहास सांगण्याच्या प्रारंभीं ते म्हणतात—

ज्ञानसुधेच्या अंतीं । आम्हींच कथिलीं सांप्रदायपद्धति ।
तेथें संक्षेपें कथा निगुती । कथन केली त्रितापी ॥ (सं. प. ४. १०)

द्वितीय गुरुपरंपरेंतील आद्यगुरु त्र्यंबकराज आणि त्यांच्यानंतरचे पांच सिद्धपुरुष यांच्यासंबंधींचा पुष्कळच वृत्तान्त ज्ञानसुधेंत असावा, असें पुढील उल्लेखावरून दिसतें—

सिद्धेशमत सांप्रदाय । स्थळस्थळीं कथिलाच आहे ।
भैरवसमुद्रोद्भव होय । सुधाकर त्र्यंबकराज गुरु ॥
त्यांपासोनि महामौळिपर्यंत । जे सिद्ध झाले महंत ।
ते कथिले आम्हीं यथास्थित । ज्ञानसुधा सद्ग्रंथीं ॥
परानंद विज्ञानानंद । कमळानंद शिवानंद ।
चिन्मयानंद हे सिद्ध । पांचही मुक्त ॥

---

१९. प्राचीन मराठी कविपंचक, पृ. १२५.

यांची महिमा अद्‌भुत । वर्णनीं कोण समर्थ ।
मियां दाविली ज्ञानसुधेंत । अनुभूति तयांच्या बोधाची ॥
(सं. प. ४. ८४. ८६-८८)

हा ग्रंथ उपलब्ध झाला, तर निरंजन माधवांच्या पारमार्थिक जीवनाचे आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासांतले कांहीं अज्ञात दुवे स्पष्ट होतील.

चिद्‌बोध रामायण : हें रामकथेवरील श्लोकबद्ध महाकाव्य आहे. परंतु दुर्दैवानें याचें केवळ बालकांडच उपलब्ध आहे. या बालकांडाचें प्रथम प्रकाशन (इ. स. १८८६) करणाऱ्या श्री. सी. रा. गायकवाडांना सातहि कांडें उपलब्ध झालेलीं होतीं, असें त्यांच्या प्रास्ताविकावरून दिसतें. पुढें उरलेलीं सहा कांडें चोरीस गेलीं अथवा भस्मसात् झालीं, असें पांगारकरांना चौकशींतून आढळलें.

या ग्रंथाची रचना ' कृष्णानंदसिंधू 'नंतर लगेच सुरू झाली, असें संप्रदायपरिमळकाराचें म्हणणें आहे—

समाप्त पावतां हा ग्रंथ । चिद्‌बोध रामायण उद्‌बोध घडत ।
निरंतर अंतरस्थित । प्रेरणा करी या मना ॥
अध्यात्मरामायण टीका । चिद्‌बोधरामायण ग्रंथ निका ।
जो आवडता रघुनायका । प्रेरिला तेणें या वाचे ॥
जडवाणी मतिहीन । नसतां कदापि काव्यस्फुरण ।
महाग्रंथ रामायण । अनायासें विरचिला ॥
श्रीरंगपट्टणीं आरंभ ग्रंथ । पुण्यनगरीं समाप्त ।
मान्य बहुतां पंडितांत । होतां तोही पाहिला ॥ (सं. प. ३. २३०-२३३)

श्रीरंगपट्टणास ' कृष्णानंदसिंधू ' ची सांगता होतांच, श्रीरामाच्या आंतरिक प्रेरणेनें या ग्रंथाच्या रचनेला आरंभ झाला आणि तिथून निवृत्त होऊन पुण्यास आल्यावर (इ. स. १७५८) या ग्रंथाची समाप्ति झाली. हा महाग्रंथ म्हणजे अध्यात्मरामायणाची टीका असून, त्याच्या रचनेला रघुनायकाची प्रेरणा लाभल्यामुळें तो ' अनायासें ' रचला गेला, असें कवीचें म्हणणें आहे. असा हा ' वरदी ' ग्रंथ ' बहुतां पंडितांत मान्य ' झाल्याचें सुखद दृश्यहि कवीला पहावयास मिळालें होतें.

आज उपलब्ध असलेलें बालकांडहि स्वतंत्रपणें महाकाव्य शोभण्यासारखें आहे. तें सात सर्गांत विभागलेलें असून, त्यांत विभिन्न वृत्तांतील ४२२ श्लोक आहेत. ' वाणी पवित्र करणें गुणकीर्तनानें ' या पारमार्थिक प्रेरणेनेंच कवि हा रामगाथा गायला प्रवृत्त झाला असला, तरी त्यांत त्याचा विदग्ध मनःपिंड प्रकर्षानें

प्रकटल्यावांचून राहिला नाहीं. दशरथाच्या तीन पत्नींनीं चार पुत्रांना जन्म दिला, या घटनेचें वर्णन करतांना—

दिशा प्रसवती जशा रविशशांक, तैशापरी ।
सती प्रसवल्या सुखें सुतचतुष्टया सुंदरी ॥

अशी हृद्य कल्पना कवि लीलया व्यक्त करतो. या काव्यावरील विदग्ध संस्कृत साहित्याचा प्रभाव डॉ. के. ना. वाटवे यांनीं मार्मिकपणें दाखवून दिला आहे : "यांत रामायणाचाच आधार घेतला असून, मूळचे प्रसंग खुलवून सांगितले आहेत. सर्ग ६, श्लो. २७ वर 'कमठपृष्ठकठोरमिदं' या 'हनुमन्-नाटकां'-तील श्लोकाची दाट छाया आहे. तसेंच, सातव्या सर्गांतील राम-परशुराम-संघर्षावर 'रघुवंशा'ची दाट छाया पडली आहे. 'मम नाम धरोनि हिंडसी । मज राजन्य-वनाग्नि नेणसी ॥' यांतील, राम व परशुराम यांचें नांव एकच आहे व परशुराम हा क्षत्रियवनाला जाळणारा अग्नि आहे, या दोन कल्पना 'रघुवंशां' तील सर्ग ११, श्लो. ६८, ६९, ७३, ७५, इत्यादींवर आधारलेल्या आहेत. नेहमींच्या वृत्तांव्यतिरिक्त 'अमृतध्वनि' हें नवें वृत्त या महाकाव्यांत आढळतें. श्लोकरचना अत्यंत प्रौढ आणि सरस असून, महाकाव्याला शोभेल अशी आहे."[२०] काव्याच्या अखेरीस कवीनें—

देशवाणी प्राकृत हे म्हणोनि न गणा कधीं ।
येथें प्रविलसे पूर्ण ब्रह्मबोध सुखावधी ॥ (७. ६६)

असे संतप्रकृतीला साजेसे उद्‌गार काढले आहेत.

ज्ञानेश्वरविजय : हें ज्ञानेश्वरांच्या चरित्रावर लिहिलेलें महाकाव्य असून त्यांत ७ अध्याय आणि १०३८ श्लोक आहेत. या ग्रंथाची रचना फाल्गुन शु. ५, श. १६८७ (इ. स. १७६६) या दिवशीं पुणें येथें समाप्ति पावली. महाकाव्याच्या विषयाच्या निवडीबाबतचा संस्कृत कवींचा संकेत मोडून, निरंजन माधवांनीं ज्ञानदेवांच्या चरित्रावर महाकाव्य लिहावें, हा त्यांच्या स्वतंत्र प्रज्ञेचा पुरावाच आहे. ज्ञानदेवांच्या चरणांची गोडी त्यांना लक्ष्मीधरांकरवीं लागली होती. नामदेवांच्या नांवावर ज्ञानेश्वरचरित्रविषयक जीं तीन प्रकरणें आहेत, त्यांच्याच आधारें निरंजनांनीं या महाकाव्याची उभारणी केलेली आहे.

'वाक्यसुधे' वरील गद्य टीका–'बोधप्रदीपिका' : ह. भ. प. पांगारकरांनीं 'निरंजन माधवांची कविता', भाग ३ मध्यें (पृ. ४७-४८) या ग्रंथांतील एक

---

२०. प्राचीन मराठी पंडिती काव्य, पृ. १५६.

उतारा दिलेला आहे. या ग्रंथाची एक प्रत माझ्याहि संग्रहांत आहे. निरंजनांनीं हा ग्रंथ गद्यांत रचलेला असला, तरी मंगलाचरण एका श्लोकांत केलें आहे—

श्रीमद्रामपरब्रह्मानन्दनाथगुरुं मुदा ।
नत्वा कुर्वे वाक्यसुधाटीकां बोधप्रदीपिकाम् ॥

या श्लोकानंतर—

" आतां वाक्यसुधा नामक ग्रंथ, श्रीशंकरभगवत्पूज्यपादकृत, त्याची टीका प्राकृत भाषेंकरुन कवि निरंजन करिताहें ॥ "

असा उपन्यास केला आहे. प्राकृतांत काव्यग्रंथ रचण्याची प्रथा रुळली असली, तरी गद्य ग्रंथ– आणि तेहि पारमार्थिक विषयावरील– अभावानेंच झालेले असल्यामुळें, प्रत्यक्ष टीकेला प्रारंभ करण्यापूर्वीं निरंजनांना आपल्या प्राकृत माध्यमाचें समर्थन करावें लागलें आहे. हें समर्थन त्यांनीं अत्यंत विनयानें केलें आहे. ते म्हणतात—

" त्यास प्राकृत म्हणिजे अपशब्द होय, (असें) असतां (प्राकृत टीका) करावयासी प्रयोजन काये म्हणाल, तरी प्राकृत अर्थानृत असिलें तरी दोषावह आहे, शब्दानृत दोषावह नव्हे ॥ म्हणऊन बाळबोधार्थ रचिजेत आहेत ॥ ' काव्यालापांश्च वर्जयेत् ' असा संस्कृत अर्थानृत शब्दांचाहि निषेध केला आहे ॥...म्हणऊन शब्दानृत अंगिकारिलें आहे ॥ आणखी प्रमाण—' संस्कृतैः प्राकृतैर्वापि गद्यपद्याक्षरैस्तथा । देशभाषादिभिश्चैनं बोधयेत्सद्गुरुः स्मृतः ॥ ' ऐसीं वाक्यें आहेत ॥ पुरातन शिष्टही प्रवर्त्तले आहेत ॥ हें पाहून मीही प्रवर्त्तलों आहें ॥ "

या विनयशील भूमिकेनें टीका लिहिण्यास प्रवृत्त झालेल्या निरंजनांनीं टीका-विषय अतिशय सुगम करून सांगितला आहे. " दृश्य म्हणिजे काय ॥ चक्षुर्द्वारा निर्गत जे अंतःकरणवृत्ति, तिचा ज्या विषयासी संबंध होईल, त्या विषयासी दृश्य म्हणावें ॥ " अशा पद्धतीनें तात्त्विक संज्ञांचें स्पष्टीकरण केलें आहे. अधूनमधून प्रमाण म्हणून संस्कृत श्लोक उद्धृत केले आहेत. अखेरीस—

" इति श्रीनिरंजनमाधवविरचित वाक्यसुधाटिपण बोधप्रदीपिका समाप्त जाली ॥ "

अशी समाप्तिमुद्रा आहे. येथें ग्रंथकारानें ' टीके 'ऐवजीं ' टिपण ' असा शब्द वापरला आहे, तो यथार्थ वाटतो.

' स्वात्मनिरूपणा 'वरील गद्यटीका– ' अद्वैतामृत ' : ' बोधप्रदीपिका ' ही जशी शंकराचार्यांच्या एका प्रकरणावरील गद्य टीका आहे, त्याचप्रमाणें हा ' अद्वैतामृत ' ग्रंथहि शंकराचार्यांच्याच ' स्वात्मनिरूपण ' नामक ग्रंथावरील गद्य टीका आहे. मूळ ग्रंथ आर्याबद्ध आहे. निरंजनांनीं मूळ ग्रंथाचें नांव ' स्वात्मानंद-

प्रकाशकार्या ' असें दिलें आहे. याहि ग्रंथाच्या आरंभीं त्यांनीं मंगलाचरण श्लोकांतच केलें आहे—

श्रीरामपरब्रह्मानन्दयतीन्द्रं गुरुं मुदा नत्वा ।
अद्वैतामृतनाम्नीं टीकां कुर्वे प्रकाशकार्याणाम् ॥

या श्लोकानंतर—

" श्रीमच्छंकर भगवत्पूज्यपादाचार्यकृत स्वात्मानंदप्रकाशकार्या प्रकरणाची टीका भाषेंकरून अद्वैतामृत नामक योगी निरंजन माधव करीत आहे ॥ "

असा मूळ ग्रंथाचा, टीकेचा आणि टीकाकाराचा स्पष्ट नामनिर्देश केलेला आहे. टीकेचें स्वरूप ध्यानीं यावें, म्हणून पुढें पहिली आर्या आणि तिच्यावरील निरंजनांची टीका उद्धृत करीत आहें –

श्रीगुरुचरणद्वन्द्वं वन्देऽहं मथितदुःसहद्वन्द्वम् ।
भ्रान्तिग्रहोपशान्ति पांसुमयं यस्य भसितमातनुते ॥ १ ॥

" श्रीगुरुचरणकमळद्वंद्वातें वंदितों ॥ ज्या चरणद्वयानें द्वंद्वदुःखें शीतोष्णादिक मथित ह्मणिजे मर्दिलीं आहेत आणि ज्या चरणद्वयाचें रज तेंच भस्म, तेणें करून भ्रांति ह्मणिजे पिशाच, त्याची उपशांति जो नाश होत आहे ॥ "

या ग्रंथाचा उल्लेख प्रा. पंगूनीं केलेला आहे. माझ्या संग्रहांत याची एक त्रुटित हस्तलिखित प्रत (शेवटच्या चार-पांच आर्यांवरील टीका नसलेली) आहे.

चिद्रत्न : या ग्रंथाचा उल्लेख पन्नास वर्षांपूर्वी श्री. गो. का. चांदोरकरांनीं एका छोट्या टिपणांत करून ठेवला आहे. ते म्हणतात : " श्रीमत् भगवत्पूज्यपाद श्रीशंकराचार्य यांच्या तीन श्लोकांवर गद्यात्मक ही लहानशी टीका आहे. ही रा. राजवाडे यांच्या संग्रहांत मिळाली. या ग्रंथाचा विशेष असा कांहीं नाहीं. भाषा शास्त्रीय आहे. या प्रकरणाचे शेवटीं आपले गुरूंचें नांव ब्रह्मानंद असें त्यांनीं दिलें आहे. " [२१]

गुरूच्या नांवासंबंधीं चांदोरकरांनीं केलेला हा उल्लेख महत्त्वाचा आहे. निरंजन माधवांचे गुरु लक्ष्मीधर, बापदेव व आपण्णापंडित हे तिघे होते, हें आपण पाहिलेंच आहे. असें असतांना ' बोधप्रदीपिका ', ' अद्वैतामृत ' व ' चिद्रत्न ' या तीनहि गद्य ग्रंथांत ब्रह्मानंद असें गुरुनाम कां यावें, हा प्रश्नच आहे. ब्रह्मानंद हे निरंजनांचे गुरु नसून, परमगुरु (लक्ष्मीधरांचे गुरु) आहेत. मग त्यांचा गुरुस्थानीं उल्लेख कसा ? कीं ब्रह्मानंद या नांवाचे निरंजनांनीं केलेले कोणी चवथे गुरु होते ?

---

२१. भा. इ. सं. मंडळ वार्षिक इतिवृत्त, शके १८३६, पृ. ६५.

तशीहि शक्यता आहे. ' अनेक गुरुरूपें । ब्रह्मतत्त्व केलें सोपें ' (सं. प ३. २४४) असें त्यांनीं म्हटलेंच आहे.

वृत्तविषयक ग्रंथ : श्लोकबद्ध रचनेवर निरंजन माधवांचें अत्यंत प्रभुत्व असण्याचें कारण असें आहे कीं, त्यांनीं छंदःशास्त्राचा आवर्जून अभ्यास केला होता. आपल्या या अभ्यासाचें फलित त्यांनीं ' वृत्तमुक्तावली ' व ' वृत्तावतंस ' या दोन ग्रंथांत मांडलें आहे. ' वृत्तमुक्तावली ' अथवा ' सद्वृत्तमुक्तावली ' हा ग्रंथ ' महाराष्ट्रकवि ' मासिकांत प्रसिद्ध झालेला आहे. याची रचना चैत्र शु. १, सोमवार, शके १६८३ या दिवशीं सांगता पावली. या ग्रंथांत एकूण १५० श्लोक आहेत. आपण हा ग्रंथ ' बालांलागी पद्यरचना सुबोध घडाया ' रचला, असें निरंजनांनीं म्हटलें आहे. ग्रंथारंभीं (श्लोक ६) त्यांनीं आपणांस ' छंदःशास्त्र-विशारद ' असें विशेषण लावलें आहे. यांत प्रथम चरणांत वृत्ताचें लक्षण व नांव सांगितलेलें असून, पुढील चरण उदाहरणार्थ दिले आहेत. छन्दोरचनाकार माधवराव पटवर्धनांनीं या ग्रंथाचें मूल्यमापन केलें आहे, तें असें—

" निरंजन माधव हा वृत्ताला ' व्यक्ति ' म्हणतो आणि ' जातिव्यक्तिरूपा-मध्यें छंदःशास्त्र विरूढलें ' असें सांगतो. मराठींत लगत्वभेदातीत जी पद्यरचना रूढ आहे, तिचा विसर त्याला व्हायला नको होता. परंतु एकंदरीनें पाहतां छंदावर लिहिणारांची प्रवृत्ति स्वतंत्र दिसतच नाहीं. नवीं नवीं नांवें देण्यामध्यें असेल तें स्वातंत्र्य व्ययित होई. कनकप्रभा, विबुधप्रिया, इत्यादि वृत्तांना निरंजन माधव मत्तहासिनी, मल्लिका हीं नांवें देतो, पण आधार देत नाहीं. एखाद्या दाक्षिणात्य छन्दःशास्त्रकाराचा त्याला आधार असावा; कारण विबुधप्रिया वृत्ताला नागवर्म मल्लिकामाला म्हणतो आणि मन्दारमरन्दचम्पूचा कर्ता कृष्णकवि हा मल्लिका म्हणतो. पण अमृतध्वनि वृत्ताला मन्दारमरन्दचम्पूकार मत्तेभ म्हणत असतांहि निरंजन माधव कल्पलतिका हें नांव देतो. मधुमती, कमला, भामिनी, सहदळा (?), कनकलता, मदनसायक, हेमकला, कामकला व सुधा हीं नऊ वृत्तें तो नवीनच देतो; पण आधार सांगत नाहीं. " [२२]

निरंजनांचा ' वृत्तावतंस ' हा ग्रंथ मला पहायला मिळाला नाहीं. पांगारकरांनीं निरंजनांचा ' वृत्तवनमाला ' नामक आणखी एक वृत्तविषयक ग्रथ उल्लेखिलेला आहे. परंतु हा वृत्तविषयक ग्रंथ नसून ' महालक्ष्मीस्तोत्र ' आहे. " यांत विष्णुपत्नी श्रीलक्ष्मीदेवीची स्तुति सतरा पद्यांत गायिली आहे. पहिलीं चौदा पद्यें, उपजाति वृत्ताचे जे चौदा पोटभेद त्या त्या पोट-वृत्तांत त्यांचीं नांवें सार्थ योजून, रचिलीं

---

२२. छंदोरचना, पृ. ५५९-५६०.

आहेत.'' [२३] 'चौदा परीच्या उपजाति वृत्तें। संप्रार्थिलें म्यां हरिवल्लभेतें।' असें निरंजनांनीं स्पष्टच म्हटलें आहे.

यात्रावर्णनपर ग्रंथ : निरंजन माधवांनीं सर्व भारतभर तीर्थयात्रा केली होती, हें आपण पाहिलेंच आहे. त्यांच्यासारख्या रसिक आणि मार्मिक दृष्टीच्या कवीनें जर आपल्या यात्रेचें वर्णन शब्दबद्ध करून ठेवलेलें असेल, तर रसिकांच्या व इतिहासज्ञांच्या दृष्टीनें तो एक अमोल ठेवाच ठरेल. सारस्वतकारांनीं निरंजन माधवांच्या अशा एका ग्रंथाचा परिचय करून दिला असून, त्या ग्रंथांतील अनेक उतारे उद्धृत केले आहेत. [२४] परंतु मला हा ग्रंथ निरंजन माधवांचा वाटत नाहीं. या ग्रंथांतील कविनाममुद्रा अशा आहे —

प्रयागीं जसें पाहिलें म्यां विचित्र।
तसें वानिलें वर्णिलें हें चरित्र।
दयालू नृसिंहें कृपा पूर्ण केली।
(निरंजनें) रसज्ञां गुणी माधवें गुंफवीली॥

या श्लोकाच्या अंतिम पंक्तींतील 'निरंजनें' हा प्रारंभींचा शब्द वृत्तदृष्ट्या न जुळणारा असून तो कोणीं तरी नंतर घुसडलेला आहे, हें वाचकांना श्लोक वाचतां क्षणींच प्रतीत होईल. तो अनावश्यक शब्द मीं मुद्दामच कंसांत टाकला आहे. तो शब्द वगळतांच श्लोक सरळ वाचतां येतो आणि त्यांतून असा अर्थ स्पष्ट होतो कीं, हा ग्रंथ कोणा नृसिंहाश्रिष्य माधवानें रचलेला आहे–निरंजन माधवानें नव्हे.

पांच स्फुट प्रकरणें : निरंजन माधवाच्या स्फुट प्रकरणांपैकीं 'भार्गवराम-चरित्र' अथवा 'भार्गवजन्माख्यान' हें प्रकरण ओवीबद्ध आहे. निरंजनांची ही एकमेव ओवीबद्ध रचना होय. अवघ्या ५८ ओव्यांचें हें प्रकरण भागवताच्या आधारें रचलेलें आहे—

ऐसें भार्गवरामजनन। भागवती कथा परमपावन।
शुकें वर्णिली नृपालागुन। प्रायोपवेशनीं परीक्षिती॥ ५६॥
तेंच कवि माधवनंदन। बनाजी योगी निरंजन।
रचिता झाला पावन। संतसज्जनतोषार्थ॥ ५७॥

'अद्वैतबोध' हें प्रकरण अवघें ६ श्लोकांचें आहे. या प्रकरणांत 'वेदान्ताविण शास्त्र शास्त्राचि नव्हे,' हें ठासून सांगितलें असून, जो 'वैराग्यें विषयीं उदास'

---

२३. निरंजन माधवाच्या स्तोत्रसंग्रहावर टीकात्मक निबंध : प्रा. चिं. नी. जोशी, पृ. १६.

२४. महाराष्ट्रसारस्वत (आवृत्ति पांचवी), पृ. ४१८–४१९.

आहे आणि 'सर्व ब्रह्म' असा ज्याच्या बुद्धीचा निश्चय झालेला आहे, तो मग 'जातीचा भलता असो,' असें निरंजन माधवांनीं म्हटलें आहे. 'यतिनृपति-संवाद' हें २१ श्लोकांचें प्रकरण भर्तृहरीच्या वैराग्यशतकांतील कांहीं श्लोकांच्या आधारें रचलेलें असून, त्यांत निःस्पृह संन्यासी आणि वैभवशाली राजा यांच्यांतील संवाद आहे. संन्यासी राजवैभवाविषयीं तुच्छता दाखवीत आहे, असा या प्रकरणाचा आशय आहे. 'राया, तूं विभवें विराजसि, अम्ही विद्यामहावैभवें' असें संन्यासी म्हणतो आहे. 'अद्वैतभावनापंचदशी' ही शंकराचार्यांच्या एका १५-श्लोकी प्रकरणाची समश्लोकी टीका आहे. यांत निरंजनांनीं केवळ बापदेव गुरूचाच उल्लेख केला आहे. 'वसिष्ठसुशर्मासंवाद' हें प्रकरण ३४ श्लोकांचें आहे. या प्रकरणांतील मूळ कथा स्कंदपुराणाच्या ब्रह्मगिरिमाहात्म्यांत स्कंदानें नंदिकेश्वराला सांगितलेली आहे. निरंजनांनीं तिचा समश्लोकी अनुवाद पद्मपुराणाच्या संमतीनें केलेला आहे. या प्रकरणांत प्रपंचाची असारता सांगितलेली असून, 'आतां जाउनि काशिकेप्रति सख्या श्रीविश्वनाथा भजे।' असा आदेश दिलेला आहे. या प्रकरणाची रचनातिथि वैशाख कृ. ८, रविवार, शके १६९१ ही आहे

या पांच प्रकरणांपैकीं 'भार्गवरामजन्मचरित्र' हें प्रकरण वगळून बाकीचीं चार प्रकरणें वैराग्यपोषक आणि अद्वैतप्रबोधक अशीं आहेत.

स्तोत्रें आणि पदें : स्तोत्रें आणि पदें या रचना-प्रकारांत निरंजन माधवांनीं आपल्या भक्तीची आणि पारमार्थिक अनुभवांची सरळपणें उत्कट अभिव्यक्ति केलेली असेल, असें रासिकांना वाटणें स्वाभाविक आहे. परंतु त्यांचीं स्तोत्रेंहि (पदें ६ चें आहेत) विदग्ध संस्कृत कवींच्या काव्यसरणीचेंच अनुसरण करणारीं आहेत. हीं सर्व स्तोत्रें वृत्तबद्ध असून, त्यांत शब्दालंकार व अर्थालंकार यांची भरमार आहे. 'मंत्ररामचरित' या पहिल्याच स्तोत्रांत (श्लोकसंख्या १५) श्लोकांच्या प्रथम पंक्तीच्या आद्याक्षरांतून 'श्रीराम जय राम जय जय राम' हा मंत्र गुंफला आहे. तसेंच 'निरोष्ठराघवचरितां'त (श्लोकसंख्या ४५) ओष्ठ्य वर्ण वर्ज्य केलेले आहेत. हीं दोन्ही स्तोत्रें निरंजन माधवांचे कनिष्ठ समकालीन (Junior Contemporary) मोरोपंत यांना प्रेरक ठरलीं आहेत, हें मोरोपंतांची तशाच प्रकारची रचना पाहतां स्पष्ट होतें.

रामावरील या दोन स्तोत्रांप्रमाणेंच 'महावीर्यवंत' अशा हनुमंताचें स्तोत्रहि (श्लोक २०) निरंजनांनीं गायिलें आहे. रामावरील या दोन स्तोत्रांशिवाय 'रामकर्णामृत' नामक एक प्रदीर्घ रामस्तोत्र (श्लोक १११) निरंजनांनीं शके १६९१ (चैत्र शु. १) मध्यें रचलेलें आहे. या स्तोत्रांत निरंजनांनीं रामाचें शौर्य, यश, औदार्य, इत्यादि गुण कल्पनारम्यतेनें वर्णिले असून, 'अभिजात

संस्कृतांतील कल्पनापद्धति आणि अलंकारयोजना ' यांचें दर्शन मराठी रसिकांना घडविलें आहे.

झाली हें धन्य वाणी, रघुपतिचरणीं अर्पिली पद्यमाळा ।
काव्यामोदें विराजे नवरसभरिता तोष दे सज्जनाला ॥

या शब्दांत, कवीनें रघुपतिचरणीं अर्पण करण्यासाठींच ही पद्यमाला आपण रचल्याचें सांगितलें असलें, तरी त्याचा भर ' काव्यामोदा 'वर विशेष आहे, यांत संशय नाहीं. या प्रदीर्घ स्तोत्रावर संस्कृत कवींचा प्रभाव स्पष्ट जाणवतो. यांतील दोन श्लोक (३५ व ५२) तर ' हनुमन्नाटकां ' तील दोन श्लोकांचे (१४. ७७, ८३) अनुवाद आहेत, हें डॉ. वाटवे यांनीं दाखवून दिलें आहे.[२५] ' ॐ नमो भगवते वासुदेवाय ' हें स्तोत्र (श्लोक १४) ' मंत्रामचरित्रा 'प्रमाणेंच मंत्रात्मक आहे.

निरंजनांच्या स्तोत्रसंग्रहांत ' सांबशिवाष्टक ' व ' भवान्यष्टक ' अशीं शिव-पार्वतीवरील दोन अष्टकें असून, नारायणाष्टक, ज्ञानेश्वराष्टक व स्वरूपानुभवाष्टक अशीं आणखी तीन अष्टकें आहेत. यांतील शेवटचें ' स्वरूपानुभवाष्टक ' हें स्तोत्र नसून, एक वेदान्तपर लघुप्रकरणच आहे.

शिवस्तुतिपर एक अष्टक रचून निरंजनांचें समाधान झालें नाहीं, म्हणून त्यांनीं एक ७६ श्लोकांचें ' सांबशिवस्तुतिध्यान ' रचलें आहे. यांत प्रारंभीं " शंकराच्या दरबाराचें, नंदीचें, गणपतीचें व षडाननाचें अशीं वर्णनें आहेत... पुढें पार्वतीच्या वर्णनास सुमारें ३३ पद्यें (१६ ते ४८) खर्चिलीं आहेत. यांत तिचें समग्र रूपवर्णन आलें आहे व त्यांत शृंगाराला फार प्राधान्य दिलें आहे...हें स्तोत्र अनेक शब्दालंकारांनीं, अर्थालंकारांनीं व नवीन रम्य कल्पनांनीं फारच चेतोहर झालें आहे, यांत संशय नाहीं. प्रत्येक पद्यांत अलंकारांची इतकी गर्दी उडालेली दिसते कीं, या काव्यास एक छोटीशी अलंकारमंजूषाच म्हटल्यास हरकत नाहीं असें आम्हांस वाटतें. " यांतील एखादी कल्पना मम्मटाच्या ' काव्यप्रकाशां '-तून, तर इतर कित्येक हृद्य कल्पना राजशेखराच्या ' कर्पूरमंजरीं ' तून उचलल्या आहेत, असें प्रा. चिं. नी. जोशी यांनीं दाखवून दिलें आहे.[२६] परंतु संस्कृत कवींच्या काव्योद्यानांतील सुगंधी फुलांबरोबरच आपल्या प्रतिभालतेवर फुललेलीं मनोहर व सुगंधी फुलेंहि त्यांनीं या श्लोकहारावळींत गुंफलेलीं आहेत. उदा. पार्वतीची हनुवटी म्हणजे लावण्याची पेटी असून, तिच्यांतील गोंदण ही त्या पेटीवरील मुद्राच

---

२५. प्राचीन मराठी पंडिती काव्य, पृ. १०८-१०९.

२६. निरंजन माधवाच्या स्तोत्रसंग्रहावर टीकात्मक निबंध : प्रा. चिं. नी. जोशी, पृ. २०-२२.

आहे, ही निरंजन माधवांची कल्पना कितीहि विदग्ध असली, तरी ती खास त्यांच्या मराठपणांतून उमललेली आहे, यांत संशय नाहीं. तसेंच उमेचें श्रीमुख हा आरसा असून, हनुवटी हो त्या आरशाची दांडी आहे. जेव्हां शिवाला त्या आरशांत आपलें मुख पाहण्याची इच्छा होते, तेव्हां तो हनुवटी हातीं धरतो. या कल्पनेंतील हृद्य सूचकता अनुभवतांच रसिक मंत्रमुग्ध होऊन जातील, हें निश्चित.

या शिवस्तोत्राप्रमाणेंच 'मल्हारीस्तोत्रराज' हि प्रदीर्घच (श्लोक ४४) आहे. मल्हारी हा शिवावतार आहे, या भावनेनेंच हें स्तोत्र रचलेलें असल्यामुळें त्याला शिवस्तोत्रच म्हणायला हवें. या स्तोत्राच्या अखेरीस कवीनें स्वत:ला 'पंडित निरंजन' म्हटलें अ हे. 'विठ्ठलस्तोत्र' (श्लोक ५८) आणि 'व्यंकटेश-स्तोत्र' (श्लोक १०९) हीं आणखी दोन दीर्घ स्तोत्रें होत. व्यंकटेश हें कवीचें कुलदैवत आणि विठ्ठल हें उभ्या महाराष्ट्राचें उपास्य दैवत– कवीला प्रिय असलेल्या सुंदरकृष्णाचें महाराष्ट्रप्रिय रूप, परंतु या दोन्ही दैवतांवरील स्तोत्रांतहि कवि भावनेनें उचंबळून आलेला दिसत नाहीं–इथेंहि त्याची कल्पकता व विदग्धताच जागी आहे.

निरंजनांच्या स्तोत्रसंग्रहांत गोदावरी व भागीरथी या दोन नद्यांवर आणि बनशंकरी व महालक्ष्मी या दोन देवींवर स्तोत्रें आहेत. या चार स्तोत्रांची श्लोक-संख्या अनुक्रमें २१, ४४, ९ व १७ अशी आहे. 'भागीरथीस्तोत्र' हें जगन्नाथ पंडिताच्या 'गंगालहरी'चे स्मरण घडविणारें आहे. 'महालक्ष्मीस्तोत्रा'चा उल्लेख वृत्तविषयक ग्रंथांच्या परिचयांत येऊन गेला आहे. 'बनशंकरीस्तोत्रां'त कांहीं आत्मपर उल्लेख आहेत—

चित्तीं चिंतन मी करीन म्हणतां वित्तादि चिंता मला।
नेती वोढुनि आपल्याच तिकडे द्यावें कसें म्यां तुला।
कीजे अर्चन सांग सांग विभवाभावीं कसें तें घडे।
भाग्यार्थीं नृपसेवनादि करणें हें तों मना नावडे॥

या श्लोकांतील आत्मपर उल्लेख कदाचित्, नानासाहेब पेशव्यांची इतराजी होऊन कवि तीर्थयात्रेला गेला, त्या परिस्थितीचा द्योतक असावा अथवा इ. स. १७५८ नंतरच्या निवृत्त स्थितीचा द्योतक असावा, असें वाटतें.

'सद्गुरुस्तव' आणि 'तुलसीस्तोत्र' हीं दोन स्तोत्रें अनुक्रमें ३८ व ५१ श्लोकांचीं आहेत. यांपैकीं तुलसीस्तोत्रांत कवीनें कांहीं आर्याहि ग्रथित केलेल्या आहेत. या सर्व स्तोत्रांत जशी भावोत्कटता नाहीं, तशीच ती पदांतहि आढळत नाहीं. स्तोत्रें अलंकृत व कल्पनाप्रचुर आहेत, तर पदें केवळ तत्त्वपर आहेत.

चंपू : 'गद्यपद्यमयं काव्यम्'

निरंजन माधवांचें 'सुभद्रास्वयंवर' हें एक चंपूकाव्य आहे. चंपू हा

एक संस्कृत साहित्यप्रकार असून, त्यांत गद्य आणि पद्य यांचें मिश्रण असतें. साहित्यदर्पणकार विश्वनाथानें 'गद्यपद्यमयं काव्यं चम्पूरित्यभिधीयते।' (गद्यपद्यमय काव्याला चंपू असें म्हणतात), अशी चंपूकाव्याची व्याख्या केली आहे. चंपू या संज्ञेचें मूळ अजून विद्वानांच्या हातीं आलेलें नाहीं. श्री. हरिदास भट्टाचार्य यांनीं एक काल्पनिक व्युत्पत्ति मांडली आहे. ती अशी—

चमत्कृत्य पुनाति सहृदयान्, विस्मयीकृत्य प्रसादयतीति चम्पूः। [२७]

[जें सहृदयांना चमत्कृत करून पवित्र करतें आणि विस्मित बनवून प्रसन्न करतें, तें चंपूकाव्य होय.]

ही व्युत्पत्ति चंपूच्या स्वरूपाचें द्योतन करणारी असली, तरी तिला भाषिक आधार नाहीं.

आपल्याकडे प्राचीन ब्राह्मण ग्रंथ, जातककथा, जातकमालादि बौद्ध ग्रंथ, हरिषेणादि कवींच्या शिलालिखित राजप्रशस्ति, इत्यादि रचना गद्यपद्यमय आहेत. परंतु त्यांतून चंपूकाव्य उत्क्रांत झालें असेल, असें वाटत नाहीं. जातककथा किंवा पंचतंत्रासारख्या नीतिकथा यांत पद्य असतें, तें एखादें नीतिवचन ग्रथित करण्यासाठीं अथवा कथेचें नैतिक सार विशद करण्यासाठीं. चंपूकाव्यांत तसा प्रकार आढळत नाहीं.

संस्कृत साहित्यांतील चंपूकाव्याचा विकास पाहतां या साहित्यप्रकाराची निर्मिति गद्यकाव्याच्या चरम विकासानंतर झालेली दिसते. गद्यांतला अर्थगौरव आणि पद्यांतली श्रुतिमधुरता व भावनात्मता यांचा संगम साधण्याच्या हेतूनें या गद्यपद्यमय प्रकाराचा संभव झाला असावा. परंतु पुढें हा हेतु टिकलेला दिसत नाहीं. आज उपलब्ध असलेल्या चंपूकाव्यांतील गद्यपद्याचें मिश्रण चमत्कृतीपेक्षां अन्य कोणताहि हेतु सिद्ध करूं शकत नाहीं.

दंडीनें आपल्या काव्यादर्शांत (१·३१) 'गद्यपद्यमयी वाणी चम्पूरित्यभिधीयते।' (गद्यपद्यमय वाणीला चंपू म्हणतात), असा या साहित्यप्रकाराचा उल्लेख केला आहे. चंपूचा हा प्राचीनतम उल्लेख समजला जातो. अग्निपुराणांत (३३६·३८) 'मिश्रं चम्पूरितिख्यातम्' (गद्यपद्यमिश्रित असें काव्य म्हणजे चंपू होय), असा चंपूचा उल्लेख आहे, परंतु या उल्लेखाचा काळ निश्चित करणें अशक्य आहे. दंडीनें केलेल्या उल्लेखावरून असें म्हणतां येतें कीं, त्याच्यापूर्वीं म्हणजे इ. स. च्या सहाव्या शतकापूर्वीं हा साहित्यप्रकार अस्तित्वांत होता. परंतु प्रत्यक्षांत इ. स. ९०० नंतरचेच चंपू उपलब्ध आहेत.

---

२७. संस्कृत-कवि-दर्शन : डॉ. भोलाशंकर व्यास. पृ. ५१७.

चंपूंत एखादी कथा सांगितलेली असते, म्हणून संस्कृत साहित्यशास्त्राच्या संकेतानुसार चंपूचा गद्यकाव्यांतच समावेश होतो. चंपूंत गद्य व पद्य यांचा समतोल असावा, ही अपेक्षा उपलब्ध चंपूंतून पुरी होत नसली, तरी मुळांत गद्य आणि पद्य यांना चंपूकारानें समान प्रतिष्ठा द्यावी, असा संकेत असावा. परंतु उत्तरकालीन संस्कृत नाटककारांनीं ज्याप्रमाणें नाटकांतील पात्रांचे संवाद श्लोकबद्ध बनवून टाकले. त्याचप्रमाणें चंपूकारांनींहि केवळ शोभेसाठीं गद्य ठेवून चंपूचा बहुतेक भाग पद्यांतच रचण्याचें तंत्र अवलंबिलें.

कथात्मकता आणि गद्यपद्यमयता हे चंपूचे दोन प्रधान विशेष आहेत. आद्य चंपूकार त्रिविक्रम यानें आपल्या 'नलचंपूं' त श्लिष्ट शब्दांत हे विशेष सांगितले आहेत—

उदात्तनायकोपेता गुणवद्वृत्तमुक्तका ।
चम्पूश्च हारयष्टिश्च केन न क्रियते हृदि ॥

[ज्याचा नायक उदात्त आहे व जो काव्यगुणांनीं भारलेल्या गद्यपद्यांनीं युक्त आहे असा चंपू आणि ज्याला उदात्त नायकानें परिधान केलें आहे व ज्याच्यांत टपोरे मोती सूत्रबद्ध गेलेले आहेत असा हार – यांना आपल्या हृदयाशीं जवळीक देणार नाहीं, असें कोण आहे ?]

हेमचंद्रानें आपल्या 'काव्यानुशासनां' त या दोन विशेषांबरोबरच चंपूचीं आणखी दोन लक्षणें सांगितलीं आहेत : त्याच्या मतें, चंपूकाव्य हें उच्छ्वासांत विभागलेलें असतें आणि प्रत्येक उच्छ्वासाच्या अंतीं कोणत्या तरी विशिष्ट पदाचा प्रयोग केलेला असतो.

काव्याचें नांव

या काव्याचें नांव प्रत्येक सर्गाच्या पुष्पिकेंत 'सुभद्रास्वयंवर चंपूकाव्य' असें नोंदविलेलें आहे. या नांवांतील 'चंपूकाव्य' हा शब्द रचनाप्रकाराचा द्योतक असल्यामुळें 'सुभद्रास्वयंवर' हेंच काव्याचें नांव टरतें. परंतु प्रत्यक्ष काव्यांत मात्र हें नांव आढळत नाहीं. पहिल्या सर्गांतील प्रास्ताविक भागांत कवीनें अर्जुनाला प्राधान्य दिलें आहे. श्रीकृष्णकथा ज्याप्रमाणें पातकांचें पर्वत खणून काढते, त्याप्रमाणें 'तद्भक्तपुण्यचरितें' हि पापहरण करून क्षणांत जगाचा उद्धार करतात, अशी कवीची श्रद्धा असल्यामुळेंच तो 'पांडुसुतकीर्तन' (१. ३) शब्दबद्ध करायला प्रवृत्त झालेला आहे. प्रस्तुत काव्याचा विषय म्हणजे अर्जुनाचें 'विवाहचरित' आहे, असें प्रारंभींच (१. ६) त्यानें स्पष्ट केलें आहे. उपसंहारांतहि कवि प्रस्तुत काव्याला 'पार्थचरित्र' (७. ९१) म्हणतो आणि अखेरच्या श्लोकांत अगदीं स्पष्ट शब्दांत काव्याचें नामकरण 'पार्थचंपू' असें करतो—

इति श्रीपार्थचंपू हा। केला कविनिरंजनें।
श्रीकृष्णार्पणबुद्धीनें। प्रेमानंदात्मभक्तिनें॥ (७. ९७)

यावरून कवीला अभिप्रेत असलेलें काव्यनाम 'पार्थचंपू' असें आहे, असें अंतर्गत पुराव्यावरून सिद्ध होतें. पण 'सुभद्रास्वयंवर' हें पुष्पिकेंत ग्रथित असलेलें नांव प्रतकारानें दिलेलें आहे, असें मानण्याचें कारण नाहीं. कारण ह. भ. प. पांगारकारांना उपलब्ध झालेली प्रस्तुत काव्याची एकमेव प्रत काव्यरचनेनंतर अवघ्या तीन महिन्यांनीं लिहिली गेलेली असून, त्या वेळीं कवि विद्यमान होता. तसेंच या काव्यांत अप्रत्यक्षपणें या नांवाला पुष्टि मिळते. पहिल्या सर्गांत काव्य-विषयाचा उपन्यास करतांना—

अस्मत्पितामही सुभद्रासती।
अर्जुनें वरिली कवण्या रितीं। (१. ११)

असा प्रश्न परीक्षितीनें शुकमुनींना विचारला आहे. या प्रश्नांत सुभद्रेला प्राधान्य आहे. तसेंच, याच सर्गांत पुढें (१. १२) 'अर्जुनसुभद्रापाणिग्रहणकथा' असें नांव आलेलें आहे. शेवटच्या सर्गांत तर कवीनें 'सुभद्राविवाहाख्य गाथा' (७. ८३) असें आपल्या काव्याचें पर्यायनाम नोंदविलें आहे आणि काव्याची फलश्रुति सांगतांना म्हटलें आहे कीं, "जो ही कथा भक्तीनें वाचील त्याला 'सुभद्रा' (सकलकल्याण-कारिणी) नामक मुक्ति सहज वरील" (७. ८६). शेवटच्या सर्गांत आणखी एके ठिकाणीं 'झाली रम्य विवाहमंडितकथा, पार्था सुभद्रा वरी।' (७ ९५) असा सुभद्राप्रधान उल्लेख आहे.

हे सर्व उल्लेख पाहतां कवीला 'पार्थचंपू' या नांवाप्रमाणेंच 'सुभद्राविवाह' अथवा 'सुभद्रास्वयंवर' असेंहि नांव अभिप्रेत आहे, असें मानायला जागा आहे. आणि पुष्पिकेंतील नामोल्लेखाचा विचार करतां, या अप्रत्यक्ष उल्लेखांवरून केलेलें अनुमान पुष्ट होतें.

संस्कृत वाङ्मयांतील उपलब्ध चंपूंपैकीं आद्य चंपू 'नलचंपू' हा होय. तो 'दमयंती-कथा' या नांवानेंहि ओळखला जातो. त्याचप्रमाणें निरंजन माधवांच्या प्रस्तुत चंपूचीं 'पार्थचंपू' व 'सुभद्रास्वयंवर' अशीं दोन नांवें निश्चित होतात. निरंजनपूर्व काळांतील मराठी स्वयंवरकाव्यांची परंपरा आणि प्रस्तुत काव्याच्या पुष्पिकेंतील स्पष्ट नामोल्लेख हीं ध्यानीं घेऊन मीं 'सुभद्रास्वयंवर' हेंच नांव स्वीकारलें आहे.

काव्यरचनेची प्रेरणा

निरंजन माधव हे भगवंताचे भक्त आहेत, हें आपण पाहिलेंच आहे. ज्याची कथा पातकांचे प्रचंड पर्वत खणून काढते, जो भक्तांचा पक्षपाती आहे

आणि जो आपल्या अमृतदृष्टीनें भक्तांचें रक्षण करतो (१. २), त्या श्रीकृष्णाविषयीं त्यांच्या हृदयांत परमप्रीति वास करीत होती, यांत संशय नाहीं. भगवंताच्या नवविधाभक्तींतील सख्यभक्तीचा आदर्श ज्यानें उभा केला, त्या अर्जुनाची विवाहकथा भगवंताच्या चरित्रकथेइतकीच पवित्र आहे, अशी त्यांची श्रद्धा आहे. ' तद्भक्तपुण्यचरितें हरितीं अघातें, ' या श्रद्धेनेंच ' पांडुसुतकीर्तन ' करायला ते प्रवृत्त झाले आहेत. ' कीजे अर्जुनकीर्तना तंव सहा शत्रू स्वयें नासती, ' असा या भक्तचरित्रगायनाचा प्रभाव त्यांनीं सांगितला आहे—

हे पांडवी परमपुण्यकथा पवित्रा ।
आकर्णितांचि हरिते अतिदोषमात्रा ।
देते अनंतसुकृतासि म्हणोनि यीतें ।
गातां, कुळांसहित पावति सद्गतीतें ॥ (१. ७)

काव्यरचनेची सांगता झाल्यावर कवीला असें परम समाधान लाभलें आहे कीं, आपण हरीच्या पायीं ही ' विमलतर सुश्लोककमळांची माला समर्पिल्यामुळें आपलीं शतकुळें पावन झालीं आहेत ' (७·८५). आपण हें काव्य ' श्रीकृष्णार्पणबुद्धिनें ' आणि ' प्रेमानंदात्मभक्तीनें ' रचलें आहे (७·९७), असें कवीनें आवर्जून सांगितलें आहे. काव्यरचनेमागील या भक्तिप्रेरणेमुळेंच, ' पढेल जो पार्थचरित्र त्याला । यथार्थ तें घालिल मुक्तिमाळा ॥ ' (७·९१) अशी पारमार्थिक फलश्रुति त्यानें सांगितली आहे.

कवि भक्त असल्यामुळें त्यानें आपली वाणी प्रभुगुणकीर्तनांत अथवा प्रभूच्या भक्तांच्या संकीर्तनांत रमवावी, हें स्वाभाविक आहे. ' वाणी पवित्र करणें गुणकीर्तनानें ' (चिद्बोध रामायण, १·१·८), ही त्याची भक्तिनिष्ठ साहित्यप्रेरणा त्याच्या भक्तिमय जीवनाशीं सर्वस्वीं सुसंवादी आहे. परंतु या कवीच्या जीवनांत भक्तीमुळें मूळची विदग्ध रसिकता गुदमरलेली नाहीं. प्रभुगुणसंकीर्तनाचें निमित्त करून त्यानें आपल्यांतील विदग्ध अभिरुचीचा कवि प्रकट केला आहे, हें काव्यरसिकांच्या सहज प्रत्ययास येईल. आपलें काव्य म्हणजे ' सद्रत्नहारावळी ' आहे, असा त्याला यथार्थ अभिमान वाटतो आणि ' कंठीं यीस धरील जो चतुर त्या हें शोभवी भूतळीं, ' असा विश्वासहि तो व्यक्त करतो.

शृंगारमुख्य नवही रस मूर्तिमंत ।
काव्यांत या परिसतां दिसती प्रशस्त ।
भोक्ता असे यदुपती सकळां रसांचा ।
झाली म्हणोनि रसिका कविराजवाचा ॥ (१. ९)

या उद्गारांत कवीनें आपल्या वाणीला ' रसिका कविराजवाचा ' म्हटलें असून, आपल्या काव्यांत ' शृंगारमुख्य नवही रस ' मूर्तिमंत झाल्याची ग्वाही दिली आहे.

हें काव्य सांगता पावल्यावर, ' रसालंकारांची अतिसरस वाणी विलसली ! ' हा परमतृप्तीचा भाव कवीच्या मनांत जागा झालेला आहे. त्यानें हीं श्लोकरूपी कमळें हरीच्या पायीं अर्पिलेलीं असलीं, तरी तीं ' सुश्लोककमळें ' आहेत, याची त्याला स्पष्ट जाणीव आहे. ही जाणीवच कवित्वाच्या प्रेरणेला उठाव देणारी आहे. ' सर्व रसालंकारांनीं विभूषित केलेल्या अशा या काव्याच्या रंगभूमीवर साक्षात् शारदा नृत्य करीत आहे ' (७.९६) हा कवीचा उद्‌गार तर त्याच्या कविभूमिकेचा प्रकर्ष प्रत्ययास आणणारा आहे.

निरंजन माधवांनीं आपल्या काव्याविषयीं काढलेले हे सर्व उद्‌गार पाहतां हें सहज जाणवून जातें कीं, भक्तीचें सूत्र सुटूं न देतां कवित्वाचा विलास दाखविणें हींच त्यांच्या काव्यरचनेमागील प्रधान प्रेरणा आहे. ज्या संयमानें त्यांनीं हा शृंगारप्रधान विषय हाताळला आहे, तो पाहतां ते आपल्या भूमिकेशीं संपूर्णपणें प्रामाणिक राहिल्याची खात्री पटते आणि रसिकांच्या मनांतील त्यांच्याविषयींचा आदर दुणावतो, यांत संशय नाहीं.

' सुभद्रास्वयंवरा 'चे मूलस्रोत

' सुभद्रास्वयंवरा 'ची कथा अत्यंत आकर्षक असूनहि प्राचीन मराठी कवींनीं तिच्याकडे द्यावें तसें लक्ष दिलेलें नाहीं. भागवताच्या दशमस्कंधावरील टीकांच्या निमित्तानें या कथेचें मराठीकरण अनेकांनीं केलेलें असलें, तरी निरंजन-समकालीन असलेल्या रामचंद्र मल्हारासारखा[२८] एखादा अपवाद सोडल्यास स्वतंत्रपणें या कथेवर काव्य रचायला अन्य कोणी प्राचीन कवि प्रवृत्त झालेला दिसत नाहीं. रुक्मिणीस्वयंवराच्या प्रसंगावर अनेक प्राचीन कवींनीं आपली लेखणी चालविलेली दिसते; तसेंच सीतास्वयंवरावरहि अनेकांनीं काव्यें रचलेलीं आहेत. या दोन प्रसंगांवर अनेक काव्यें होण्याचें कारण असें कीं, त प्रसंग प्राचीन कवींच्या परमार्थ-प्रवणतेला अनुकूल आहेत. त्या दोन प्रसंगांचे नायक साक्षात् परमेश्वरावतार असून नायिका या परमात्म्याच्या चिच्छक्ति अथवा परमात्म्याशीं एकरूप होऊं पाहणाऱ्या जीवात्म्याचीं प्रतीकें मानल्या गेलेल्या आहेत. तशी परिस्थिति सुभद्रास्वयंवर-कथेची नाहीं. परंतु निरंजन माधवांनीं मात्र त्या कथेच्या आत्मिक काव्यात्मतेमुळें तिचा स्वीकार केला; एवढेंच नव्हे तर तिला सख्यभक्तीच्या रंगांत रंगवून टाकलें. भक्तीचें अधिष्ठान ढळूं न देतां निरंजनांनीं या कांहींशा अलक्षित कथेवर विदग्ध महाकाव्याचा साज कसा चढविला, हें पाहिल्यावर निरंजनांच्या काव्यकुशलतेचा आपणांस प्रत्यय येईल. हा प्रत्यय घेण्यासाठीं आपण प्रथम या कथेचे मूलस्रोत निरखले पाहिजेत. निरंजनांनीं सांगितलेले आपल्या काव्याचे मूलाधार असे—

---

२८. रामचंद्र मल्हार सुखटणकर यांची कविता : संपादक प्रा. अ. का. प्रियोळकर.

कांहीं भागवती कथाक्रम असे, कांहीं असे भारती ।
कांहीं अन्यपुराणभाव वरिला, कांहीं कवीभारती ।
हे सारी ग्रथुनी यथार्थ विरचूं सद्रत्नहारावळी ।
कंठीं यीस धरील जो चतुर, त्या हे शोभवी भूतळीं ॥ (१.१०)

या श्लोकांत कवीनें सांगितलेल्या काव्याधारांचें वर्गीकरण असें करतां येईल—

(१) **भागवती कथा :** श्रीमद्भागवतपुराणाच्या दशम स्कंधांत सुभद्रा-स्वयंवराची कथा (अध्याय ८६, श्लोक १–१२) आहे.

(२) **भारती कथा :** महाभारताच्या आदिपर्वांत 'सुभद्राहरण-पर्व' (अध्याय २१९–२२०) नामक एक उपपर्व आहे. या उपपर्वाची पार्श्वभूमि २१३ व्या अध्यायापासून आलेली असून, २२१ व्या अध्यायाचे प्रारंभींचे सहा श्लोक त्याच कथेची अखेर वर्णन करणारे आहेत.

(३) **अन्यपुराणभाव :** भागवत आणि महाभारत यांत न आलेला नारदार्जुन-संवादाचा भाग कवीनें स्कंदपुराणांतून (कौमारिकाखंड, अ. २...) उचललेला आहे.

(४) **कविभारती :** इतिहास-पुराणांशिवाय विदग्ध संस्कृत काव्यांचाहि उपयोग निरंजन माधवांनीं करून घेतलेला आहे. 'साहित्यसागर यथामतिनें मथीतों,' असें त्यांनीं प्रास्ताविकांत (श्लो. ६) म्हटलें आहे, तें त्यांचें म्हणणें याच कवि-भारतीला उद्देशून आहे.

केवळ कथेच्या दृष्टीनें विचार केला, तर असें स्पष्टपणें दिसून येईल कीं, निरंजन माधवांनीं सांगितलेल्या चतुर्विध आधारांपैकीं केवळ पहिले दोनच—म्हणजे भागवत व महाभारत यांतील सुभद्रास्वयंवरप्रसंग—'सुभद्रास्वयंवर' या काव्याचे मूलाधार आहेत. निरंजनांनीं याच दोन मूलाधारांना अनुसरून काव्य-कथेचा उपन्यास केला आहे, हें पुढील अवतरणांवरून दिसून येईल—

श्रीमद्भागवतीं । शुकमुनीस पुसे परीक्षिती ।
अस्मत्पितामही सुभद्रासती । अर्जुनें वरिली कवण्या रितीं । (१.११)

'सुभद्रास्वयंवरा'च्या कथेचा हा प्रस्ताव भागवतांतील पुढील श्लोकाचा अनुवाद मात्र आहे—

ब्रह्मन् वेदितुमिच्छामः स्वसारं रामकृष्णयोः ।
यथोपयेमे विजयो या ममासीत् पितामही ॥　　(भा. १०. ८६. १)

[राजा परीक्षिति शुकाचार्यांस म्हणतो : हे मुने, जी बलराम आणि श्रीकृष्ण यांची बहीण आणि माझी आजी होती, त्या सुभद्रेशीं अर्जुनानें कशा प्रकारें विवाह केला, तें जाणण्याची मला इच्छा आहे.]

तसेंच पुढें –

ऐसाचि जन्मेजय महाप्रवीण। भारतगाथा करितां श्रवण।
व्यासशिष्य वैशंपायन। तयासी प्रेमपुरःसर करी प्रश्न।
'स्वामी, अर्जुनसुभद्रापाणिग्रहण। कथा कथावी' म्हणतां मुनिकुलमंडण।
परमानंदें कथन करी॥ (१. १२)

अशा शब्दांत महाभारताला अनुसरून कथाप्रस्ताव केला आहे.

या दोन मूलाधारांचें स्वरूप आणि कवीनें काव्यरचनेंत केलेला त्यांचा उपयोग यांचा सविस्तर विचार केल्याशिवाय कवीचें काव्यरचनाकौशल्य स्पष्ट होणार नाहीं. म्हणून आपण या दोन्ही मूलाधारांचें स्वरूप कांहींशा विस्तारानें पाहूं.

भागवतांतील कथा : आपली आजी सुभद्रा हिच्याशीं अर्जुनानें कशा प्रकारें विवाह केला, या परीक्षितीच्या पृच्छेवरून शुकमुनींनीं सांगितलेली कथा अशी आहे :

महापराक्रमी अर्जुन तीर्थयात्रा करीत पृथ्वीवर हिंडत असतां प्रभासतीर्थाला जेव्हां आला, तेव्हां तिथें त्याला आपल्या या मामेबहिणीचा वृत्तान्त समजला. बलराम तिला दुर्योधनास देणार आहे, परंतु इतरांचा तसा उद्देश नाहीं, हें त्याच्या कानांवर आलें आणि तिची प्राप्ति करून घेण्याच्या इच्छेनें तो त्रिदंडी संन्यासी होऊन द्वारकेला आला. तिथें आपला हेतु सिद्धीस कसा नेतां येईल, याचा विचार करीत तो पावसाळ्याचे चार महिने राहिला असतां नागरिकांनीं त्याचा चांगला सत्कार केला आणि बलरामानेंहि त्याला न ओळखतां त्याचा वारंवार बहुमान केला. एकदां तर त्याचा पाहुणचार करावा म्हणून बलरामानें त्याला आमंत्रण देऊन आपल्या घरीं आणलें. तिथें बलरामानें मोठ्या भक्तीनें वाढलेले पदार्थ त्यानें भक्षण केले. त्या भोजनप्रसंगीं पराक्रमी पुरुषांच्या मनांत भरणारी अशी ती उपवर कन्या सुभद्रा त्याच्या दृष्टीस पडली. तिला पाहतांच त्याचे नेत्र आनंदानें प्रफुल्लित झाले आणि प्रेमानें वेडावलेलें त्याचें मन तिच्यावर बसलें. स्त्रियांच्या मनास आनंद देणाऱ्या अशा त्या अर्जुनाचें दर्शन होतांच सुभद्रेचेंहि मन त्याच्यावर बसलें. तिचें हृदय व नेत्र त्याच्याकडे ओढ घेऊं लागले व ती हंसत लाजत त्याच्याकडे चोरून पाहूं लागली. नंतर, तिचेंच सतत ध्यान करणारा अर्जुन तिच्या प्राप्तीची संधि पाहूं लागला. बलवत्तर कामानलानें तो अगदीं पीडित झाला आणि त्याचें मन अस्थिर होऊन, त्याला कशानेंहि सुख वाटेनासें झालें. अशा स्थितींत मोठ्या देव-यात्रेचा प्रसंग उद्भवला. त्या वेळीं ती सुभद्रा द्वारकेंतील आपल्या सुसंरक्षित राज-वाड्यांतून बाहेर पडून रथांत बसून देवदर्शनास चालली असतां, त्या महापराक्रमी अर्जुनानें तिच्या मातापित्यांच्या व कृष्णाच्या संमतीनें तिला त्या समारंभांतून पळवून नेलें. त्याला अडविण्यासाठीं जे शूर यादवे आडवे आले, त्यांना त्यानें आपलें धनुष्य

सरसावून पळवून लावलें आणि सिंह आपला वांटा घेऊन जसा निघून जातो, तसा तो–यादवमंडळी आक्रोश करीत असतां–रथांत बसून निघून गेला. हा घडलेला प्रकार जेव्हां बलरामाला कळला, तेव्हां पौर्णिमेच्या समुद्राप्रमाणें तो अगदीं खवळून गेला; पण कृष्णानें व अन्य स्नेह्यांनीं त्याच्या पायां पडून त्याला थोड्या वेळानें शांत केलें. नंतर शांत झालेल्या त्या बलरामानेंहि आनंदानें वधूवरांकडे हत्ती, घोडे, रथ, इत्यादि मूल्यवान् साहित्य व दासदासी आंदण म्हणून पाठवून दिलीं. (भागवतपुराण, १०. ८६. १–१२).

भागवतकारांनीं दिलेली ही कथा अल्पाक्षररमणीय आहे. भागवतकारांनीं दिलेल्या या कथेचें प्रमुख वैशिष्ट्य असें कीं, ती सुभद्राहरणाची कथा नसून, सुभद्रास्वयंवराची कथा आहे—विवाहांत परिणत झालेल्या सुभद्रेच्या सफल प्रीतीची कथा आहे. या कथेंत काव्यात्मता आहे, सूचकता आहे, अद्भुतताहि आहे. सुभद्रेचें साक्षात् दर्शन होण्यापूर्वीपासूनच तिच्या सौंदर्याच्या कीर्तीनें आकर्षित झालेला अर्जुन, तिचा दुर्योधनाशीं विवाह करण्यास बलरामेतर मंडळींची असलेली असंमति, त्यांच्या–विशेषतः श्रीकृष्णाच्या असंमतीचा अर्जुनास होऊं शकणारा उपयोग, सुभद्रेच्या प्राप्तीसाठीं अर्जुनाचा त्रिदंडी संन्यास, त्याची ओळख न पटल्यामुळें भाबडेपणानें बलरामानें केलेलें त्याचें स्वागत, त्या स्वागतप्रसंगीं प्रथम-दर्शनींच सुभद्रा व अर्जुन यांची परस्परांवर जडलेली प्रीति, अर्जुन संन्यास-वेशांत असूनहि सुभद्रेनें त्याच्याविषयीं अनुकूलता दाखवावी–या घटनेंतून सूचित होणारें कृष्णाचें कारस्थान, सुभद्रार्जुनांची प्रणयविव्हलता, अर्जुनानें कृष्णाच्या संमतीनें साधलेली संधि आणि त्यानें सुभद्रेचें केलेलें हरण–या सर्वच घटनांचा क्रम अत्यंत नाट्यमय वाटतो आणि त्यांतली नाट्यात्मता जाणवूं लागतांच भागवतकारांनीं न दिलेला तपशील वाचक त्या नाट्यमय कथेंत आपल्या कल्पकतेनें भरूं शकतो. निरंजन माधवांनीं प्राधान्यानें भागवतकारांचाच कथादर्श पुढें ठेवून आपली सुभद्रा-स्वयंवरकथा रंगविली आहे. भागवतकारांनीं घडविलेल्या सूचनांच्या आधारें त्यांनीं अन्य सामग्रीचा उपयोग केला आणि आपल्या प्रतिभेच्या किमयेनें मूल-कथेवर महाकाव्याचा साज चढविला.

महाभारतांतील कथा : अपरांतांतील तीर्थयात्रा उरकल्यावर पश्चिम सागराच्या तीरावरील तीर्थें पहात पहात अर्जुन प्रभासक्षेत्रीं आला. त्याच्या आगमनाची वार्ता ऐकतांच श्रीकृष्णहि त्याच्या भेटीच्या ओढीनें प्रभासला गेला. त्या दोघां स्नेह्यांनीं परस्परांना आलिंगन दिलें आणि कुशल प्रश्न विचारले. त्यानंतर श्रीकृष्णानें अर्जुनाला रैवतक पर्वतावर नेलें. तिथें अर्जुनानें श्रीकृष्णाच्या मधुर सान्निध्यांत एक रात्र निवास केला आणि दुसऱ्या दिवशीं ते दोघेहि रथांत बसून द्वारकेला आले. द्वारकावासी जनांनीं त्यांचें प्रचंड स्वागत केलें. अर्जुन द्वारकेंत कृष्णाच्या घरीं अनेक दिवस राहिला. (महाभारत, आदिपर्व, अ. २१८).

पुढें कांहीं दिवसांनीं रैवतक पर्वतावर वृष्णि आणि अंधक यांचा मोठा उत्सव झाला. त्या प्रसंगीं भोज, वृष्णि व अंधक कुळांतील वीरांनीं रैवतकावर नाना प्रकारें विलास केला. त्या पर्वतावर गायन, नर्तन व वादन यांनीं भारलेल्या वातावरणांत वीरपुरुष आपल्या स्त्रियांसह मधुपानानें धुंद होऊन विहार करीत होते. अशा या उत्सवांत अर्जुन कृष्णासह फिरत असतांना मैत्रिणींच्या समूहांत असलेली सुंदर आणि सुलक्षणी सुभद्रा त्यानें पाहिली. तिला पाहतांच अर्जुनाच्या मनांत काम उद्भवला. अर्जुनाचें हृदय सुभद्रेकडे आकर्षित झालें आहे, हें कृष्णाच्या तत्काळ ध्यानीं आलें आणि तो थोडेंसें हसून त्याला म्हणाला, " वनचराचें चित्त कामानें क्षुब्ध होतें हें कसें ?...माझी ही बहीण सुभद्रा पित्याची लाडकी कन्या आहे. तुझी इच्छा असेल, तर मी याविषयीं पित्याजवळ गोष्ट काढतों."

त्यावर अर्जुन म्हणाला, " तुझी ही बहीण माझी पट्टराणी होण्यासाठीं तूं सहाय्य केलेंस, तर तूं माझें सर्व कल्याण केलेंस, असेंच निःसंशय होईल. हिच्या प्राप्तीसाठीं मी काय करूं तें सांग. जें मानवाला शक्य आहे, तें सर्व करायला मी सिद्ध आहें. "

श्रीकृष्णानें अर्जुनाला असें उत्तर दिलें कीं, " हे नरश्रेष्ठा, स्वयंवर हा क्षत्रियांचा मुख्य विवाहविधि आहे. परंतु स्त्रियांचा स्वभाव चंचल असल्यामुळें तो विधि सफलतेच्या दृष्टीनें संशयित आहे. बलात्कारानें आवडत्या स्त्रीचें हरण करणें हेंहि विवाहसाधन शूर क्षत्रियांना प्रशस्त आहे. तेव्हां तूं माझ्या या बहिणीला बलात्कारानें पळवून ने. कारण स्वयंवरांत हिची इच्छा काय होईल तें कोण बरें सांगणार ? "

एवढें संभाषण झाल्यावर कृष्ण आणि अर्जुन यांनीं कांहीं योजना निश्चित केली आणि इंद्रप्रस्थाला दूत पाठवून युधिष्ठिराची संमति मिळविली. (महाभारत, आदिपर्व, अ. २१९).

पुढें सुभद्रा रैवतक पर्वतावर गेल्याचें समजतांच अर्जुन कृष्णाच्या संमतीनें, त्याचा निरोप घेऊन मृगयेच्या निमित्तानें रथांत बसून निघाला. तो गांवाबाहेर पडतांच, रैवतकाची व तेथील देवतांची पूजा करून परतलेली सुभद्रा त्यानें पाहिली. तो तत्काळ रथांतून उतरून तिच्याकडे धांवत गेला आणि तिला बलात्कारानें रथांत बसवून इंद्रप्रस्थाकडे निघाला. तिला नेतांना पाहून सैनिक आरडाओरडा करीत द्वारकेंत आले. त्यांनीं सुधर्मा राजसभेच्या रक्षकाला अर्जुनाचें तें कृत्य सांगितलें. सभारक्षकानें लगेच ' सर्व जण सज्ज व्हा ' असा इशारा देण्यासाठीं नौबत वाजविली. त्याबरोबर भोज, वृष्णि व अंधक कुळांतील सर्व वीर तिथें जमा झाले. सभापालाकडून अर्जुनाचें कृत्य समजतांच ते खवळले आणि अर्जुनाचें पारिपत्य करायला सिद्ध झाले. परंतु बलराम त्यांना म्हणाला, " अज्ञ हो, कृष्ण स्तब्ध असतां, त्याचा

अभिप्राय जाणल्यावांचून तुम्ही संतापानें व्यर्थ गर्जना करीत आहां. प्रथम त्या महाबुद्धिमंताचा अभिप्राय आणून घ्या आणि मगच त्याला जें करणें रुचत असेल, तें तुम्ही वेळ न लावतां करा." (महाभारत, आदिपर्व, अ. २२०).

बलरामाच्या या भाषणानें ते सर्व जण शांत झाल्यावर तो श्रीकृष्णाला म्हणाला, " हे जनार्दना, आम्हीं सर्वांनीं तुझ्याकरितां अर्जुनाचा सत्कार केला; परंतु तो दुष्टबुद्धि कुलकलंक त्या सत्काराला पात्र नाहीं. एखाद्याच्या घरीं भोजन करून तिथेंच त्याचें भांडें फोडणें हें आपणांस कुलीन समजणाऱ्या कोणत्या पुरुषास शोभतें ? अर्जुनानें केलेला अपमान मला सहन होत नाहीं. मी एकटा पृथ्वी निष्कौरव करणार ! "

बलरामाच्या या भाषणाला अनेकांनीं पुष्टि दिली. त्यावर श्रीकृष्ण म्हणाला, " अर्जुनानें आपल्या सात्वत कुळाचा अपमान केला नसून, सन्मानच केला आहे, असें मला वाटतें. एखाद्यानें पशूप्रमाणें केलेली कन्येची देणगी स्वीकारणें अथवा तिला विकत घेणें अर्जुनाला पसंत नसल्यामुळें त्यानें अन्य विधींतील दोष टाळण्यासाठीं राक्षस विधीनें सुभद्रेनें हरण केलें, हें योग्यच झालें. शिवाय अर्जुनाला युद्धांत जिंकूं शकणारा शंकरावांचून त्रैलोक्यांत कोणीहि नाहीं. तेव्हां त्याच्याशीं युद्ध करून फजित होण्यापेक्षां तुम्हीं त्याला समजावून परत आणणें हेंच इष्ट ठरेल. "

कृष्णाचें हें म्हणणें यादवांना पटलें. त्यांनीं अर्जुनाला सन्मानानें द्वारकेला आणलें आणि अर्जुन व सुभद्रा यांचा विवाह थाटामाटानें पार पाडला. विवाहानंतर त्यानें एक वर्षभर द्वारकेंतच विलासोपभोग घेतला. (महाभारत, आदिपर्व अ. २२१).

ही महाभारतांतील कथा सुभद्रास्वयंवराची नसून, सुभद्राहरणाची आहे. या कथेंत सुभद्रेच्या पूर्वरागाचा संबंधच येत नाहीं. तसेंच, सुभद्रा दुर्योधनाला देण्याचें बलरामानें ठरविलें होतें, असेंहि यांत कुठें उल्लेखिलेलें नाहीं. तसेंच अर्जुन कृष्णाच्या संमतीनें रैवतकावर त्रिदंडी संन्यास घेऊन राहतो आणि बलराम त्याला घरीं आणून त्याचा सत्कार करतो, ही अद्‌भुताचें वलय निर्माण करणारी घटनाहि महाभारतकार नोंदवीत नाहींत. ही कथा सरधोपट आहे– तींत कसलीहि काव्यात्मता नाहीं; सूचकता नाहीं.

भागवत आणि महाभारत या दोन्ही ग्रंथांतील कथा पाहतां, हें स्पष्ट होतें कीं, निरंजन माधवांनीं आपलें काव्य प्रामुख्यानें भागवतांतील कथेवर आधारलेलें आहे आणि कलात्मकतेच्या दृष्टीनें त्याला पोषक असा कांहीं तपशील त्यांनीं महाभारतांतून उचललेला आहे.

आतां आपण निरंजनांच्या 'सुभद्रास्वयंवरा'च्या कथेचें विश्लेषण करूं आणि त्यांतील विविध कथाघटकांचे मूलस्रोत निश्चित करूं—

सर्ग पहिला

श्लोक १ : अर्जुनाचें सारथ्य करणाऱ्या कृष्णाला नमन. अर्जुनाच्या सख्य भक्तीचा विजय दाखविणारी कथा म्हणून निरंजनांनीं या कथेचा स्वीकार केला आहे. प्रस्तुत नमन सख्यभक्तीच्या विजयाचें सूचक आहे.

श्लोक २–९ : कथेचें माहात्म्य आणि काव्याचा गौरव.

श्लोक १० : काव्यकथेच्या मूलाधारांचा निर्देश.

चूर्णिका ११ : भागवतानुसार कथाप्रस्ताव.

चूर्णिका १२ : महाभारतानुसार कथाप्रस्ताव.

श्लोक १३–४४ : सुभद्रेच्या सौंदर्याचें वर्णन.

हें वर्णन स्वतंत्र असून त्यावर विदग्ध संस्कृत काव्यांतील नायिका-वर्णनांचा प्रभाव पडलेला आहे.

श्लोक ४५-४६ : सुभद्रेच्या हृदयांत अर्जुनाविषयीं उदित झालेला प्रीतिभाव. हें खास कवीचें वैशिष्ट्य आहे.

श्लोक ४७-४८ : सुभद्रा अर्जुनाला द्यावी, हा कृष्णाचा संकल्प आणि त्याला असलेली बलरामेतर सर्वांची संमति. हा भाग भागवतसंमत आहे.

सर्ग दुसरा

चूर्णिका १-३ : सुभद्रा दुर्योधनाला द्यावी, हा बलरामाचा विचार भागवताला अनुसरून.

चूर्णिका ४-७ व श्लोक ८-१३ : बलरामाचा विचार कानीं येतांच सुभद्रा अस्वस्थ बनते आणि इष्टवरप्राप्तीसाठीं शिवपार्वतीची पूजा-प्रार्थना करते, हा कथाभाग कविनिर्मित आहे. त्यावर भागवतांतील उषाहरणाची छाया जाणवते.

चूर्णिका १४-२१, श्लोक २२-२६ व चूर्णिका २७-३० : नारद इंद्रप्रस्थास येऊन बलरामाचा विचार अर्जुनास सांगतो. तें ऐकून सुभद्रेविषयीं पूर्वीपासून आकर्षण बाळगणारा अर्जुन अस्वस्थ होतो आणि 'मजसारिखा वीर धनुर्धर असोनि धरणी। कैसा वरील दुर्योधन यादवाधीश्वरभगिनी?' इत्यादि गर्जना करतो– हा कथाभाग कविनिर्मित आहे. नारदार्जुन-भेटीला स्कंदपुराणाचा दूरान्वित आधार आहे.

चूर्णिका २१–३४ व श्लोक ३५–४९ : धर्मराजाला द्रौपदीसह एकान्तांत पाहिल्यामुळें प्रायश्चित्त घेण्यासाठीं अर्जुन तीर्थयात्रेला निघतो आणि तीर्थयात्रा करीत द्वारकेसमीप येतो; तसेंच कृष्णहि अर्जुनाच्या भेटीच्या ओढीनें मृगयेनिमित्त बाहेर पडतो – महाभारताला अनुसरून.

सर्ग तिसरा

चूर्णिका १–२, श्लोक ४, चूर्णिका ५–२४ : कृष्णार्जुनभेट – महाभारतास अनुसरून. कृष्णार्जुन-संवाद आणि त्यांत सुभद्रेच्या विवाहासंबंधीं झालेली चर्चा– भागवतांतील सूचकतेचा लाभ घेऊन कवीनें केलेली स्वतंत्र निर्मिति.

श्लोक २४, चूर्णिका २६–३० : अर्जुनानें त्रिदंडी संन्यास घेऊन रैवतक पर्वतावर चातुर्मासाचा काळ काढावा आणि बलरामाला भुरळ पाडावी, ही श्रीकृष्णाची कारस्थानी सूचना भागवतांतील सूचकतेंतून निर्मिलेली आहे.

चूर्णिका ३१–४१ : रैवतकवर्णन कविनिर्मित संस्कृत महाकाव्यांच्या संकेतानुसार.

सर्ग चौथा

बलराम व संन्यासवेशधारी अर्जुन यांची रैवतकावर भेट, बलराम संन्याशाला घरीं बोलावतो, संन्यासी राजभोगाविषयीं लटकी नापसंती दाखवितो आणि अखेर बलरामाच्या आग्रहानें त्याच्या घरीं जातो, हा कथाभाग भागवतांतील सूचकतेवर आधारलेला आहे.

सर्ग पांचवा

संपूर्ण कविनिर्मित. बलराम संन्यासी अर्जुनाला घरीं ठेवून घेऊन, सुभद्रेला त्याच्या सेवेला ठेवतो; त्याची सेवा करीत असतां सुभद्रा त्याच्या मुखांत अर्जुनाच्या मुखाचें साम्य पाहते आणि आश्चर्य प्रगट करते. नंतर संन्यासी अर्जुन व सुभद्रा यांचा संवाद होतो आणि त्यांतून सुभद्रेची अर्जुनाविषयींची उत्कट प्रीति व्यक्त होते. नंतर श्रीकृष्ण बलरामाकडे येऊन त्याला मानभावीपणानें दोष देतो कीं, तूं सुभद्रेला त्या तरुण संन्याशाच्या सेवेंत ठेवलेंस तें अनिष्ट आहे.

सर्ग सहावा

श्लोक १-७ : शरद्ऋतुवर्णन. कविनिर्मित. संस्कृत महाकाव्यांच्या संकेतानुसार.

श्लोक ८-३८ : चातुर्मास संपल्यामुळें अर्जुन बलरामाचा निरोप घेतो; बलराम त्याला रैवतकोत्सव पाहण्याचा आग्रह करतो; परिवारासह अर्जुन रथांत बसून

रैवतकाकडे निघतो; मागचे-पुढचे यादव वीर बेसावध आहेत, हें पाहून तो सुभद्रेला रथांत घालून वेगानें रथ हाकतो; बरोबरच्या वीरांना हें समजतांच ते पाठलाग करतात, परंतु तो अर्जुन आहे हें समजतांच परत फिरतात आणि कृष्णार्जुनांना हें वृत्त कळविण्यास येतात—भागवत आणि महाभारत या दोन्ही ग्रंथांच्या आधारें.

सर्ग सातवा

श्लोक १–८१ : वीरांच्या तोंडून सुभद्राहरणाचें वृत्त ऐकतांच बलराम खवळतो आणि पांडवविनाशाच्या गर्जना करतो; कृष्ण त्यांची समजूत काढतो; नंतर सुभद्रा व अर्जुन यांना सन्मानानें द्वारकेला आणतात आणि त्यांचा विवाह थाटामाटानें साजरा करतात. भागवत व महाभारत या दोन्हींच्या आधारें.

श्लोक ८२–९७ : उपसंहार व फलश्रुति.

या विश्लेषणावरून वाचकांच्या ध्यानीं येईल कीं, निरंजनांनीं भागवतांतील कथा पुढें ठेवून आणि त्यांत महाभारतांतील कथेचा कांहींसा तपशील भरून संस्कृत विदग्ध काव्यांच्या रसास्वादानें समृद्ध बनलेल्या आपल्या प्रतिभेनें या काव्याची हृदयंगम रचना केली आहे. मूलाधारांचा उपयोग करून घेण्यांत त्यांनीं दाखविलेली कुशलता आणि मूलकथेला महाकाव्याचें स्वरूप देण्यात दिसणारी त्यांची कल्पकता स्पृहणीय आहे.

चंपू नव्हे – विदग्ध महाकाव्य

निरंजनांनीं सुभद्रास्वयंवराची भागवतांतील कथा स्वीकारून, तिच्यावर विदग्ध महाकाव्याचा साज चढविला आहे. या काव्यांतील प्रत्येक सर्गांत कांहीं चूर्णिका टाकलेल्या आहेत, म्हणूनच केवळ याला चंपू म्हणायचें, इतकेंच. परंतु चूर्णिकांच्या वापराची बाब सोडली, तर हें काव्य सर्व बाबतींत महाकाव्याच्या लक्षणांशीं जवळीक साधणारें आहे. शिवाय यांतील चूर्णिकांची प्रकृतिहि त्यांतील तालबद्धतेमुळें गद्याऐवजीं पद्याकडे झुकणारी आहे. आजच्या भाषेंत सांगायचें तर ती मुक्तछंदांतील रचना आहे. याचा अर्थ स्पष्ट असा आहे कीं, चूर्णिकांना गद्य मानल्यामुळेंच या काव्याचा 'गद्यपद्यमय काव्या'च्या कक्षेंत–चंपूकाव्यांत समावेश झालेला आहे. वास्तविक तें विदग्ध संस्कृत महाकाव्यांच्या धर्तीचें काव्य आहे. हें काव्य रचतांना निरंजनांपुढें पंचमहाकाव्यांचा आदर्श होता.

इतिहास-पुराणांतील किंवा सत्त्वसंपन्न पुरुषांच्या चरित्रांतील कथा; त्या कथेचा नायक उदात्तचरित असा देवकोटींतील अथवा क्षत्रिय कुलांतील महापुरुष; त्याच्या चरित्राचा उठाव करण्यासाठीं रूपगुणयुक्त नायिका; ऋषिमुनि, दूत, योद्धे, खलनायक, इत्यादि पात्रांची योजना; कथानकाला उठाव यावा म्हणून प्रभात,

मध्यान्ह, सायंकाळ, रात्र, अंधकार, षड्ऋतू, सागर, नद्या, अरण्यें, चंद्र, सूर्य, उद्यानक्रीडा, जलविहार, मद्यपान, रतिक्रीडा, नगर, आश्रम, स्वर्ग, यज्ञ, इत्यादींचीं वर्णनें; विवाह, पुत्रजन्म, रणप्रयाण दूतप्रेषण, राजकारणचर्चा, वियोग, समागम, मृगया, इत्यादि प्रसंगांची योजना; कथानकाची सर्गबद्ध विभागणी; गुणालंकारांनीं नटलेली भाषाशैली आणि चतुर्विध पुरुषार्थांचें साधन हा हेतु– हीं विदग्ध संस्कृत महाकाव्यांचीं लक्षणें मानलीं जातात हीं सर्वच लक्षणें प्रत्येक महाकाव्यांत असलींच पाहिजेत, असें नाहीं. त्यांपैकीं अनेक लक्षणांनीं युक्त असें जें असेल, तें विदग्ध महाकाव्य ठरूं शकतें.

या लक्षणांच्या प्रकाशांत निरंजनांच्या 'सुभद्रास्वयंवरा'चें निरीक्षण केलें, तर असें आढळून येतें कीं, विदग्ध संस्कृत महाकाव्यांच्या लक्षणांना अनुसरून या काव्यांतील नायक अर्जुन हा धीरललित नायक आहे, सुभद्रेसारखी गुणवती व रूपवती नायिका आहे; तिला अर्जुनाऐवजीं दुर्योधनासारख्या खलपुरुषाला देण्याचा बलरामाचा संकल्प हाच खलनायक आहे; राजसभा, पर्वत, उत्सव, शरद्ऋतु यांचीं वर्णनें आहेत; नारदासारखें ऋषि पात्र आहे; राजसभेंतील चर्चा आहे, सैन्याच्या हालचाली आहेत व कारस्थानेंहि आहेत. विप्रलंभ शृंगाराचा उठाव केलेला आहे. तसेंच, या काव्याची विभागणी अनेक सर्गांत झालेली असून, प्रत्येक सर्गांत विविध वृत्तांची योजना केलेली आहे. भाषा गुणालंकारांनीं नटलेली आहे. हे सर्व विशेष महाकाव्याच्या लक्षणांशीं जुळणारे असल्यामुळें हें काव्य अंतर्बाह्य एक विदग्ध महाकाव्य आहे––चंपूकाव्य नव्हे.

ऐसा रमणीय रैवतगिरी

सृष्टिसौंदर्याच्या बाबतींत निरंजनांची दृष्टि रसडोळस आहे. तिसऱ्या सर्गांत रैवतक पर्वताचें वर्णन करतांना त्यावर बहरलेल्या वनश्रीचें वैभव निरंजनांनीं जरी सांकेतिक शब्दांत रेखाटलें आहे, तरी त्या सांकेतिकतेंतूनहि त्यांची सृष्टिसौंदर्या-विषयींची आसक्ति प्रस्फुटित होत आहे. रैवतकावरील वन हें बलरामाचें विहारवन आहे, हें सांगतांना निरंजन त्या वनाला–त्यांतील तरुवरांना रसिकदृष्टीपुढें कशा भावमय रीतीनें उभे करतात, तें पहा––

जेथें कल्पतरूसमान तरुवर,
शीतळ छायेसि मनोहर,
सदैव पत्रकुसुमफळभार
अंगीं धरोनि, सकळ शरीर –
अर्पिती परोपकरणप्रचुर
श्रीरामसंतोषकरणीं अत्यादरपुरःसर

परमानंदें डोलती,
मंदपवनसंचारें वेल्हावती,
निजशाखाकर पसरोनि खेंव देती,
अत्यानंदें परस्परें ॥ (३.३५)

इथें रैवतकावरील तरुवरांना मानवरूपांतच उभें केलें आहे. त्यांचें परमानंदानें डोलणें, मंद पवनाच्या संचारानें वेल्हावणें आणि शाखाकरानीं परस्परांना खेंव म्हणजे आलिंगन देणें—या सर्व क्रिया त्या अर्धचेतन वृक्षांना मानवी भावभूमीवर आणतात. निरंजनांनीं याहिपुढें जाऊन रैवतकावरील तरुवेलींचा मुक्त विलास रसधुंद शब्दांत प्रतिबिंबित केला आहे. श्रीमदानें पुष्ट झालेले श्रीमंत जसे रतिमंदिरांत प्रियेला मिठींत घेऊन विलासरंगांत रंगून जातात, त्याचप्रमाणें रैवतकावर या तरुवेलींचा विलास बहरास आला आहे, असें निरंजन म्हणतात—

जैसे श्रीमंत जन निजमंदिरीं,
श्रीमदपुष्ट निजदयितासमालिंगनें मुदित मनांतरीं,
तैसेचि तरुवर निजवनितालतालिंगनें
तोषायमान नानापरी,
माधवी कुंद जाई जुई मल्लिकादि वल्लिका
परिवेष्टित सानंदांतरीं,
मदमत्तसमान डोलती,
पुष्पविकासें हासती,
कोरकमिसें दंतद्युति प्रकाशिती,
अरुणपल्लवमिसें शोणाधर विकासविती,
किंशुकमिसें पीतांशुक परिधान करिती,
पिकरवमिसें पंचमराग आलापिती,
शुकभाषणमिसें बोलती,
केकामिसें निजाप्रिय वारिवाहासि बाहती,
ऐशा विलासें विलसती,
वनकुळभूषण तरुणभूरुहराज निजवैभवें ॥ (३. ३७)

सुगंधी फुलांनीं नटलेल्या आणि त्यांच्या सुगंधानें परिमळलेल्या लतांच्या गाढ आलिंगनांत धुंद झालेले हे तरु धुंदींत डोलताहेत, विकसित फुलांच्या रूपानें हसताहेत, कळ्यांच्या रूपानें त्यांची दंतप्रभा हसतांना झळाळते आहे, लालसर पालवीच्या रूपानें त्यांच्या लालस ओठांची लालिमा शोभून दिसते आहे, किंशुकाच्या लालपिवळ्या फुलोऱ्याच्या रूपानें त्यांचीं भडक वस्त्रें जाणवताहेत, कोकिळकंठांतून

ते पंचमराग आळविताहेत, शुकमुखांतून बोलताहेत आणि मयूरांच्या केकारवानें आपल्या प्रिय मेघाला बाहताहेत– जणुं रतिश्रांति दूर करण्यासाठीं !

आला शरत् साजिरा

सहाव्या सर्गाच्या प्रारंभीं आलेलें शरद ऋतूचें वर्णनहि निरंजनांच्या सृष्टि-सौंदर्यप्रीतीचें द्योतक आहे.

वर्षाकाळ समस्तही निरसला, आला शरत् साजिरा ।
झालें अंबर शुद्ध, मंदगतीनें वायू फिरे गोजिरा ॥

या शरदाचें आगमन जाहीर करणाऱ्या पहिल्या दोनच पंक्तींत निरंजनांनीं शरदाला लावलेलें ' साजिरा ' हें विशेषण त्याचें दृष्टिसुखद स्वरूप व्यक्त करीत आहे आणि वायूला लावलेलें ' गोजिरा ' हें विशेषण त्याचें स्पर्शसुखद स्वरूप सूचित करीत आहे.

झाल्या त्या सरिता कृशा रसयुता स्वच्छांबुसंधारणें ।
लोकां लंघनशक्य त्या विलसती शैत्यादि सर्वां गुणें ॥

हें शरद् ऋतूंतील सरितांचें वर्णनहि असेंच हृद्य सूचनानें भारलेलें आहे. त्यांतील ' कृशा ', ' रसयुता ', इत्यादि सरितांचीं विशेषणें ध्वनिगर्भ आहेत हें रसडोळस रसिकांना जाणवल्यावांचून राहणार नाहीं. निरंजनांनीं केलेल्या या शरद्वर्णनांत मला विशेष जावणलें, तें शरदाला लावलेलें ' सावळा ' हें विशेषण. या विशेषणां-तून शरदाचें सर्व सौंदर्य प्रस्फुटित होत आहे, असें मला वाटतें.

व्यक्तिरेखांचा चौखांबी मंडप

निरंजनांचें हें काव्य जसें गुणालंकारांनीं नटलेलें आहे, जसें सृष्टिवर्णनांनीं रंगलेलें आहे, तसेंच ठसठशीत व्यक्तिरेखांमुळें नाट्यमयता पावलेलें आहे. सुभद्रा, अर्जुन, श्रीकृष्ण आणि बलराम या चार व्यक्तींच्या चित्रणावर निरंजनांनीं आपलें काव्य उभारलें आहे. थोडें काव्यात्म शब्दांत सांगायचें तर, असें म्हणतां येईल कीं, या चार व्यक्तिरेखांच्या शिल्परम्य चौखांबी रंगमंडपांत निरंजनांची विदग्ध वृत्ति पूजानृत्य करीत आहे.

पहिल्या सर्गांत निरंजनांनीं सुभद्रेचें नखशिखान्त सौंदर्य वर्णिलें आहे. सुभद्रेच्या सौंदर्याचें हें वर्णन सर्वस्वीं सांकेतिक स्वरूपाचें आहे; परंतु या सांकेतिकतेंतूनहि कवीचीं कांहीं वैशिष्ट्यें डोकावून जातात. ' सुनीळी भृंगाळीसम अळकजाळी शिरिं धरी,' यासारख्या पंक्ति केवळ क-काराच्या खेळामुळेंच सुखद वाटतात असें नसून, त्यांत सौंदर्यचित्रणाचीहि जादू प्रतीत होते. सुभद्रेचें सौंदर्य केवळ अनुपम आहे, ही सांकेतिक अतिशयोक्ति स्वीकारूनहि कवीचें कृष्णभक्तिरत हृदय एक गोष्ट केव्हांहि

विसरत नाहीं कीं, विश्वांतील परमसौंदर्याचें निधान परमात्म्याच्या सगुण रूपांत असून, तदितर सौंदर्यमूर्ति त्याच्याहून फिक्या आहेत–अंशमात्र आहेत हें भान असल्यामुळेंच निरंजनांनीं म्हटलें आहे—

वपू श्रीकृष्णाची रचुनि उरलें सौष्ठव तया ।
दिल्हें नारीवेषा कमलभवनें आणुनि दया ।
असें वाटे मातें म्हणुनि हरिणाक्षी नृहरिची ।
स्वसा झाली बाळी यदुवरकुळीं साचपरिची ॥

मा. ग्रं. संग्रहालय ठाणे
१९३०९
(क्र. २६)

श्रीकृष्णाची काया घडविल्यानंतर ब्रह्मदेवानें उरलेल्या सौंदर्याला नारीरूप दिलें आणि म्हणूनच ती उर्वरित सौंदर्याची पुतळी श्रीकृष्णाची वहीण म्हणून जन्मास आली, ही निरंजनांची कल्पना त्यांच्या भक्तिरंजित वृत्तीला शोभणारी आहे.

सुभद्रेच्या अंगोपांगांच्या वर्णनांत निरंजनांची कल्पनाशक्ति आणि त्यांचा विदग्ध संस्कृत काव्यांचा व्यासंग यांचें एकरस दर्शन घडतें. काळ्या काजळानें भरलेलीं नीळकमळांसारखीं सुभद्रेचीं नयनयुगलें म्हणजे तरुणांच्या चित्ताचा वेध घेण्यासाठीं सज्ज असे गरळानें माखलेले मदनबाणच होत, ही सुभद्रेच्या डोळ्यांवर केलेली कल्पना; अथवा स्तनांच्या फळभारानें लवलेली सुभद्रेची देहलता मधेंच मोडून जाऊं नये, म्हणून विधीनें रत्नखचित कांचीनें तिचा मध्य सुदृढपणें बांधून टाकला, त्यामुळें तिचा मध्यभाग सूक्ष्म बनला– ही सुभद्रेच्या सूक्ष्म कटीवर केलेली कल्पना कवीच्या कमनीय कल्पनाशक्तीचा प्रत्यय घडविणारी आहे.

पहिल्या सर्गांतील शेवटच्या चार श्लोकांत सुभद्रेची अर्जुनाविषयींची ओढ निरंजनांनीं सांगितली आहे. सख्या अनेक राजपुरुषांचें गुणगायन करीत, त्यांचीं चित्रें चितारून सुभद्रेला दाखवीत, परंतु सुभद्रा मात्र अर्जुनावांचून अन्य सर्वांना तुच्छ मानीत असे. अर्जुनाच्या गुणांनीं तिचें हृदय इतकें रंगून गेलें होतें कीं, सख्यांच्या वचनांचा प्रबल गंगाप्रवाहहि तो रंग धुऊन टाकायला असमर्थ ठरला. ‘ सर्वांच्या चित्तांतील अभिमताचा वेत्ता ’ म्हणजे जाणकार असलेल्या श्रीकृष्णानें सुभद्रेचा हा भाव जाणून त्याला मनोमन मान्यता दिली आणि त्या संकल्पाला मातापित्यांची व आप्तसुहृदांची संमति मिळवून ठेवली.

दुसऱ्या सर्गाच्या प्रारंभींच नाट्यमय संघर्षाचें सूचन आहे. सुभद्रा दुर्योधनाला द्यावी, असें बलरामानें ठरविल्याचें या सर्गाच्या प्रारंभींच (चूर्णिका २) सांगितलें आहे. बलरामाच्या मुखीं दुर्योधनाचें सुयोधन असें शोभन नांव योजण्यांत कवीनें मार्मिकता दाखविली आहे. श्रीकृष्ण आणि अन्य सर्व सुहृद सुभद्रेच्या अर्जुनप्रीतीला अनुकूल आहेत आणि बलराम मात्र तिला दुर्योधनाला देण्याचा बेत रचीत आहे,

असें कळतांच रसिकांची उत्सुकता जागी होते आणि सुभद्रेच्या भवितव्याविषयीं त्यांचें हृदय भय बाळगायला लागतें.

बलरामाचा अभद्रकर संकल्प कर्णोपकर्णीं सुभद्रेला समजतो आणि तिचें तन-मन चिंताज्वरानें तापून निघतें. एका अर्जुनावांचून तिला अन्य कुणीहि नको आहे. 'तयाचा मज न घडवील संयोग। तरि माझा नुरेल प्राण-शरीरयोग।' एवढा तिचा निर्धार आहे. त्याचमुळें ग्रीष्मऋतूंतील कमळाप्रमाणें तिची कांया सुकून जाते. निरंजन तिच्या या अवस्थेचें वर्णन करतात—

नावडे संभाषणावलोकन सखीजनमंडळीं।
क्षुधातृषास्मृती विसरली।
आधींच कृशांगी अतिकृशत्व पावली।
कदलीपत्रपृष्ठवत् पृष्ठभागीं दिसों लागली।
मुखीं कनककेतकीपांडुरता प्रसरली।
जैसी चित्रलिखित पूतळी,
तैसि निश्चेष्ट राहिली,
चिंतातुरचतुरकामिनी करकंजदळीं।
मुखशशी निवेशवोनि नयनकुड्मलीं।
घनाश्रुधारा मोकली। (३. ४)

या अगतिक अवस्थेंत सुभद्रा नित्य सहस्रकमळांनीं हरगौरीची पूजा बांधण्याचें व्रत सुरू करते आणि अभीष्ट वराच्या प्राप्तीसाठीं हरगौरीची प्रार्थना करते.

पहिल्या सर्गांत आलेली, राजपुरुषांचीं चित्रें काढून सख्यांनीं नायिकेला दाखविण्याची कल्पना आणि अभीष्ट वराच्या प्राप्तीसाठीं शिवपार्वतीची उपासना करण्याची ही दुसऱ्या सर्गांतील (७.१३) कल्पना निरंजनांचा उषानिरुद्धकथेशीं असलेला घनिष्ठ परिचय दाखवून देतात.

दुसऱ्या सर्गांतच सुभद्रेची विकलावस्था सांगून झाल्यावर (१३ नंतर) निरंजनांनीं नारदाला इंद्रप्रस्थाला पाठवून संघर्षाला आणखी रंग भरला आहे. नारदमुखानें बलरामाचा संकल्प समजतांच, पूर्वीपासूनच सुभद्रेवर आसक्त असलेला अर्जुन अस्वस्थ होतो आणि जर सुभद्रेचा दुर्योधनाशीं विवाह झाला, तर आपलें पौरुष विफल आहे, असा भाव तीव्र शब्दांत व्यक्त करतो (१८.२८). परंतु या संतप्त स्थितींत अर्जुनाला श्रीकृष्णाचें स्मरण होतें आणि तो आपला परमहितकर्ता असल्यामुळें त्याचें या बाबतींतील मनोगत समजल्यावांचून कसलेंहि आक्रमक पाऊल टाकूं नये, असें अर्जुनाला वाटतें (२९). हा विचार त्याच्या चित्तांत स्थिर होतो

न होतो, तोंच ब्राह्मणांच्या गाई सोडविण्याचें निमित्त होऊन त्याला कापडी वेशानें तीर्थयात्रेला जावें लागतें. तीर्थक्षेत्रें पहात पहात तो प्रभासप्रदेशांत येतो आणि तेथून समीप असलेल्या द्वारकाप्रदेशाच्या दर्शनानें अंतरीं सुखावूं लागतो. दुसऱ्या सर्गांतील ३५–४५ या श्लोकांत प्रकटलेला अर्जुनाचा भक्तिभाव हा निरंजनांच्या भक्तहृदयाचाच अप्रत्यक्ष आविष्कार आहे.

सुरेश्वराला जिंकून अमरलोकींची सुधा भूतळीं आणणाऱ्या गरुडाप्रमाणें त्रिखंडांत पुरुषार्थ गाजवूं पाहणारा अर्जुन (२.२७) बलरामाचा संकल्प नारद-मुखांतून समजतांच खवळतो आणि—

आतांचि जावोनि कुशस्थळीं ।
युद्धीं जिंतोनिया प्रबळ यादवमंडळीं ।
हरोनि आणीन सुभद्रा वेल्हाळी ।

असा वारिघोष करतो; परंतु श्रीकृष्णाचें स्मरण होतांच लगेच स्वतःला सावरतो–

परंतु द्वारकानिलयनिवासी ।
दाशार्ह माझा पक्षपाती कृपावारिराशी ।
असतां, मदीयमानससरोवरासी ।
चिंताग्रीष्माग्निज्वाळा कैसेंन स्पर्शी ।
त्याच्या न जाणोनि गहनाभिप्रायासी ।
उचित नव्हे कीजे साहसासी ।
तो करुणाजलधर-अपांगवृष्टी करितां अनायासीं ।
मानसकासार पूर्ण करील घनश्याम आत्माराम,
राजीवदळनयन श्रीकृष्ण ॥ २९ ॥

अर्जुनाच्या या दोन उद्‌गारांत शक्ति आणि भक्ति यांच्या सामरस्यानें बनलेल्या त्याच्या व्यक्तिमत्त्वाचें मर्म प्रस्फुटित झालेलें आहे. घनिष्ठ मित्र (परमसखा) आणि मामेभाऊ (मातुलेय) असें त्याचें श्रीकृष्णाशीं नातें असलें, तरी त्याला या गोष्टींचें पूर्ण भान आहे कीं, श्रीकृष्ण हा ' जगदंतरवासकर्ता ' आहे, ' त्रिजगैकभर्ता ' आहे, ' आनंदसिंधू ' आहे आणि ' करुणामृतवारिराशी ' आहे.

असा हा करुणामृताचा मेघ असलेला श्रीकृष्ण दुसऱ्या सर्गाच्या अंतींच, अर्जुनाची आपल्या भेटीविषयींची उत्कंठा अंतर्दृष्टीनें जाणून, मृगयेचें निमित्त करून मोजक्या सेवकांसह रथारूढ होऊन द्वारकेबाहेर पडलेला दिसतो.

तिसऱ्या सर्गांत पहिल्या २९ श्लोकांत कृष्णार्जुनांच्या भेटीचा सोहळा, त्यांनीं परस्परांना विचारलेले कुशल प्रश्न आणि सुभद्रेच्या प्राप्तीविषयीं त्यांनीं

केलेलें हितगूज– यांतून भक्त-भगवंताच्या नात्याचें स्पष्ट दर्शन घडतें. श्रीकृष्णाला दुरून येतांना पाहून अर्जुनाच्या तनामनांत दाटलेला आनंदोत्सव वर्णितांना निरंजनांनीं म्हटलें आहे—

आला हा पक्षपाती हरि निजमनिंचा अर्थ तो पूरवाया ।
आतां भेटेल मातें पसरुनि बरव्या मोकळ्या चारि बाह्या ॥
केलों मी धन्य येणें, ह्मणउनि विसरें पार्थ तो देहभाना ।
नेत्रीं बाष्पांबु लोटे, गदगदित घडे कंठ तैं बोलवेना ॥ (३.४)

अर्जुनानें श्रीकृष्णाच्या सूचनेप्रमाणें त्रिदंडी संन्यास अंगीकारून रैवतक पर्वतावर निवास केल्याचें वृत्त ३.३० मध्यें आलें आहे आणि त्यानंतर तिसऱ्या सर्गाच्या अखेरीपर्यंत (३१-४१) रैवतकाच्या सौंदर्याचें वर्णन आलेलें आहे, तें आपण मागें पाहिलेंच आहे.

चौथ्या सर्गाच्या प्रारंभीं, श्रीकृष्णानें रचलेल्या कारस्थानाला अपेक्षित फळें देणाऱ्या घटना घडूं लागलेल्या दिसतात. ज्या रैवतकावर अर्जुन त्रिदंडी वेशानें राहिलेला होता, तो बलरामाचा क्रीडापर्वत असल्यामुळें बलराम आपल्या प्रियेसह क्रीडेसाठीं रैवतकावर येतो आणि तेथील एका गुहेंत संन्याशाचा आश्रम पाहून तिकडे आकर्षित होतो. बलरामाला साधुसंन्याशांविषयीं विशेष भक्तिभाव वाटत असल्यामुळें तो अर्जुनाच्या कपटवेशाला भुलेल आणि त्याला अत्याग्रहानें घरीं रहायला घेऊन येईल, हा श्रीकृष्णाचा ' आन्तरः कोऽपि हेतुः ' सफल होण्याचीं चिन्हें या सर्गाच्या प्रारंभींच सूचित होतात. ' संन्यासी हरिरूप, मानव नव्हे ' ही भोळ्या बलरामाची भावना. त्यामुळें छद्मवेशी अर्जुनाला पाहतांच तो विरघळतो आणि त्याला अर्जुन हा वैराग्याचें मूर्तरूप भासतो. पुढें बलराम आणि यतिवेशधारी अर्जुन यांची भेट झाल्यानंतर त्यांच्यांत घडलेला संवाद निरंजनांनीं कौशल्यानें लिहिला आहे. या संवादांत अर्जुनानें वठविलेलें सोंग आणि बलरामाचा भोळा भाव नि साधा स्वभाव अत्यंत रोचकपणें व्यक्त झालेला आहे. बलरामानें संन्याशाला घरीं चलण्याचा चालविलेला आग्रह आणि आपली ' अरतिर्जनसंसदि ' दाखविण्यासाठीं अर्जुनानें बलरामाचा आग्रह आणखी वाढविण्याच्या हेतूनें चालविलेलें यतींच्या निरिच्छभावावरील प्रवचन वाचकांना हसू फोडतें. नारायणमंत्राचा जप करणाऱ्या या संन्याशाला बलराम सांगतो कीं, ' तुम्ही द्वारकेला चला, म्हणजे तुम्हांला साक्षात् नारायणाचा सहवास घडेल. ' त्यावर अर्जुनानें दिलेलें उत्तर पाहण्यासारखें आहे—

त्वां पूर्वीं कथिलें हरी विलसतो द्वारावतीभीतरीं ।
तो आहे जडजंगमांत समुद्या व्यापोनि नानापरी ॥

आम्ही तों निरखीतसों जनिंवनीं सर्वांद्य सर्वां स्थळीं ।
त्यासंगेंचि सदा अम्ही रमतसों अंतर्विवित्तस्थळीं ॥ (४. २२)

चौथ्या सर्गाच्या अखेरीस बलरामाच्या अत्याग्रहाला मान देण्याचें नाटक वठवून अर्जुन त्याच्या रथांत बसून द्वारकेला येतो आणि वाचक या कपटनाटकाची पुढील रंगत जाणायला उत्सुक बनतात.

भोळा बलराम या अभिनव संन्याशाला आपल्या घरीं आणून ठेवतो आणि त्याची त्रिकाळ सेवा करूं लागतो. कृष्णाला हें कळल्यानंतर तोहि यतिपूजेचें नाटक सफाईनें वठवूं लागतो—

ज्याचें श्रीपदतोय देव शिरसा वंदोनिया तोषती ।
तो लक्ष्मीसह पादतोय यतिचें वंदी प्रमोदें अती ॥ (२. ५)

अर्जुनाचें विरक्तीचें नाटक कांहीं काळ पाहिल्यावर बलरामाला त्याच्या वैराग्याची खात्री वाटते आणि तो (श्रीकृष्णाच्या अपेक्षेप्रमाणेंच) सुभद्रेला यतीची सेवा करण्याचा आदेश देतो—

बाले भक्तिमती, सदा सुविनयें सेवी त्रिकाळीं यती ।
याचें सेवन तूं करोनि लभसी तो चक्रवर्ती पती ॥ (५. ४-५)

सुभद्रेनें यतीच्या निवासस्थानीं प्रवेश करतांच तिला आश्चर्याचा धक्का बसला. तो यति तिनें चित्रांत पाहिलेल्या अर्जुनासारखा होता. (तो अर्जुनच आहे, हें तिला अज्ञात होतें, परंतु धर्मराज युधिष्ठिराकडे त्याचा अधिक काळ निवास असतो, हें त्यानें स्वतःच बलरामदादाला सांगितल्याचें तिनें ऐकलें होतें.) नित्य सेवेनें भीड मोडल्यावर—

तेव्हां ते पुसते यतीस सगुणा संतुष्ट पाहोनियां ।
इंद्रप्रस्थपुरींत धर्मनिकटीं होतां कधीं स्वामिया ॥
तुम्ही अर्जुन लक्षिला निजदिठीं आहे बरा कीं सुखी ।
त्याचें तें गुण-रूप वर्णन करा, विश्रांति द्या या मना ॥ (५. ८-९)

सुभद्रेच्या या प्रश्नानें अर्जुनाची खात्री झाली कीं, हिचें हृदय आपल्यासाठींच तळमळतें आहे. 'त्याचें श्रीमुखपद्म लक्षिन कधीं ?' अशा उत्कटतेनें अर्जुनावर प्रीति करणारी सुभद्रा 'तो कांत मातें घडो', यासाठीं यतिवेशधारी अर्जुनाचाच आशीर्वाद मागूं लागते, तेव्हां निर्माण होणाऱ्या नाट्यात्मकतेनें वाचक सुखावतात. सुभद्रा व अर्जुन यांचा हा सर्वच संवाद अत्यंत रोचक आहे. या

संवादांतून सुभद्रेच्या हृदयांतील अर्जुनविषयक प्रीति ओसंडून वाहत आहे. हा सवाद कुमारसंभवांतील उमा आणि बटुवेशधारी शिव यांच्या संवादाचें स्मरण घडविणारा आहे. अर्जुन मुद्दामच सुभद्रेपुढें अर्जुनाची निंदा करतो आणि दुर्योधनाचा गौरव गातो, तरीहि सुभद्रा त्याचें तें म्हणणें खोडून काढून अर्जुनाच्या गुणसागरांतच अवगाहन करीत राहते. 'काका कोकिल साम्यता तरि कसी लोकांत या संभवे ?' या तिच्या प्रश्नांत सर्व कांहीं आलें आहे. 'माय-बाप बंधुजन, सर्व वर्तती हलायुधाधीन, तो तंव आग्रही दारुण, तूं तंव अबळा सुलीन, कैसेनि पावसी वीराग्रेसर अर्जुन ?' असा प्रश्न अर्जुनानें विचारतांच सुभद्रेनें प्रकट केलेलें आपलें अंतरंग अगदीं अत्याधुनिक प्रीतिकल्पनेचा प्रत्यय घडविणारें आहे.

मज जरि राम अर्पील दुर्योधना निश्चितीं ।
तदा धाडीन निजपत्रिका पार्थाप्रती ।
जैसी रुक्मिणी एकांतीं ।
संदेशवचनें विप्राहातीं ।
पाठऊनि गेला यादवपती ।
तैसी मीही पृथानंदन वीर फाल्गुन सुमती ।
वरीन निश्चितीं यतिवर्या ॥ (५. २८)

असा तिचा निर्धार आहे आणि जर या निर्धाराला यश आलें नाहीं तर—

पृथ्वी धाडिन ज्या स्थळीं नर असे पृथ्वीस भेटावया ।
आपीं आप मिळेल अर्जुन जया प्राशील तोया तया ।
माझें तेज मिळो तदीय मुकुरीं लक्षी मुखालागुनी ।
वायू राहिल तालवृंत-उदरीं, आकाश त्या आंगणीं ॥ (५. ३१)

" जर अर्जुनानें माझी उपेक्षा केली अथवा अन्य कांहीं संकटें उपस्थित होऊन मला त्याला वरतां आलें नाहीं, तर सर्पत्वचेप्रमाणें असणारी केवळ माझी कायाच वडिलाधीन राहील आणि माझें सर्वस्व मी अर्जुनाला वाहीन. माझ्यांतील पृथ्वीतत्त्व अर्जुनाच्या चरणतलीं नांदेल, अर्जुन जें जल प्राशन करील त्यांत माझ्यांतील जलतत्त्व विरून जाईल, त्याचें मुख ज्या दर्पणांत नित्य प्रतिबिंबित होतें, त्या दर्पणांत माझ्यांतील तेज सामावून जाईल, माझ्यांतील वायुतत्त्व त्याच्या हातांतील पंख्यांतून त्याची सेवा करील आणि माझ्यांतील आकाशतत्त्व त्याच्या अंगणांत राहून त्याला सर्वांगीं क्षेमालिंगन देईल. "—ही सुभद्रेच्या प्रीतीचो जाती आगळी आहे; संस्कृत साहित्यांतील प्रीतिकल्पनेहून उदात्त आहे आणि त्याचमुळें आधुनिक रसिकांनाहि

भुरळ पाडणारी आहे. त्याचमुळें निरंजनांचें हें काव्य किर्लोस्करांसारख्या नव्या नाटककाराचें स्फूर्तिकेंद्र ठरूं शकलें.[२९]

या सुभद्रार्जुन-संवादांत सुभद्रेच्या मुखांतून रुक्मिणीहरणाच्या प्रसंगाचा दोनदा उल्लेख आलेला आहे (५. २८ व ३४). त्यावरून असें दिसतें कीं, निरंजनांपुढें उषाहरणाप्रमाणेंच रुक्मिणीहरणाचा प्रसंगहि होता.

पांचव्या प्रसंगांतील हा रहस्यमय संवाद संपल्यावर यतिरूपधारी अर्जुनाला सुभद्रेच्या दृढ प्रीतीची साक्ष पटते आणि तो आपलें खरें रूप सुभद्रेपुढें प्रकट करतो (४. ४३–५०). या सर्गाच्या उत्तरार्धांत (श्लोकांक ५१–पासून पुढें) श्रीकृष्णाच्या लीलानाटकी वृत्तीचें आणखी एक दर्शन घडतें. तो बलरामाला एकांतांत गांठून छेडतो कीं, "तूं हा कोण कुठला तरुण यति आणून घरीं ठेवला आहेस आणि कसलाहि विचार न करतां आपली तरुण बहीण त्याच्या सेवेला ठेवलीस!" सुभद्रेला अर्जुनानें पळवून नेलें, तर तो दोष आपला नसून, बलरामाच्या मूर्खपणांतून तें घडून आलें, असें ठरविण्यासाठीं कृष्णाचें हें नवें नाटक!

पुढें रैवतक-पर्वतोत्सवासाठीं सर्व द्वारकावासी जन गांवाबाहेर पडलेले असतांना अर्जुन संधि साधून सुभद्रेला पळवितो; यादवसैन्य त्याचा पाठलाग करतें. अर्जुन त्या सैन्याला परतवितो आणि कृष्ण पुढें सर्व कांहीं स्थिरस्थावर करून सुभद्रार्जुनांचा विवाह थाटामाटानें करून देतो.

या सर्व कथाप्रवाहांतून सुभद्रा, अर्जुन, कृष्ण व बलराम यांचीं व्यक्तिमत्त्वें व्यवच्छेदकपणें उमलून आलेलीं आहेत. अर्जुनावर अनन्य प्रीति करणारी लावण्यवती सुभद्रा, सुभद्रेच्या प्राप्तीसाठीं कृष्णसहाय्यानें सोंग घेऊन राहिलेला वीरपुरुष अर्जुन, कृष्णाचीं कारस्थानें न ओळखतां प्रवाहाविरुद्ध वागून फशीं पडणारा भोळा बलराम आणि सर्व कांहीं करून त्यापासून 'अलिप्त' राहणारा लीलानाटकी श्रीकृष्ण यांचीं जिवंत चित्रें निरंजनांनीं रेखाटलीं आहेत आणि या चार व्यक्तींच्या परस्परसंबंधांतून एक ललित, रहस्यात्मक काव्यनाट्य उभें केलें आहे.

निरंजनांच्या कृतीचें हें वैशिष्ट्यच तिला सांकेतिकतेच्या प्रभावांतहि चिरंतनत्व देणारें आहे. आजचें रसिकहि या वैशिष्ट्यामुळें निरंजनांच्या या ललितरम्य कृतीला जवळ करतील, असा विश्वास वाटतो, तो यामुळेंच.

---

२९. किर्लोस्करांच्या 'सौभद्रा'च्या मूलाधारांत निरंजनांच्या' या काव्याचें स्थान मोठें असलें पाहिजे, असें मत प्रा. व. दि. कुलकर्णी यांनीं एका खासगी चर्चेत साधार मांडलें आहे.

पंडितकविमंडळ आणि निरंजन माधव

निरंजन माधव हे प्रकृतीनें पंडितकवि आहेत. ते स्वतः उच्च श्रेणीचे पारमार्थिक असूनहि, त्यांची पंडितकविप्रकृति परमार्थ-प्रभावांतहि प्रबळ राहिली आणि त्यांनीं विदग्ध संस्कृत कवितेच्या वळणाची कविता रचली. त्यांच्या प्रबंधात्मक रचनेचा या दृष्टीनें विचार करतां, 'ज्ञानेश्वरविजया' चें बाह्य स्वरूप जरी श्लोकबद्ध आणि सर्गविभक्त महाकाव्याचें असलें, तरी त्याचें अंतरंग आख्यानकाव्याचेंच आहे. दुसरें 'चिद्बोधरामायण' हें महाकाव्य बालकांड वगळून अनुपलब्ध आहे. राहतां राहिलें 'सुभद्रास्वयंवर' हें प्रस्तुत काव्य. या काव्यावरूनच त्यांचें पंडित-कविमंडळांतील प्रतिनिधित्व निश्चित होणार आहे.

नरेंद्र व भास्कर हे दोन आद्य महानुभावीय कवि, मुक्तेश्वर, नागेश, सामराज, विठ्ठलद्वय (कळपूरकर आणि बीडकर), अवचितसुत काशी, वामनपंडित, आनंद-तनय, अनंत आणि रघुनाथपंडित हे निरंजनपूर्व प्रमुख पंडित कवि होत. नरेंद्र-भास्करांची विदग्ध प्रकृति संस्कृत पंचमहाकाव्यांच्या निर्मात्यांना साजेशी होती. त्यांचा वारसा त्यांच्या पंथांतील कविहि सांभाळूं शकले नाहींत. त्यामुळें मराठी पंडिती काव्याची परंपरा एक प्रकारें मुक्तेश्वराच्या उदयापर्यंत खंडितच राहिली. मुक्तेश्वर हा प्रकृतीनें आर्ष आणि संस्कारांनीं विदग्ध असल्यामुळें त्यानें आपल्या 'महाभारतां'त वेरूळच्या कैलासांतील तांडव आणि लास्य एकसाथ प्रकटविलें. नागेश, सामराज, विठ्ठलद्वय, अवचितसुत काशी आणि वामन पंडित यांनीं विदग्ध संस्कृत काव्यांचें वळण राबविलें हें खरें; परंतु त्यांच्या काव्यांत पांडित्य आणि प्रतिभा यांचें सामरस्य अनुभवायला मिळत नाहीं. त्यामुळें त्यांचीं काव्यें रसिकांना भुलवूं शकलीं, तरी हलवूं शकत नाहींत. अनंत, आनंदतनय आणि रघुनाथपंडत या तिघांची प्रकृति कांहींशी समान आहे. त्यांनीं शिवकालीन पंडिती काव्याची रहाटी स्वीकारली आणि तिला कीर्तनसंस्थेच्या विकासासाठीं राबविली. त्यांचीं काव्यें एक प्रकारें कीर्तनाख्यानेंच आहेत. या कवित्रयापैकीं रघुनाथपंडितांचें 'दमयंतीस्वयंवर' एक कीर्तनाख्यान असूनहि, सहृदय पांडित्याच्या स्पर्शानें एक नितांतरम्य काव्यशिल्प बनलेलें आहे. निरंजन माधवांचें 'सुभद्रास्वयंवर' हें 'दमयंतीस्वयंवरा'च्या जातीचें काव्य आहे. कीर्तनाचा श्रोतृवर्ग संमुख कल्पून, निरंजन माधवांनीं एका ललित पुराणकथेला नाट्यात्मक आणि भावरम्य प्रबंध-काव्यांत परिणत केलें आहे. प्राचीन मराठी पंडितकविमंडळांत निरंजन माधवांचें स्थान रघुनाथपंडितांच्या श्रेणींत आहे, यांत यत्किंचितहि संशय नाहीं.

□ □ □

सुभद्रास्वयंवर

संहिता

निरंजन माधव-विरचित

सुभद्रास्वयंवर

सर्ग पहिला

॥ श्रीसुंदरकृष्णाय नमः ॥ श्रीगणेशगुरुशारदाभ्यां नमः ॥

स्रग्धरा

वागोरे वामहस्तें धरुनि हय बरे पांडवस्यंदनाचे
चान्ही जो नाचवितो चतुर जिणति जे वेग वातामनाचे ।
दक्षें तोत्रांगिकारी नवजलदतनू पीतकौशेयधारी ।
साजे सारथ्यकर्मीं नमिन पदयुगीं सादरें श्रीमुरारी ॥ १ ॥

वसंततिलका

ज्याची कथा सबळपातकशैल खाणी ।
उत्पन्न हे करि जनांप्रति पुण्यखाणी ।
जो भक्तसाह्य करि केवळ पक्षपाती ।
रक्षी विलोकुनि सुधासम पक्षपातीं ॥ २ ॥

तद्भक्तपुण्यचरितें हरितीं अघातें ।
जे कां पळांत परि उद्धरितीं जगातें ।
तत्रापि पांडुसुतकीर्तन या कळीतें ।
उच्चारितां मुखपुटें तंव निर्दळीतें ॥ ३ ॥

शार्दूलविक्रीडित

गातां भूपति धर्मपुत्र सुजनीं तो धर्म वाढे सदां
ध्यातां नित्य वृकोदरा स्थिति नव्हे पापासि तेथें कदा ।
कीजे अर्जुनकीर्तना तंव सहा शत्रू स्वयें नासती
माद्रीपुत्रयशासि गान करितां रोगा नव्हे तैं गती ॥ ४ ॥

वसंततिलका

ज्या सख्यभक्तिविभवें हरि शेषशायी ।
स्वाधीन होउनि करी निजपादसायीं ।
तो धीर मध्यमणि पांडवरत्नहारीं ।
ध्यातां धनंजय महाभय घेत हारी ॥ ५ ॥

त्याच्या विवाहचरिताप्रति मी कथीतों ।
साहित्यसागर यथामतिनें मथीतों ।
जे श्रेष्ठ सद्गुण कवीश्वर वंद्य मातें ।
त्यांच्या मतानुसरतां न मनी श्रमातें ॥ ६ ॥

हे पांडवी परम पुण्य कथा पवित्रा ।
आकर्णितांचि हरिते अतिदोषमात्रा ।
देते अनंत सुकृतासि म्हणोनि यीतें ।
गातां कुळांसहित पावति सद्गतीतें ॥ ७ ॥

याकारणें कवि निरंजन याचः काजीं ।
वाणी मनासहित अक्षगणा नियोजी ।
श्रीकृष्णभक्तिविभवें गुरुदास्यलेशें ।
विघ्नाद्रि भंगुनि विराजत नित्य तोषें ॥ ८ ॥

शृंगारमुख्य नवही रस मूर्तिमंत ।
काव्यांत या परिसतां दिसती प्रशस्त ।
भोक्ता असे यदुपती सकळां रसांचा ।
झाली म्हणोनि रसिका कविराजवाचा ॥ ९ ॥

शार्दूलविक्रीडित

कांहीं भागवती कथाक्रम असे कांहीं असे भारती
कांहीं अन्यपुराणभाव वरिला कांहीं कवीभारती ।
हे सारी ग्रथुनी यथार्थ विरचूं सद्रत्नहारावळी
कंठीं यीस धरील जो चतुर त्या हे शोभवी भूतळीं ॥ १० ॥

चूर्णिका

श्रीमद्भागवतीं । शुकमुनीस पुसे परीक्षिती । अस्मत्पितामही सुभद्रासती । अर्जुनें वरिली कवण्या रितीं । ते कथा कथन करोनि विश्रांती । मनासि द्यावी महामती । ऐसें विनवितां कृपामूर्ति । महायोगी सज्जनगती । परम संतोषें अभिमन्युपुत्राप्रति । कथा कथी कौतुकवती । जीमाजि वीर अर्जुन त्रिदंडी यती । होवोनि वासुदेवी सुदती । राक्षसविधीं हरोनि निगुति । नेता समयीं बळिराम बलार्णव । क्रोधानळावेशें पवमानें क्षोभतां । अती सकळ सुरमंडल चक्रवर्ती । श्रीकृष्णें विनयें सांतवोनि विधिविधानें । यथास्थिती पाणिग्रहण करवोनि इंद्रप्रस्थाप्रती । पाठवी उत्सवें श्रीपती । ऐसें कथी सविस्तर ॥ ११ ॥

ऐसाचि जन्मेजय महाप्रवीण । भारतगाथा करितां श्रवण । व्यासशिष्य वैशंपायन । तयासि प्रेमपुरःसर करी प्रश्न । स्वामी अर्जुनसुभद्रा-पाणिग्रहण । कथा कथावी म्हणतां मुनिकुलमंडण । परमानंदें कथन करी ॥ १२ ॥

शिखरिणी

सुभद्रा कृष्णाची बहिण जलजाक्षी शशिमुखी ।
जिच्या सौंदर्यातें निरखुनि शचीमुख्य सुमुखी ॥
त्यजोनी गर्वातें सतत करिती कीर्तन यिचें ।
असी नाहीं दूजी म्हणुनि अति लावण्यमयिचें ॥ १३॥

त्यजोनी बाल्यातें तरुण पद अंगीकरितसे ।
तसीं चिन्हें सारीं अभिनव शरीरीं धरितसे ।
स्ववर्णें हे जिंती सुतनु नवजांबूनदकळा ।
कळा आदित्याच्या घडति सहसा तप्त सकळा ॥ १४ ॥

सुनीळी भृंगाळीसम अळकजाळी शिरिं धरी ।
कपाळीं अर्धेंदूसदृश उपमा सुंदर वरी ॥
स्वनेत्रें जिंतोनी अति विमळ ते नीळकमळें ।
तया भ्रूयुग्मानीं स्मरधनुषगर्वासि हरिलें ॥ १५ ॥

प्रभा गल्लद्वंद्वें सहज अरशाची हरितली ।
तिळाच्या पुष्पाचें यश जिणुनि नासा मिरविली ॥
सुमुक्ताशुक्ती त्या श्रुति निरखितां मज्जति जळीं ।
मुखाब्जा लक्षोनी परम त्याजिला गर्व कमळीं ॥ १६ ॥

कसे झाले हीरे काठिण निरखोनी रुदवरां ।
प्रवाळाहीं दिल्ही अति अरुणिमा दिव्य अधरा ॥
सुधापात्रें दिल्हें अनुपम हनूतें निजपदा ।
म्हणोनी हें झालें बुधजनमना कारण मुदा ॥ १७ ॥

शशी या वक्त्रातें निरखुनि घडे क्षीण सगळा ।
जिणे यीची मंदस्मित रुचि तयाची शुभकळा ॥
२५९ सुकंठें कंबूची त्रिवळिगत रेखा हरितली ।
भुजद्वंद्वीं कैसी कमळलतिका ते झकविली ॥ १८ ॥

यिच्या वक्षोजाहीं सरस हरिल्या कंजकळिका ।
म्हणोनी कंदर्पा प्रकटविति चित्तीं सकळिका ॥
दिसे शामा पोटावरि लघुतरा रोमसरणी ।
असे कीं कामाची तरि असिलता जीवहरणी ॥ १९ ॥

यिच्या कोशाकारें त्रिवळि दिसती सूक्ष्म उदरीं ।
युवाच्या चित्तातें क्षण न लगतां खंडिति परी ॥
सुनिम्नत्वें नाभी वटपुटसमानोदरवरीं ।
स्वयें लीला कैसी अमृतरसवापीसम धरी ॥ २० ॥

नितंबातें कुंभस्थळ निरखितां मत्तकरिचे ।
महालज्जेनें ते श्रवति असुनी साचपरिचे ॥
तया शुंडादंडा जिणुनि उरुयुग्मीं स्वमहिमा ।
जगीं केली तेहीं प्रकट दिसते दिव्य सुषुमा ॥ २१ ॥

स्मराच्या तूणातें हरुनि वरजंघा विरचिल्या ।
तशा माणिक्याच्या अरुणिमकळा एकवटिल्या ॥
पदद्वंद्वें टांचा रचुनि सरळा अंगुळवळी ।
विधीनें हे केली सरस धरणीमाजि पुतळी ॥ २२ ॥

शरच्चंद्रज्योत्स्ना करुनि शकलें ते नखमणी ।
घडोनीया केली स्थिति गमतसे रम्य चरणीं ॥
लता हे हेमाची चतुर चतुरास्यें विरचिली ।
धरोनी देहातें अचळ चपला काय घडली ॥ २३ ॥

जिच्या आमोदातें परिसुनि अळी गुंजति सदा ।
दिसे हेमाब्जाची विधिरचित माळा प्रसुखदा ॥
पशामध्यें दोनी नयन न समाती, वपुकळा ।
महा अंध:कारीं प्रकट करिते दिव्य अबळा ॥ २४ ॥

समस्ता अंगांचीं असतिं जितुकीं लक्षणगणें ।
समस्तें ये स्थानीं वसति, न दिसे एकहि उणें ॥
अशा लावण्याची कुशल जगनिर्माणकरिता ।
करी नारीमूर्धामणि रमणि हे देवकिसुता ॥ २५ ॥

वपू श्रीकृष्णाची रचुनि उरलें सौष्ठव तया ।
दिल्हें नारीवेषा कमलभवनें आणुनि दया ॥
असें वाटे मातें म्हणुनि हरिणाक्षी नृहरिची ।
स्वसा झाली बाळी यदुवरकुळीं साच परिची ॥ २६ ॥

अळंकारें वस्त्राभरणपदकें दिव्यवलयें ।
उदारांगीं यीच्या करुनि वसती रम्य निलयें ॥
त्रिवेणीसी वेणी मणिखचित एणाक्षिणिशिरीं ।
दिसे लावण्याच्या निधिवरिल हे नागिण बरी ॥ २७ ॥

मयूराच्या पिच्छाकृति अळक आधींच सरळे ।
सुगंधा तैलांनीं विभउनि जळें शुद्ध धुतले ॥
सुवेणीचीं लेणीं वरि विलसलीं माणिकगणीं ।
वरी मुक्ताजाळी तदुपरि विराजे बहुगुणी ॥ २८ ॥
पहा आधीं केला सरस दिसतो भांग बरवा ।
स्मरें लावण्यांभोनिधिंत कृतसेतू तरि नवा ॥
तया रामाहस्तें विरचुनि यशा पात्र घडती ।
रवींद्राच्या साम्यें जडित शशिभानू विरचिती ॥ २९ ॥

सुभद्रा भद्राक्षी कमलरहिता हे जलधिजा ।
विना वीणा हस्तीं परमनिपुणा काय विधिजा ॥
नसे माथां यीच्या शाशिशकल हे काय गिरिजा ।
त्रिलोकीं धन्यत्वा वरिल नवरी हेच वरिजा ॥ ४४ ॥

असी कन्या धन्या त्रिजगजनमान्या सुचरिता ।
नव्हे हे सामान्या नवतरुणि कंदर्पभरिता ॥
स्पृहा यीची सारे करिति नृपती ऐकुनि गुणा ।
न आणी जे पार्थाविण अणिक तो वल्लभ मना ॥ ४५ ॥

नृपाळांचीं चित्रें लिहुनि सखिया दाविति तिला ।
न मानी कौंतेयाविण अणिक त्या तुच्छ पतिला ॥
सदां जे ऐकोनी विजयगुण चित्तांत रुतले ।
न जाती ते कांहीं सखिवच्चनगंगेंत धुतले ॥ ४६ ॥

हरी वेत्ता चित्तांतिल कळुनि यीच्या अभिमता ।
समर्पावी कुंतीतनुजविजया सद्गुणवता ॥
असें योजी, मानें विहित वसुदेवासि बरवें ।
तसी माता तेही परिसुनि सुखाब्धींत मिरवे ॥ ४७ ॥

स्वागता

श्वेतवाहन इला नवरा हो ।
हाच योग्य दुसरा नव राहो ।
सर्वहीं सुहृद आप्त जनांहीं ।
बोलिजेत असलेंच सदाही ॥ ४८ ॥

इति श्रीमत्कविकुलतिलकनिरंजनमाधवविरचिते सुभद्रास्वयंवरे चंपूकाव्ये स्वरूपशृंगारवर्णनं नाम प्रथमः सर्गः ॥ १ ॥ श्रीकृष्णाय नमः ॥

♣ ♣ ♣

सर्ग दुसरा

चूर्णिका

सकळलल्लनाशिरोभूषणा । सुभद्रा भद्रगुणा । नवतारुण्यचिन्ह-
सं प न्ना । गतिविलासविलोकनभाषणमंदमृदुलचपलकोमलरचना ।
मनमोहना कंजाक्षी ॥ १ ॥

देखोनि निजस्वसा सीरपाणी । वरविचारणा करितां योजी मनी । सकळभूपाळमंडणमणी । कुरुराज सुयोधना हे रमणी । रमणीयदृशा अर्पावी ॥ २ ॥

ऐसा दाशार्हसभेमाजी । भोजांधक कुकुर यादव । शूरसेन वृष्णि मुख्य समार्जी । भाषण करोनि विचार योजी । सुभद्रा हे भगिनी माझी । कमलकोमलतनु कलानाथवदना सौंदर्यसदना सद्गुणराजी । राजराजेश्वरा कुरुनायका सुयोधना म्यां संकल्पिली ॥ ३ ॥

ऐसा वृत्तांत बहुजन-सखीजनमुखें । अभद्रकर सुभद्रा श्रवणीं आयके । परम दचकोनि मनीं शोके । अंतरींच्या अंतरीं धाके । ग्रीष्मऋतुराजीवसमान सूकली । बसोनि एकांतीं एकली । चिंताज्वरें संतापली । नावडे संभाषणावलोकन सखीजनमंडळीं । क्षुधातृषास्मृती विसरली । आधींच कृशांगी अतिकृशत्व पावली । कदलीपत्रपृष्ठवत् पृष्ठभागीं दिसों लागली । मुखीं कनककेतकीपांडुरता प्रसरली । जैसी चित्रलिखित पूतळी । तैसी निश्चेष्ट राहिली । चिंतातुरचतुरकामिनी करकंजदळीं । मुखशशी निवेशवोनि नयनकुड्मलीं । घनाश्रुधारा मोकली । ऐशी भावी अंतरीं ॥ ४ ॥

अहो विधाता सर्वज्ञ परी । अपंडितसमान वर्तन कां करी । युक्तायुक्तविचार त्याच्या घरीं । नाहीं ऐसा मम मानसांतरीं । प्रत्यय वाटे विचारितां ॥ ५ ॥

मम गुणानुगुण पुरुषरत्न । सकळसुजनमान्यवीरशिखामणी अर्जुन । तरुण आजानुबाहु सुलोचन । समस्तकळानिधी वासवनंदन । सुहृज्जनहृत्तापहारक चंदन । मदनमोहन । मज पती कां करीना ॥ ६ ॥

तयाचा मज न घडवील संयोग । तरि माझा नुरेल प्राणशरीर-योग । न करीन अन्यपुरुषपरिष्वंग । एका नरावीण अन्य नरदेव वसुदेव-समान मी मानीं । ऐसें चिंतोनि मनीं । उमाधवचरणनलिन नलिनसहस्रें सततार्चननिरत । वीरव्रताचरण आरंभी । अंभोजपाणी समारंभी पूजनारंभीं । स्तवी त्रिकाळीं भद्रकाळीसमेत रुद्राक्षाभरणाप्रियवीरभद्रातें सुभद्रा ॥ ७ ॥

इंद्रवंशा

भवा भवानीरमणा भयापहा ।
भोगींद्रभूषा भुवनैकविग्रहा ॥
भूतिप्रिया भर्म गिरीश भक्तिदा ।
भक्तार्त्तिहा भव्यगुणाश्रया सदा ॥ ८ ॥

उपेंद्रवज्रा

हिमाद्रिजावल्लभ हेमवर्णा ।
हिरण्यरेता हर नित्यपूर्णा ॥
हर्य्यश्वमुख्यामरपूज्यपादा ।
हविर्भुजा भव्यभुजार्कतेजा ॥ ९ ॥

इंद्रवज्रा

देवोत्तमा दीनजनानुकंपा ।
दयार्णवा दिव्यनुतप्रतापा ॥
दाक्षायणीनायक दैत्यनाशा ।
दे पार्थ मातें पतिदान ईशा ॥ १० ॥

इंद्रवंशा

देवी दयाळे दनुजांतकारके ।
दुष्पारदुःखाटविदावपावके ॥
दुरत्यये देववरार्चिते शुभे ।
दुर्गे सुदुर्गातिहरे रविप्रभे ॥ ११ ॥

वंशस्थ

महानुभावे मदमत्तलोचने ।
मदालसे मानितपापमोचने ॥
मदीय चिंतार्णव शोषिजे सती ।
महायशा अर्जुन हो मला पती ॥ १२ ॥

इंद्रवज्रा

प्रार्थीं अशी पूजुनियां त्रिकाळीं ।
उमार्द्धसद्विग्रहचंद्रमौळी ॥
शुद्धस्वभावा वसुदेवबाळी ।
उमामहेशव्रत नित्य पाळी ॥ १३ ॥

चूर्णिका

अहो अस्मिन्नवसरीं । नारद देवऋषी सकळलोकसंचारी । श्रीकृष्ण-दर्शनानंतर सहज पातला इंद्रप्रस्थपुरी । शमदमतपस्वाध्यायाध्ययनत्याग-संतोष तितिक्षाविनयविधानसूयादयाज्ञानानंदयुक्त युधिष्ठिरमहाराज-सदनवरीं । देखतांचि धर्मराजभीमार्जुननकुलसहदेवसह परिवारीं । साष्टांग प्रणमोनि कोमल चरणकल्हारीं । बैसवोनि भद्रासनीं पूजिला । परम विनयें सन्मानिला । द्वारकापुरनिवासीसुहृदजनकुशलवृत्तांत पूसिला । यदुपतिलीलाश्रवणोत्सुकें राजराजें ॥ १४ ॥

सकळसात्वतकुलकुशल कथन करितां । सांगतां सदुत्सवें रामकृष्णचरितामृतकथा । सुभद्रा भद्रलक्षणा दुर्योधनकौरवनाथा । बलभद्रें संकल्पिली ऐशी व्यवस्था । सूचवी चतुर चतुराननानंदन देवलोक-वंदितचरणारविंद मुनी ॥ १५ ॥

परि सुभगसुभद्रामानसभ्रमर । सदां इच्छी अर्जुनवदनकनककल्हार । नेच्छी कौरवेंद्रकटुकुटजविटपिवर । अनेकबंधुस्कंदप्रचुर । संपत्तिसुमनें प्रफुल्लित तन्हीं । रात्रौ निद्रासेवन न करी । तळमळी उदकाविना जेंवि शफरी । अशनपानादिविलासइच्छा न धरोनि कृशोदरी । अति कृशत्व पावली सुंदरी । ऐसा तदीय हृद्गत वृत्तांत सहज परी । परिसवी तदां मुनिनाथ ॥ १६ ॥

महती वीणा वाहोनि खांदीं । गर्जे हरिकृष्ण गोविंद माधव वासुदेव गोवर्द्धनोद्धरण नृसिंह राम यादवाधीश कंसचाणूरमर्दन मधु-कैटभारी ऐशा सुंदर नामप्रबंधीं । बंदीजन घडोनि गाय स्वच्छंदीं, सदानंदभरित श्रीकृष्णप्रियतम परमपुरुषचरणाराधक महापुरुष नारद महानुभाव धर्मासि पुसोनि स्वर्गमार्गें जाता झाला सप्तलोकादिलोक-संचारार्थी ॥ १७ ॥

सुभद्रा सकळभुवननारीरत्न । वरील ऐकोनि दुष्ट दुर्योधन । धनंजय मनीं चिंताविषदिग्धकामबाण । नारदवाग्धनुर्मुक्त दारुण । जिव्हार फोडोनि भेदला । हृदयीं तेणें परम खेदला । सदां सर्वदां तीच्या गुणीं वेधला । निद्रा-आहार-सुखविलासहास्यविनोद-सुहृज्जनसंभाषण न रुचतां विव्हळमति अति तळमळी वीरकेसरी ॥ १८ ॥

श्रीकृष्णसहोदरी गुणलावण्यरत्नपेटी । अंगनामणी मनीं भावी किरीटी । ह्रीमति भीमति चारुमति भावज्ञा कंबुकंठी । कनकवर्णी गोरटी । शृंगावरली सुस्मिता ॥ १९ ॥

मजसारिखा वीर धनुर्धर असोनि धरणी । कैसा वरील दुर्योधन यादवाधीश्वरभगिनी । जे निरंतर मदीयभावबद्ध तरुणी । तरुणतामरस-समान अरुणपाणी । बिंबोष्ठी मधुरपिकवाणी । वाणी मन शरीर अर्पोनि माझ्या कारणीं वर्ते रमणी सुभद्रा ॥ २० ॥

आजि मी न वरीन तीतें । सर्व लोकीं धिक्कार मातें । ऐसा पार्थ आपणांमाजि आपणातें । निंदा करोनि विषादातें । पावे तेजस्वी धुरंधर ॥ २१ ॥

शार्दूलविक्रीडित

झालें विश्व निरर्जुनी द्रुपदजा चौघां वरांची सती ।
कुंती पुत्रचतुष्टयासि जननी, निर्वीर झाली क्षिती ।
झाला द्रोण आशिष्य, यादवपती निर्मित्र झाला हरी ।
धिग् माझा पुरुषार्थ अंधतनया जेव्हां सुभद्रा वरी ॥ २२ ॥

नाहीं मी जठरींच कां विघरलों कां जन्म म्यां घेतला ।
अस्त्रग्राम महानुभाव गुरुला सेवोनि संपादिला ।
म्यां युद्धीं दितिजेंद्र फार वधिले, अग्नीस त्या खांडवे—।
केले तृप्त, न यादवी परिणितां कां वांचणें पांडवें ॥ २३ ॥

सेळीचे गळिंचे पयोधर तसे मी आजि झालों कसा ।
नासाकेशसमान व्यर्थ घडलों लोकीं कराला असा ।
षंढाचें अतिलंब मेहन जसें लोंबे दहा अंगुळें ।
वांचावें क्षितिभार होउनि वृथा मातापित्यांच्या मळें ॥ २४ ॥

छाया शीतळ हींवराख्य तरुची ते तों नये कारणा ।
जाया ते उपयोग काय घडवी केली नटी अंगना ।
डोळे दीर्घ असोनि काय करिजे ते व्यर्थ अंधा जना ।
तैसा मी नर मेदिनीवरि करीं भूभार कां आपणां ॥ २५ ॥

श्रीमच्छंकर पूजिला प्रतिदिनीं म्यां सांब बिल्वें सुमें ।
केलें तद्व्रत एकनिष्ठ मनसें अत्युत्सवें संभ्रमें ।
याचें तों फळ सारसाक्षिणि मला संग्राम व्हावी वरी ।
या लोकीं परमेश्वरत्व वरिजे हें साच देहांतरीं ॥ २६ ॥

चूर्णिका

आतांचि जावोनि कुशस्थळीं । युद्धीं जिंतोनिया प्रबळ यादवमंडळी । हरोनि आणीन सुभद्रा वेल्हाळी । सुपर्णवत् सुधा अमरलोकींची भूतळीं । सुरेश्वरा जिंतोनि आणिली । पुरुषार्थ त्रिजगीं विस्तारिला ॥ २७ ॥

जरि मी धरीन चित्तीं । तरि हे पृथ्वीच घालीन पालथी । परम गंभीर तरी अपांपती । कोरडा करीन अस्त्रानळें निगुती । उडवीन ब्रह्मांड कंदुकप्राय सगळें हातीं । क्षणांत तोडोनि नक्षत्रपंक्ती । सडा घालीन एक वेळे क्षिती । तरिच म्हणवीन धरेमाजि निखळ वीरधुरीण पंडुनंदन ॥ २८ ॥

परंतु द्वारकानिलयनिवासी । दाशार्ह माझा पक्षपाती कृपावारिराशी । असतां मदीय मानससरोवरासी । चिंताग्रीष्माग्निज्वाळा कैसेंन स्पर्शी । त्याच्या न जाणोनि गहनाभिप्रायासी । उचित नव्हे कीजे साहसासी । तो करुणाजलधर अपांगवृष्टि करितां अनायासीं । मानसकासार पूर्ण करील घनश्याम आत्माराम राजीवदळनयन श्रीकृष्ण ॥ २९ ॥

ऐसा सुभद्राभिलाषकामबाणें । केवळ संदीप्त केला अर्जुन । तळमळी अंतरविरहतापें दारुण । वदनसरोजीं सुवर्णपीतवर्ण । सांद्र प्रभा विनटली । चिंताज्वरजनित देहीं कार्शता वाटली । जैशी तरुवरकोटरीं हुताशज्वाला दाटली । करी निःसार तया परी । अंतरीच्या अंतरीं । कुंतीप्रियकुमार अति विव्हळमति संतापला ॥ ३० ॥

अस्मिन्नवसरीं ब्राह्मण । निशीथसमयीं धर्मराजमंदिरा ये धाऊन । करी आक्रोशाट्टहासें गर्जन । म्हणे धांवा धांवा रे भीमार्जुन । माझें धनगोधनादिहरण । करोनि नेती चोरवत् दानव दारुण । त्यांचा करोनि पाठलाग याच क्षणें । त्यांचा वध करोनि माझें धन । मज देवोनि वांचवा प्राण । तुम्ही प्रजापालनप्रवीण । शरणागतरक्षणार्थीं धनुर्बाण । स्वीकार करोनि धर्मस्थापन— । कर्त्ते दीनां सांभाळिजे ॥ ३१ ॥

तदां ब्राह्मणसंरक्षणार्थ । धनुर्बाणग्रहणीं पार्थ । त्वरित जातां अस्त्रशाळेंत अकस्मात । धर्मराज याज्ञसेनीसहित । असतां एकांतविलासरत । पाहतां नेत्र झांकोनि त्वरित । आयुध करोनि हस्तगत । चालिला विप्रवचनपरिपाळणीं । धांवोनि वधिले दुष्ट दानव रणीं । गोधन अर्पोनि नमोनि चरणीं । ब्राह्मणा संतोषवी कुरुमणी ॥ ३२ ॥

त्यानंतर नारदवाक्यमर्यादापाळणीं । पुरुषार्थसागर अर्जुन प्रतिज्ञासिद्धकरणीं । प्रायश्चित्तनिमित्तें तीर्थभ्रमणीं । भ्रमण करितां पुण्य अवनी । गंगादिसकळतीर्थनिषेवणीं । कार्पटिकवेषग्रहणीं । पादचारी संचार करित वीरशिखामणी । प्रभासप्रदेशीं पातला ॥ ३३ ॥

तेथोनि समीप द्वारकाप्रदेश । तेथें नांदे निजमित्र हृषीकेश । तद्दर्शनाचा धरोनि अभिलाष । चिंता करी पार्थ विशेष । मानसीं तया अवसरीं आठवी श्रीहरी तत्प्राण ॥ ३४ ॥

इंद्रवंशा

कुशस्थळीं पुण्य वनस्थळीतें ।
अपुण्य मी देखन केविं तीतें ।
असे सुरेंद्रालयसाम्य भूवरी ।
द्वारावती सर्व अघासि संहरी ॥ ३५ ॥

नानापरी उन्नत सौधमंदिरें ।
सौवर्णरत्नांचित जें मनोहरें ।
निजोच्चतेनें गगनासि चुंबितीं ।
स्वदीप्तिनें भानुकरांसि दापितीं ॥ ३६ ॥

मृदंग

नाना सुवर्णकलशें रमणीय गोपुरीं ।
वैकुंठतुल्य रचिली यदुनायकें पुरी ।
पृथ्वीतळीं म्हणुनि देवगुरू तन्हीं तया ।
वर्णावया धृति नव्हे जरि शारदा तिया ॥ ३७ ॥

वसंततिलका

तत्रापि षोडशसहस्र तयासि राणी ।
तो देव यादवपती विभु चक्रपाणी ।
नांदे सुवर्णसदनीं अति उत्सवासीं ।
सानंदती त्रिभुवनेश्वर कीर्तिघोषीं ॥ ३८ ॥

संपत्ति सर्व भरली सुरमानवांची ।
आणीक भौममुरमागधदानवांची ।
इंद्रादि दिक्पति समर्पिति ज्यासि पूजा ।
त्रैलोक्यनाथ करि शासन देवराजा ॥ ३९ ॥

ब्रह्मण्य देव गरुडध्वज शेषशायी ।
द्वारावतीस वसतो विभु मुक्तिदायी
सर्वां जनांसि तरि वाटतसे दिवाळी ।
श्रीकृष्णनाथमुखदर्शन नित्यकाळीं ॥ ४० ॥

त्यांचीं पुराकृत तपें अमितें म्हणोनी ।
ते सेविती प्रभु सनातन चक्रपाणी
श्रीवासुदेव जगदंतरवासकर्ता ।
तो सर्व पाल्न करी त्रिजगैकभर्ता ॥ ४१ ।

संकर्षणासहित सर्व विलासकारी ।
तो देखती नर तशाचि सुधन्य नारी
कंदर्पकोटिसदृशा अतिसुंदरांगा ।
जे लक्षिती करिति पावन अंतरंगा ॥ ४२ ।

माझा सखा परम तो हरि मातुल्य ।
भेटेल तो मज कसा विभु देवराय ।
एकांतसौख्य अनुभोगिन काय त्यासी ।
आनंदसिंधु करुणामृतवारिराशी ॥ ४३ ॥

सांगेन ह्रदत तयाप्रति सर्व माझें ।
झाले बहूत दिस अंतरिं फार वोझें ।
तापत्रया हरिल तोचि मनोरथातें ।
संपूर्ण तो करिल तारिल तोचि मातें ॥ ४४ ॥

सोळा सहस्र रमणी रमवी विलासी ।
देखेन पांथ कवणेपरि आजि त्यासी ।
सांगेल कोण मम वृत्त तयासि कानीं ।
आला सखा तव धनंजय राजधानी ॥ ४५

रामासि वृत्त न कळोनि हरीच भेटे ।
साधेल कार्य मनिचें मज साच वाटे ।
यावेगळा अणिक भिन्न उपाय नाहीं ।
भेटेल तो मज कधीं पसरोनि बाहीं ॥ ४६ ।

ऐसा मनीं विजय तो करि फार चिंता ।
सर्वज्ञ सर्वगत त्या कळलें अनंता ।
कौंतेय तो प्रियसखा मम सव्यसाची ।
आला इहा धरुनियां मम दर्शनाची ॥ ४७ ।

भेटोनि त्यासि करणें मनिचें मला कीं ।
नाहीं मला प्रिय तयासम अन्य लोकीं ।
हेही स्वसा परम रूपवती मदीया ।
देयीन त्यासि विरचोनि अगाध माया ॥ ४८ ॥

ऐसा विचार करि कंजदलायताक्ष ।
श्रीकृष्ण कृष्णसख सर्वहि लोक साक्ष ।
संयोगिला रथ निघे मृगयेनिमित्तें ।
जो एकला प्रमित घेउनि सेवकांतें ॥ ४९ ॥

॥ इति श्रीसुभद्रास्वयंवरे चंपूकाव्ये पार्थसुभद्राविरहवर्णनं तीर्थसंचारप्रभासागमनं नाम द्वितीयः सर्गः ॥

♣ ♣ ♣

सर्ग तिसरा

चूर्णिका

भक्तपक्षपाती रमापती श्रीकृष्ण । मृगयेनिमित्तें फिरतां नानावनें । मेध्यमृगसमूह करित कदन । मदनकोटिसुंदरें अकल्पित देखिला वीर अर्जुन । प्राची-सरस्वतीतीरीं पावन । पांथ कार्पटिक कृषगात्र वर्ण विहीन । काषायवल्कल परिधान । पंचमळदिग्धांग पूर्ण । जैसा झांकला दिवामणि दुर्दिनें । तैसा स्वतेजतिरोधान । करोनि करी भूभ्रमण । सकळतीर्थस्नानें पवित्रपण संपादोनि निःस्पृहत्वें फिरे लोकचर्याजिज्ञासू सुज्ञमणी ॥ १ ॥

ऐसाही जरी फाल्गुन देखिला । जो परिवारसेवकजनारहित एकला । मार्गश्रमें जरी सूकला । केशकूर्चस्मश्रुनखवृद्धि दीक्षावद्ध-कार्पटिकवेषें जरि झांकला । नानामळें जरी माखला । तरी देखतांचि धनंजय । जैसा रत्नपारखी निजरत्न वोळखे तैसा वोळखिला । इंद्रनीळमणिभासुर सुंदरांग इंद्रनंदन देवकीनंदनें ॥ २ ॥

अस्मिन्नवसरीं माध्यान्हकाळीं । सरिद्वरासरस्वतीजळीं । कृतस्नान आर्द्रमौळी । अर्घ्यप्रदानें तोषवोनि अंशुमाली । प्रसारितबाहू उपस्थानवेळीं । सवितृमंडलमध्यस्थितनारायणध्याननिष्ठ अंतराळीं । बद्धदृष्टि ध्यानोत्सवें परमानंदहृदयीं तत्समयीं । साक्षान्नारायण पार्थदर्शनोद्विग्नमन । सूर्यमंडलांतर्गतनिर्गतध्यानमूर्तिसमान । अनंत-मध्यान्हार्कभासुर तेजःपुंज नीलमेघश्यामवर्ण । शैव्य-सुग्रीव-मेघपुष्प-बलाहक-संयुक्त स्यंदन । घणघणायमानघंटाध्वनीसीं सुसंपन्न । चतुर दारुकसारथीप्रेरित दिव्य रथीं । अतिरथींमाजि धुरीण यादवपती । कुंतीकुमारें निरखिला । आनंद मानिला निजांतरीं ॥ ३ ॥

स्रग्धरा

आला हा पक्षपाती हरि निजमनिंचा अर्थ तो पूरवाया ।
आतां भेटेल मातें पसरुनि बरव्या मोकळ्या चारि बाह्या ।
केलों मी धन्य येणें म्हणउनि विसरे पार्थ तो देहभाना ।
नेत्रीं बाष्पांबु लोटे गदगदित घडे कंठ तैं बोलवेना ॥ ४ ॥

चूर्णिका

समीप देखतां श्रीकृष्ण नयनीं । साष्टांग आंग लोटोनि धरणी । मस्तक अर्पोनि रमाराधितकमल्मृदुलचरणीं । अष्टभाव वोसंडला ते क्षणीं । नीरपूर वाहे नीरजदळसदृशलोचनीं । अपरिमितानंदसंदोह अंतःकरणीं । पंडुकुमरा महावीरा ॥ ५ ॥

अतसीपुष्पसंकाश नीलवर्ण । मंदहासकिरणसंयुक्त वदनचंद्र पूर्ण । कृपाकटाक्षशोभित अरुणारविंददळनयन । मस्तकीं सूर्यकोटिसंकाश मुगुट विराजमान । कटिदेशीं पीतपट सुवर्णवर्ण । मकरकुंडलघटित उदार समकर्ण । आपादलंबिनी वैजयंती वनमाला पावन । शंखचक्रगदारविंदादि वरायुधसंपन्न । भक्तार्तिनिवारकदीक्षित नारायण । कुमारनारदादिसुभक्तवंदितचरण । सदाचरणसंपन्न नरावतारी अर्जुन निजसखा देखतां आपुण । धन्योऽहं धन्योऽहं वचनोच्चारें कृतकृत्यता मानिली ॥ ६ ॥

देखतां नवघनश्यामला । अर्जुन मनीं विश्रामला । मनोरथतरु उद्दाम अमृतफळेंशीं फळला । किंवा चिंतादावपावकार्दिता अकाळीं महामेघ वर्षला । दारिद्र्यासि चिंतामणी जोडला । आयुष्यावसानीं धन्वंतरी आतुडला । तद्वत् चित्तसरिते आनंदपूर वाढला । विकसितमुखनयनसंभ्रमें ऊठला । भुजद्वय पसरोनि कडकडोनि भेटला । चतुर्भुजमूर्तीस सखामणी ॥ ७ ॥

सच्चिदानंदविग्रहपरिरंभ । हृदय हृदया मिळतां उदित झाला संतोष स्वयंभ । तो अनिर्वाच्य सकळभुवनाधारस्तंभ । अंबुजसंभवाद्यखिलजगदारंभ । अमरोरगनरेंद्रमुनींद्रवंदितचरण निजजनभयहरण समारंभें । निज मित्र पार्था भेटला । सकळ सुखाचा दिवस वाटला । संतापसागर आटला । श्रीकृष्णें करुणाकटाक्षें विलोकितां ॥ ८ ॥

तैसाचि आनंद आनंदनिधी श्रीकृष्णमानसा । देखोनि निजसखा अर्जुन प्राण तसा । वियोगविरहव्याकुळ बहुतां दिवसां । भेटोनि अत्यंत सुखावला । वत्सा धेनूसम पान्हावला । कृपणगतधनप्राप्तिसम धनंजयलाभें संतोष मानिला । पाहे वेळोवेळां आस्यकमळा कमलायताक्ष अंतःप्रेमपुरःसरें नरहरी ॥ ९ ॥

प्राचीसरस्वती-सरिद्वरातटीं । महावनीं वटविटपिनिबिडछाया-तळवटीं । पार्थसखासहित श्रीकृष्ण जगजेठी । अर्घ्यादिपूजा पावोनि संतुष्टीं । परमानंदभरित पोटीं । पुसे स्वागतादि कुशल गोष्टी । सृष्टि-स्थितिलीलानाटकसूत्रधार नारायण जगद्गुरु ॥ १० ॥

सर्वत्र सर्वेश्वर सर्वांतर्गत सर्वाधार । निजजनकामपूर मंदार । मंदरोद्धर गुणसागर । सुरमुनिजनकिंकरसेवितांघ्रिकल्हार । परात्पर परमहर्षें अर्जुनासी अनुवादला ॥ ११ ॥

कां रे सख्या अकाळींच झणीं । धर्मराज वृकोदर नकुळ सहदेव याज्ञसेनी । परम वृद्ध पवित्र पृथाजननी । व्यास-धौम्यादि महामुनी । महावैभव इंद्रप्रस्थ राजधानी । त्यजोनि एकलाचि दंडपाणी । किन्निमित्त कार्पटिकवेष स्वीकारिला सद्गुणखाणी । अत्यंत श्रम पावलासि नाना देशाटणीं । तीर्थस्नानें काया पावनी । करोनि आलास हेत धरोनि माझ्या दर्शनीं । सांगोनि शीतळवचनीं निववी मज ॥ १२ ॥

ऐशी सुधाकल्प मधुरवाणी । भगवन्मुखनिर्गत प्रेमसौरभ्यसहायिनी । ऐकोनि पुरली पार्थाची शिराणी । जैसा नीळकंठ परिसतां नवनीरद-ध्वनी । परमानंदें नाचे देहभान विसरोनी । तैसाचि पांथ परिभ्रमणश्रमें कृष्णगात्र असतां गांडीवपाणी । पीतामृतासमान पुष्टि मानोनि करी कथनी । सकळ वृत्तांत सर्वज्ञशिखामणि श्रीकृष्णचरणीं । भाववद्ध पांडुराज प्रियनंदन । सज्जनसंतापपरिहारक चंदन । वंदन करोनि अतिप्रेमें ॥ १३ ॥

शार्दूलविक्रीडित

सर्वज्ञा तुजला नसे विदित तो वृत्तांत कोठें असे ।
तूं सर्वात्मक वासुदेव पुससी अज्ञानवंतें जसें ॥
आज्ञा वंदुनि सांगतों परिसिजे त्या इंद्रप्रस्थांतरीं ।
होतों धर्मसुतासमेत सुहृदीं त्वां ठेविलें त्यापरी ॥ १४ ॥
विप्राचें धन दुष्ट दैत्य हरितां रात्रीं त्वरें पातला ।
आक्रोशें मज धांव धांव म्हणतां देखें द्विजा विव्हळा ॥
तेव्हां चापनिषंगखड्गकलना गेलों गृहाभीतरीं ।
तेथें धर्म निरीक्षिला द्रुपदजासंगें विलासांतरीं ॥ १५ ॥

रात्रीं दैत्य सुदुष्ट चोर वधिला धांवोनियां सत्वरें ।
दिल्हीं तें धनगोधनें मुनिवरा वंदोनि अत्यादरें ।।
प्रायश्चित्तनिमित्त नारदमतें तीर्थावगाहाप्रती ।
आलों स्नान करोनि दुष्कृततरू संछेदिला श्रीपती ।। १६ ।।

आलों द्वारवतीसमीप तुझिया इच्छोनियां दर्शना ।
तूं आलासि जगत्रयादिजनका धांवोनि नारायणा ।।
झालें पादसरोजदर्शन मला, जे कोटिजन्मांतरीं ।
केली पातकपंक्ति दग्ध घडली, मी मुक्त झालों हरी ।। १७ ।।

झालों धन्य पुनीत मी निजकुळाकोटीसमेतें हरी ।
झालों मी कृतकृत्य आणिक मनीं इच्छा नसे दूसरी ।।
आतां त्वां परमेश्वरा लघुतरा या किंकराकारणें ।
दिल्हें दर्शन, हेत पूर्ण घडला, झालें दृशां पारणें ।। १८ ।।

चित्तीं एक असे तुला पुसतसें दासांचिया वत्सला ।
आला नारद मत्पुरीस कथिला वृत्तांत तेणें मला ।।
तूझी जे भगिनी सरोजनयना देवी सुभद्रा, हली– ।
देताहे अपुल्या मतें सुविधिनें दुर्योधना ऐकिली ।। १९ ।।

नातें तें अमुचें समीप अथवा अंधात्मजाचें हरी ।
तूझी ते अनुजा वरील न कळे कोणा गुणें साजिरी ।।
आहे भाव तुझ्या पदीं नरहरी त्याचा कसा जाणसी ।
आम्ही दास तुझे अनन्य म्हणवों, आहों तुझ्या मानसीं ।। २० ।।

हेंही वृत्त तुला पुसोनि करिजे बीजे स्वदेशाप्रती ।
चिंता नित्य करी युधिष्ठिर मनीं, ते वृद्ध माता सती ।
झालों धन्य कृतार्थ आजि तुझिया संदर्शनें अच्युता ।
येतों, लोभ धरी, असोंचि पदरीं तूझ्या अम्ही सर्वथां । २१ ।।

ऐशी ऐकुनि पार्थभाषित गिरा तोषें हरी त्या वदे ।
तूंतें आजि निरीक्षिलें बहु दिसां संतुष्ट झालों मुदें ।।
आहे मात यथार्थ नारदमुनी सांगे तशी, सुंदरी– ।
अर्पावीच सुयोधना म्हणुनियां अत्याग्रहा आदरी ।। २२ ।।

स्रग्धरा

तूझ्या ठायीं सुभद्रा कृतमति विलसे, ते न इच्छी परातें ।
मातापित्रामनींही दृढ नियत असें अर्पिजे हे नरातें ॥
एका रामाविना ते अणिक न मनिती धार्तराष्ट्रासि देणें ।
ताल्यांकासी कदांही न वदति पितरें स्नेहविच्छेदभेणें ॥ २३ ॥

आतां साधीन कार्या तव नियत सख्या, सांगतों मी उपाया ।
जेणें तूतें सुभद्रा वरिल न लगतां साहसातें कराया ॥
तेव्हां संपूर्ण माझे फळतिल मनिंचे अर्थ ते वीरराया ।
योग्यातें योग्य दीजे म्हणति सुजन, ते योग्य तूला वराया ॥ २४ ॥

शार्दूलविक्रीडित

आले वार्षिकमास सन्निध पहा वीरा ययाकारणें ।
चातुर्मासनिवास युक्तचि असे एका स्थळीं राहणें ॥
यामध्येंच सख्या मनोरथ तुझा म्यां पाहिजे साधिला ।
यासाठींच उपाय एक सुचला तो सांगतों मी तुला ॥ २५ ॥

चूर्णिका

रैवतनामा गिरिराज वरिष्ठ । तो तंव बळिरामासि परम इष्ट । सदैव ललनासमूहसमेत यथेष्ट । क्रीडाविनोद व्याहाळीं उद्देशें प्रकृष्ट । महा भूधरीं रमतसे उत्कृष्ट । वारुणीमदिराक्षीप्रसक्त ॥ २६ ॥

रसाधीश्वरवरुणप्रेषित । सुरादेवी तरुकोटरीं निवसत । तेथें हलायुध घेवोनि अंगनाशत । क्षीव विव्हळित एकांतरत । विजन-वनकुसुम-किसलय-मंडित । सफळशोभा-विलोकन-मुदित । विविध तांडवादि चेष्टा करी पूर्णकाम सप्रेमें ॥ २७ ॥

तया पर्वतीं पाहोनि उत्तम दरी । तेथें सुरम्य आश्रम पर्णकुटिका माठिका करी । होवोनि त्रिदंड-संन्यासवेषधारी । कुटीचक-बव्होदक-प्रकारीं । सानंद तेथें वसती करी । क्रीडार्थ येईल श्रीराम सहपरिवारीं । देखोनि हंसस्वरूप अत्यादरीं । परमहंस-गति परम-प्रीतिपुरस्सर नेयील निजमंदिरीं । यतिजनप्रिय परम दैवत आत्माराम आनंदनिधि भुवनधर्ता ॥ २८ ॥

तदनंतर पुढील कार्याचा संदर्भ परोपरीं । मीच घडवीन तुझा कैवारी । प्रेरक मी असे सर्वांतरीं । आतां विशेष चिंता न करीं । निजवृत्ति परम समाधानें धरी । धैर्यावलंबें पांडुतनया प्रतापनिधी ॥ २९ ॥

ऐसें गुह्य कथोनि देवकीजठराकर-नीलरत्नें मुनिजन-हृदयभूषणें नारायणें । करितां निजपुरीस प्रयाण । परम सुभट फाल्गुन । स्वकार्यतत्पर सकळकळाप्रवीण । त्रिदंडसंन्यासवेषांगिकारोन करी गमन । रैवतक महानगवरीं प्रवेशला ॥ ३० ॥

त्रैलोक्यव्यापक महागिरी । पाद प्रवेशले पाताळवरी । मस्तक अंतरिक्षनक्षत्रमंडल धरी । महावन घोरांधारी । जेथें इभ-भग्न-द्रुमांच्या हारी । संघशा फिरती सहपरिवारीं । वासित निमित्तें मदमत्त करी । युद्धसमयीं विदारित-दंत-गंडस्थळ-गळित मुक्ताफळ-निकरीं । वसुंधरा मंडित दिसे बहुपरीं । सुर सिद्ध गंधर्व यक्ष किन्नर किंपुरुष सुंदरी । नाना विमळ सलिलसरोवरीं । विराजित कुमुदोत्पल-कल्हारीं । निजदयित-नायकसमेत क्रीडाभरीं । निजकुचकलश-रेखित-कुंकुम-मृगमदामोद-सुवासित-नीरीं । मज्जन करोनि सालंकारीं । रमण करिती वनविहारीं । विलोकितां विस्मय मानोनि अंतरीं । पाहे गिरिराज परमशोभा ॥ ३१ ॥

जेथें महामृगांचीं गणें । फिरतीं निबिड नितांत निर्भय मनें । जातिवैर त्यागोनि हर्षायमानें । रामप्रभावशासनें । सिंह शार्दूल गंडक हरिण । रोहित सामर वराह वृक जंबूक शाखामृगाद्यनेकवर्णें । व्याल नकुल शशकांत सत्त्वजाति भिन्न भिन्न । पाहोनि कुतुकायमान अंतःकरणें । विस्मय मानी पार्थमणी ॥ ३२ ॥

जेथें मणिशिला अतिविचित्र । कृष्ण रक्त पीत धवळ हरितमिश्र चित्रविचित्र । स्वदीप्तीनें नैशतमहरणी स्वतंत्र । स्वप्रकाश करिती दिनकल्प पवित्र रत्नश्रेणी ॥ ३३ ॥

सौवर्णराजत ताम्र सीस गैरिक मनःशिलादि धातुखाणी । निजांगरंगें नानावर्णीं । तेणें परम शोभायमान धरणीधर धरणीधर-दयित समर्थ सकळ गुणीं । रमवी मना सुजनांचिया ॥ ३४ ॥

जेथें कल्पतरूसमान तरुवर । शीतळ छायेशीं मनोहर । सदैव पत्रकुसुमफळभार । आंगीं धरोनि सकळ शरीर । अर्पिती परोपकरण-प्रचुर । श्रीरामसंतोषकरणीं अत्यादरपुरःसर । परमानंदें डोल्ती । मंद-पवन-संचारें वेल्हावती । निजशाखा-कर पसरोनि खेंव देती । अत्यानंदें परस्परें ॥ ३५ ॥

रसाळ जंबु जंबीर ताळ । तमाळ हिंताळ नीप निचोळ । अशोक पारिजात प्रियंगु प्रियाळ । जपा दाडिम चंपक चंदन बकुळ । करंज बदर पुन्नाग पाटल । भल्लातक हरीतक बिभीतकामल । धव तगर करवीर कोल कंकोल । खर्जूर केतकी जातिफळ । लोध्र तिंदुक मातुलिंग मंदा वंजुळ । नारिंग नारिकेळ बेल । कदली पूग आम्र आम्रातक तिंत्रिणी विशाल । वटाश्वत्थ पलाश पुष्कळ । अगणित तरुवर अखिल । सपल्लव सपुष्प सफळ रूपें विराजमान । अनेक नगराज शिखरिराज या विराजविती ॥ ३६ ॥

जैसे श्रीमंत जन निजमंदिरीं । श्रीमदपुष्ट निजदयितासमालिंगनें मुदित मनांतरीं । तैसेचि तरुवर निजवनितालताालिंगनें तोपायमान नानापरीं । माधवी कुंद जायी जुयी मल्लिकादि वल्लिका परिवेष्टित सानंदांतरीं । मदमत्तसमान डोल्ती । पुष्पविकासें हांसती । कोरकमिसें दंतद्युति प्रकाशिती । अरुणपल्लवमिसें शोणाधर विकासविती । किंशुकमिसें पीतांशुक परिधान करिती । पिकरवमिसें पंचमराग आलापिती । शुकभाषणमिसें बोलती । केकामिसें निजप्रिय वारि-वाहासि वाहती । ऐशा विलासें विलसती । वनकुळभूषण तरुण भूरुहराज निजवैभवें ॥ ३७ ॥

ऐसा रमणीय रैवतगिरी । देखतां अर्जुन परमानंदयुक्त मनांतरीं । निजवासार्थ सकळ काळ सुखावह पाहोनि दरी । मणिमय गुहांगिकारी । जल-वात-शीत-सहनक्षम क्षेमकारी । मनरंजनें निजानंद उद्बोध करी । निरंजन श्रीकृष्ण ध्यानधाराप्रवाहाविच्छिन्न घटणानुकूल बरी । कंदमूळफळपुष्पजळसमृद्धि समीप तरी । समस्त लक्षण लक्षित धरी । श्रीहरि-आज्ञानुसारें हरिताश्वनंदन हरिमित्र हरिध्वज हर्षमानी ॥ ३८ ॥

तेथें काषायवास वल्कल मृगाजिन पीठ पादुका । वृषी त्रिवेणु सूत्र शिखा— । समेत त्रिदंडधारी संन्यासी नेटका । एकाकी सस्पृहांतर परि निःस्पृहासारिखा । वसोनि जनमोहनार्थ मात्र वेष धरोनि निका । निजनेमाचरणें क्रियायोगें श्रीकृष्णकोमलकमलसदृशचरणारविंदाराधन-ध्यानैकनिरत पांडुराजतनय परमहंसचर्या आचरे ॥ ३९ ॥

नवतुळसीदळमंजरीहरितें । आम्रकिसलयें सुशोभितें । करवीर पारिजातें । पाटल चंपक बकुल बिल्व प्रवाळ समेतें । मल्लिका जाती कुंद मंदारयुक्तें । शतपत्राद्यनेकसुमें प्रशस्तें । शामल कोमल दूर्वांकुरें एकचित्तें । श्रीकृष्णसहस्रनामादि स्तोत्रपाठनिरत प्रेमांतरें गद्गदितें । पार्थ श्रीकृष्णचरणार्चन करी त्रिकाळीं ॥ ४० ॥

ग्रीष्मऋतुपर्यवसानीं । जलदाकुलगगन निरीक्षतां नयनीं । घनगर्जन-विद्युत्पातादि भयप्रदानीं । निर्भयमनें प्रारब्धैकदत्तदृष्टि परमसुखानुभूति मनें सुखासनीं । पांडव-रत्नहार-मध्यमणी । श्रीकृष्णसखा सुकुमारमूर्ति सर्वांगसुंदर नवयौवनमंडित मदनसदृश मनोहर । पुरवनिता-मनांतरीं कामदेवमहोत्सव-निर्माणकारी । यतिवेषधारी तपश्चर्या करी अति तोषें ॥ ४१ ॥

॥ इति श्रीसुभद्रास्वयंवरे चंपूकाव्ये कृष्णार्जुनसंदर्शनसंभाषणरैवत-प्रवेशनिवासो नाम तृतीयः सर्गः ॥

♣ ♣ ♣

सर्ग चौथा

।। श्रीबलभद्रप्रियानुजाय नमः ।।

चूर्णिका

अहो अस्मिन्नवसरीं । सकळ अमरासुरनर-नमस्कृत-चरण भवभयहरण नारायणांशकळाष्टमावतारमूर्तिमंत श्रीमंत भूभारसंहारक संकर्षण सात्वत वृंदानंदसंदोह महानुभाव । देवगंधर्वनरनागवनितासमूह-समावेष्टित । क्रीडार्थ निजदयित रैवतकपर्वतवनीं । अवनीभुजमंडण तालांकध्वजभूषित महारथारूढ आरूढयौवन महापुरुष परंज्योतिस्वरूप लीलानाटकसूत्रधार सकळजगदाधार येता झाला ॥ १ ॥

प्रथम-वर्षागम-समयीं । नानाद्रुमफलपक्वभारभूषित नमितशाखा-मंडित खर्जुर-जंबु-जंबीर-रसाल-पनसाद्यनेकतरुवरनम्रशिर विनीतवत् परम सादर । निजसेवनार्थ तत्पर विलोकित आनंदभरित नाना-तरुकोटरास्थित-वारुणीरसपानासक्त । प्रमत्त-आरक्त-कमलदलायत-चारुनेत्र । विकसित-मंदार-सुमन-दाम-कलित-कंधर । पुरंदरादि-दिविज-वंदित-पदारविंद सानंद सुंदरीसह संचार करितां अकल्पित अर्जुनाश्रमकृत-शोभित-नगराजदरी अवलोकिली ॥ २ ॥

शार्दूलविक्रीडित

देखे तैं यतिराज राजकुळिचा संन्यासवेषा धरी ।
काषायांबर दंडमंडित दिसे जो शोभवीतो दरी ।
संन्यासी-प्रिय राम मानित तदां आश्चर्य चित्तांतरीं ।
हा तों नूतन-सद्वयस्क असतां भिक्षुत्व कां स्वीकरी ॥ ३ ॥

वैराग्यें धरिलें स्वरूप सगळें तैसा दिसे लोचना ।
नाहीं यासम निःस्पृही कवणही, कामीं न योजी मना ।
कंदें मूळ-फळें जळें करितसे प्राणाचिया धारणा ।
कद्धीं ते उपवास निर्जळ करी कद्धीं करी पारणा ॥ ४ ॥

लोकांचा सहवास टाकुनि कसा एकांत अंगीकरी ।
नालोकी नगरापुरासि अटवीं हे सेविलीसे दरी ।
याला पूर्ण विरक्ति वाणुनि असे, निःसंग ऐसा दिसे ।
नैरापेक्ष्यपदासि पाउनि वसे स्वानंद या उल्लसे ॥ ५ ॥

ऐसें चिंतुनि मानसीं झडकरीं आला समीप-स्थळीं ।
याची दीप्ति विलोकितां म्हणतसे हा धन्य पृथ्वीतळीं ॥
श्रीनारायणमंत्रपूर्वक करी दंडापरी वंदना ।
संन्यासी हरिरूप, मानव नव्हे, हे अंतरीं भावना ॥ ६ ॥

तो नारायण उच्चरोनि वसवी तालांक दर्भासनीं ।
संतोषें करि सुप्रसन्न-मनसें संप्रश्न रामा मुनी ॥
त्यातें राम पुसे सतोषविनयें बद्धांजुळी सादरें ।
येणें कोठुनि या स्थळासि अपुलें स्वामी वदा विस्तरें ॥ ७ ॥

सांगे अर्जुन धर्मराजानिकटीं होतों हळी आयकें ।
इंद्रप्रस्थपुरासमीप वसतां धर्में धरानायकें ॥
केला मान, परंतु निःस्पृह अम्ही आहों यती, संगती ।
नोहे योग्य कधीं गृहाश्रमवतांसंगें अम्हां सन्मती ॥ ८ ॥

आलों भूभ्रमणार्थ, तीर्थनिवहीं स्नानें तनू पाविली ।
श्रीविष्णू-शिवमंदिरें सुखकरें दृष्टीं यया देखिलीं ॥
ज्ञानी श्रेष्ठ महानुभाव बहुतां क्षेत्रीं अम्हां भेटले ।
सत्संगामृत-भाषणें दिवस म्यां कित्येक ते लोटिले ॥ ९ ॥

आतां रैवतपर्वतासि सहजें मी पांथ आलों परी ।
वर्षाकाळ समीप देखुनि बरी म्यां सेविली हे दरी ॥
चातुर्मास्य-दिनासि कंठुनि पुन्हा जाऊं तया सुस्थळा ।
जेथें धर्मज सत्यधर्म विलसे जो सत्यसंधागळा ॥ १० ॥

ऐसें ऐकुनि पार्थभाषण मनीं संतोषला राम तो ।
प्रार्थी वंदुनि सादरें यतिवरा योगींद्रविश्राम तो ॥
चालावें विभु मंदिरासि अमुच्या कंठोनि वर्षादिना ।
द्यावा सत्सहवास, पावन करा बद्धां गृहस्थां जनां ॥ ११ ॥

तुम्ही सूर्य तसे जगांत फिरतां लोकांचिया तारणा ।
हृत्पद्मीं निशिवार ठेउनि असां त्या आदिनारायणा ।
तोही तों तुमच्या हृदब्जनिलया सोडीचना श्रीहरी ।
भक्तिप्रेमनिबद्ध गुंतुनि वसे अन्य स्थळां नादरी ॥ १२ ॥

तुम्हां जे भजती सतोष पुजिती अन्नोदका अर्पिती ।
ते त्रैलोक्यपती हरीस पुजिती ऐशा फळा पावती ॥
यासाठीं करुणा करोनि सदना चाला प्रभू सत्वरें ।
साक्षाल्लोकनिवास कृष्ण निरखा नेत्रीं यया सादरें ॥ १३ ॥

ज्यासाठीं करिती तपें कठिण ते ध्यातात योगी मनीं ।
ज्यासाठीं व्रतनिष्ठ आचरति ते कित्तेक तीर्थाटणी ॥
यज्ञें याज्ञिक नित्य अर्चिति तया तो यादवांच्या कुळीं ।
झाला भूभरवारणार्थ सुजनां रक्षावया भूतळीं ॥ १४ ॥

भूपांचे मददर्प मंथुनि करी सोळा सहस्त्रांगना ।
सर्वांही सदनांत नित्य वसतो जो अंतरायाविना ॥
सत्यज्ञानसुखस्वरूप विभु तो निर्लेप सर्वां घटीं ।
राहे व्योम तसा अलिप्त करितो याही जगीं राहटी ॥ १५ ॥

त्याचा कीं सहवास होयिल तुम्हां, देखोनि तुम्हांप्रती ।
तोही पावल तोष फारचि पहा भिक्षुप्रिय श्रीपती ॥
तो निष्किंचनवित्त यास्तव मुनी निष्काम जे निःस्पृही ।
त्यांचें दास्य करी समस्त पुरवी राहोनि त्यांचे गृहीं ॥ १६ ॥

ऐसा हा जगदीश नांदत असे द्वारावतीभीतरीं ।
चालावें करुणाघनीं जरि मना माने विनंती तरी ॥
ऐसा राम सुधोपमान वचनें विज्ञापना ती करी ।
तेव्हां पार्थ सदुत्तरें श्रुतिमतें बोलोनि तोषा करी ॥ १७ ॥

यावें त्वत्सदनासि तूं विनविसी, आम्हां वनें काननें ।
श्रीदेवायतनें गुहा दरकुट्या केल्या विधीनें मनें ॥
नाना हे नगराज अर्पिति सदां स्वादिष्ट भिक्षाफळें ।
गोडा वाहति या नद्या अघहरा देती जळें शीतळें ॥ १८ ॥

कंदें मूळ फळें अम्हांसि रुचती कंथाजिनें वल्कलें ।
कापायांवर आमुचे जिणति त्या पीतांबरातें बळें ॥
रुद्राक्ष स्फटिकादि दिव्यतुळसी पद्माक्षधात्रीफळें ।
माळा या नवरत्नसाम्य, न गणूं या तुल्य मुक्ताफळें ॥ १९ ॥

हो का चंदन एणनाभि अथवा काश्मीरपंकाहुनी ।
आम्ही शुभ्र विभूति भूतिद असी सानंद मानूं मनीं ॥
आम्हांतें करकंजपात्र मिरवे तोयाचिया प्राशना ।
बाहू हे उपवर्ह, काय करणें ऊशा अम्हां सद्गुणा ॥ २० ॥

शय्या भूमितळीं सुरम्य पुलिनीं कीं शाड्वलीं कोमलीं ।
राकाचंद्र सुदीप, चामर अम्हां संप्राप्त मंदानिळीं ॥
भोगूं श्रेष्ठ विरक्ति मुक्ति वरण्या तुर्यानुभूति स्त्रिया ।
आम्ही तों यतिराज, राजस जनीं संसर्ग तो कासया ॥ २१ ॥

त्वां पूर्वीं कथिलें हरी विलसतो द्वारावतीभीतरीं ।
तो आहे जडजंगमांत समुद्या व्यापोनि नानापुरी ॥
आम्ही तो निरखीतसों जनिं वनीं सर्वाद्य सर्वां स्थळीं ।
त्यासंगेंचि सदां अम्ही रमतसों अंतर्विवित्तस्थळीं ॥ २२ ॥

भोगी एकचि वेळ राहुनि घरीं सोळा सहस्त्रांगना ।
याचें कैं नवलाववर्णन किजे या आदिनारायणा ॥
जो मायी अपुल्या अनंत रमवी शक्तीस सद्वैभवें ।
नाना नाटकशक्तिचक्र नटवी आश्चर्य कैं संभवें ॥ २३ ॥

सर्वत्रीं विभु पूर्ण चिद्गगन हा सर्वेश सर्वां घटीं ॥
आहे व्यापक एकला गुण तसा व्यापोनि सारा पटीं ॥
भांडीं मृत्कनकेंचि जाण वसिजे सर्वस्व आभूषणीं ।
तैसा हा जगदात्मरूप विलसे सर्वत्र आत्मा धणी ॥ २४ ॥

ब्रह्मा आदि पिपीलिकांतकरुनी कोठेंचि नाहीं उणा ।
चेष्टेना परि तूळतंतु तरिही त्या श्रेष्ठसत्तेविना ॥
आम्हांही हृदयीं प्रकाशक असे पाहोनि नारायणा ।
आहों स्वस्थ पुरीं प्रवेश करिजे कोणा तरी कारणा ॥ २५ ॥

प्रारब्धार्पण देह हा करुनियां जाळोनिया संचिता ।
केलें तें क्रियमाण भार्जित पुढें नाहींच चिंताकथा ॥
आम्ही शांति वरोनि निर्भय असों डोहीं बुडाल्या गजा ।
मोठा ग्रीष्मज ताप काय भय दे संदेह नाहीं दुजा ॥ २६ ॥

आम्हां हेचि दरी पुरंदरपुरी हें काननें नंदनें ।
हे सारे तरु कल्पवृक्ष समजों संतोषपूर्णें मनें ॥
ज्याच्या अंतरिं पूर्ण तोष विलसे ऐंद्री तरी संपदा ।
मानी तुच्छ, यती तयासि म्हणिजे जो निंद्य नेच्छी कदां ॥ २७ ॥

आम्ही हा तरि लोकसंग समुदा सर्पापरी मानितों ।
व्याघ्री आसवली वृकी मरकटी नारी तशा पाहतों ॥
सोनें आणि शिळा मृदासम गणूं जाणूं मणी शर्करा ।
आम्ही निःस्पृह, काय कारण कथी यावें हळी त्या पुरा ॥ २८ ॥

वैराग्योक्ति असी वरी परिसतां श्रीराम संतोषला ।
मानी हा यति फार निःस्पृह असे वैराग्यासिंधू भला ॥
यातें नेउनि मास च्यारि सदनीं ठेऊनि पूजूं बरें ।
ऐसें चिंतुनि राम त्याप्रति वदे जें युक्त प्रत्युत्तरें ॥ २९ ॥

स्वामींनीं कथिलें यथार्थ परिचें मानूं अम्ही सादरें ।
तत्रापी गृहवंत त्यां गति तुम्ही, नाहींच कीं दूसरें ॥
ज्ञानी सर्वग लक्षिती यदुवरा तोही तया अंतरा ।
सोडीनाच यथार्थ पैं परि असे व्यापोनि सर्वांतरा ॥ ३० ॥

आहां निर्मम निष्प्रपंच यतिही आहांचि संगाविना ।
तत्रापी करिजेचि मान्य अमुची अव्यंग हे प्रार्थना ॥
प्रारब्धार्पण हें शरीर करिती ज्ञानी सदां वर्तती ।
नाहीं आग्रह त्यांसि जाण सहसां ते साम्य सर्वा स्थिति ॥ ३१ ॥

कंथाही धरिती कधीं सुवसनें कद्धीं फळें भक्षणा ।
मिष्टान्नें मिळती कधीं परि कधीं जाताति भिक्षाटणा ॥
कोणेका दिवसीं सुरत्नभुवनीं राजांगना सेविती ।
कद्धीं ते मलिन स्थळीं उकरडां धूळींतही लोळती ॥ ३२ ॥

कद्धीं तें पिचुमंद तोय मिनलें स्वादिष्टसें भक्षिती ।
कद्धीं आजगरी व्रताचरण तें कैं सोपवासव्रती ॥
अन्येच्छेस्तव वर्तती सुजन ते नाहीं तया आग्रहो ।
अस्ताही विषयीं उदासिन तरी व्याधीचना निग्रहो ॥ ३२ ॥

यासाठीं मुनिनायकीं न धरितां संकल्प कांहीं मनीं ।
चालावें मम मंदिरासि वसिजे अत्याग्रहा टाकुनी ॥
एकांतींच तुम्हां करीन वसती सध्यानयोग्या स्थळीं ।
जेथें तो जनसंघबाध न घडे, ये ना वधूमंडळी ॥ ३३ ॥

वर्षाकाळ सरेल त्यावरि बिजे कीजे मना मानल्या ।
ऐशी हे विनती बरी परिसिजे हे युक्तसी वाटल्या ॥
तेव्हां हांसुनि पार्थ त्याप्रति वदे इच्छा हरीची असी ।
आहे तैं कवणासि लंघवल वा नाहीं तरी मानसीं ॥ ३५ ॥

तुम्ही ईश्वर या जगांत नटतां क्रीडा अनेका करा ।
कीर्तीनें त्रिजनां भरोनि समुद्या लोकांस या उद्धरा ॥
भूमीचा अतिभारदूरकरणीं बंधू तुम्ही शोभतां ।
एकत्वीं अपणांत दोनिपण हें मायें जगीं दाविता ॥ ३६ ॥

तूं संकर्षण सर्व भूमि धरिसी सिद्धार्थसी मस्तकीं ।
तेथें स्थापिसि लोक सर्व अपुल्या तेजेंचि नेमस्त कीं ॥
कल्पांतीं जग सर्व एक अपुल्या वक्त्रानळीं होमिसी ।
मायेचें परतीर पाउनि सुखें तूं एकला राहसी ॥ ३७ ॥

तूं जें बोलसि मान्य तें मज असे नीलांबरालंकृता ।
येतों द्वारवतीस रम्य विलसे सर्वाढ्य सालंकृता ॥
ऐसें ऐकुनि राम तोषितमनें या अर्जुनातें रथीं ।
प्रेमें बैसवि देव आपुण घडे स्वच्छंद तो सारथी ॥ ३८ ॥

जेव्हां हेमरथीं यती वळघवी आणी पुरीकारणें ।
तेव्हां देखति नागरीक जन ते दृष्टी घडे पारणें ॥
आधीं सुंदर वेषहि बहु तसा शोभे नटाचे परी ।
जो कार्यार्थ पृथाकुमार असला श्रीकृष्णवाक्यें धरी ॥ ३९ ॥

वाद्यांच्या गजरें महोत्सवभरें सप्रेमयुक्तांतरें ।
आंणी राम महानुभाव यतिला ठेवी गृहीं सादरें ॥
आले आनकदुंदुभीप्रभृति ते ऐकोनि संदर्शना ।
श्रीकृष्णासह उग्रसेन नृपती वंदोनि नारायणा ॥ ४० ॥

झाले तुष्ट सुपुष्ट हृष्ट म्हणती हा श्रेष्ठ सर्वां गुणीं ।
आला कीं यति इष्ट दैवत तसा कष्टाविना आंगणीं ॥
यातें मिष्ट सदन्न अर्पूनि पुजूं सप्रेम सुष्टप्रदा ।
निष्ठेनें भजतां हरोनि समुद्या कष्टासि दे संपदा ॥ ४१ ।

॥ इति श्रीसुभद्रास्वयंवरे चंपूकाव्ये अर्जुनबलरामसंदर्शनसंवाद-
संतोषणद्वारकापुरप्रवेशो नाम चतुर्थः सर्गः ॥

सर्ग पांचवा

॥ श्रीकृष्णाय सत्यभामाप्रियाय नमः ॥

इंद्रवज्रा

तालांक तो अंकित त्यासि झाला ।
काळत्रयीं सेवितसे यतीला ।
ठेवी तयातें अति गुह्य ठायीं ।
जेथें जनांची गति फार नाहीं ॥ १ ॥

शार्दूलविक्रीडित

पूजी श्रीधर त्या यतीस विभवें ब्रह्मेंद्र ते आपणा ।
जैसे पूजिति त्यापरीच करितो पादाब्जप्रक्षाळणा ॥
ज्याचें श्रीपदतोय देव शिरसा वंदोनियां तोषती ।
तो लक्ष्मीसह पादतोय यतिचें वंदी प्रमोदें अती ॥ २ ॥
या रीतीं प्रतिवासरीं करितसे सद्भक्तिनें सेवना ।
सायंप्रात अविस्मरेंचि करितो येवोनि सद्वंदना ॥
अंतःप्रेमरसांतरें प्रतिदिनीं भिक्षान्न दे आदरें ।
सानंदें अवलोकितां विजय त्या सौख्याब्धि चित्तीं भरे ॥ ३ ॥
ऐसे द्वारवतीनिवास समुदे देखोनि भोजांधकीं ।
नाना यादव शूरसेन करिती पूजेसि मोहांध कीं ॥
गेले दीस कितेक राम वदतो भावें सुभद्रेप्रती ।
बाले भक्तिमती सदां सुविनये सेवी त्रिकाळी यती ॥ ४ ॥
हा तों पूर्ण विरक्त साधु सुगुणी सद्धर्मवेत्ता असे ।
कांहींही अणुमात्र दुर्गुण यया स्पर्शींच ना मानसें ॥
याचें सेवन तूं करोनि लभसी तो चक्रवर्ती पती ।
ऐशा त्या बलभाषणा परिसतां संतोषली सन्मती ॥ ५ ॥
लागे ते निशिवार भक्तिपरमें भिक्षूचिया सेवना ।
त्या कार्यांतचि काळ सर्व खपवी कांहीं न लागे मना ॥
काळीं दे जळ शौचमज्जनतृषानाशार्थ अत्यादरें ।
काषायांबर धौत निर्मल करी कौपीन दे सत्करें ॥ ६ ॥

यीचें पाहुनि रूप तापितमनीं कंदर्प कांडे व्यथा ।
पावे पार्थ म्हणे कधीं हरिन मी साध्वी मना संमता ॥
हेही पाहुनि त्या यतीस सुदती आश्चर्य मानी मनीं ।
चित्रीं म्यां अवलोकिला विजय तो तद्रूप हाही मुनी ॥ ७ ॥

होता धर्मनृपासमीप म्हणुनी हेही गिरा ऐकिली ।
सेवा नित्य करी समीप वसतां ते भीडही फीटली ॥
तेव्हां ते पुसते यतीस सगुणा संतुष्ट पाहोनियां ।
इंद्रप्रस्थपुरींत धर्मनिकटीं होतां कधीं स्वामिया ॥ ८ ॥

तुम्हीं अर्जुन लक्षिला निजदिठीं आहे बरा कीं सुखी ।
त्याचें वृत्त समस्तही परिसवा चित्ता करावें सुखी ॥
त्याचें तें गुणरूप वर्णन करा विश्रांति द्या या मना ।
त्याचें श्रीमुखपद्म लक्षिन कधीं वाटे असी कामना ॥ ९ ॥

तो भेटेल कधीं मला गुणनिधी तो कांत मातें घडो ।
आशीर्वाद करा मला गुरुकृपें मद्भाग्य हें ऊघडो ॥
नेच्छी हें मन अर्जुनाविण पती ऐका यती सांगतें ।
साचें हें तुमच्या पदाब्जयुगुळीं मी आण ते वाहतें ॥ १० ॥

ऐशी प्रेमरसांतरा प्रतिदिनीं बोले गिरा भामिनी ।
जैसें नारदभाषणा परिसिलें आलें तसें या मनीं ॥
बोले तीप्रति कुंतिभोजकुमरीगर्भाकरींचा मणी ।
तेव्हां अर्जुन ऐक वो म्हणतसे पार्थप्रिये कामिनी ॥ ११ ॥

बंधू पांचसभेत अर्जुन असे संपत्ति कांहीं नसे ।
ऐशाचा तरि हेतु काय तुजला त्यां कामिला मानसें ॥
पृथ्वीमंडण राजराजमुकुटालंकार चूडामणी ।
तो दुर्योधन तूं वरीं सुललने संपत्ति भोगीं जनीं ॥ १२ ॥

ज्याचे बांधव सत्पराक्रम पहा दुःशासनासारिखे ।
तेही शंभर शंबरारिसम ते रूपें महानेटके ॥
माता आणि पिता बहूत कुळही स्वाधीन त्या मेदिनी ।
सेनानायक कर्ण सैंधव असे साहाय वीराग्रणी ॥ १३ ॥

भोगी सांप्रत सर्व हे वसुमती तो चक्रवर्ती असे ।
नाहीं त्यासम अन्य भूप दुसरा जो योग्य तूला दिसे ॥
हे तों पार्थ समर्थ नोहति कदां वित्तें तथा वैभवें ।
त्याला तूं वरिसी न तोष तुजला चित्तांत या संभवे ॥ १४ ॥■

ऐसें ऐकुनि पार्थभाषण वदे मंदाक्षरें सुंदरी ।
तुम्हीं जो कथिला सुयोधन पती मी त्याजला ना वरीं ॥
माझा एकचि भाव अर्जुनविना नेच्छी कदां मीं पती ।
देवेंद्रादिक अष्ट दिक्पति तरी मी नांगिकारी यती ॥ १५ ॥

होती पांडव पांच साच परि ते पंचाननासारिखे ।
एकाहोनि विशेष एक बलधी यांसी न कोणी तुके ॥
एका भीमबलासि शंभर तरी येती न ते साम्यता ।
पार्थाच्या धनुटंकरा परिसतां ते पावती मूढता ॥ १६ ॥

हे सारे पुरुषार्थवंत जिणती एकेक ते मेदिनी ।
पृथ्वीच्या भणगासि पूर्ण करिते आहेति रत्नीं धनीं ॥
आतेचा सुत कामसुंदर तसा कोदंडदीक्षागुरू ।
कृष्णाचा अतिमित्र अर्जुन मला सर्व प्रकारें वरू ॥ १७ ॥

एकानें द्रुपदात्मजा सकळही पृथ्वीभुजांमंडळीं ।
इच्छा भेदुनि कर्णमुख्य असतां वीरांतरीं जिंतिली ॥
जेणें खांडवदाह तो विरचिला देवेंद्रही पाहतां ।
केलीं आणिक दुष्करें बहुतसीं कर्में सुरां देखतां ॥ १८ ॥

तो हो कां धनहीन संपति नसो कांहींच त्याचे घरीं ।
तत्रापी धनदादिकां न करवे त्या अर्जुनासीं सरी ।
ज्याचा मित्र अनंत त्यासि समते देवेंद्रही नातुळे ।
तेव्हां पामर कौरवेश्वर कसा दुर्बुद्धि त्यासी तुळे ॥ १९ ॥

सूर्याच्या समतेसि कीटक कसा खद्योत येऊं सके ।
झाला पुष्ट अतीव सूकर तव्हीं कैं दिग्गजासीं तुके ॥
सिंहा श्वान समान होयिल कसा सांगा तुम्ही हें बरें ।
त्या उच्चैश्रवसासि साम्य करिजे कोणा उपायें खरें ॥ २० ॥

शेषासी अलगर्द येयिल समा कैं कूप ये सागरा ।
चांप्यासी तरि किंशुकें मग किजे स्पर्धा कसी नागरा ॥
जोडावें कमळासि काय सुमनें उन्मत्तवृक्षोद्भवें ।
काका कोकिलसाम्यता तरि कसी लोकांत या संभवे ॥ २१ ॥

मूर्खालागि सुरेंद्रदेशिक तया पंक्ती कसें आणिजे ।
तैसा पार्थसमान केंवि चतुरीं अंधात्मजा मानिजे ॥
जो सर्वज्ञ बलाढ्य रूपसगुणी शस्त्रास्त्रवेत्ता जनीं ।
त्यासी कोण तुळेल साच न कळे हे शोधितां मेदिनी ॥ २२ ॥

आहे पार्थ तसा सुरांत हरिसा, तीर्थांत काशीपुरी ।
तेजोवंत तयांत भास्कर तसा, गंगा नदीभीतरीं ॥
पाषाणांत मणी, चतुष्पदगणीं ते कामधेनू गुणी ।
पक्ष्यांमाजि समर्थ त्यासि म्हणिजे जो राजहंसाग्रणी ॥ २३ ॥

धातूंमाजि सुवर्ण, त्या वनमृगीं पंचास्य जैसा बळी ।
देहीं मस्तक पूज्य, चंद्र मिरवे तारागणीं सोज्वळीं ॥
माधुर्यांत सुधा, मनुष्यनिवहीं राजा, यती आश्रमीं ।
यज्ञांमाजि तुरंगमेध, न तुळे वर्णांत विप्रोत्तमीं ॥ २४ ॥

चूर्णिका

ऐशी सुभद्रामुखकमळनिर्गत-हंसकळनिनादसमान हंसवाहिनी । ऐकोनि चतुरतरसमाजमुकुटरत्नें कानीं । परम विस्मय मानोनि मनीं । पुन्हां सस्मित सुवचनीं । नारीवचनसरणी पडताळी ॥ २५ ॥

ह्मणे तूं पराधीन वो राजबाळी । अत्याग्रही बळिराम महाबळी । निग्रहें सुयोधनासि तुज देयील तया काळीं । यत्न काय तुझा चालेल वद वो वेल्हाळी । चातुर्यमणी चंद्रवदने ॥ २६ ॥

मायबाप बंधूजन । सर्व वर्तती हलायुधाधीन । तो तंव आग्रही दारुण । तूं तंव अबळा सुलीन । कैसेनि पावसी वीराग्रेसर अर्जुन । अर्जुना अर्जुनवत् गणोनि तुज वरील कौरवेश्वर सुयोधन । रामपक्षपातें निश्चयें ॥ २७ ॥

तेव्हां वदे सुभद्रासती । सस्मित-विकसित-रदरत्नदीप्ती । मज जरि राम अर्पील दुर्योधना निश्चितीं । तदां धाडीन निजपत्रिका प्रार्थाप्रती । जैशी रुक्मिणी एकांतीं । संदेश-वचनें विप्राहातीं । पाठऊनि नेला यादवपती । अंबिकाल्यीं भूपाळपंक्ती । संनद्ध असतां हंसगती । वरिती झाली कृष्णासि निगुती । तैसीच मीही पृथानंदन वीर फाल्गुन सुमती । वरीन निश्चितीं यतिवर्या ॥ २८ ॥

तोही गांडीवधन्वा महाबळी । उडी घालील मज निमित्तें तात्काळीं । चक्रवाकीसंकटीं अंशुमाळी । कृपेनें उदय करी प्रातःकाळीं । तद्वत् तमप्राय कौरवमंडळी । मथोनि मज हरील वीरमौळी । तालांकसहित यादवफळी । भेदोनि नेयील सकळीं । अवलोकितां मृगराज स्वभाग बस्तमेळीं । हरी तैसा निजप्रतापें ॥ २९ ॥

कदाचित् न येतां राहील मज उपेक्षून । जरि मम प्राणप्रिय वीर अर्जुन । तरि निजदेहस्थित भूतांश तत्सेवना धाडीन । विभाग जेथील तेथें मेळवीन । प्राण प्राणीं मनीं मन । निजजीववृत्तीसहवर्तमान । तेंही विंदाण परिसिजे ॥ ३० ॥

शार्दूलविक्रीडित

पृथ्वी धाडिन ज्या स्थळीं नरे असे पृथ्वीस भेटावया ।
आपीं आप मिळेल अर्जुन जया प्राशील तोया तया ॥
माझें तेज मिळो तदीय मुकुरीं लक्षी मुखालागुनी ।
वायू राहिल तालवृंत-उदरीं आकाश त्या आंगणीं ॥ ३१ ॥

राहे हे तनुमात्र एक वडिलाआधीन, सर्पत्वचा ।
जैसी ते जड, काय तीस करिती रामादि हें निर्वचा ॥
माझें जीवित साच जाइल यती जेथें असे तो पती ।
त्या अंगासि अलिंगितील सहसा हे इंद्रियें निश्चितीं ॥ ३२ ॥

तेव्हां काय करील राम कथिजे माता पिता कायसीं ।
मानी कोण सुहृज्जनां ? विजय तो म्यां कामिला मानसीं ॥
आतां एक तुह्मांसि मी विनवितें कीजे कृपासागरीं ।
चातुर्मास सरेल जाल पुढती त्या इंद्रप्रस्थांतरीं ॥ ३३ ॥

सांगावें मम मानसांतर तया वीरास अत्यादरें ।
यावें तां समयीं स्वयंवर घडे माझें तदां सुंदरें ।।
न्यावें तां मज कोटिवीर मथुनी, कृष्णें जसी आणिली ।
देवी भीमकनंदिनी, मज तसें तांही हरावें बळीं ।। ३४
आहे रैवतकीं मला नवस तो देवीचिया पूजना ।
तेव्हां तां हरिजे मला गुणवता वीरां शिरोमंडणा ।।
हा संकेत तयासि पूर्ण कथिजे तो पार्थ मातें वरीं ।
ऐसा हा उपकार पूर्ण करिजे मातें यतीशेखरीं ।। ३५ ।

वसंततिलका

आले गृहासि अतिथी अतिमानदानें ।
अत्युत्सवें करुनि पूजन अन्नदानें ।
केला असेल जरि तोष तया महंतां ।
तैं पार्थ होयिल मला अनुरूप भर्ता ।। ३६ ।।
जे भारपीडित निवारुनि भार त्यांचा ।
म्यां घेतला असल बोलुनि रम्यवाचा ।
देखोनियां क्षुधित अन्न दिल्हें तयाला ।
म्यां पाजिलें असल तोय तृषातुरांला ।। ३७ ।।
म्यां दीधला असल ठाव यथेच्छ पांथा ।
जे उष्ण-शीत-जळपीडित त्यां अनाथां ।
कष्टी विलोकुनि निवारण कष्ट केले ।
ते अंध पंगु परिपाळुनि तुष्ट केले ।। ३८ ।।
रोगी निरीक्षुनि तयां उपचार केला ।
ठेवोनियां स्वसदनांतरिं वेळवेळां ।
देवोनि रोगहर औषध दिव्यमात्रा ।
धर्मार्थ जाणुनि यथाविध आर्तमात्रा ।। ३९ ।।
केली असेल गुरुवृद्धजनांसि पूजा ।
धर्मासि साह्य करि वेचुनि देह माझा ।
तीर्थव्रतें सुनियमें उपवास योग ।
म्यां अर्जिले असति टाकुनि देहभोग ।। ४० ।

म्यां दीधलें असल दान अशक्त दीनां ।
जे कां विपन्न, गति ज्यां दुसरी असेना ।
लोकीं अनेक असती अति सूक्ष्म धर्म ।
आपूर्त इष्ट म्हणिजे परसौख्य कर्म ।। ४१ ।।
निष्काम आचरुनि तोषविला हरी तो ।
पुण्यें तया वरिन पार्थ यथार्थ मी तो ।
म्यां पूजिली असल शंभुसती भवानी ।
तैं तो वरील मज गांडिवचापपाणी ।। ४२ ।।
ब्रह्मेशमुख्य मशकांत समस्त भूतें ।
मानोनि कृष्ण अतिभाव धरोनि त्यातें ।
म्यां वंदिलें असल जन्मशतीं यती हो ।
तैं तो धनंजय गुणाढ्य मला पती हो ।। ४३ ।।

शार्दूलविक्रीडित

ऐसी केवळ एकनिष्ठ घडली माझे स्थळीं हे पिया ।
चित्तीं जाणुनि सूचवी मग कथा सांगोनि कांहीं तिया ।।
ज्यासाठीं धरितेसि हेत इतुका तो पार्थ तीर्थाटणा ।।
गेला टाकुनि आपुली निजपुरी धर्मादि बंधूजनां ।। ४४ ।।
आला द्वारवतीसमीप विपिनीं ऐसें अम्हीं ऐकिलें ।
कृष्णें भेटुनि मंत्र त्यास कथिला संन्यास घेयीं बळें ।।
नेतां तो बळिराम ये निजपुरीं अंतःपुरीं राहिजे ।
तद्वाक्यें यदुमंदिरीं वसतसे कोठें तुवां पाहिजे ।। ४५ ।।
ऐसें अर्जुनभाषणा परिसतां साशंक चित्तांतरीं ।
झाली हर्षित मुग्धभाव म्हणुनी कांहीं घडे घाबरी ।।
तेव्हां वृत्त समस्त सांग कथितां तैं ते मनीं लाजिली ।
आला प्रत्यय पूर्ण सर्व विषयीं जाणोनि विश्वासली ।। ४६ ।।
वंदी पादसरोज फार विनयें साष्टांग भावें सती ।
प्रार्थी म्यां तुज नेणतां सलगिनें सेवातरीं सन्मती ।।
केलासे जरि अंतराय, तरिही कीजे क्षमा वत्सला ।
आतां काय वदूं विशेष सगुणा, हा देह म्यां अर्पिला ।। ४७ ।।

संवोखी अति पार्थ भक्तिमति तूं मत्प्रेम तूं शुद्ध तूं ।
तूं विज्ञान विवेक शील शुचिता, येणें गुणें पूर्ण तूं ॥
तूझाही मज वेध लागुनि सये, आलों अशा संकटें ।
जेव्हांपासुनि नारदें निगदिलें मी सर्व सौख्या विटें ॥ ४८ ॥

ऐसें चित्त परस्परें मिसळलें पुष्पायुधें व्यापिलें ।
नेत्रप्रांतविलोकनें स्मितमुखें सस्नेह मोहाकुलें ॥
एका एक निरीक्षणा न करितां कल्पांत होतीं पळें ।
यांचें अंतर सर्व ह्रद्गत तया गोविंदजीला कळे ॥ ४९ ॥

कांहींसें गुज देवकीस कळलें, जाणे हरी सांवळा ।
कांहींसें वसुदेवही उमजला, नेणे हळी बावळा ॥
कांहीं यादव मंडळीस कळलें, पैं कृष्णमाया असी ।
बोलों ना सकती उगेच असती ठेवोनियां मानसीं ॥ ५० ॥

एके दिनीं एकांतीं घनसांवळा । मायाधारी अनंतकळा । हलायुधासि विनवी सद्गुणशीला । माझी हे विनती अवलीला । परिसिजे अत्यंत सोज्वळा । हा त्रिदंडधारी कोठुनि आणिला । तरुण रूपस सकळकळा । त्रिभुवनवनिता देखतां डोळां । तात्काळ होती स्मरविव्हळा । चातुर्यासिंधु परम मला । प्रौढप्रतापी दिसतसे ॥ ५१ ॥

तथापि वास अंतःपुरीं । एकांतीं वसे कन्यकागारीं । परम वैराग्यवंत तरी । विष्णुमाया देखतां नारी । संयोग सन्निकर्ष पावतां परी । कोण चित्तीं धैर्य करी । ऐसा तपस्वी तरी । विरळ जगीं मी मानीं ॥ ५२ ॥

सुभद्रा तारुण्यमदमंडिता । ते एकांतीं यतिसेवेमाजि निरता । नियत वसे अखंडिता । जैं तां आज्ञापिली भूभृता । तेव्हांच मज गमली मानसव्यथा । हे गोष्ट उचितीं न पडे पाहतां । परि न बोलूं सकवे तुज समर्था । कूळदूषण सत्कुळप्रसूतां । लोकापवाद लांछन झगटतां । मग न जाय सकळ तीर्थसलिलीं धूतां । लोकीं प्रकटली निंद्यता । जगद्वंद्यकुळीं कज्जलप्राय मलिनता । आणों सके हे तात्काळ ॥ ५३ ॥



घृतभांड अग्नीसमीप । ठेवितां काय न पावे ताप । वायुयोगें प्रदीप । तोही पावेल चळकांप । योगी ज्ञानी तपस्वी निर्विकल्प । असेही कामिनीवाग्जल्प । एकांतीं परिसतां कुसुमायुधसंताप । न सहोनि भ्रष्टले अमूप । असती ऐकिले परिसिजे ॥ ५४ ॥

योषिता म्हणिजे मदनज्वाळा । स्वरूपेंधनप्रदीप्त विशाळा । ते पुरुषचित्तचंचळपतंगकुळा । न जाळितां राहील, या बोला । केविं मानिजे सर्वज्ञशिखामणी ॥ ५५ ॥

विश्वामित्रपराशरादि मुनिजन । प्रमदासहवासें पावले चलन । दीर्घ तपासि घडलें विघ्न । अनर्थ उदेला दारुण । इतर पामर मानवां लेखी कोण । देव दैत्य परमबळसंपन्न । परि अबळाविलासें भ्रष्टले । प्राणांत पावोनि नष्टले । सर्व सुकृता वीटले । महावैभवा रुष्टले । नरकदुःखें कष्टले । लोटले अपार संसारसागरीं ॥ ५६ ॥

अहिल्याकामी पाकशासन । भगांक वाहे आझुण । कळंकी अद्यापि तारारमण । सीताभिलाषें रावण । विसर्जोनि गेला राज्य-प्राण । तिलोत्तमाव्याजें मरण । सुंदोपसुंद पावले दारुण । अन्य राजऋषी गणी कोण । सदाशिव मोहनीविलासगुणें । मोहित घडला तेधवां ॥ ५७ ॥

ब्रह्मा कन्याभिलाषी । धरूं धावें शारदेसी । विष्णु वृंदा-स्मशानवासी । आठवोनि तद्गुण मानसीं । वृंदावनासि नुपेक्षी ॥ ५८ ॥

अद्यापि महादेव धूर्जटी । गंगा वाहे जटाजूटीं । अर्द्धांगीं असतां पार्वती कंबुकंठी । पद्मनेत्रा सुवर्णगोरटी । मोहनांगी प्रियतमा ॥ ५९ ॥

ऐसे महानुभाव जगत्कारण । तेही जिंकिले मदनबाणें । पामरां मानवांची धृति वानी कोण । तात्काळ भ्रष्टती नियमापासुन । तूं सर्ववेत्ता प्रवीण । म्यां काय विनविजे अल्पज्ञें अल्पवचनें । तथापि याचा विश्वास मानणें । अयोग्य ऐसें मज वाटे ॥ ६० ॥

शील स्वभाव बहुत दिवसां व्यक्त । सहवासियां होती यथास्थित । ते आपातमात्रें न कळत । मनुष्यस्वभावगुण असती असंख्यात । अविद्या त्रिगुणजनित । यास्तव विचार करोनि बहुत । संग्रह करितां अप्रमत्त । तरीच सुखावह होयील निश्चित । ना तरि कर्म अविचारकृत । प्राणियां हृदयीं आमरणांत । शल्यतुल्य घडत सर्वज्ञा ॥ ६१ ॥

परंतु चातुर्मास-संकल्पित यतिवरां । स्थानचलन योग्य नव्हे, ऐशी श्रुतिगिरा । यास्तव परम सावधपणें अंतःपुरचर नारीनरां । शासनपूर्वक प्रतिक्षणीं निरीक्षण करिजे धुरा । आंतर विचारा न कळवितां ॥ ६२ ॥

हें रहस्य तया यतीस न कळविजे । तो क्षोभ पावतां सहजें । सकळ कुळासहित ऐश्वर्य वोजें । भस्म करील ऐसें समजें । तपोनिधि प्रतापी यतिराणा ॥ ६३ ॥

एकचि असे विश्वासासि कारण । युधिष्ठिर ज्ञानवैराग्यसंपन्न । तत्सन्निधानीं ययासि काळहरण । बहुकाळ घडलें म्हणोनि वैराग्यदीप प्रकाशमान । यया हृदयमंदिरीं प्रकाशे ॥ ६४ ॥

तयासि अनेक-विकल्प-पतंग-पतनें। अथवा प्रमदाविलास-वातस्पर्शनें । तो विझों न सके ऐसेंही मानी माझें मन । याचें पुण्याचरण अवलोकितां ॥ ६५ ॥

ऐसा श्रीकृष्ण जगन्नाटकचक्रवर्ती एकांतीं । भाषण करोनि अग्रजाप्रती । पुन्हा मायामोह विरचोनि, यती—। पूजन करोनि सादर मती । पूर्वपद्धति यथास्थिति । अमंदसा भाषणहास्यविनोद-भावसानंदप्रीती । अविकळ करवी जगत्कर्ता ॥ ६६ ॥

॥ इति श्रीसुभद्रास्वयंवरे चंपूकाव्ये अर्जुनसुभद्रासंभाषणकृष्णबलभद्र-संवादस्वाधीनकरणं नाम पंचमः सर्गः ॥

सर्ग सहावा

शार्दूलविक्रीडित

वर्षाकाळ समस्तही निरसला, आला शरत् साजिरा ।
झालें अंबर शुद्ध मंदगतिनें, वायू फिरे गोजिरा ॥
तत्काळोद्भव सत्फळें सुकुसुमें भारें तरू डोलती ।
सस्यें शोभित दीसते वसुमती, संफुल्लल्या माल्ती ॥ १॥

झालीं निर्मळ तें सरोजसहितें पद्माकरें पावनें ।
येती दिव्य मरालवृंद करिती सेवावया धावनें ॥
पर्वीं पूर्णशशी चकोरकगणा योजी सुधापारणें ।
आले पट्पद तैं परागपर ते सत्पक्षझंकारणें ॥ २ ॥

झाले स्तब्ध शिखी सुखी घडुनियां अर्थी जनांचे परी
पाहा शोभति शाड्वलें हरित ते श्रीमंत तैसे गिरी ॥
झाल्या त्या सरिता कृषा रसयुता स्वच्छांबुसंधारणें ।
लोकां लंघनशक्य त्या विलसती शैत्यादि सर्वां गुणें ॥ ३ ॥

नाना नव्य तृणें वनीं मृगगणें सेवोनियां पुष्ट ते ।
जैसे नूतनसंपदामदभरें सानंदले दुष्ट ते ॥
कामार्थीं करिताति युद्ध अपुल्या जातींत कामाथिले ।
ते दुर्वृत्त मदोद्धतांसम पहा ग्रामीणसे मातले ॥ ४ ॥

औदार्योन्नत दंभवंत करिती देतां जनां गर्जना ।
तेव्हां पावति कृप्णता अपयशें, मालिन्य ये त्या जनां ॥
तेही सज्जनसंगलाभ घडतां शुद्धाकृती पावती ॥
तैसे मेघ शरत्समागमवशें मौनें शुची राहती ॥ ५ ॥

जाती ते द्विज नीड टाकुनि, तंसे सद्विप्र तीर्थाटणा ।
राजे जैत्ररथावरोह करिती शत्रूचिया शासना ॥
वाणिज्यार्थ वणिग्जनीं वृषगणीं वाहोनि वस्तू बव्या ॥
नेती उद्यमलाभ इच्छुनि मनीं स्वच्छंद देशांतरा ॥ ६ ॥

जाती स्वस्थकुलांगना पतिकुळा सौभाग्यकामी सती ।
क्षत्री भूपतिसेवनार्थ निघती त्यागोनि गेहाप्रती ॥
व्यापारीं रत सर्व जीव घडती येतां शरत् सांवळा ।
भिक्षू निःस्पृह ते गृहस्थ वसती संत्यागिती त्या स्थळा ॥ ७ ॥

मागें अर्जुनही निरोप सहजी तोषें हळीकारणें ।
झालें रक्षण या तनूस अपुल्या सप्रेमसंरक्षणें ॥
आम्ही निःस्पृह फार दीस न वसों गेहीं गृहस्थांचियां ।
तेणें लोप अवश्यमेव घडती नेमासि संन्यासिया ॥ ८ ॥

झाले मार्ग समस्त निर्मळ, तृणें ते कोमलें वाढलीं ।
जीवांची अतिसूक्ष्म पंक्ति समुदी सल्लीनता पावली ॥
झालें अंबरही निरभ्र, सरला अंधार हा दुर्दिनी ।
भानूही स्वकळां प्रसन्न सकळा संपन्न हिंडे जनीं ॥ ९ ॥

ऐसें ऐकुनि राम त्याप्रति वदे, स्वामी कृपासागरा ।
केली मान्य गिरा म्हणोनि घडला हा लाभ गेहातुरां ॥
आहे रैवतपर्वतोत्सव उद्यां कीजे समस्तां जनीं ।
दृष्टीं या निरखोनि साच करिजे प्रस्थान आल्या मनीं ॥ १० ॥

केलें मान्य यतीश्वरें बहु बरें संतोषयुक्तांतरें ।
आज्ञापी स्वपुरींत राम सुजनां आतां चला सत्वरें ॥
श्रीकृष्णाहुक देवकोद्धव तथा अक्रूर तो सात्यकी ।
तेव्हां आनकदुंदुभीसह निघे योषिद्गणीं देवकी ॥ ११ ॥

कृष्णांतःपुर सर्व सिद्ध घडलें नारीमणी रेवती ।
साऱ्या यादवदेवराज महिषी सद्भूषणीं शोभती ॥
छत्रें चामर दासिकांसह महा आनंदल्या वैभवें ।
ज्यातें देखुनि देवलोकवनिता लाजोनि जाती जवें ॥ १२ ॥

कांहीं हेममणीविराजित रथीं आरूढल्या साजिऱ्या ।
कांहीं त्या शिबिकादि दिव्य वहनीं त्या शोभजेल्या वऱ्या ॥
भेरी-झांकृति-दुंदुभी-रवभरें संनाद कोंदाटला ।
लोकांचा बहुसाल तो गलबला दाहीं दिशां व्यापला ॥ १३ ॥

शिखरिणी

सुभद्रा भद्रांगी मणिरहिवरीं ते वळघली ।
निघाली लक्ष्मीसी जलनिधि जळापासुनि भली ॥
समस्तालंकारें खाचित दिसते हेमपुतळी ।
जशी रत्नस्तोमीं कुशलविधिनें रम्य घडिली ॥ १४ ॥

महावीरांचेंही निजगुणविलासें मन हरी ।
दिसे हे सौंदर्यांबुधिजनित लावण्यलहरी ॥
मुखांभोजीं यीच्या तरुणनयनाली झगटती ।
तदां नासा चंपाकुसुमवरदर्पें मुरडती ॥ १५ ॥

सुभद्रा दे सज्जीकृत रथ तया हंसमणिला ।
असे लक्षामध्यें अनुपम महावीर गणिलां ॥
स्त्रियांच्या संदोहीं यतिवर निघे दंडधर तो ।
रणीं वाटे वीरां प्रबळ दुसरा दंडधर तो ॥ १६ ॥

पुढें मागें सारे रणचतुर ते शूर निघती ।
पदातीही हातीं अमित परि शस्त्रें परिजिती ॥
महासेना साजे अतुळ चतुरंगें बळवती ।
बलाध्यक्षामागें तरुण रणवेत्ते मिरवती ॥ १७ ॥

पुढें श्रीकृष्णासी करि गमन तालांक गजरें ।
तदां द्वारीं द्वारावतिस तरि तो मार्ग न सरे ॥
नरांचे नारींचे गण निरखिती वैभव दिठीं ।
जयांच्या चित्ताची पडलि हरिपायीं दृढ मिठी ॥ १८ ॥

वसंततिलका

टाकोनियां नगर ते निघती जवानें ।
जे दृप्त सर्व घडले निज वैभवानें ॥
इंद्रादिकां न गणिती यदुवीर गाढे ।
ज्यांची असी हरि-परिग्रह-दीप्ति वाढे ॥ १९ ॥

जाती स्वस्थकुलांगना पतिकुळा सौभाग्यकामी सती ।
क्षत्री भूपतिसेवनार्थ निघती त्यागोनि गेहाप्रती ॥
व्यापारीं रत सर्व जीव घडती येतां शरत् सांवळा ।
भिक्षू निःस्पृह ते गृहस्थ वसती संत्यागिती त्या स्थळा ॥ ७ ॥

मागें अर्जुनही निरोप सहजी तोषें हळीकारणें ।
झालें रक्षण या तनूस अपुल्या सप्रेमसंरक्षणें ॥
आम्ही निःस्पृह फार दीस न वसों गेहीं गृहस्थांचियां ।
तेणें लोप अवश्यमेव घडती नेमासि संन्यासिया ॥ ८ ॥

झाले मार्ग समस्त निर्मळ, तृणें ते कोमलें वाढलीं ।
जीवांची अतिसूक्ष्म पंक्ति समुदी सल्लीनता पावली ॥
झालें अंबरही निरभ्र, सरला अंधार हा दुर्दिनी ।
भानूही स्वकळां प्रसन्न सकळा संपन्न हिंडे जनीं ॥ ९ ॥

ऐसें ऐकुनि राम त्याप्रति वदे, स्वामी कृपासागरा ।
केली मान्य गिरा म्हणोनि घडला हा लाभ गेहातुरां ॥
आहे रैवतपर्वतोत्सव उद्यां कीजे समस्तां जनीं ।
दृष्टीं या निरखोनि साच करिजे प्रस्थान आल्या मनीं ॥ १० ॥

केलें मान्य यतीश्वरें बहु बरें संतोषयुक्तांतरें ।
आज्ञापी स्वपुरींत राम सुजनां आतां चला सत्वरें ॥
श्रीकृष्णाहुक देवकोद्धव तथा अक्रूर तो सात्यकी ।
तेव्हां आनकदुंदुभीसह निघे योषिद्गणीं देवकी ॥ ११ ॥

कृष्णांतःपुर सर्व सिद्ध घडलें नारीमणी रेवती ।
साऱ्या यादवदेवराज महिषी सद्भूषणीं शोभती ॥
छत्रें चामर दासिकांसह महा आनंदल्या वैभवें ।
ज्यातें देखुनि देवलोकवनिता लाजोनि जाती जवें ॥ १२ ॥

कांहीं हेममणीविराजित रथीं आरूढल्या साजिऱ्या ।
कांहीं त्या शिबिकादि दिव्य वहनीं त्या शोभजेल्या बऱ्या ॥
भेरी-झांकृति-दुंदुभी-रवभरें संनाद कोंदाटला ।
लोकांचा बहुसाल तो गलबला दाहीं दिशां व्यापला ॥ १३ ॥

शिखरिणी

सुभद्रा भद्रांगी मणिरहिवरीं ते वळघली ।
निघाली लक्ष्मीसी जलनिधि जळापासुनि भली ॥
समस्तालंकारें खाचित दिसते हेमपुतळी ।
जशी रत्नस्तोमीं कुशलविधिनें रम्य घडिली ॥ १४ ॥

महावीरांचेंही निजगुणविलासें मन हरी ।
दिसे हे सौंदर्याब्धिजनित लावण्यलहरी ॥
मुखांभोजीं यीच्या तरुणनयनाली झगटती ।
तदां नासा चंपाकुसुमवरदर्पें मुरडती ॥ १५ ॥

सुभद्रा दे सज्जीकृत रथ तया हंसमणिला ।
असे लक्षामध्यें अनुपम महावीर गणिलां ॥
स्त्रियांच्या संदोहीं यतिवर निघे दंडधर तो ।
रणीं वाटे वीरां प्रबळ दुसरा दंडधर तो ॥ १६ ॥

पुढें मागें सारे रणचतुर ते शूर निघती ।
पदातीही हातीं अमित परि शस्त्रें परिजिती ॥
महासेना साजे अतुळ चतुरंगें बळवती ।
बलाध्यक्षामागें तरुण रणवेत्ते मिरवती ॥ १७ ॥

पुढें श्रीकृष्णासी करि गमन तालांक गजरें ।
तदां द्वारीं द्वारावतिस तरि तो मार्ग न सरे ॥
नरांचे नारींचे गण निरखिती वैभव दिठीं ।
जयांच्या चित्ताची पडलि हरिपायीं दृढ मिठी ॥ १८ ॥

वसंततिलका

टाकोनियां नगर ते निघती जवानें ।
जे दृप्त सर्व घडले निज वैभवानें ॥
इंद्रादिकां न गणिती यदुवीर गाढे ।
ज्यांची असी हरि-परिग्रह-दीप्ति वाढे ॥ १९ ॥

शार्दूलविक्रीडित

कांहीं दूर पुरी त्यजोनि निघतां पाहोनि मागें पुढें ।
वीरांतें निरखोनिही विरळसे तैं सज्ज हाही घडे ॥
आणी स्यंदन तो समीप मिरवे जेथें सुभद्रा सती ।
देतां हस्त ततक्षणीं वळवली या अर्जुनाच्या रथीं ॥ २० ॥
दिल्हा तो ढकलोनि सारथि घडे हे वासुदेवी स्वयें ।
अश्वाचे वरदोर धारण करी जे चालवी निर्भयें ॥
तेव्हां तो रथ काढिला द्रुतगती टाकोनि सर्वां जनां ।
झाला अर्जुन चाप-बाण धरुनी सन्नद्ध युद्धांगणा ॥ २१ ॥
जैसा तो मृगराज भाग अपुला स्वात्मप्रतापें हरी ।
तैसा तो कुरुवीर अर्जुन बळे नेतो रथीं नोवरी ॥
तेव्हां एकसरेंचि तो गलबला अंतःपुरीं माजला ।
संन्यासी असतां हरोनि पळतो देवी सुभद्रा तिला ॥ २२ ॥
आक्रोशें अति अट्टहास करिती नारी पथीं विव्हळा ।
तो कोलाहल भूमि-अंबर-दिशा-गर्भांत कोंदाटला ॥
नेली त्या यतिने पहा गुणवती कैसी सुभद्रा सती ।
नारी पीटिति भाळ-वक्ष म्हणती कैं राम कैं श्रीपती ॥ २३ ॥
तेही काय म्हणोनि भिक्षुकरथीं आरूढली सांप्रती ।
जे कां शीलवती महाशुभमती मानीत होतों किती ॥
आहा स्त्रीचरितीं नव्हे परगती देवादिकांही अती ।
एकांतीं मतली तयास सुदती गेली तया संगतीं ॥ २४ ॥
ऐसें ऐकुनि वीर रक्षक मनीं होवोनियां घाबिरे ।
तेव्हां पाहति भोंवते तंव यती नेतो सुभद्रा त्वरें ॥
पाठीं धांवति ' फीर फीर ' म्हणती शस्त्रास्त्रवेत्ते बरे ।
जैसा सागरपाट एकसर तो लोटे मही ना धरे ॥ २५ ॥
आक्रोशें म्हणती यती, कुळवधू तूं कोण नेसी असा ।
हे तूला न कळे, कसी हरिसि तूं श्रीकृष्णजीची स्वसा ॥
कैसा राम तुला उपेक्षिल खळा, आम्हांपुढें तूं तरी ।
कैं जाऊं सकसील वांचुनि तरी घेवोनि हे नोवरी ॥ २६ ॥

आतां तों तव मानभंग करणें आला अम्हां रोकडा ।
संन्यासी म्हणवोनि वंदन करूं, बांधोनि नेऊं मुद्दा ॥
हे आहे बळिराम-कृष्ण-भगिनी, भिक्षू तुला हे कसी ।
कन्या प्राप्त घडेल ? नेणासि कसा तूं आपुल्या मानसीं ॥ २७ ॥
हे नोहे वनिता, असे वठिश रे मच्छापरी भिक्षुका ।
तूझे प्राण हरील, मायिक तुला कैशी जिरे क्षुल्लका ॥
आतां तूं न करी विलंब, सुदती टाकोनि दे तूं पळे ।
नाहीं तैं तुज राम दंडिल बरा, दंडी म्हणे ना बळें ॥ २८ ।

सांगे तूं तरि नांव काय अपुलें, नेसी वधू कासया ।
संन्यासी म्हणवोनि वेषधर तूं आलासि गांवास या ॥
जासी घेउनि काय ईस हरिच्या लंघोनिया शासना ।
पृथ्वी ते तुज ठाव देइल कशी, आणी विचारें मना ॥ २९ ॥

या भूमीवरि वाव तो तुज नसे, जाशील स्वर्गाप्रती ।
तेथें इंद्र करील रक्षण तुझें, हें ना घडे दुर्मती ॥
तेव्हां दिक्पति काय तूज करिती, ते निर्बळी रक्षणा ।
आतां प्राणचि मात्र घेउनि पळें स्त्री-चोरट्या दुर्गुणा ॥ ३० ॥

रामानें तुज पूजिलें प्रणमिले प्रेमें घरीं ठेविलें ।
चातुर्मास्यिजळागमीं तुज कसें सानंद संरक्षिलें ॥
त्यांचा तो उपकार शीघ्रचि तुवां निस्तारिला दीसतो ।
ऐसा दुर्मति तूं कृतघ्न तुजला जावा कसा दीसतो ॥ ३१ ॥

तेव्हां तो रणधीर अर्जुन म्हणे नोहे यती मी, सती— ।
माझी म्यां हरिली, वदा त्वरित जा त्या रामकृष्णांप्रती ॥
आहे पांडव धर्मबंधु वरितों मन्मातुळाची सुता ।
माझा भाग यथार्थ हो परिसिजे, आहे विधी नेमिता ॥ ३२ ॥

आहे मी समरीं उभा, जरि तुम्हां युद्धीं असे वासना ।
या सज्जोनि पहा पराक्रम तरी लावीन मी शिक्षणा ॥
आहे गौतमशिष्य मी परिसिजे शस्त्रास्त्रवेत्ता जगीं ।
आहे फाल्गुन मी बुझा निजमनीं, शंका त्यजा वाउगी ॥ ३३ ॥

ऐशी अर्जुनभाषिता शुभ गिरा ऐकोनियां वीर ते ।
झाले कीं पुरुषार्थहीन समरीं घेतीच ना धीर ते ।।
जैसा तो मृगराज नाद करितां क्षुद्रां मृगांच्या गणा ।
प्राणा अंत घडे, तसा मदगिरी यांचा घडे ठेंगणा ।। ३४ ।।

झाले अर्जुन नांव ऐकुनि तदा साशंक चित्तांतरीं ।
याचा मित्र असे यथार्थ परिसा श्रीकृष्ण याचे शिरीं ।।
त्याच्या तों विवराविना हरिल हा हे नोवरी ना घडे ।
यासी युद्ध करूं तरी न करितां संकष्ट दोहींकडे ।। ३५ ।।

आतां जाणविजे त्वरेंकरुनियां त्या रामकृष्णांप्रती ।
नेताहे यति दंडधार तुमची जे कां स्वसा जन्मती ।।
आहे अर्जुन नाम हेंचि कथितो सांगे पृथानंदन ।
मी नेतों मम भाग मातुळसुता साध्वीसमाना गुणें ।। ३६ ।।

आहे तो स्थिर वीर सज्जुनि उभा अंकीं असे नोवरी ।
त्याच्या प्रेमपुरःसरें धृतिमती सारथ्यकर्मा करी ।।
आतां काय तयासि जिंतुनि रणीं बांधोनियां आणिजे ।
कीजे काय उपाय यावरि तयां आज्ञा कसी पूसिजे ।। ३७ ।।

ऐसा दीर्घ विचार वीर करुनी सांगावया पातले ।
जेथें श्रीपति-राम-मुख्य असती लज्जाभरें आतले ।।
तैं हे रैवत पावले तंव घडे आकांत मार्गीं असा ।
सांगायाप्रति धींवसा न पुरवे शूरांचिया मानसा ।। ३८ ।।

इति श्रीसुभद्रास्वयंवरे चंपूकाव्ये शरत्कालवर्णनं सुभद्राहरणं नाम षष्ठोऽध्याय ॥

सर्ग सातवा

शार्दूलविक्रीडित

मार्गीं ते हरिली वहीण तुमची देवी सुभद्रा सती ।
हेही आरुढली उगी रहिंवरीं, घेवोनि जातो यती ॥
आहे वीर नव्हेचि भिक्षु समजा मोठा प्रतापी दिसे ।
गेले वीर समस्तही हटविले, हें वीर्य कोणा असे ॥ १ ॥

रामा ! अर्जुन आपणां म्हणवितो, माता पृथा सांगतो ।
माझी मातुळकन्यका मम असे हा भाग, हें बोलतो ॥
जा सांगा म्हणतो तुम्हांसि दिसतो युद्धीं नव्हे घाबिरा ।
द्रोणाचा तरि शिष्य मुख्य म्हणवी शस्त्रास्त्रवेत्ता पुरा ॥ २ ॥

आम्ही युद्ध करावयासी अडवे झालों तया रोधुनी ।
केलीं चूर्ण समस्त खड्गधनुषें गांधर्व तें सोडुनी ॥
नोहे धीर अम्हांसि यादव महा संभिन्न केले रथी ।
कैसे ते असिवार पावति तया कैं पायिच्यांच्या गती ॥ ३ ॥

शस्त्रास्त्रें अमुचीं गळोनि पडलीं, केली महा दुर्दशा ।
हें ऐकोनि महांत रोष चढला रामाचिया मानसा ॥
क्रोधावेशावशें त्वरेंचि वळघों पाहे रथीं तो हळी ।
कृष्णाचें मुख तेधवां अतिभरें शोणाक्ष तो न्याहळी ॥ ४ ॥

बोले मी अति दुष्ट भूप दमितों निर्दाळिता वर्ततां ।
माझी नेयिल ते स्वसा कवण रे वंचोनि मी देखतां ॥
झालाही जरि वीर अर्जुन तरी मारीन मी आहवीं ।
पाहा मत्पुरुषार्थ रक्तसरिता मी पांडवी वाहवीं ॥ ५ ॥

माझी हे यतिवेषधारक कसा वंचोनि नेतो स्वसा ।
मृत्यूपासुनि केंवि त्यास घडला नेणों सके भर्वसा ॥
हेही यादवसत्कुलोद्भव वधू त्या वश्य झाली कसी ।
म्यां सेवेस्तव लाविली तपनिधी जाणोनियां मानसीं ॥ ६ ॥

ऐशी अर्जुनभाषिता शुभ गिरा ऐकोनियां वीर ते ।
झाले कीं पुरुषार्थहीन समरीं घेतीच ना धीर ते ।।
जैसा तो मृगराज नाद करितां क्षुद्रां मृगांच्या गणा ।
प्राणा अंत घडे, तसा मदगिरी यांचा घडे ठेंगणा ।। ३४ ।।

झाले अर्जुन नांव ऐकुनि तदा साशंक चित्तांतरीं ।
याचा मित्र असे यथार्थ परिसा श्रीकृष्ण याचे शिरीं ।।
त्याच्या तों विवराविना हरिल हा हे नोवरी ना घडे ।
यासी युद्ध करूं तरी न करितां संकष्ट दोहींकडे ।। ३५ ।।

आतां जाणविजे त्वरेंकरुनियां त्या रामकृष्णांप्रती ।
नेताहे यति दंडधार तुमची जे कां स्वसा जन्मती ।।
आहे अर्जुन नाम हेंचि कथितो सांगे पृथानंदन ।
मी नेतों मम भाग मातुळसुता साध्वीसमाना गुणें ।। ३६ ।।

आहे तो स्थिर वीर सज्जुनि उभा अंकीं असे नोवरी ।
त्याच्या प्रेमपुरःसरें धृतिमती सारथ्यकर्मा करी ।।
आतां काय तयासि जिंतुनि रणीं बांधोनियां आणिजे ।
कीजे काय उपाय यावरि तयां आज्ञा कसी पूसिजे ।। ३७ ।।

ऐसा दीर्घ विचार वीर करुनी सांगावया पातले ।
जेथें श्रीपति-राम-मुख्य असती लज्जाभरें आतले ।।
तैं हे रैवत पावले तंव घडे आकांत मार्गीं असा ।
सांगायाप्रति धींवसा न पुरवे शूरांचिया मानसा ।। ३८ ।।

इति श्रीसुभद्रास्वयंवरे चंपूकाव्ये शरत्कालवर्णनं सुभद्राहरणं नाम षष्ठोऽध्यायः ।।

♣ ♣ ♣

सर्ग सातवा

शार्दूलविक्रीडित

मार्गीं ते हरिली बहीण तुमची देवी सुभद्रा सती ।
हेही आरुढली उगी रहिंवरीं, घेवोनि जातो यती ॥
आहे वीर नव्हेचि भिक्षु समजा मोठा प्रतापी दिसे ।
गेले वीर समस्तही हटविले, हें वीर्य कोणा असे ॥ १ ॥

रामा ! अर्जुन आपणां म्हणवितो, माता पृथा सांगतो ।
माझी मातुळकन्यका मम असे हा भाग, हें बोलतो ॥
जा सांगा म्हणतो तुम्हांसि दिसतो युद्धीं नव्हे घाबिरा ।
द्रोणाचा तरि शिष्य मुख्य म्हणवी शस्त्रास्त्रवेत्ता पुरा ॥ २ ॥

आम्ही युद्ध करावयासी अडवे झालों तया रोधुनी ।
केलीं चूर्ण समस्त खड्गधनुपें गांधर्व तें सोडुनी ॥
नोहे धीर अम्हांसि यादव महा संभिन्न केले रथीं ।
कैसे ते असिवार पावति तया कैं पायिच्यांच्या गती ॥ ३ ।

शस्त्रास्त्रें अमुचीं गळोनि पडलीं, केली महा दुर्दशा ।
हें ऐकोनि महांत रोष चढला रामाचिया मानसा ॥
क्रोधावेशावशें त्वरेंचि वळघों पाहे रथीं तो हळी ।
कृष्णाचें मुख तेधवां अतिभरें शोणाक्ष तो न्याहळी ॥ ४ ॥

बोले मी अति दुष्ट भूप दमितों निर्दाळिता वर्ततां ।
माझी नेयिल ते स्वसा कवण रे वंचोनि मी देखतां ॥
झालाही जरि वीर अर्जुन तरी मारीन मी आहवीं ।
पाहा मत्पुरुषार्थ रक्तसरिता मी पांडवी वाहवीं ॥ ५ ॥

माझी हे यतिवेषधारक कसा वंचोनि नेतो स्वसा ।
मृत्यूपासुनि केंवि त्यास घडला नेणों सके भर्वसा ॥
हेही यादवसत्कुलोद्भव वधू त्या वश्य झाली कसी ।
म्यां सेवेस्तव लाविली तपनिधी जाणोनियां मानसीं ॥ ६ ॥

इंद्रमाला (उपजाति)

मैंदापरी घेउनि वेष ऐसा ।
विरक्तिविज्ञान वदोनि कैसा ॥
माझ्या मना मोहुनि धीट मोठा ।
प्रवेशला मत्सदनांत खोटा ॥ ७ ॥

इंद्रवज्रा

लोकीं असे ते असती असंत ।
बाह्य क्रिया दाउनियां जगातें ॥
ते नाडिती मांडिति दंभ नाना ।
तैसाचि हा दुर्जन साच माना ॥ ८ ॥

मी भाळलों बाह्य गुणासि याच्या ।
अध्यात्मबोला रिझलों खळाच्या ॥
गानस्वरें तो मृगयू मृगाला ।
मोही, करी घात, तसाचि केला ॥ ९ ॥

इंद्रमाला (उपजाति)

मारीन ऐसा कपटी कुबुद्धी ।
टिकेल मत्सन्मुख काय युद्धीं ॥
गदाप्रहारें शतचूर्ण त्याचें ।
करीन मी दुर्जनमस्तकाचें ॥ १० ॥

अपांडवी आजि करीन धात्रा ।
नेतो स्वसा चोरुनि हेमगात्री ॥
यती असें मानुनि म्यां तयाला ।
आणोनि गेहीं बहुमान केला ॥ ११ ॥

इंद्रवज्रा

तो व्यर्थ माझा उपकार झाला ।
विद्या गुरू नेणुनि हे खळाला ॥
झाला कसा मायिक हा त्रिदंडी ।
मोठा कसा दंभ जनांत मांडी ॥ १२ ॥

इंद्रमाला (उपजाति)

दंडीन मी त्याप्रति दंडधारी ।
यमाप्रमाणें हल्लदंडधारी ।।
येतील बंधू जरि पक्षपाती ।
मारीन मी जों न लगेति पातीं ।। १३ ।।

इंद्रवज्रा

युद्धासि येतांचि वृकोदरातें ।
फोडीन त्याच्या पृथुकोदरातें ।।
मी तों कदां त्या नकुळा गणीना ।
सद्विप्र त्या हीनकुळा गणीना ।। १४ ।।

इंद्रमाला (उपजाती)

आला तरी तो सहदेव कांहीं ।
समर्थ माझ्या समतोसि नाहीं ।।
युद्धांगणीं दक्ष नव्हेचि धर्म ।
आधीं नये मानुनि तो अधर्म ।। १५ ।।
ज्याच्या घरीं हे तनु पुष्ट केली ।
त्याचीच ने काय हरोनि वाळी ।।
अधर्म हा मानल काय त्याला ।
सत्यात्मका भूप युधिष्ठिराला ।। १६ ।।

इंद्रवज्रा

सेना त्वरें सर्वहि सिद्ध कीजे ।
जावोनि पार्थासह युद्ध कीजे
मारा धरा बांधुनि त्यासि आणा
तो शत्रु माझा अनुपम्य जाणा ।। १७ ।।
झाला जरी पितृस्वसाकुमार ।
देईन त्याला दृढ एक मार ।।
नाटोपतां जायिल वीर जेव्हां ।
एका रथें मीच धरीन तेव्हां ।। १८ ।।

इंद्रमाला (उपजाति)

वंचोनि नेतो अमुची कुमारी ।
तो शूर मानी समरांत मारी ॥
केली असे ख्याति जगांत येणें ।
धनुर्धरीं वीर म्हणोनिशानें ॥ १९ ॥

पाहेन त्याचा पुरुषार्थ आतां ।
माझ्या कसा तों भिडवील हाता ॥
हळें विदारीन तया उरातें ।
या मूसळें फोडिन मी शिरातें ॥ २० ॥

दिशां बळी टाकिन अंग त्याचें ।
करीन खाजें वृकजंबुकांचें ॥
भूतावळी पीतिल शोणितातें ।
मारीन जेव्हां अरि दुष्ट हातें ॥ २१ ॥

या योग्य नोहे ललिता कृशांगी ।
सरोजनेत्रा अति मोहनांगी ॥
त्या वेदवाणीप्रति शूद्र जैसा ।
स्पर्शावया योग्य नव्होचि तैसा ॥ २२ ॥

इंद्रवज्रा

संकल्पिली म्यां कुरुनायकातें ।
दुर्योधनातें सुखदायकातें ॥
हे पांचही पांडव ते भिकारी ।
देऊं नये सुंदर या सिकारी ॥ २३ ॥

ऐसें करी वल्गन फार रागें ।
श्रीकृष्ण त्याच्या चरणांसि लागे ॥
सायास हा व्यर्थ किमर्थ कीजे ।
होयील जैं पार्थ न युद्ध कीजे ॥ २४ ॥

इंद्रमाला (उपजाति)

पूर्वीच म्यां जाणविलें विभूला ।
अंतःपुरीं योग्य नव्हे स्थितीला ॥
तथापि कन्या तरुणी सुभद्रा ।
सेवा करी कारण हे अभद्रा ॥ २५ ॥

इंद्रवज्रा

झालें असो जें घडणार आतां ।
तो जिंतिजे योग्य नव्हे समर्था ॥
तूंवेगळे जातिल सर्व कांहीं ।
ते शूर त्यांचें तरि काम नाहीं ॥ २६ ॥

इंद्रमाला (उपजाति)

अग्नीपुढें काय तृणें करावें ।
वीरीं वृथा जाउनि कां मरावें ॥
समर्थ तूं एक तया जिणाया ।
या यादवांमाजि तरी म्हणाया ॥ २७ ॥
तथापि त्या जिंतुनि पांडवातें ।
महोद्भटातें हुतखांडवातें ॥
दीजे पुन्हां नेउनि कौरवातें ।
त्या धिक्करावें रणभैरवातें ॥ २८ ॥

इंद्रवज्रा

ना ठेविजे ते सदनांत कांहीं ।
न्यावीच कीं ते वधु आणिकांहीं ॥
जे स्पर्शिली त्या नरनायकानें ।
मी नायकें अन्य वरील कानें ॥ २९ ॥
जे कां सुभद्रा वश त्यासि झाली ।
ते काय अन्याप्रति माळ घाली ॥
ठेवील ते जीव कसी क्षणार्ध ।
टाकील ते देह जसा तृणार्ध ॥ ३० ॥

तो कोण आहे परकीय रामा ।
पितृस्वसापुत्र गुणाभिरामा ॥
जिंतोनि त्याला अणिकासि द्यावी ।
हे मात चित्तांत वसों न द्यावी ॥ ३१ ॥

इंद्रमाला (उपजाति)

करी विधी हे वधु त्याजसाठीं ।
घडोनि आल्या म्हणवोनि गोष्टी ॥
टाकीं वृथा आग्रह तूं सुदक्षा ।
बलीयसी केवळ ईश्वरेच्छा ॥ ३२ ॥
माया जयाची अघटें घडीतें ।
घडील ऐशाप्रति वीघडीतें ॥
हा खेळ तीचा नकळेचि तुच्छा ।
बलीयसी केवळ ईश्वरेच्छा ॥ ३३ ॥
हे सृष्टि जीणें रचिली विचित्रा ।
भिंतीवरी लेखन जेंवि चित्रा ॥
तेथें नसे कीं अणुही परेच्छा ।
बलीयसी केवळ ईश्वरेच्छा ॥ ३४ ॥
सर्वज्ञ सर्वेश्वर सर्ववेत्ता ।
तूं सर्वलोकीं अससी अनंता ॥
आतां करावी सहसा उपेक्षा ।
बलीयसी केवळ ईश्वरेच्छा ॥ ३५ ॥

इंद्रवज्रा

ऐसा हरी प्रार्थित त्याचि काळीं ।
तैं यादवी सर्व सभा मिळाली ॥
ते देखती आग्रह या हळीचा ।
तैं स्तब्धल्या यादववीरवाचा ॥ ३६ ॥
आला तदां आनकदुंदुभी तो ।
देखोनि रोषाकुळ राम भीतो ॥

हें मानलें भाषण उग्रसेना ।
कांहीं पुढें यत्न तया दिसेना ॥ ३७ ॥

इंद्रमाला (उपजाति)

तैं बोलिला उद्धव रम्यवाणी ।
वीरार्जुना योग्यचि कीरवाणी ॥
माने अम्हां सत्य वदे हरी हा ।
तुलाचि कां आग्रह अंतरीं हा ॥ ३८ ॥
हे पांचही पांडव जीव याचे ।
सांगीतलें कर्म करावयाचें ॥
श्रीकृष्णपार्यीं दृढ ज्यांसि निष्ठा ।
म्हणोनि त्यांची मिरवी प्रतिष्ठा ॥ ३९ ॥
हा प्राण कीं केवळ पार्थ याचा ।
या भूमिभारासि हरावयाचा ।
तूं नेणसी काय महानुभावा ।
धनुर्धरा लोकनुतप्रभावा ॥ ४० ॥
हे क्षत्रियाचें तरि कर्म रामा ।
वधू हरावी स्वमनोभिरामा ॥
तें आचरें अर्जुन वीर्यशाली ।
चित्तांत तां हे धरिजे खुशाली ॥ ४१ ॥

इंद्रवज्रा

द्यावी तया चंद्रमुखी विधीनें ।
हे निर्मिली यास्तव त्या विधीनें ॥
हे सुंदरी त्या अनुरूप रामा ।
हे अर्पिजे त्याच गुणाभिरामा ॥ ४२ ॥
तो काय दुर्योधन यीस जोडा ।
कस्तूरिके योग्य नव्हेचि रेडा ॥
कां चंदनी ऊटि खरासि द्यावी ।
कोण्या गुणें मात मला वदावी ॥ ४३ ॥

इंद्रमाला (उपजाति)

वधूवरां आणाविजे प्रयत्नें ।
नसे महाकाज विशेषयत्नें ॥
सभासदां सर्व महाजनांतें ।
हे मानली मात बरी मनातें ॥ ३४ ॥

उपजाति (इंद्रवंशा–इंद्रमाला)

ऐसेंचि बोले वसुदेव आहुक ।
मातामहा देवक वृद्ध बाहुक ॥
सर्वांमतें हें करणेंचि आलें ।
हळायुधाचें मग काय चाले ? ४५ ॥

इंद्रवज्रा

प्रवृद्ध कोपानळ शांत झाला ।
मेघें जसा दावशिखी विझाला
ऊर्मी जिराली समुदी मनाची
येतां शरत्काळ तरी धनाची ॥ ४६ ॥

इंद्रमाला (उपजाति)

विचार रामें तरि आयकीला ।
तो पाठवी उद्धव-सात्यकीला ।
जावोनि ते भेटति अर्जुनातें ।
तो आदरी पाहुनि पूर्वनातें ॥ ४७ ॥

ते पाहती हांसति या यतीतें ।
अंकासनीं लक्षुनि त्या सतीतें ॥
तूं धन्य होसी विजया प्रतापी ।
यथार्थ तूं शोभसि शत्रुतापी ॥ ४८ ॥

इंद्रवज्रा

तां जिंतिली आजि वधू सुभद्रा ।
कैं ठाव आतां उरला अभद्रा ॥

तूझा हरी केवळ पक्षपाती ।
रक्षी तसा नेत्रयुगासि पातीं ॥ ४९ ॥

इंद्रमाला (उपजाति)

तालांक चक्रांक सआहुकाशीं ।
करोनि आलोचन सावकाशीं ॥
आलों तुम्हांतें फिरवावयातें ।
मनोरथाब्धी पुरवावयातें ॥ ५० ॥
ते पाठवीती म्हणवोनि आलों ।
पार्था तुला देखुनि धन्य झालों ॥
फिरा पुरातें अति उत्सवासीं ।
भेटा सुतोषें बळकेशवासी ॥ ५१ ॥
महोत्सवें हे: परिणोनि भद्रा ।
नारीमणी कामलता सुभद्रा ॥
जावें स्वगेहा अतितोषचित्तें ।
समर्पिली घेउनि रत्नवित्तें ॥ ५२ ॥
तूं साच होसी पुरुषार्थसिंधू ।
तूं शोभसी केवळ धर्मबंधू ॥
पृथा जनित्री अति धन्य झाली ।
तापोर्मि तीच्या मनिची विझाली ॥ ५३ ॥

इंद्रवज्रा

ऐशा प्रकारें मधुभाषणानें ।
स्नेहार्द्र आलोकनिमेषणानें ॥
सन्मान-सौहार्द-सुतोषणानें ।
त्या भूषविलें मणिभूषणानें ॥ ५४ ॥
आप्तोक्ति ते मानुनि सर्व साची ।
संतोष मानी मग सव्यसाची ॥
ऐकोनियां उद्धवभाषणानें ।
स्वीकारिलें वासवि भूषणातें ॥ ५५ ॥

टाकोनिया दंडकमंडलातें ।
काषाय-कौपीन-मृगाजिनातें ॥
रुद्राक्षधात्री-स्फटिकादि माळा ।
त्यागोनि मुक्तामणि-हार ल्याला ॥ ५६ ॥

इंद्रमाला (उपजाति)

उष्णीष सत्कंचुक राजवस्त्रें ।
धरोनि बांधी अनुपम्य शस्त्रें ।
नीहार-निर्मुक्त दिनेश जैसा ।
विराजला अर्जुनवीर तैसा ॥ ५७ ॥
होता यती भूपति त्याच वेळे ।
दिसे जनांचे भरि सर्व डोळे ॥
वधूवरां मंडित दिव्ययानीं ।
तैं आणिलें मान करोनि यांनीं ॥ ५८ ॥
गेला पुढें केशव शार्ङ्गधारी ।
तालांक बंधूसह तोपकारी ॥
करावया लग्नमहोत्सवातें ।
उत्साह वाटे अति केशवातें ॥ ५९ ॥

इंद्रवज्रा

शृंगारिली द्वारवती विराजे ।
देखोनियां विस्मित देवराजे ॥
नानापरी तोरण रंगमाळा ।
दीपावळी नाशिति त्या तमाळा ॥ ६० ॥
ते पूग-रंभादिक वृक्षपंक्ती ।
द्वारीं उभ्या शोभति गेहपंक्ती ॥
नाना पताका अतिचित्रवर्णीं ।
तैं स्तंभ सारे मढिले सुवर्णीं ॥ ६१ ॥
नारीनरांचे गण निर्जराळी ।
तैसेचि ते शोभत सर्व काळीं ॥

तै नृत्यगीतें सदसीं युवातें ।
वारांगना तोषविती मनातें ॥ ६२ ॥

लक्ष्मीनिवासी सुखसर्वभोक्ता ।
नांदे महा-योग-विलास-धर्ता ॥
तेथें उणें काय असेल बोला ।
कैं वर्णवें या कवि-अल्पबोला ॥ ६३ ॥

वसंततिलका

सोळा सहस्र तरुणींसह चक्रपाणी ।
ज्या उत्सवीं मिरवितो अखिलांडखाणी ॥
ज्यातें साविस्मित विलोकिति देवराणी ।
ज्याचें चरित्र वदती निगमीं पुराणीं ॥ ६४ ॥

त्या काय वर्णन करूं सकवेल वाणी ।
हे मानवी लघुतरा अति दीनवाणी ॥
वेडावती फणिविधी शिवमुख्य सारे ।
ते काय येतिल कवीवचना पसारे ॥ ६५ ॥

तैं आणवी नृप युधिष्ठिर याज्ञसेनी ।
आला वृकोदर सहानुज दिव्ययानीं ॥
माता पृथा विदुर धौम्य ऋषी अनेक ।
द्वैपायनादि मुनिनायक आप्त लोक ॥ ६६ ॥

उपजाति (वंशस्थ-इंद्रवंशा-इंद्रमाला)

मुहूर्तकाळीं विजयासि मंटपीं ।
आणोनि अत्युत्सवयुक्त साक्षपीं ॥
कन्या दिली आनकदुंदुभीनें ।
भरी त्रिलोकी यशदुंदुभीनें ॥ ६७ ॥

संतोषले तैं वसुदेवदेवकी ।
फुलें शिरीं वर्षति सिद्धदेव कीं ॥
भेरी तुरें वाजविती अनेक ।
त्या अप्सरा नाचति निर्विशंक ॥ ६८ ॥

इंद्रमाला (उपजाति)

धरामरांचा गण अक्षतेशीं ।
आशीर्गिरा वोपिति वोहरासी ॥
शोभे सुभद्रा गुणरत्नखाणी ।
लक्ष्मी तशी पावुनि चक्रपाणी ॥ ६९ ॥
किंवा शशी अर्जुन रोहिणी हे ।
सूर्यप्रभासाम्य ययासी लाहे ॥
शची सुरेंद्रासह संपदेशीं ।
विराजणें त्या धनदें सुखेंशीं ॥ ७० ॥
प्रतापकीर्तीसह वर्तताहे ॥
धर्म क्रियेशीं अति शोभताहे ॥
साजे जसा तो क्रतु दक्षिणेशीं ।
तैसा विराजे जय यादवीसीं ॥ ७१ ॥

इंद्रमाला (उपजाति)

संतोष वाटे सकळां जनांला ।
पाहोनि कांतेसह अर्जुनाला ॥
रूपें गुणें शीलवयें समान ।
म्हणोनि ते डोलविताति मान ॥ ७२ ॥

शार्दूलविक्रीडित

वेष्टी अर्जुनपादपासि ललिता प्रेमें सुभद्रालता ।
सद्वक्षोजफलान्विता सुकुसुमें नेत्रांबुजालंकृता ॥
संशोणाधरपल्लवा सुकलिका दंतावळीमंडिता ।
भृंगालीसम केशपाशरचिता सानंद संफुल्लिता ॥ ७३ ॥

इंद्रमाला (उपजाति)

देखोनिया वोहर या प्रकारीं ।
त्या नागरीचे गण दाट भारी ॥
ओवाळिती त्यांप्रति अक्षवाणी ।
पृथा तथा देवकि लिंबलोणी ॥ ७४ ॥

ऐसें करी कौतुक शेषशायी ।
जो भक्तदीनोद्धर मुक्तिदायी ।।
सारोनिया लग्नमहोत्सवातें ।
यथाविधी पूजुनि पांडवातें ।। ७५ ।।

उपेंद्रवज्रा

समर्पिले आंदणभार हातें ।
सुवर्णरत्नें वसनें अनंतें ।।
गजाश्वपत्ती रथ कांचनाचे ।
समर्पिले भार महा धनाचे ।। ७६ ।।

इंद्रमाला (उपजाति)

किरीट माळा पदकें विचित्रें ।
केयूरमुद्रामणि हेमसूत्रें ।।
झषाकृती कुंडल हस्तमात्रा ।
त्या लेववी कामसमानगात्रा ।। ७७ ।।

तसेंचि कन्याधन दे अपार ।
देवी सुभद्रेसि बहु प्रकार ।।
दे दास-दासी-गण सर्वदानी ।
उदार लक्ष्मीपति चक्रपाणी ।। ७८ ।।

इंद्रवज्रा

माता पृथा धर्म-वृकोदरातें ।
माद्रीसुतातें मग द्रौपदीतें ।।
तैं व्यासधौम्यादि मुनीश्वरांतें ।
सन्मानिलें प्रेमभरें महंतें ।। ७९ ।।

उपजाति (वंशस्थ-इंद्रवंशा-इंद्रमाला)

तो पाठवी फाल्गुन आलयाला ।
अशक्य हें काय गुणालयाला ।।
मनोरथाब्धी तरला धनंजय ।
श्रीकृष्ण दे त्यासि यशोधनंजय ।। ८० ।।

भक्तिप्रभावें भुवनत्रयांतरीं ।
सत्कीर्तिभेरीजयघोष जो भरी ।।
गाती सुराधीश्वरही जयाला ।
श्रीकृष्ण तो साह्य धनंजयाला ।। ८१ ।।

भुजंगप्रयात

सुभद्रा नवोढा रथीं उत्सवासीं ।
निघे पार्थ देवेंदप्रस्था सुतोषीं ।।
पृथा-धर्म-भीमा यमा द्रौपदीला ।
महानंदासिंधूच संप्राप्त झाला ।। ८२ ।।
हरी साह्य ज्याला उणें काय त्याला ।
हरिप्रेम चित्तीं जगीं तोचि ज्याला ।।
वृथा त्या कथा आणखी सर्व कांहीं ।
तयाचें यया मंडपीं काम नाहीं ।। ८३ ।।
सुभद्राविवाहाख्य गाथा अपूर्वा ।
पढे नित्य पूजोनियां सांबशार्वा ।।
तयालागि संपत्ति सत्पुत्र कन्या ।
इहामुत्र दे भुक्तिमुक्ती सुधन्या ।। ८४ ।।
मनीं इच्छिलें सर्वही प्राप्त त्याला ।
घडे या जगीं वीणकष्टें नराला ।।
महद्भक्ति विज्ञान वैराग्यबोध ।
सदा लाभ चातुर्य हीं सर्व साधे ।। ८५ ।।

शिखरिणी

रसालंकारांची अति सरस वाणी विलसली ।
यथासामर्थ्यें म्यां गुरुभजनयोगें विरचिली ।।
हरीच्या पायीं हे विमलतर सुश्लोककमळें ।
समर्पोनी माळा पुनित घडलों मी शतकुळें ।। ८६ ।।
पढे भक्तीनें जो हरिजन महाभागवत तो ।
हरीलाही जैसा प्रिय विजय तैसाचि घडतो ।।

सुभद्रा नाम्नी तो सहज वरितो मुक्तिपदवी ।
मुखीं माझ्या ऐसें यदुपति रमारंग वदवी ॥ ८७ ॥

शार्दूलविक्रीडित

विश्वामित्रकुलारविंदतरणी ऋग्वेदसिंधूमणी ।
सर्वालंकरणज्ञ पंडितगणीं जो शोभतो सद्गुणी ॥
श्रीमन्माधवराव पूज्य जानिता भागीरथी माउली ।
गंगासागरसंगमीं उपजलों मी चंद्र विद्वत्कुळीं ॥ ८८ ॥

श्रीलक्ष्मीधरबापेदवकरुणे मी मूढही यापरी ।
श्रीमत्सज्जनपंडितांसि सुखदा वाणी ग्रथीं साजिरी ॥
जैशी सायिखड्यासि नाचवितसे ते सूत्रधारक्रिया ।
तैशी मद्रसनेसिही नटविते श्रीसद्गुरूची दया ॥ ८९ ॥

मातें दिव्यनिरंजनाभिधपदा देवोनि संतारिलें ।
माझें हत्तम बोधचंडकिरणें सर्वस्व संहारिलें ॥
माझें प्राक्तनकोटिजन्मअघ तें एका क्षणीं वारिलें ।
जेणें मद्भय दैन्य विघ्न परतें एकीकडे सारिलें ॥ ९० ॥

सर्वां सत्कविनायकांसि नमितों मी दीन अंगीकरा ।
माझ्या या विनतीस मान्य करुनी हा ग्रंथ वाचा बरा ॥
दोषा टाकुनि सर्वथा गुण तुम्ही निर्मत्सरें आदरा ।
तेव्हां बालक धन्य होयिन जगीं हातीं कृपेनें धरा ॥ ९१ ॥

इंद्रमाला (उपजाति)

देवाल्यीं श्री-तुळसीवनांतीं ।
श्रीमारुतीसन्निध नित्यभक्ती ॥
पढेल जो पार्थचरित्र त्याला ।
यथार्थ ते घालिल मुक्ति माळा ॥ ९२ ॥

वंशस्थ

विवाहकामी तरि कृष्णरुक्मिणी ।
पुजोनि तत्सन्निध नित्य सन्मनीं ॥

पढेल त्याला तरि शीलसद्गुणा ।
मिळेल नारीमणि सत्कुलांगना ॥ ९३ ॥

कवी बनाजी विनवी समस्तां ।
जोडोनियां सादर युग्महस्तां ॥
कृपार्णवीं साच मदीय वाणी ।
म्हणों नये बोलवि चक्रपाणी ॥ ९४ ॥

शार्दूलविक्रीडित

पाहावें शकुनासि सात करिजे राशी वऱ्या तंडुलें ।
तेथें चिंतुनि ठेविजे स्वमनिचें तीन्ही सुपाऱ्या फुलें ॥
आधीं सर्ग गणा दुजा दशक तो घ्या श्लोक तो तीसरा ।
त्या अर्थांत शुभाशुभासि विवरा सर्वार्थसिद्धी वरा ॥ ९५ ॥

श्रीमच्छालिवहीं शकीं ख-नव-सा-एकांक अंगीकरा ।
साजे वत्सर सर्वधारि बरवासे सौख्यदेता नरां ॥
मासीं मार्गशिरीं सुकृष्णदशमी पूर्णेंदुवारीं बरी ।
झाली रम्य विवाहमंडित कथा पार्था सुभद्रा वरी ॥ ९६ ॥

सर्वालंकरणीं रसासह वसे हे काव्यगी रंगभू ।
येथें तांडव शारदा करितसे पाहा तुम्ही हे प्रभू ॥
तो श्रीकृष्णचि सूत्रधार नटवी मायागुणें नाटकी ।
हा प्रेमोत्सव देखतांचि घडती ते संतसाधू सुखी ॥ ९७ ॥

अनुष्टुभ्

इति श्रीपार्थचंपू हा केला कवि निरंजनें ।
श्रीकृष्णार्पणबुद्धीनें प्रेमानंदात्मभक्तिनें ॥ ९८ ॥

इति श्रीमत्कविकुलतिलक-श्रीमन्निरंजनमाधवविरचिते सुभद्रास्वयंवरे चंपूकाव्ये
बळिरामक्रोधावेश-सांत्वन-विवाहोत्साहवर्णनं नाम सप्तमः सर्गः ॥
सर्वधारी संवत्सर फाल्गुन वद्य सप्तमी गुरुवासरे लेखनं समाप्तिमगमत् ॥

□ □ □

सुभद्रा स्वयंवर

शब्दार्थ व टीपा

सर्ग पहिला

१. **वागोरे**–लगाम (हिंदी-बागडोर.) 'सारथी आखुडीत वागारे !'–उषा. ७३·२८. **वामहस्तें**–डाव्या हातानें. **हय**–घोडे. **पांडवस्यंदन**–(पांडव–पंडुपुत्र अर्जुन; स्यंदन–रथ.) अर्जुनाचा रथ. **जिणनि**–जिंकतात. **वातामनाचे वेग**–वारा आणि मन यांचे वेग. वेगाच्या बाबतींत मन आणि वायु यांची उपमा देण्याचा संकेत रूढ आहे. 'मनोजवं मारुततुल्यवेगम्' या हनुमत्स्तुतिपर श्लोकांत हनुमंताच्या गतीला मनाच्या व वायूच्या गतीशीं तुळलें आहे. **दक्षें**–दक्षतेनें, सावधगिरीनें. **तोत्रांगिकारी**–(तोत्र–चाबूक, अंगिकारी–धारण करतो.) चाबूक (हातीं) धरतो. **नवजलदतनु**–नवमेघाप्रमाणें (पावसाळ्याच्या प्रारंभीं आकाशांत येणाऱ्या मेघाप्रमाणें) ज्याची तनु (काया) सांवळी आहे, असा मेघश्याम श्रीकृष्ण. **पीतकौशेयधारी**–(पीत-पिवळें, कौशेय–रेशमी वस्त्र) पीतांबर परिधान करणारा–श्रीकृष्ण. **सारथ्यकर्म**–रथ हांकण्याचें काम. **पदयुग**–पायांची जोडी. या मंगलाचरणाच्या श्लोकांत कवीनें अत्यंत औचित्य साधलें आहे. सुभद्रास्वयंवराची कथा म्हणजे अर्जुनाच्या सख्यभक्तीचा विजय असल्यामुळें, अर्जुनाचें सारथ्यकर्म करणाऱ्या भूमिकेला प्राधान्य देऊन कृष्णवंदन करणें, हें काव्यविषयाचें हृद्य सूचन आहे.

२. **सबळ पातकशैल**–पातकांचा दृढ पर्वत. **खाणी**–खणून काढते. **सुधासम पक्ष्मपातीं**–(सुधासम–अमृतासारख्या, पक्ष्मपातीं–दृष्टिक्षेपानें. पक्ष्म–पापणीचे केस.) अमृतासारख्या दृष्टिक्षेपानें. परमेश्वराची दृष्टि ही कासवीच्या दृष्टीसारखी भक्तपोषक असते, असें संत नेहमीं म्हणतात. कासवी केवळ दृष्टिक्षेपानें आपल्या पिलांचें पोषण करते, असा संकेत आहे.

३. **तद्भक्तपुण्यचरितें**–त्याच्या भक्तांचीं पवित्र चरित्रें. **हरितीं**–हरण करतात; दूर करतात. **अघातें**–पापाला. **पांडुसुतकीर्तन**–पंडुपुत्र अर्जुनाच्या गुणांचें गायन. **कळी**–कलियुग, कलियुगांतील अधार्मिकता. **मुखपुटें**–(तोंडाच्या पोकळीनें) मुखानें.

४. **धर्मपुत्र**–युधिष्ठिर. युधिष्ठिर हा कुंतीला यमधर्मापासून झालेला असल्यामुळें त्याला धर्मपुत्र वा नुसतेंच धर्म म्हणतात. **वृकोदर**–भीम. **सहा शत्रु**–हे (परमार्थमार्गावरील) सहा शत्रु आहेत–काम, क्रोध, मद, मत्सर, लोभ व मोह.

षड्रिपु. **माद्रीपुत्र**—नकुल व सहदेव. हे दोघे पंडुराजाची द्वितीय पत्नी माद्री हिचे जुळे पुत्र होत. हे दोघे अश्विनीकुमारांपासून झालेले होते. अश्विनीकुमार हे देवांचे वैद्य होते. त्यामुळें त्यांचे अंश असलेल्या नकुल-सहदेवांचें यशोगान रोगनिवारणास कारण होतें, असें कवि म्हणतो, तें स्वाभाविक आहे.

५. **निजपादसार्यीं**- आपल्या पावलांच्या सावलींत, आश्रयाला. **मध्यमणि**—मेरुमणि. पांच पांडवांच्या रत्नहारांत अर्जुन हा मधला पांडव मध्यमण्यासारखा आहे. **धनंजय**—अर्जुन. **हारी घणें**—पराभूत होणें, माघार घेणें.

६. **मथीतों**—मंथन करतों. **मतानुसरतां** (मता अनुसरतां)—मताचें अनुसरण करण्यांत. **न मनीं श्रमातें**—मी शीण मानीत नाहीं; उल्हासानें त्याचें अनुसरण करतों, हा भाव.

७. **आकर्णिणें**—ऐकणें. **सुकृत**—पुण्य, चांगल्या कृत्याचें मिळणारें फळ. **यीतें**-(हीतें) हिला. **कुळांसहिन**—आपल्या पुण्यकृत्यांनीं केवळ आपलाच नव्हे, तर आपल्या समग्र कुळाचा—पितरांचाहि उद्धार व्हावा, अशी इच्छा असते.

८. **काज**—कार्य. **अक्षगण**——इंद्रियसमूह. **गुरुदास्यलेशें**—अल्पशाहि गुरुसेवेमुळें. **विघ्नाद्रि**—विघ्नांचा पर्वत. **तोष**—संतोष.

९. **शृंगारमुख्य नवही रस**—शृंगार, हास्य, करुण, रौद्र, वीर, भयानक, बीभत्स, अद्भुत व शांत या नवरसांत शृंगार हा रसराज समजला जातो.

१०. **कवीभारती**—कविवाणी. इतिहासपुराणें वगळून अन्य विदग्ध संस्कृत (आणि प्राकृतसुद्धां) वाङ्मय. **विरचूं**—उत्तम गुंफण करूं (मी करीन). **सद्रत्नहारावळी**—उत्तम रत्नांची—वाग्रत्नांची माळा. या समासांत हार आणि आवळी या एकार्थक शब्दांमुळें अनावश्यक द्विरुक्ति झाली आहे. **यीस**—(हीस) हिला.

११. **अस्मत्पितामही**—आमची आजी (पित्याची आई). सुभद्रा ही परीक्षितीचा पिता अभिमन्यु याची आई होय. **महामती**—महाबुद्धिवान् (शुकमुनि). **सज्जनगतां**—सज्जनांचा आदर्श (शुकमुनि). **कौतुकवती**—अद्भुत, नवलाईची. **त्रिदंडी यती**—त्रिदंडी संन्यासी. त्रिदंडी संन्यास घेतलेला संन्यासी हा शिखा-सूत्र-कच्छ (शेंडी, जानवें व कासोटा) या तीन गोष्टींचा त्याग करीत नाहीं आणि त्यास परत गृहस्थाश्रमांत येतां येतें, अशी समजूत आहे. **वासुदेवी**—वसुदेवाची कन्या, सुभद्रा. **सुदती**—जिचे दांत सुंदर आहेत अशी. **राक्षसविधीं**—राक्षसविधीनें. राक्षसविधि ही विवाहाची एक प्राचीन रीति असून, हींत वर वधूला बळजबरीनें घेऊन जाऊन, तिच्याशीं लग्न लावतो. **निगुति**—कौशल्यानें. **बलार्णव**—बलाचा सागर, बलाढ्य. **क्रोधानळावेशें पवमानें**—वाऱ्यानें अग्नि भडकावा, त्याप्रमाणें क्रोधाग्नीच्या भडकण्यानें. **सकळसुरमंडळचक्रवर्ती**—सर्व देवतासमूहाचा प्रमुख, श्रीकृष्ण. **सांतवणें**—सांत्वन करणें; शांत करणें. **पाणिग्रहण**—विवाह. **इंद्रप्रस्थ**—

पांडवांची नगरी. ही सध्यांच्या दिल्लीजवळ होती. **उत्सवें**–थाटामाटानें, समारंभपूर्वक.

१२. **भारतगाथा**–महाभारताची कथा. **प्रेमपुरःसर**–प्रेमपूर्वक. **मुनिकुलमंडन**–मुनिकुलाचें भूषण असा वैशंपायन.

१३. **जलजाक्षी**–(जलज–कमळ, अक्ष–डोळा) जिचे डोळे कमळांसारखे आहेत, अशी. **शशिमुखी**– जिचें मुख चंद्रासारखें आहे, अशी. **शचीमुख्यसुमुखी**–(शची–इंद्राणी, सुमुखी–सुंदर मुखाच्या स्त्रिया) इंद्राणी आदि स्वर्गांतील सुंदर स्त्रिया. **कीर्तन**–स्तुति, गुणगौरव.

१४. **तरुणपद**–तारुण्यावस्था. **स्ववर्णें**–स्वतःच्या रंगानें. **सुतनु**–जिचें शरीर सुंदर आहे, अशी. **नवजांबूनदकळा**–(जांबूनद-सोनें) शुद्ध सोन्याचें तेज. **कळा आदित्याच्या**–सूर्याच्या कळांशीं तिच्या कांतीची तुलना करायची तर त्या तप्त असल्यामुळें दृष्टीला असह्य असतात, तर हिची कांति तेजस्वी असूनहि दृष्टिसुखद आहे.

१५. **सुनीळी**–सुनील, सुंदर निळी. **भृंगाळी**–(भृंगावळी) भुंग्यांचा समूह. **अळकजाळी**–केशकलाप. **अर्धेंदु**–अर्धचंद्र. **स्वनेत्रें**–स्वतःच्या डोळ्यांनीं. **भ्रूयुग्म**–भुवयांची जोडी. **स्मरधनुष**–मदनाचें धनुष्य. सुभद्रेच्या भुवयांच्या धनुष्यांनीं मदनाच्या धनुष्याचा गर्व हरण केला होता. (कारण तिच्या भुवयांच्या धनुष्यांतून सुटणारे कटाक्षांचे बाण मदनबाणांहून अधिक प्रभावी होते.)

१६. **गल्ल**–गाल. **द्वंद्व**–जोडी. **नासा**–नाक. **सुमुक्ताशुक्ती**–उत्तम मोत्यांनीं युक्त असे शिंपले. **श्रुति**–कान. **मज्जति**–बुडतात. सुभद्रेच्या कानांचें सौंदर्य पाहून उत्तम मोत्यांनीं युक्त असलेल्या शिंपल्यांनींहि लाजून जळांत बुडी दिली. **मुखाब्ज**–मुखकमळ.

१७. **रदवर**–(रद–दांत, वर–श्रेष्ठ) सुंदर दांत. तिचे सुंदर दांत पाहून हिऱ्यांनींहि लाजेनें कठिणपण धारण केलें–हिरे जडमूढ होऊन गेले ! **प्रवाळाहीं**–प्रवाळांनीं. **अरुणिमा**–लाली. **अधर**–ओठ. **सुधापात्र**–अमृतकलश, सुरई. **हनु**–हनुवटी. **निजपद**–स्वतःचें स्थान. **बुधजनमन**–जाणत्यांचें मन. **मुद**–मोद, आनंद.

१८. **वक्त्र**–मुख. **शशी**–चंद्र. **मंदस्मितरुचि**–मंदहास्यानें येणारी शोभा. **शुभकळा**–सुंदर कला. **कंबू**–शंख. कंठाला शंखाची उपमा देण्याचा संकेत संस्कृत साहित्यांत सर्वत्र आढळतो. संस्कृत कवि स्त्रीला कंबुकंठी म्हणतात. **त्रिवळिगतरेखा**–शंखाचा पुढील आकार. शंखाला 'त्रिरेख' असेंहि नांव आहे. **हरितली**–जिंकली. **भुजद्वंद्व**–भुजांची जोडी. **झकविली**–फजित केली.

१९. **वक्षोजाहीं**–स्तनांनीं. **कंजकळिका**–कमळाच्या कळ्या. **कंदर्प**–मदन. **लघुतर**–अत्यंत लहान. **रोमसरणी**–रोमावळी, बारीक केसांची ओळ. **असिलता**–तलवार. **जीवहरणी**–जीवघेणी.

२०. **कोशाकारें**–(कोश–म्यान) म्यानासारख्या आकाराच्या. **त्रिवळी**–(पोटावरील तीन वळ्या). **सूक्ष्म**–नाजूक, अस्पष्ट. **युवा**–तरुण पुरुष, युवक. त्रिवळीच्या म्यानांत असलेली रोमावळीची तलवार युवकांचीं चित्तें क्षणांत खंडित करते ! **सुनिम्नत्वें**–(निम्नत्व–खोलगटपणा) चांगलीच खोलगट असल्यामुळें. **नाभी**–बेंबी. **वटपुटसमानोदरवरी**–गोल आकाराच्या उदरावर. बेंबी ही अमृतरसाच्या वापीसारखी (विहिरीसारखी) आहे.

२१. (हिच्या) **नितंबातें निरखितां मत्तकरिंचें कुंभस्थळ, साचपरिचे असुनी, ते महालज्जेनें श्रवति**–सुभद्रेच्या नितंबांना पाहून मत्त हत्तींचीं कुंभस्थळें (तीं खरोखरीचीं असूनहि) अत्यंत लज्जेनें पाझरतात **शुंडादंड**–हत्तीची सोंड. **जिणुनि**–जिंकून. **उरुयुग्म**–मांड्यांची जोडी. **सुषमा**–सौंदर्य.

२२. **स्मर**–मदन. **तूण**–भाता. **वरजंघा**–(वर–श्रेष्ठ, जंघा–जांघा) सुंदर जांघा. **माणिक्य**–माणिक नांवाचें लाल रंगाचें एक रत्न. **अरुणिमकळा**–लाल छटा. **पदद्वंद**–पायांची जोडी. **अंगुळवळी**–बोटांची ओळ. **विधी**–ब्रह्मदेव.

२३. **शरच्चंद्रज्योत्स्ना**–शरदृतूंतील चांदणें. **शकले**–तुकडे. **नखमणी**–नखरूपी रत्नें. शारदीय चंद्रकळेचे लहान लहान भाग करूनच जणूं सुभद्रेचीं नखरत्नें घडविलीं होतीं. **लता हे...विरचिलीं**–चतुर विधात्यानें ही जणुं सोन्याची वेलच घडविली आहे. **चतुरास्य**–ज्याला चार मुखें आहेत, असा–ब्रह्मदेव (आस्य–मुख). **धरोनी...घडली**–जणुं चपल विद्युतच देह धारण करून अचल बनली होती.

२४. **आमोद**–मुखाचा सुगंध. **अळी**–भ्रमर. **हेमाब्ज**–सुवर्णकमल. **विधिरचित**–ब्रह्मदेवानें निर्माण केलेली. **प्रसुखदा**–अत्यंत सुख देणारी. **पसा**–एका हाताचा खोलगा. **न समाती**–मावत नाहींत. **वपुकळा**–देहाची प्रभा.

२५. **लक्षणगण**–लक्षणांचा समूह. **जगनिर्माणकरिता**–ब्रह्मदेव. **नारीमूर्धामणि**–सर्वश्रेष्ठ स्त्रीरत्न. **देवकिसुता**–देवकीची कन्या सुभद्रा.

२६. **वपू**–शरीर. **सौष्ठव**–सौंदर्य, डौलदारपणा. **नारीवेष**–स्त्रीरूप. **कमलभवन**–ब्रह्मदेव हा शेषशायी विष्णूच्या नाभिकमलांत वास करतो, ही पुराणकल्पना येथें अभिप्रेत आहे. **हरिणाक्षी**–जिचे डोळे हरिणीच्या डोळ्यांसारखे आहेत, अशी. **नृहरि**–नृसिंह, श्रीकृष्ण. **स्वसा**–बहीण. **साचपरिची**–खरोखरीची.

श्रीकृष्णाचा देह निर्माण केल्यानंतर ब्रह्मदेवानें उरलेल्या सौंदर्यांतून हें स्त्रीरूप (सुभद्रेचें शरीर) निर्माण केलें, म्हणूनच सुभद्रा ही यदुकुळांत श्रीकृष्णाची बहीण म्हणून जन्माला आली, असें कवीला वाटतें.

२७. **उदारांग**–सुंदर शरीर. **निलय**–वसतिस्थान. **त्रिवेणी**–तिपेडी वेणी. **मणिखचित वेणी**–रत्नखचित सोन्याची वेणी, केसांच्या वेणींत घालावयाचा एक मूल्यवान् अलंकार. **एणाक्षिणिशिरीं**–(एण–काळा मृग, एणाक्षिणि–मृग-नयना) हरिणाच्या डोळ्यांसारखे जिचे डोळे आहेत अशा सुभद्रेच्या डोक्यांत. **दिसे लावण्याच्या...वरी**–सुभद्रेची काया म्हणजे लावण्याचा निधि होय आणि तिच्या काळ्याभोर केसांची तिपेडी वेणी म्हणजे त्या लावण्यनिधीवरील नागीणच होय. (पूर्वीं लोक आपलें धन भूमींत पुरून ठेवीत असत. तें धन जमिनींत असतांनाच जर त्या धनाचा स्वामी मृत्यु पावला, तर तो नाग बनून त्या गुप्त धनाची राखण करीत असतो, अशी समजूत आहे.)

२८. **मयूराच्या पिच्छाकृति**–मोरपिसांप्रमाणें. **अळक**–केस. **विभउनि**–स्निग्ध-सुगंधित करून. **माणिक्यगण**–माणकांचा समूह. **मुक्ताजाळी**–मोत्यांची जाळी. **तदुपरि**–तिच्यावर.

२९. **स्मर**–मदन. **लावण्यांभोनिधि**–लावण्याचा सागर. सुभद्रेच्या केसां-तील भांग म्हणजे मदनानें लावण्यसागरांत बांधलेला नवीन सेतु होय.

३०. **सिंदूर**–कुंकू. **अरुणपद**–लाली. **उदित सूर्य**–(नुकताच) उगवलेला (लाल रंगाचा) सूर्य. **त्रिवेणी...अवतरे**–भांगांतील कुंकवाची लाली, मोत्यांच्या सराची शुभ्रता आणि केसांचा काळिमा या तीन रंगांच्या संमेलनानें जणुं गंगा-यमुना-सरस्वती यांचा त्रिवेणी संगम सौभाग्योदयासह सुभद्रेच्या मस्तकावर अवतरला आहे.

३१. **स्मर**–मदन. **गरळ**–विष. **युवा**–तरुण पुरुष. **दळण**–छेद-भेद. **विधी**–ब्रह्मदेव. काजळानें शोभणारे सुभद्रेचे डोळे पाहिले कीं, वाटतें–युवकांच्या चित्ताचा भेद करण्यासाठीं ब्रह्मदेवानें हे विषानें माखलेले मदनबाणच निर्माण केले आहेत. (बाणांच्या टोकांना विष लावण्याची प्रथा आहे.)

३२. **बिंजे करणें**–गमन करणें, जाणें. **कपोळ**–गाल. **पत्राळी**–पानांची ओळ. गालांवर केशराच्या रसानें कातरपानें रेखाटलेलीं होतीं. **स्वदीप्ती**–स्वतःचें तेज, आपल्या कांतीची झळाळी.

३३. **सुधांशूपूर्णांगीं**–पूर्णचंद्राच्या ठायीं. **ठोसर**–नाकांतलें मोठें भूषण–नथ. पूर्णचंद्राच्या ठायीं अरुण आणि दोन शुक्र नांदूं लागल्याप्रमाणें वर्तुळाकार मोठी नथ एक लाल खडा आणि दोन टपोरे शुभ्र मोती यांच्यासह तिच्या नाकांत

शोभत होती. **फुल्लाब्ज**–फुललेलें कमळ. **लिगटणें**–चिकटणें, खेटून राहणें. **शर्शांमित्र**–चंद्र-सूर्य. **सुताटंकें**–(ताटंक–कर्णभूषण) सुंदर कर्णभूषणें. ज्याप्रमाणें चंद्रसूर्य उत्फुल्ल कमळाला लिगटून राहतात, त्याप्रमाणें तिच्या कानांतील तेजस्वी कर्णभूषणें मुखकमळाला लिगटून राहिलीं होतीं.

३४. **तयांच्या सामीप्यें**–चंद्रसूर्यांच्या संगतीनें.

३५. **अमरयुवती**–देवांगना, अप्सरा. **गुजे**–माळ, हार.

३७. **मुक्ताहार**–मोत्यांचा हार. **स्तनगिरिशिरीं**–स्तनरूपी पर्वतांच्या शिखरांवर. **शृंग**–शिखर. **घन**–मेघ. **करिचे गंड**–हत्तींचीं गंडस्थळें. तिच्या गौर स्तनप्रदेशावर रुळणारा मोत्यांचा हार पाहून कवीला असें वाटतें कीं, हिमाच्छादित शुभ्र सुमेरु पर्वताच्या शिखरावर स्वर्गगंगचा ओघच उतरत आहे अथवा हत्ती मेघाच्या धारा आपल्या गंडस्थळांवर झेलीत आहेत.

३८ **सुवर्णाची वल्ली**–(सु-वर्ण–सोनें अथवा सुंदर वर्ण, सोन्यासारखी गौर कांति वल्ली–वेल) स्तनरूपी फळांच्या भारानें सुभद्रेच्या देहाची ही सुवर्णलता लवून मोडूं नये, म्हणून ब्रह्मदेवानें (विधीनें) तिच्या कमरेला रत्नखचित कमरपट्टा (सुरत्नांची कांची) बांधला. म्हणूनच कवीला वाटतें कीं, तिची कमर (मध्य) इतकी लहान (सुसूक्ष्मा) झाली आहे.

३९. **झुणा**–(पुंल्लिंगी) रंगीत साडी. **अरुणसुमराग**–लालसर फुलाचा रंग. **सुसूक्ष्मत्व**–झिरझिरीतपणा, तलमपणा. **कनकतनुभा**–सोन्यासारख्या कांतीची प्रभा. **अमल**–शुद्ध, विमल डाळिंबी रंगाच्या तलम साडींतून फाकणारी तिच्या सुवर्णकांतीची प्रभा पाहून असें वाटतें कीं, जणुं माणकाच्या विमल (पारदर्शक) पात्रांत दीपकळिका तेवत आहे.

४०. **मंजीर**–पैंजण. **मणिखचित**–रत्नखचित. **सन्नादित**–नादानें युक्त, नाद करणारे. **मंदिर**–भवन, घर. **रव**–ध्वनि. **तैं**–तेव्हां. **शर**–बाण.

४१. **पोल्हार, अनवट व विरोद्या**–पायाच्या आंगठ्यांत व बोटांत घालावयाचे चांदीचे अलंकार. **मुखर**–आवाज करणारीं. **जोडवीं**–पायांच्या आंगठ्याशेजारच्या बोटांत घालावयाचा अलंकार. **न बैसों ...निर्गुणपदीं**–पायांतील जोडवीं आपल्या आवाजामुळें यतींच्या मनांना (नियमितमनां) निर्गुण तत्त्वाच्या चिंतनांत (निर्गुणपदीं) स्थिर राहूं देत नाहींत. (सुभद्रेच्या पायांतील जोडव्यांचा आवाज ऐकून, युवतीच्या आगमनाचें सूचन मिळाल्यामुळें, तपस्व्यांचीं चित्तें विचलित होतात, हा भाव.)

४२. **पदाब्जें आधीं ते...बरवीं**–पावलें आधींच कमळांसारखीं अथवा तांबूस पालवीसारखीं कोवळीं. (पदाब्ज–पदकमळ. किसलय–पालवी. शोण–तांबूस.) **आलक्तकरसवरें**–अळित्याच्या उत्तम रसानें. **मिरवी**–सुशोभित करी. **ध्वजोर्ध्वा**

...**सांगति खुणे**–तळव्यावरील ध्वजादि आकृतींनीं युक्त अशीं रेखांचीं लक्षणें असें दाखवितात कीं, ही चक्रवर्ती राजाची (महाराजेंद्राची) पट्टराणी (महिषी) होईल.

४३. **नानाभूषाभरित**–अनेकविध वस्त्रालंकारांनीं नटलेली. **शशि**–चंद्र. **भद्राक्षी**–सुंदर डोळ्यांची. **भुवनतिलका**–(भुवन–जग अथवा घर. तिलक–टिळा, शोभेचा कळस.) जगाचें अथवा घराचें भूषण. **भर्मलतिका**–(भर्म–सुवर्ण. लतिका–वेल) सोन्याची वेल. (सुभद्रेच्या कांतीवरचें हें रूपक श्लोकांक २८ मध्येंहि ' सुवर्णाची वल्ली ' या शब्दांत येऊन गेलें आहे.) **भवाची मुद्रा**... **सकळिकां**–सुभद्रा ही साक्षात् प्रपंचाची मुद्रा असून ती सकळांना भ्रमांत टाकते. (प्रपंच हा भ्रमोत्पन्न आहे, असा अद्वैतवेदान्ताचा सिद्धान्त आहे.)

४४. **भद्राक्षी**–चांगल्या डोळ्यांची. **कमलरहिता जलधिजा**–(आसनाला) कमळ नसलेली लक्ष्मी. (लक्ष्मी ही समुद्रांतून निघालेली–जलधिज–असून, ती कमलासनावर विराजमान झालेली असते.) **विधिजा**–ब्रह्मदेवाची कन्या, शारदा. सुभद्रा ही हातीं वीणा नसलेली शारदाच आहे. **शशिशकल**–चंद्रकोर. **गिरिजा**–गिरीची (हिमालयाची) कन्या पार्वती. सुभद्रा ही मस्तकावर चंद्रकोर नसलेली पार्वतीच आहे. **वरिजा**–(वरजा) श्रेष्ठाची कन्या, श्रेष्ठ कुळांत जन्मलेली.

४५. **त्रिजगजनमान्या**–त्रैलोक्यांतील लोकांच्या कौतुकाचा विषय झालेली. **कंदर्पभरिता**–(कंदर्प–काम, मदन) कामभावनेनें युक्त. **स्पृहा**–इच्छा. **पार्थ**–अर्जुन, पृथेचा (कुंतीचा) पुत्र. **वल्लभ**–पति. **नृपति**–राजा.

४६. **नृपाळ**–राजा. **कौंतेय**–कुंतीचा पुत्र, अर्जुन. **विजयगुण**–(विजय–अर्जुन) अर्जुनाचे गुण. **रुतले**–ठसले. **न जाती...धुतले**–नेहमीं ऐकून अर्जुनाचे गुण तिच्या हृदयांत ठसले होते, ते सख्यांच्या मुखांतून ऐकावयास मिळणाऱ्या अन्य राजांच्या स्तुतींनें दूर होणें शक्य नव्हतें–सख्यांच्या वचनरूपी गंगेंतहि धुतले जाणें शक्य नव्हतें.

४७. **हरी**–श्रीकृष्ण. **वेत्ता**–जाणता. **अभिमत**–आशय, हृद्गत. **कुंती-तनुज विजय**–कुंतीपुत्र अर्जुन. **सद्गुणवत**–सद्गुणांनीं युक्त असलेला. **मानें**... **बरवें**–सुभद्रेचें हृद्गत जाणून श्रीकृष्णानें असें योजलें कीं, तिला अर्जुनालाच द्यावी; कृष्णाचें हें ठरवणें वसुदेवालाहि अत्यंत इष्ट (बरवें–विहित) आहे, असें मान्य झालें. **तसी माता**...**मिरवे**–तसेंच (कृष्णाचा हा संकल्प) ऐकून माता देवकीहि सुखसागरांत (सुखाब्धींत) डुंबूं लागली.

४८. **श्वेतवाहन**–अर्जुन. **नव राहो**–न राहो, नसावा.

♠ ♠ ♠

सर्ग दुसरा

१. **सकळललनाशिरोभूषणा**–सर्व स्त्रियांत श्रेष्ठ. **भद्रगुणा**–उत्तम गुणांची. **नवतारुण्यचिन्हसंपन्ना**–नवतारुण्याच्या लक्षणांनीं युक्त. **गतिविलास ……रचना**–जिचें चालणें मंद, वागणें हळुवार, पाहणें चंचल आणि दिसणें कोमल आहे अशी. **कंजाक्षी**–जिचे डोळे कमळांसारखे आहेत अशी, कमलाक्षी.

२. **निजस्वसा**–स्वतःची बहीण. **सीरपाणी**–(सीर–नांगर, पाणि–हात) ज्याच्या हातीं नांगर हें आयुध आहे, तो–बलराम. **वरविचारणा**–(सुभद्रेसाठीं) वर निश्चित करण्याचा विचार. **सकळभूपाळमंडनमणी**–सर्व राजांचें भूषण असलेला–राजश्रेष्ठ. **कुरुराज**–कुरुकुलांत श्रेष्ठ. **सुयोधन**–दुर्योधन. **रमणीयदृशा**–सुंदर डोळ्यांची (सुभद्रा).

३. **दाशार्हसभेमाजीं**–श्रीकृष्णाच्या राजसभेंत. **भोजांधक…समाजीं**–भोज, अंधक, इ. हीं यादवांचीं विभिन्न कुळें आहेत. **कमलकोमलतनु**–जिची काया (तनु) कमलासारखी कोमल आहे अशी. **कलानाथवदना**–जिचें मुख चंद्रासारखें आहे अशी. **सौंदर्यसदना**–सौंदर्याचें माहेरघर असलेली. **सद्गुणराजी**–सद्गुणांची मालिका जिच्या ठायीं आहे अशी (सुभद्रा).

४. **बहुजन-सखीजन-मुखें**–अनेक लोकांच्या व मैत्रिणींच्या मुखानें. **अभद्रकर**–अकल्याणकारक, अशुभ (वृत्तान्त). **श्रवणीं**–कानांनीं. **परम**–अत्यंत. **शोके**–शोक करूं लागली. **धाके**–भयभीत झाली. **ग्रीष्मऋतुराजीवसमान सुकली**–ग्रीष्मऋतूंतील कमळाप्रमाणें सुकली. **चिंताज्वरें संतापली**–चिंतेच्या तापानें तापली. **संभाषणावलोकन**–बोलणें व पाहणें. **क्षुधातृषास्मृती**–तहानभुकेची आठवण. **कृशांगी**–सडसडीत बांध्याची. **अतिकृशत्व**–अत्यंत हाडकुळेपणा. **कदलीपत्रपृष्ठ…लागली**–अशक्तपणामुळें तिचा पाठीचा कणा दिसूं लागल्यामुळें तिची पाठ कर्दळीच्या पानासारखी दिसूं लागली. **कनककेतकीपांडुरता**–सोनकेवड्याच्या रंगासारखा पिवळेपणा. **प्रसरली**–पसरली. **चित्रलिखित.. लागली**–चित्रांत काढलेल्या पुतळीप्रमाणें निश्चेष्ट राहिली. **करकंजदळीं…मोकळी**–ती (सुभद्रा) कमळासारख्या हातांत (करकंजदळीं) मुखाचा चंद्र लपवून (मुखराशी निवेशवोनि) नेत्रांच्या कमलांतून (नयनकुड्मलीं) टपोऱ्या अश्रूंच्या धारा (घनाश्रुधारा) सांडूं लागली.

५. **विधाता**–ब्रह्मदेव. **अपंडितसमान**–मूर्खाप्रमाणें. **युक्तायुक्तविचार**–योग्य-अयोग्य विचार. **मानसांतरीं**–मनांत. **विचारितां**–विचार करतां.

६. **ममगुणानुगुण पुरुषरत्न**–माझ्या गुणांना अनुरूप गुण असलेला श्रेष्ठ पुरुष–माझ्या गुणांच्या सूत्रांत ओवल्यावर शोभून दिसेल असें पुरुषरत्न.

सकळ...मणी–सर्व सज्जनांना मान्य असा वीरश्रेष्ठ. **आजानुबाहू**–ज्याचे हात गुडव्यांपर्यंत पोचतात असा. (आजानुबाहुत्व हें भाग्यवंताचें लक्षण मानलें जातें.) **सुलोचन**–ज्याचे डोळे सुंदर आहेत असा. **समस्तकळानिधी**–सर्व कलांचा सांठा ज्याच्या ठायीं आहे असा–कलामर्मज्ञ. **वासवनंदन**–इंद्राचा पुत्र. अर्जुन हा कुंतीला इंद्राच्या मंत्रानें लाभलेला होता. **सुहृज्जन...चंदन**–जणुं आपल्या माणसांच्या–मित्रांच्या हृदयाचा ताप दूर करणारें चंदन. **मदनमोहन**–मदनासारखा सुंदर अथवा मदनालाहि मोहित करण्याइतका सुंदर.

७. **संयोग**–मीलन. **नुरेल प्राणशरीरयोग**–प्राण आणि शरीर एकत्र राहणार नाहीं–म्हणजे प्राण शरीराला सोडून जातील, मृत्यु येईल. **अन्यपुरुषपरिष्वंग**–(अर्जुनावांचून) अन्य पुरुषाचें आलिंगन. **एका नरावीण**–एका अर्जुनावांचून. (अर्जुन हा नर नामक प्राचीन ऋषीचा अवतार समजला जातो.) **अन्य नरदेव**–अन्य मानव व देव. **वसुदेवसमान**–(वसुदेव हा सुभद्रेचा पिता होता.) पित्यासमान. **उमाधवचरणनलिन**–शंकराचीं चरणकमलें. **नलिनसहस्रें**–हजार कमळांनीं. **सतनार्चननिरत**–सदैव पूजेंत मग्न. **वीरव्रताचरण**–वीरपुरुषाला प्राप्त करण्यासाठीं करावयाचें व्रत. **भद्रकाळी...भद्रातें**–ज्याला रुद्राक्षांचें भूषण प्रिय आहे, अशा वीरभद्राला भद्रकालीसह (सुभद्रा स्तवूं लागली).

८. **भव**–शंकर. **भवानीरमण**–भवानीचा पति शंकर. **भयापह**–भयाचें हरण करणारा. **भोगींद्रभूष**–(भोगींद्र–सर्पश्रेष्ठ) सर्प हें ज्याचें भूषण आहे असा–शंकर. **भुवनैकविग्रह**–सारें विश्व ही ज्याची मूर्ति आहे तो विश्वव्यापक शिव. **भूतिप्रिय**–ज्याला विभूति (भस्म) प्रिय आहे असा. **भर्मगिरीशभक्तिदा**–(भर्मगिरि-सुवर्णनिधि. त्याचा ईश म्हणजे स्वामी जो कुबेर) कुबेराला भक्ति देणारा. **भक्तार्तिह**–भक्तांची आर्ति म्हणजे दुःख दूर करणारा. **भव्यगुणाश्रय**–जो भव्य म्हणजे श्रेष्ठ गुणांचा आश्रय बनलेला आहे तो.

९. **हिमाद्रिजावल्लभ**–हिमालयाची कन्या उमा हिचा पति. **हेमवर्ण**–सुवर्णासारख्या कांतीचा. (खरें म्हणजे शिव हा कर्पूरगौर आहे.) **हिरण्यरेता**–हें अग्नीचें व सूर्याचें विशेषण इथें शिवाला लावलें आहे. **हर्यश्वमुख्यामरपूज्यपाद**–विष्णु आदि देवांना ज्याचे चरण पूज्य आहेत असा. **हविर्भुज**–अग्नीचें विशेषण (हवि म्हणजे आहुति भक्षण करणारा); इथें हें विशेषण शिवाला लावलें आहे. **हविर्भुजार्कतेजसा**–अग्नि आणि सूर्य यांच्यासारखा तेजस्वी.

१०. **देवोत्तम**–देवांमध्यें श्रेष्ठ. **दीनजनानुकंप**–दीन जनांविषयीं अनुकंपा म्हणजे करुणा असणारा. **दयार्णव**–दयेचा सागर. **दिव्यनुतप्रताप**–ज्याच्या प्रतापाची देवांनीं स्तुति केली आहे, असा. **दाक्षायणीनायक**–दक्षकन्या पार्वती हिचा पति. **पार्थ**–अर्जुन. **ईश**–शंकर.

११. **दनुजांतकारका**–दानवांचा अंत म्हणजे नाश करणारी. **दुष्पार-दुःखाटविदावपावका**–दुर्लंघ्य (दुष्पार) अशा दुःखरूपी अरण्या (दुःखाटवी)ला जाळून टाकणारा जणुं दावाग्नि (दावपावक) असलेली. **दुरत्यया**–जिचें स्वरूप अगाध आहे अशी. **देववरार्चिता**–श्रेष्ठतम देवांनीं पूजिलेली. **सुदुर्गातिहरा**–अजिंक्यदुर्ग जिंकणारी. **रविप्रभा**–रवीचें तेज असलेली.

१२. **महानुभावा**–उदार, श्रेष्ठ. **मदमत्तलोचना**–जिचे डोळे मदानें धुंद झाले आहेत, अशी. **मदालसा**–यौवनानें जिची गति मंद झाली आहे अशी. **मानितपापमोचना**–जीवांना पापांपासून मुक्त करण्याच्या बाबतींत जिची ख्याति आहे, अशी. **मदीय**–माझा. **चिंतार्णव**–चिंतेचा सागर. **शोषिजे**–शोषून टाक.

१३. **उमार्द्धसद्विग्रहचंद्रमौळी**–ज्याच्या मूर्तींत उमेचा अर्धा भाग आहे, असा, अर्धनारीश्वर. **वसुदेववाळी**–वसुदेवकन्या सुभद्रा.

१४. **अस्मिन्नवसरीं**–या प्रसंगीं. **सकळलोकसंचारी**–स्वर्ग, मृत्यु, पाताळ या तिन्ही लोकांत संचार करणारा. **शम**–शांति. **दम**–संयम. **तितिक्षा**–सहनशीलता. **अनसूया**–निर्मत्सरत्व. **सदनवरीं**–राजगृहांत. **प्रणमोनि**–प्रणाम करून. **चरणकल्हार**-चरणकमल. **भद्रासन**-उच्च व उत्तम आसन.

१५. **सात्वतकुल**–यादवकुल. **सदुत्सवें**–अत्यंत उत्साहानें. **भद्रलक्षणा**–सुलक्षणी. **बलभद्र**-बलराम. **चतुराननंदन**–ब्रह्मदेवाचा पुत्र, नारद. **देवलोक-लोकवंदितचरणारविंद**–देवलोकांतील लोकांनीं ज्याचीं चरणकमलें पूजिलीं आहेत असा–नारद.

१६. **सुभगसुभद्रामानसभ्रमर**–सुंदर सुभद्रेच्या मनाचा भ्रमर. **अर्जुन-वदनकनककल्हार**–अर्जुनाच्या मुखाचें सुवर्णकमळ. **नेच्छी**–इच्छीत नाहीं. **कौरवेंद्रकटुकुटजविटपिवर**–दुर्योधनरूपी कुड्याचें कडू झाड. **अनेकबंधुस्कंदप्रचुर**–अनेक बंधु व सहकारी राजे यांच्या परिवारानें–शाखांनीं युक्त असा–दुर्योधन. **शफरी**–मासोळी. **अशनपान**–खाणें-पिणें. **कृशोदरी**–जिचा उदरभाग (कटिप्रदेश) कृश आहे अशी. **मुनिनाथ**–मुनिश्रेष्ठ नारद.

१७. **महती**–मोठी. **गोवर्धनोद्धरण**–गोवर्धन पर्वत उचलून धरणारा. **कंसचाणूरमर्दन, मधुकैटभारी**–कंस व चाणूर यांचा नाश करणारा; मधु व कैटभ यांचा शत्रु श्रीकृष्ण. **नामप्रबंध**-जींत (प्रभूचीं) नामें गुंफलेलीं आहेत अशी गायनयोग्य रचना (‘ कृष्ण विष्णु गोविंद । एयां नामाचे निखिल प्रबंध । ’–ज्ञा. ९.२०९) **बंदीजन**–भाट. **घडोनि**–बनून. **परमपुरुषचरणाराधक**–परमेश्वराच्या चरणांचा उपासक. **महानुभाव**–महात्मा. **धर्मासि**–धर्मराज युधिष्ठिराला. **सप्तलोकादिलोकसंचारार्थी**–(भू, भुवः, स्वः, महः, जनः, तपस्, सत्य असे

सात ऊर्ध्वलोक पुराणांत वर्णिले आहेत.) सप्तलोकादि सर्व लोकांत म्हणजे अखिल विश्वांत संचार करण्याच्या हेतूनें.

१८. **सकळभुवननारीरत्न**–त्रिभुवनांतील स्त्रियांत श्रेष्ठ. **धनंजयमनीं**–अर्जुनाच्या मनांत. **चिंताविषदिग्धकामबाण**–चिंतेच्या विषानें माखलेले मदनाचे बाण. (बाणांच्या टोकांना विष माखण्याची पद्धति होती.) **नारदवाग्धनुर्मुक्त**–नारदाच्या वाणीरूपी धनुष्यांतून सुटलेले (कामबाण). **जिव्हार**–हृदय, मर्मस्थान. **खेदला**–खिन्न झाला. **सुहृज्जनसंभाषण**–मित्रांशीं संवाद. **वीरकेसरी**–वीरसिंह.

१९. **श्रीकृष्णसहोदरी**–श्रीकृष्णाची सख्खी बहीण. **गुणलावण्यरत्नपेटी**–गुण आणि सौंदर्य यांचीं रत्नें जिच्या ठायीं संचित आहेत अशी. **अंगनामणी**–स्त्रीरत्न, श्रेष्ठ स्त्री. **भावी**–चिंती, चिंतन करी. **किरीटी**–अर्जुन. **व्रीमती**–लज्जावती. **भीमती**–भीरु. **चारुमति**–चांगल्या स्वभावाची **भावज्ञा**–भाव जाणणारी. **कंबुकंठी**–जिची मान शंखाप्रमाणें तीन रेषा असलेली आहे अशी (हें सुदैवाचें लक्षण मानलें जातें.) **कनकवर्णगौरटी**–सोन्याच्या रंगासारखी गोरी. **शृंगारवल्ली**–जणुं शृंगाराची वेलच अशी. **सुस्मिता**–सुंदर हंसणारी.

२०. **यादवाधीश्वरभगिनी**–यादवांचा प्रमुख असलेल्या श्रीकृष्णाची बहीण (सुभद्रा). **मदीयभावबद्ध**–माझ्याविषयींच्या प्रीतिभावनेनें बद्ध अशी. **तरुणताम-रससमानअरुणपाणी**–जिचे हात कोवळ्या कमळासारखे लालसर आणि नाजुक आहेत अशी. **बिंबोष्ठी**–बिंबफळांसारख्या लालबुंद ओठांची. **मधुरपिकवाणी**–कोकिळाच्यासारखी जिची वाणी मधुर आहे अशी.

२१. **मातें**–मला. **धुरंधर**–आघाडीवर राहणारा शूर पुरुष.

२२. (अर्जुन म्हणतो,) जर सुभद्रेनें अंध धृतराष्ट्राचा पुत्र दुर्योधन याला (अंधतनया) वरिलें, तर माझ्या पुरुषार्थाचा धिक्कार असो. असें घडलें तर विश्व हें अर्जुनरहित (निरर्जुनी) झालें आहे, द्रौपदी ही केवळ चौघां पतींचीच पत्नी आहे, कुंती ही चौघां पुत्रांचीच माता आहे, पृथ्वी निर्वीर झाली आहे, गुरु द्रोणाचार्य हे शिष्यहीन बनले आहेत आणि यादवांचा प्रमुख श्रीकृष्ण हा मित्रहीन बनला आहे (म्हणजेच अर्जुन संपला आहे), असें समजावें.

२३. **नाहीं...विघरलों**–गर्भातच कां जिरलों नाहीं? **अस्त्रग्राम**–सर्व अस्त्रें, अस्त्रसमूह. **दितिजेंद्र**–दितीचे पुत्र (दितिज) जे दैत्य त्यांत श्रेष्ठ असलेले. **अग्नीस...तृप्त**–खांडववन जाळलें. **यादवी**–यादवकन्या सुभद्रा. **परिणणें**–वरणें. **पांडवें**–पांडवानें (अर्जुनानें).

२४. **पयोधर**–स्तन (शेळीच्या गळ्याला असलेले स्तन निरुपयोगी असतात). **नासाकेश**–नाकांतील केस. **षंढ**–नपुंसक, पौरुषहीन. **मेहन**–शिश्न,

लिंग. **अंगुळें**–बोटें. (अंगुळें हें एक मापनाचें परिमाण होतें.) **क्षितिभार**–भूमीला भार. **मातापित्यांच्या मळें**–मानवी देह हा मातापित्यांच्या मळापासून घडला आहे, ही कल्पना. त्याला वैशिष्ट्य येतें तें गुणांनीं, पराक्रमानें.

२५. **हींवराख्य तरु**–हिंवराचें झाड. (हिंवराच्या झाडाखालीं व झाडावर भुतांचा निवास असतो, अशी लोकश्रद्धा असल्यामुळें त्याची छाया शीतल असली तरी निरुपयोगीच ठरते.) **जाया**–पत्नी. नटी स्त्री जर पत्नी केली तर ती (निष्ठाहीनतेमुळें) निरुपयोगी ठरते. **मेदिनी**–पृथ्वी.

२६. **बिल्व**–वेल. **सुम**–फूल. **तद्व्रत**–त्याचें (शंकराच्या उपासनेचें) व्रत. **एकनिष्ठ मनसें**–एकनिष्ठ मनानें. **अत्युत्सवें**–अत्यंत उत्साहानें. **संभ्रमें**–गुंग होऊन. **सारसाक्षिणि**–(सारस–कमळ, अक्ष–डोळा) कमलाक्षी.

२७. **कुशस्थळीं**- द्वारकेभोंवतालचा प्रदेश. **वेल्हाळी**–सुंदर. **सुपर्णवत्**–(सुपर्ण गरुड) गरुडाप्रमाणें. **सुधा**–अमृत. **अमरलोक**–स्वर्ग. **सुरेश्वर**–इंद्र.

२८. **जरि...चिर्त्तीं**–जर मीं मनांत आणलें. **आपांपती**–समुद्र. (आप–जल). **अस्त्रानल**–अस्त्राचा अग्नि, अग्न्यस्त्र. **निगुती**–निश्चितपणें. **कंदुकप्राय**–(कंदुक–चेंडू) चेंडूप्रमाणें **हातीं**–(केवळ) हातानें. **नक्षत्रपंक्ती**–नक्षत्रांच्या ओळी. **धरेमाजीं**–पृथ्वीवर. **निखिळवीरधुरीण**–सर्व वीरपुरुषांचा पुढारी. **पंडुनंदन**–पंडुराजाचा पुत्र–अर्जुन.

२९. **द्वारकानिलयनिवासी**–द्वारकेंतील राजभवनांत राहणारा. **दाशार्ह**–श्रीकृष्ण. **कृपावारिराशी**–कृपेचा समुद्र. **मदीय**–माझ्या. **चिंताग्रीष्माग्निज्वाळा**–चिंतेच्या उन्हाळ्याच्या झळा. **कैसेन**–कशा प्रकारें. **गहनाभिप्राय**–गूढ हेतु. **करुणाजलधरअपांगवृष्टि**–करुणेचा मेघ असलेल्या (श्रीकृष्णाच्या) कृपादृष्टीची वृष्टि. **मानसकासार**–मानससरोवर (मनाचें तळें). **राजीवदळनयन**–ज्याचे डोळे कमळदळांसारखे आहेत असा.

३०. **संदीप्त केला**–भडकवला. **वदनसरोज**–मुखरूपी कमळ. **सुवर्णपीतवर्ण**–सोन्यासारखा पिवळेपणा, फिकटपणा. **सांद्र**–स्निग्ध वा गडद. **चिंताज्वरजनित**–चिंतेच्या तापांतून उद्भवलेली. **कार्श्यता**–कृशपणा. **हुताशज्वाला**–अग्निज्वाला.

३१. **अस्मिन्नवसरीं**–अशा वेळीं, या वेळीं. **निशीथसमयीं**–मध्यरात्रीच्या वेळीं.

३२. **धनुर्बाणग्रहणीं**–धनुष्यबाण घेण्यासाठीं. **याज्ञसेनी**–द्रौपदी. **आयुध**–शस्त्र. **कुरुमणी**–कुरुकुळांत श्रेष्ठ, अर्जुन.

३३. **नारदवाक्यमर्यादापाळणीं**–नारदाच्या वचनाची प्रतिष्ठा राखण्यासाठीं. (द्रौपदीला अर्जुनानें स्वयंवरांत जिंकल्यानंतर ती पांचहि पांडवांची पत्नी झाली. तिच्या सान्निध्याबाबत भावाभावांत कलह होऊं नयेत, म्हणून नारदानें त्यांना वर्षाचे समान भाग वांटून दिले आणि असा निर्वंध घातला कीं, "पांडवांपैकीं कोणाहि एकाबरोवर द्रौपदी एकान्तांत असतांना अन्य कोणी पांडवानें त्यांना पाहिल्यास पाहणारानें प्रायश्चित्त म्हणून बारा वर्षें तीर्थयात्रेला जावें.") **पुरुषार्थसागर**–पराक्रमाचा समुद्र. **प्रतिज्ञासिद्धकरणीं**–नियमाचें पालन करण्यासाठीं. **पुण्यअवनी**–पवित्र पृथ्वी. **निषेवण**–सेवा, पूजा, उपभोग. **कार्पटिकवेष**–कापड्याचा (यात्रिकाचा) वेश. **वीरशिखामणि**–वीरश्रेष्ठ. **प्रभासप्रदेश**–सौराष्ट्रांत द्वारकेपासून दूर नसलेला सोमनाथाजवळचा भाग.

३४. **हृषीकेश**–श्रीकृष्ण. **तद्दर्शन**–त्याचें (श्रीकृष्णाचें) दर्शन. **तत्प्राण**–त्याचा जीव कीं प्राण असलेला (श्रीकृष्ण).

३५. **कुशस्थळी**–द्वारकेचा परिसर. **वनस्थळी**–वनप्रदेश. **अपुण्य**–पुण्यहीन. **सुरेंद्रालयसाम्य**–इंद्राच्या अमरावतीशीं साम्य. **अघ**–पाप.

३६. **सौधमंदिरें**–गच्च्या असलेलीं घरें. **उन्नत**–उंच. **सौवर्णरत्नांवित**–सोनें व रत्नें यांनीं खचित अशीं. **निजोच्चतेनें**–स्वतःच्या उंचपणानें. **स्वदीप्तिनें**–स्वतःच्या झळाळीनें. **भानुकर**–सूर्यकिरण. **दापिती**–तुच्छ लेखतात, पराभूत करतात.

३७. **सुवर्णकलश**–सोन्याचे कळस. **पृथ्वी...शारदा तिया**–साक्षात् बृहस्पति (देवगुरु) अथवा शारदा यांनाहि द्वारकापुरीचें वर्णन करायचें धैर्य (धृति) नाहीं.

३८. **षोडशसहस्र**–सोळा हजार. **विभु**–प्रभु, वैभवसंपन्न. **चक्रपाणी**–ज्याच्या हातीं चक्र (सुदर्शन) आहे तो श्रीकृष्ण. **सुवर्णसदनीं**–सोन्याच्या घरांत (द्वारकेंतील घरें सोन्याचीं होतीं, ही समजूत). **उत्सवासीं**–आनंदानें, उल्हासानें. **सानंदती...घोषी**–तिन्ही लोकांचे स्वामी (त्रिभुवनेश्वर) त्याच्या (श्रीकृष्णाच्या) कीर्तीचा उद्घोष करतांना आनंदून जातात.

३९. **सुरमानवांची**–देवांची व मानवांची. **भौममुरमागधदानवांची**–भौमासुर, मुरदैत्य, मगधाचा राजा जरासंध हे सर्व श्रीकृष्णाचे शत्रु होते. त्यांचा पराभव करून त्यांची सर्व संपत्ति श्रीकृष्णानें द्वारकेंत आणली, हा भाव. **दिक्पति**–दिशांचे स्वामी. आठ दिशांचें संरक्षण करणारे अष्ट दिक्पाल मानले जातात, ते असे : पूर्व–इंद्र, आग्नेय–अग्नि, दक्षिण–यम, नैर्ऋत्य–निर्ऋति, पश्चिम–वरुण, वायव्य–मरुत्, उत्तर–कुबेर आणि ईशान्य–ईश.

४०. **ब्रह्मण्य**–ब्रह्मदेव. **देव**–महादेव. **गरुडध्वज**–ज्याच्या ध्वजावर गरुडाचें चिह्न आहे असा, विष्णु. **शेषशायी**–शेषावर शयन करणारा, विष्णु. विष्णु हा क्षीरसागरांत शेषाच्या वेटोळ्यावर निद्रा करतो, अशी पुराणकल्पना आहे. (द्वारावतींत राहणारा श्रीकृष्ण हा ब्रह्मा-विष्णु-महेशांना सामावणारा सर्वश्रेष्ठ देव आहे, हा भाव.) **दिवाळी**–आनंदोत्सवाचा परमोत्कर्ष.

४१. **पुराकृत**–पूर्वी केलेलीं, पूर्वजन्मींचीं. **अमितें**–असंख्य, अमूप. **जगदंतरवासकर्ता**–जगाच्या अंतर्यामीं वास करणारा. **त्रिजगैकभर्ता**–त्रिभुवनाचें पालन करणारा एकमेव देव.

४२. **संकर्षण**–बलराम. **कंदर्पकोटिसदृशा अतिसुंदरांगा**–ज्याचा देह कोटि मदनांसारखा सुंदर आहे अशा श्रीकृष्णाला. **लक्षिती**–पाहतात.

४३. **सखा**–मित्र. **मातुलेय**–मामेभाऊ. (श्रीकृष्ण हा अर्जुनाचा मामेभाऊ होता.) **आनंदसिंधु**–आनंदाचा समुद्र. **करुणामृतवारिराशी**–करुणामृताचा समुद्र.

४४. **हृद्गत**–हृदयांतले भावविचार, गूज. **तापत्रय**–आधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक ताप.

४५. **धनंजय**–अर्जुन.

४६. **राम**–बलराम. **साच**–खरोखर. **पसरोनि बाहीं**–भुजा पसरून.

४७. **विजय**–अर्जुन. **सर्वज्ञ**–सर्व कांहीं जाणणारा. **सर्वगत**–सर्वत्र व्यापून राहणारा. **कौंतेय**–कुंतीपुत्र अर्जुन. **सव्यसाची**–डाव्या आणि उजव्या अशा दोन्ही हातांनीं धनुष्यबाण कुशलतेनें वापरूं शकणारा. **इहा**–इच्छा.

४८. **स्वसा**–बहीण. **मदीया**–माझी. **विरचोनि**–रचून. **अगाधमाया**–गूढ कारस्थान.

४९. **कंजदलायताक्ष**–कमळदळांसारखे विशाल डोळे ज्याचे आहेत तो–श्रीकृष्ण. **संजोगिला**–सज्ज केला. **मृगया**–शिकार. **प्रमित**–अति परिमित, मोजकें, अगदीं थोडें.

♠ ♠ ♠

सर्ग तिसरा

१. **भक्तपक्षपाती**–भक्तांचा कैवारी. **मृगया**–शिकार. **मेध्यमृग**–यज्ञांत बळी देण्यास (अथवा बलवंत असल्यामुळें ठार मारण्यास) योग्य असे प्राणी. **मदनकोटिसुंदर**–कोटि मदनांइतका सुंदर. (मदन = कामदेव, हा सौंदर्याचा परमोत्कर्ष समजला जातो.) **पांथ**–वाटसरू. **कार्पटिक**–कापडी, यात्रिक. **कृषगात्र**–अशक्त, क्षीण, रोडावलेला. **वर्णविहीन**–फिकट, निस्तेज. **काषायवल्कल**–

भगवीं वल्कलें. **पंचमळादिग्धांग**–धूळ आदिकांनीं ज्याचें अंग माखलेलें आहे, असा. **दिवामणि**-सूर्य. **दुर्दिन**–ढगाळलेल्या हवेनें युक्त असा दिवस. **स्वतेज-तिरोधान**–आपल्या तेजाला झांकणें, लपविणें. **लोकचर्याजिज्ञासू**–लोकाचरण जाणून घेण्याची (नाना प्रकारचें लोकजीवन न्याहाळण्याची) इच्छा असलेला. **सुज्ञमणी**–जाणकारांत श्रेष्ठ.

२. **फाल्गुन**–अर्जुन. **केशकूर्चस्मश्रुनखवृद्धि**–केस, दाढी, मिशा आणि नखें वाढलेला. **धनंजय**–अर्जुन. **इंद्रनीळमणिभासुर**–इंद्रनीळ मण्यासारखा तेजस्वी. **इंद्रनंदन**–इंद्राचा पुत्र (अर्जुन हा कुंतीला इंद्राचा मंत्र जपल्यानें झाला होता). **देवकीनंदन**–देवकीचा पुत्र, कृष्ण.

३. **आस्मिन्नवसरीं**–या वेळीं. **सरिद्वरासरस्वतीजळीं**-सरस्वती या श्रेष्ठ नदाच्या पाण्यांत. **कृतस्नान**–ज्यानें स्नान केलें आहे असा. **आर्द्रभौळी**–ज्याचें मस्तक ओलें आहे असा. **अर्घ्यप्रदान**–पाणी ओंजळींत घेऊन गायत्री-मंत्रोच्चारपूर्वक सूर्याच्या संतुष्टीसाठीं खालीं सोडेंण. **अंशुमाली**–सूर्य. **प्रसारितबाहु**–ज्यानें हात पसरले आहेत असा. **उपस्थानवेळीं**–पूजेच्या वा प्रार्थनेच्या वेळीं. **सवितृमंडलमध्यस्थित-नारायणध्याननिष्ठ**–सूर्यबिंबामध्यें अधिष्ठित असलेल्या नारायणाच्या ध्यानांत गढलेला. **बद्धदृष्टि**–ज्याची दृष्टि खिळलेली आहे असा. **पार्थदर्शनोद्विग्नमन**–पार्थाच्या म्हणजे अर्जुनाच्या दर्शनानें ज्याचें मन वेडावलें आहे, असा. **सूर्यमंडलांतर्गतनिर्गतध्यानमूर्तीसमान**–सूर्यमंडलांतील नारायणाचें ध्यानच जणुं बाहेर येऊन पुढें उभें रहावें, असा. **अनंतमध्यान्हार्कभासुर**–मध्यान्हींच्या अनंत सूर्यांसारखा प्रखर तेजस्वी. **शैब्य, सुग्रीव, मेघपुष्प, बलाहक**–श्रीकृष्णाच्या रथाला जोडलेल्या चार घोड्यांचीं नांवें. **स्यंदन**–रथ. **दारुकसारथीप्रेरित**- दारुकनामक सारथ्यानें हांकलेला (रथ).

४. **अर्थ**–इच्छा, कामना. **बाष्पांबु**-आसू.

५. **रमाराधितकमलमृदुचरणीं**–रमेनें (लक्ष्मीनें) ज्यांची सेवा केली आहे आणि जे कमळासारखे कोमल आहेत, अशा चरणांवर. **अष्टभाव**–कंप, रोमांच, स्फुरण, प्रेमाश्रु, स्वेद, हास्य, प्रलास्य आणि गायन हे अष्ट सात्त्विक भाव होत. (पर्यायी गणना–स्तंभ = गतिनिरोध, स्वेद, रोमांच, वैरस्य, वेपथु=कंप, वैवर्ण्य, अश्रुपात आणि प्रलय = चेष्टानिरोध.) **नीरपूर**–पाण्याचा ओघळ. **नीरज-दळसदृशलोचनी**–कमळदळांसारख्या डोळ्यांतून. **संदोह**–भर, आवेग.

६. **अतसीपुष्पसंकाश**–अळशीच्या फुलासारखा, निळा (कृष्ण) **मंद-हासकिरणसंयुक्तवदनचंद्र**–(श्रीकृष्णाचें) मुख चंद्रासारखें असून, त्याचें मंदहास्य हींच त्या चंद्राचीं शीतल किरणें होत. **अरुणारविंददळनयन**–लाल-

सर कमळाच्या दळांसारखे डोळे. **सूर्यकोटिसंकाश**–कोटी सूर्यांप्रमाणें (तेजस्वी). **कटिदेशीं**–कमरेला. **पीतपट**–पिवळें वस्त्र. **आपादलंबिनी**–पायांपर्यंत लोंबणारीं. **वैजयंती**–श्रीकृष्णाच्या गळ्यांतील माळेचें नांव. **शंखचक्रगदारविंद** शंख, (पांचजन्य), चक्र (सुदर्शन), गदा आणि कमळ. **वरायुधें**–श्रेष्ठ आयुधें. **भक्तार्तिनिवारकदीक्षित** भक्तांचीं दुखें दूर करण्याचें व्रीद बाळगणारा. **कुमार**–सनत्कुमार. **नरावतारी**–नर नामक ऋषीचा अवतार, अर्जुन. नर आणि नारायण नामक दोन ईश्वरस्वरूपी वैदिक ऋषि होते. अर्जुन आणि श्रीकृष्ण हे त्या नर-नारायणाचेच अवतार होत, अशी महाभारताची धारणा आहे. **धन्योऽहं धन्योऽहं**–मी धन्य झालों, मी धन्य झालों !

७. **नवघनश्यामल**–पावसाळ्याच्या प्रारंभीं येणाऱ्या मेघासारखा सांवळा. **मनोरथतरु...फळला**–श्रीकृष्णरूपी मेघाच्या केवळ दर्शनानेंच (प्रत्यक्ष कृपावृष्टि होण्यापूर्वीच) अर्जुनाच्या मनोरथांचा वृक्ष फोफावून, तो अमृतफळांनीं लगडला. परमेश्वराच्या केवळ दर्शनानेंहि भक्तांच्या मनःकामनांची पूर्ति होते, हा भाव. (पहा : 'दर्शनमात्रें मनःकामना पुरती । '–रामदासकृत गणेशाची आरती.) **चिंता...वर्षला**–चिंतारूपी दावाग्नीनें (दाव = अरण्य, पावक=अग्नी) होरपळलेल्यावर अकालींच महामेघ वरसला. **आयुष्यावसानीं**–आयुष्य सरण्याच्या क्षणीं, मृत्युसमयीं **विकसितमुखनयन**–ज्याचें मुख आणि नेत्र प्रफुल्ल बनले आहेत असा. **संभ्रमें**–लगबगीनें. **भुजद्वय**–दोन्ही हात. **सखामणी**–मित्रश्रेष्ठ. अर्जुन हा श्रीकृष्णाचा परम सखा व सख्यभक्तीचा आदर्श मानला जातो.

८. **सच्चिदानंदविग्रहपरिरंभ**–सत्, चित् आणि आनंद यांची मूर्ति (विग्रह) असलेल्या श्रीकृष्णाचें आलिंगन. **हृदय हृदया.....स्वयंभ**–येथें ज्ञानेश्वरीच्या अंतिम अध्यायांत वर्णिलेल्या कृष्णार्जुनभेटीच्या वर्णनाचें प्रतिबिंब जाणवतें. पहा : 'हृदया हृदय एक जालें । ये हृदयींचें तें घातलें । द्वैत न मोडितां केलें । आपणांऐसें पार्था ॥ ' ज्ञा. १८·१४१२. **आनर्वाच्य**–वर्णनातीत, शब्दातीत. ज्याचें स्वरूप शब्दांनीं व्यक्त करतां येत नाहीं असा. पहा : 'अनिर्वचनीयं तत्स्वरुपम् । ' नारदभक्तिसूत्र. **अंबुजसंभवाद्यखिलजगदारंभ**– अंबुजसंभव = ब्रह्मदेव (अंबुज = कमल, संभव = जन्मलेला). ब्रह्मदेव हा महाविष्णूच्या नाभिकमलांतून जन्मला. ब्रह्मदेव हा सृष्टीचा निर्माता. परंतु परमेश्वर हा ब्रह्मदेवापासून (अंबुजसंभवात्) मुंगीपर्यंत (आब्रह्मपिपीलिका सर्व जगताचा मूलारंभ होय. **अमरोरगनरेंद्रमुनींद्रवंदितचरण**–देव (अमर), नाग (उरग), राजपुरुष (नरेंद्र) आणि महामुनि (मुनींद्र) यांनीं ज्याचे चरण वंदिले आहेत असा.

९. **आनंद आनंदनिधी श्रीकृष्णमानसा**–श्रीकृष्ण हा साक्षात् आनंदाचा खजिनाच. 'आनन्दं ब्रह्म । ' परंतु भक्तदर्शनानें त्या आनंदसागरावर उत्तुंग लाटा

उसळतात. ज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरीच्या बाराव्या अध्यायांत भगवंताच्या या सुखाचें हृदयंगम चित्रण केलें आहे. **कृपणगत...मानिला**–कृपणाच्या धनाच्या प्राप्तीप्रमाणें धनंजय अर्जुनाच्या भेटीनें श्रीकृष्णाला संतोष झाला. (येथें अर्जुनाचें ' धनंजय ' हें नांव अत्यंत मार्मिकपणें योजलें आहे.) **आस्यकमळ**–मुखकमळ. **कमलायताक्ष**–ज्याचे डोळे कमळदळांसारखे विशाल आहेत असा, श्रीकृष्ण. **अंतःप्रेमपुरःसर**–अंतःकरणांतील प्रेमाच्या आवेगानें.

१०. **प्राचीसरस्वतीसरिद्वरातटीं**–प्राची आणि सरस्वती नामक श्रेष्ठ नद्यांच्या तीरावर. **वटविटपिनिबिडछायातळवटीं**–वटवृक्षाच्या घनदाट सावलींत. **सृष्टिस्थितिलीलानाटकसूत्रधार**–जगताची निर्मिति (सृष्टि) आणि व्यवस्था (स्थिति) हें परमात्म्याचें एक लीलानाटकच आहे आणि तो स्वतः त्या नाटकाचा सूत्रधार आहे. पहा : ' स्वमायेचें आडवस्त्र । लेउनि एकला खेळवी सूत्र । बाहिरि नटि छायाचित्र । चौरासी लक्ष ॥ ' ज्ञा. १८.१२९४.

११. **निजजनकामपूर मंदार**–भक्तांच्या (निजजनांच्या) कामनांची पूर्ति करणारा कल्पवृक्ष. **मंदरोद्धर**–मंदभक्तांचा उद्धार करणारा. **सुरमुनि...कल्हार**–देव आणि ऋषि हे सेवक (किंकर) बनून ज्याच्या चरणकमलांची (अंघ्रिकल्हार) सेवा करतात असा. **परात्पर**–श्रेष्ठाहून श्रेष्ठ, सर्वश्रेष्ठ. **अनुवादणें**–बोलणें.

१२. **वृकोदर**–भीम. **याज्ञसेनी**–द्रौपदी, यज्ञसेन द्रुपदाची कन्या. **परमवृद्ध**–अतिशय म्हातारी. **पृथा जननी**–आई कुंती. **कार्पटिक वेष**–कापडी वेश. **पावनी**–पवित्र.

१३. **सुधाकल्प**–अमृतासारखी. **भगवन्मुखनिर्गत**–भगवंताच्या मुखांतून निघालेली. **प्रेमसौरभ्यसहायिनी**–प्रेमाच्या सुगंधानें युक्त. **शिराणी पुरणें**–धणी पुरणें, तृप्ति होणें. **नीळकंठ**–मोर. **नवनीरदध्वनि**–पावसाळ्याच्या आरंभींच्या मेघांचा गडगडाट. परमेश्वर हा मेघ आणि भक्त हा मयूर असल्याची कल्पना भक्तिसाहित्यांत वारंवार आढळते. श्रीकृष्ण हा वर्णानें मेघश्याम असल्यामुळें त्याच्या बाबतींत तर ही कल्पना अधिक शोभतें. मोरोपंतांची (भक्तमयूराची) ' केकावली ' या संदर्भांत ध्यानीं घ्यावी. **गांडीवपाणि**–(ज्याच्या हातीं गांडीव नामक धनुष्य असतें, तो) अर्जुन. **पीतामृतासमान**–अमृत प्यायल्याप्रमाणें. **कथनी**–निवेदन, कथन. **सर्वज्ञशिखामणि**–सर्वज्ञांमध्यें श्रेष्ठ. **सज्जनसंतापपरिहारक**–सज्जनांचा ताप दूर करणारा.

१४. **अज्ञानवंतें जसें**–अडाण्यानें विचारावें तसें. **धर्मसुतासमेत**–धर्मराज युधिष्ठिराबरोबर. **सुहृदीं**–आत्मीय संबंधांच्या व्यक्तींमध्यें. **त्वां ठेविलें त्यापरी**–अर्जुनाच्या या उद्गारांत त्याचा परमेश्वराच्या कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम्–

शक्तीवरील दृढ विश्वास व्यक्त झाला आहे. त्याच्या शक्तीवांचून कांहींहि घडूं शकत नाहीं, याची अर्जुनाला जाणीव आहे. पहा : ' ठेविलें अनंतें तैसेंचि रहावें।'—तुकाराम.

१५. **चापनिषंगखड्गकलना**–धनुष्य (चाप), बाणांचा भाता (निषंग) आणि खड्ग घेण्यासाठीं (कलन = घेणें). **द्रुपदजा**–द्रौपदी.

१६. **प्रायश्चित्तनिमित्त**–अर्जुनानें मत्स्यवेधाचा पण जिंकून द्रौपदी घरीं आणल्यानंतर व्यासांच्या अनुज्ञेनें तिचा विवाह केवळ अर्जुनाशीं न होतां पांचहि पांडवांशीं झाला. त्यानंतर वर्षाचे पांच कालखंड पाडून, द्रौपदी क्रमानें एकेका पांडवाच्या सहवासांत रहावी, अशी व्यवस्था झाली. या व्यवस्थेनुसार द्रौपदी कोणा एका पांडवाबरोबर एकांतांत असतांना जर अन्य पांडवानें त्यांना पाहिलें, तर त्यानें त्या अपराधाच्या क्षालनासाठीं बारा वर्षें तीर्थयात्रेला जावें, असें नारदानें ठरवून दिलें होतें. श्लोक क्र. १५ मध्यें उल्लेखिल्याप्रमाणें दैत्यांनीं चोरलेल्या ब्राह्मणांच्या गाई परत आणण्याच्या हेतूनें अर्जुन शस्त्रें आणायला प्रासादांत गेला, तों त्याला धर्मराज आणि द्रौपदी एकांतांत दिसली. त्यानंतर चोर दैत्याचें पारिपत्य करून ब्राह्मणाच्या गाई त्याला परत केल्यावर अर्जुन ठरल्याप्रमाणें तीर्थयात्रेला गेला. **तीर्थावगाह**–तीर्थस्नान. **दुष्कृततरु संछेदिला**–दुष्कृत्याचा वृक्ष तोडून टाकला.

१७. **जगत्रयादिजनक**–त्रिभुवनांचा निर्माता. **पातकपंक्ति**–पातकांची मालिका.

१८. **निजकुळकोटीसमेतें**–स्वतःच्या कोटिकुळांसह. **लघुतर**–लहानाहून लहान, क्षुद्र. **किंकर**–सेवक. **झालें दृशां पारणें**–डोळ्यांचें पारणें फिटलें.

१९. **मत्पुरास**–माझ्या नगरीला, इंद्रप्रस्थनगरीमध्यें. **सरोजनयना**–कमळांसारख्या डोळ्यांची. **हली**–बलराम. **सुविधिनें**–ब्राह्मविवाहपद्धतीनें.

२०. अर्जुन श्रीकृष्णाला म्हणतो, " हे हरि, तुझ्याशीं आमचें नातें अधिक जवळचें आहे कीं दुर्योधनाचें (अंधात्मजाचें–आंधळ्या धृतराष्ट्राच्या पुत्राचें)? तुझी ती सुंदर बहीण (साजिरी अनुजा) त्याला कशी वरील, कुणास ठाऊक! दुर्योधनाची तुझ्याविषयींची भावना कशी आहे, हें तूं जाणतोसच आणि आम्ही तुझे अनन्य सेवक आहोंत, याचीहि तुला जाणीव आहे."

२१. **वीजे करणें**–गमन करणें, जाणें.

२२. **पार्थपाषित गिरा**–अर्जुनानें उच्चारलेली वाणी. **तोषें**–संतोषानें. **मुदें**–आनंदानें. **आहे मात यथार्थ**–गोष्ट तर खरीच आहे. **सुयोधन**–दुर्योधनाचें शोभन नांव.

२३. **तुझ्या ठायीं कृतमति**–तुझ्या (अर्जुनाच्या) ठायीं जिनें आपलं मन जडवलें आहे अशी (सुभद्रा). **नियत**–ठरलेलें. **नरातें**–अर्जुनाला. अर्जुन हा नर ऋषीचा अवतार मानला जातो. **राम**–बलराम. **धार्तराष्ट्र**–धृतराष्ट्राचा पुत्र दुर्योधन. **तालांक**–बलराम. **स्नेहविच्छेदभेगें**–स्नेहांत दुरावा येईल, या भीतीनें.

२४. **तव नियत कार्या**–तुझ्या ठरलेल्या कार्यासाठीं. **अर्थ**–हेतु. **योग्यातें योग्य दीजे**–वधूवरांची अनुरूपता पाहून विवाह ठरवावा.

२५. **वार्षिकमास**-पावसाळ्याचे महिने. **यामध्यें च**–या चार महिन्यांच्या काळांतच.

२६ **गिरिराज**–श्रेष्ठ पर्वत. **व्याहाळीं**–अरण्यांत. **भूधर**–पर्वत. **वारुणी-मदिराक्षीप्रसक्त**–मदिरा आणि स्त्री यांच्या सेवनांत धुंद.

२७. **रसाधीश्वरवरुणप्रेषित**–रसांचा अधिपति वरुण यानें पाठविलेली. **सुरादेवी**–सुरा (दारू) हीच कोणी देवता. **तरुकोटरीं निवसत**–झाडाच्या ढोलींत राहते. झाडांपासून (शिंदी, माड, वगैरेंसारख्या झाडांपासून) बनणाऱ्या सुरेसंबंधींचा हा उल्लेख दिसतो. **क्षीब**–मत्त. **पूर्णकाम**–ज्याची कामना पूर्ण झाली आहे असा.

२८. **कुटीचक-बव्होदक-प्रकारीं**–कुटीचक आणि बहूदक हे संन्याशांच्या चार प्रकारांपैकीं एकाहून एक श्रेष्ठ असे दोन प्रकार आहेत. कुटीचक, बहूदक, हंस आणि परमहंस अशी संन्याशांची चढती श्रेणी मानली जाते. पहा : ' चतुर्विधा भिक्षवस्ते कुटीचकबहूदकौ । हंसः परमहंसश्च यो यः पश्चात् स उत्तमः ॥ '

३०. **देवकीजठराकरनीलरत्न**–श्रीकृष्ण. देवकीजठर म्हणजे देवकीची कूस हाच आकर म्हणजे समुद्र. त्यांतून निर्माण झालेलें नीलरत्न म्हणजे नीलवर्णाचा श्रीकृष्ण. **सुभट**–श्रेष्ठ वीर. **फाल्गुन**–अर्जुन.

३१. **घोरांधारी**-निबिडतेमुळें भयानक असें. **इभभग्न द्रुमांच्या हारी**–हत्तींनीं दिलेल्या टकरांमुळें भग्न झालेल्या झाडांच्या रांगा. **यूथप**–कळप (हत्तींचे). **वासित**–सुगंधित. **मदमत्त करी**–माजलेले हत्ती. **किंपुरुषसुंदरी**–किन्नरस्त्री, किन्नरी. **कुमुदोत्पलकल्हारीं**–विविध प्रकारच्या कमळांनीं. **निजकुचकलश... नीरीं**-आपल्या पुष्ट आणि विशाल स्तनांवर रेखलेल्या कुंकुमकस्तुरीच्या सुगंधानें परिमळलेल्या पाण्यांत. **मज्जन**–बुडी मारणें, डुंबणें, स्नान करणें. **रमण**–आनंदक्रीडा, विलास.

३२. **महामृगांचीं गणें**–मोठ्या प्राण्यांचे समूह. **गवय**–गवा. **गंडक**–गेंडा. **रोहित**–एक प्रकारचा जंगली प्राणी. **वृक**–लांडगा. **जंबूक**–कोल्हा.

शाखामृग–वानर, माकडें, इत्यादि झाडांवर राहणारे प्राणी. **व्याल**–सर्प. **नकुल**–मुंगुस. **शशक**–ससा. **सत्त्वजाति**–प्राण्यांचे प्रकार. **कुतुकायमान**–आश्चर्यकारक.

३३. **मणिशिला**–मूल्यवान् पाषाण, रत्नें. **नैशतमहरणीं**–रात्रीचा अंधार दूर करण्यांत. **दिनकल्प**-दिवसाप्रमाणें.

३४. **सौवर्ण राजत**–उत्तम वर्णामुळें शोभणाऱ्या. **ताम्र**–तांबें. **सीस**–शिसें. **गैरिक**–गेरू; सोनें. **मनःशिला**–एक वजनदार औषधी धातु (मनशीळ). **धरणीधर**–पर्वत (रैवतक). **धरणीधरदयित**–बलरामाला प्रिय असलेला. (धरणीधर = शेष, बलराम हा शेषावतार.)

३५. **खेंव**–(क्षेम) आलिंगन.

३६. **जंबु**–जांभूळ. **जंबीर**–महाळुंग; ईडालिंबू. **ताळ**–ताड. **हिंताल**–शिंदी. **नीप**–कदंब; नील अशोक. **निचोल**–(निचुल) कडूनिंब. **प्रियंगु**–वाघांटी. **प्रियाळ**–खिरणी. **जपा**–जास्वंद. **दाडिम**–डाळिंब. **चंपक**–चांफा. **बदर**–बोरी. **पाटल**–पाडळी. **भल्लातक**–बिब्बा. **हरीतक**–हिरडा. **बिभीतक**–वेहडा. **आमल**–आवळा. **धव**–धावडा. **करवीर**–कण्हेर. **जातिफळ**–जायफळ. **तिंदुक**–टेंभुरणी. **वंजुल**–बोरू; अशोक; वेत. **नारिकेल**–नारळ. **कदली**–केळी. **पूग**–सुपारी. **आम्र**–आंबा. **आम्रातक**–आंबाडा. **वट**–वड. **अश्वत्थ**–पिंपळ. **पलाश**–पळस. **नगराज, शिखरिराज**–पर्वतश्रेष्ठ.

३७ **श्रीमदवुष्ट**–श्रीमंतीच्या मस्तीनें धुंद. **निजदयितासमालिंगनें**–आपल्या प्रियेला मिठी दिल्यानें. **तरुवर**–मोठे वृक्ष. **निजवनिताललतालिंगनें**–वेली याच जणुं प्रिया, त्यांना आलिंगन दिल्यानें. **तोषायमान**–संतुष्ट. **मल्लिका**–मोगरा. **वल्लिका**–वेली. **परिवेष्टित**–वेढलेले. **मदमत्तसमान**–धुंद, बेहोश. **कोरकमिसें**–कळ्यांच्या मिसानें. **दंतद्युति**–दंतप्रभा, दांतांची झळाळी. **अरुण पल्लव**–*लालसर पालवी*. **शोणाधर**–*लाल ओठ*. **किंशुक**–पळस (पळसाचीं फुलें). **पीतांशुक**–*पीतांबर, पिवळें वस्त्र*. **पिकरव**–कोकिळांचा आवाज. **शुकभाषण**–पोपटांचें बोलणें. **केका**–मोराचें ओरडणें. **वारिवाह**–मेघ. **भूरुहराज**–वृक्षश्रेष्ठ.

३८. **निजवासार्थ**–आपल्या निवासासाठीं. **क्षेमकारी**–सुखद, कल्याणकर. **हरिताश्वनंदन**–इंद्रपुत्र अर्जुन. **हरिध्वज**–(हरि = वानर, हनुमान) ज्याच्या ध्वजावर हनुमान आहे, तो अर्जुन.

३९. **काषायवास**–भगवें वस्त्र. **वल्कल**–झाडाच्या सालीचें वस्त्र. **मृगाजिन**–हरिणाचें कातडें. **वृषी**–दर्भासन. **त्रिवेणु**–संन्याशाचा त्रिदंड. **सूत्र**–जानवें. **शिखा**–शेंडी. **सद्गृहांतर**–सकाम मनाचा. **जनमोहनार्थ**–लोकांना फसविण्यासाठीं. **परमहंसचर्या**–श्रेष्ठतम संन्याशाचा आचार.

४०. **नवतुळसीदळमंजरीहरितें**–तुळशीशीं कोंवळीं हिरवीं पानें व मंजरी. **आम्रकिसलय**–आंब्याची पालवी. **जाती**–जाई.

४१. **ग्रीष्मऋतुपर्यवसानीं**–उन्हाळ्याच्या अखेरीस. **जलदाकुलगगन**–मेघांनीं भरलेलें आकाश. **प्रारब्धैकदत्तदृष्टि**–जें घडणार असेल तें घडो, अशा विचारानें स्थिर बनलेला. **पांडवरत्नहारमध्यमणी**–पांच पांडवांचा एक रत्नांचा हार कल्पिला, तर अर्जुन हा त्या हारांत मध्यें शोभणारें श्रेष्ठतम रत्न आहे, हा भाव. अर्जुन हा वयानेंहि मधलाच आहे. **पुरवनिता**–नागरस्त्रिया. **कामदेव-महोत्सवनिर्माणकारी**–उद्दाम कामभावना उसळविणारा.

♠ ♠ ♠

सर्ग चौथा

१. **अस्मिन्नवसरीं**–या वेळीं. **अमरासुरनरनमस्कृतचरण**–ज्याच्या चरणीं (सकल) देव, दानव व मानव हे नमस्कार करीत आहेत, असा. **नारायणांशकळाष्टमावतारमूर्तिमंत**–नारायणाच्या अंशकळेचा साक्षात् आठवा अवतार–बलराम. श्रीकृष्ण हा भगवंताचा पूर्णावतार समजला जातो आणि बाकीचे अंशावतार मानले जातात. त्याचमुळें कांहीं अवतारगणनाप्रसंगीं आठवा अवतार म्हणून बलरामाचा समावेश केलेला आढळतो. जयदेवाच्या गीतगोविंदांतील प्रारंभींच्या 'जय जय देव हरे।' या अष्टपदींत आठवा अवतार म्हणून 'हली' म्हणजे बलरामच वंदिलेला आहे. **संकर्षण**–बलराम. वैष्णवांच्या चतुर्व्यूह-संज्ञांमध्यें बलरामासाठीं ही संज्ञा वापरली जाते. **सात्वतवृंदानंदसंदोह**–बलराम हा यादवांच्या सात्वत कुळांतला; म्हणून तो सात्वतसमूहाच्या आनंदाचा राशि होय. **निजदयित**–स्वतःला प्रिय. **अवनीभुजमंडळ**–राजश्रेष्ठ. **तालांकध्वजभूषित**–तालवृक्षाच्या चिन्हानें युक्त असा ध्वज, त्यानें सजलेला (रथ). बलरामाचा ध्वज तालांकित असल्यामुळें बलरामाला तालांकित हें नांव लाभलें होतें. **आरूढयौवन**–यौवनाच्या भरांत असलेला.

२. **प्रथम वर्षागमसमयीं**–पावसाळ्याच्या प्रारंभीं. **नानाद्रुमफलपक्व-भारभूषित...विनीतवत्**–बलरामाला प्रिय असलेला रैवतक पर्वत हा पिकलेल्या फळांच्या भारानें युक्त अशा नाना प्रकारच्या वृक्षांनीं नटलेला होता; खजूर, जांभूळ, जंबीर (ईडलिंबू), फणस, इत्यादि वृक्ष रसाळ फळांच्या भारानें नमलेल्या फांद्यांमुळें बलरामापुढें शिरें नमवून नम्र बनल्यासारखे दिसत होते. या वृक्षांच्या नम्र शाखांच्या रूपानें रैवतक जणुं बलरामाचें सादर स्वागत करीत होता. **प्रमत्त...चारुनेत्र**–(ठिकठिकाणच्या झाडांच्या ढोलींत बसून प्रियेसह मद्यप्राशन केल्यामुळें) ज्याचे कमळदळांसारखे विशाल सुंदर डोळे धुंद व लाल झाले आहेत असा,

बलराम. **विकसित...कंधर**–फुललेल्या मंदार फुलांच्या माळेनें ज्याचा कंठ भूषित झाला आहे असा, बलराम. **पुरंधरादि...पदारविंद**–इंद्रादि देवांनीं ज्याचीं चरण-कमळें वंदिलीं आहेत असा, बलराम. **नगराजदरी**–पर्वतश्रेष्ठ रैवतकावरील गुहा.

३. **तैं**–तेव्हां. **यतिराज**–श्रेष्ठ संन्यासी. **काषायांबर**–भगवें वस्त्र. **संन्यासिप्रिय राम**–ज्याला साधुसंन्याशांबद्दल प्रेम आहे असा बलराम. **भिक्षुत्व**–संन्यास, वैराग्य.

४. **वैराग्यें धरिलें स्वरूप सगळें**–जणुं वैराग्यच सगुण साकार होऊन प्रकटलें आहे. **कामीं...मना**–मनाला कामवासनेच्या ठायीं गुंतवीत नाहीं. **प्राणाचिया धारणा**–प्राण धारण करण्यासाठीं, जगण्यासाठीं. **कद्धीं**–कधीं. (वृत्तसुखार्थ प्रथमाक्षर दीर्घ हवें, म्हणून ' कधीं 'चें हें भ्रष्ट रूप साधलेलें दिसतें.)

५. **अटवीं**–अरण्यांत. **नैरापेक्षपद**–अपेक्षारहित अशी मनाची अवस्था, निष्कामता.

६. **दंडापरी वंदना**–दंडवत् प्रणाम, भूमीवर सर्वांग लोटून केलेलें वंदन. **संन्यासी...नव्हे**–(संन्याशानें सकल कामनांचा निरास करून चित्त परमवस्तूच्या ठायीं स्थिर केलेलें असल्यामुळें) संन्यासी हा मानव नसून साक्षात् हरिच होय.

७. **तालांक**–बलराम. **संप्रश्न**–कुशल प्रश्न. **सतोषविनयें**–संतोष आणि विनय यांसह. **बद्धांजुळी**–हात जोडून. **विस्तरें**–विस्तारानें.

८. **हळी**–हे बलरामा ! ' हलिन् ' हें बलरामाचें एक नांव. हल म्हणजे नांगर हें त्याचें आयुध असल्यामुळें त्याला हें नांव लाभलें. अन्वय : अर्जुन सांगे, ' (हे) हळी, आयकें. (आम्ही) धर्मराजनिकटीं होतों. इंद्रप्रस्थपुरासमीप वसतां धरानायकें धर्में मान केला. परंतु आम्ही निःस्पृह यती आहों. ये सन्मति (बलरामा), अम्हां गृहाश्रमवतांसंगें संगती कधीं योग्य नोव्हे. ' **धरानायक**–राजा.

९. **तीर्थनिवहीं**–तीर्थांच्या समूहांत, अनेक तीर्थांत. **पाविली**–पवित्र झाली.

१०. **चातुर्मास्यादिनांसि कंठुनि**–चातुर्मास्याचे दिवस कंठून. संन्यासी चातुर्मासाचा काळ (आषाढ शु ११ त कार्तिक व ११ कोठें तरी एके ठिकाणीं राहून व्रतस्थपणें घालवितात. **जेथें धर्मज...आगळा**–ज्या ठिकाणीं सत्यालाच परम धर्म मानणारा आणि दिलेलें वचन सत्य करणारा असा वैशिष्ट्यपूर्ण धर्मपुत्र युधिष्ठिर नांदत आहे (त्या सुस्थळा–इंद्रप्रस्थनगराला).

११. **योगींद्रविश्राम**–योगीजनांच्या संगतींत आणि सेवेंत विसांवणारा, बलराम. **वर्षादिन**–पावसाळ्याचे दिवस. **बद्ध**–प्रपंचासक्त

१२. **लोकांचिया तारणा**–लोकोद्धारासाठीं. **हृत्पद्मीं**–हृदयरूपी कमळांत. **निशिवार**–अहर्निश, रात्रंदिवस. **हृद्व्जनिलय**–हृदयकमळरूपी निवासगृह.

भक्तिप्रेमनिबद्ध–भक्तिप्रेमानें बांधलेला. (पहा : ' नाहं वसामि वैकुण्ठे, योगिनां हृदयेऽपि वा । मद्भक्ता यत्र गायन्ति, तत्र तिष्ठामि नारद ॥ ')

१३. ' तुमच्यासारख्यांना जे भजतात, तुमची जे संतोषानें पूजा करतात आणि तुम्हांला जे अन्नोदक अर्पण करतात, ते हरिभक्तीनें प्राप्त होणारें फळ पावतात. ' हा भाव पहिल्या श्लोकार्धांत व्यक्त झाला आहे. **साक्षाल्लोकनिवास**– (साक्षात् + लोकनिवास) लोकनिवास म्हणजे लोकांच्या ठायीं जो आहे आणि लोक ज्याच्या ठायीं आहेत, असा.

१४. **झाला'''भूतळीं**–(तो श्रीकृष्ण) भूमीचा भार दूर करण्यासाठीं (भूभरवारणार्थ) म्हणजेच दुष्टांचा संहार करण्यासाठीं आणि सज्जनांच्या रक्षणा-साठीं भूमीवर (भूतळीं) अवतरला आहे. (पहा : ' परित्राणाय साधूनां, विनाशाय च दुष्कृताम् । धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥ ' गीता, ४.८.)

१५. **अंतराय**–अडथळा, अडचण, दुरावा. **विभु**–सर्वव्यापी सर्वशक्तिमान परमेश्वर. **निर्लेप**–(सर्व कर्मे करून) कर्म-फलांच्या लेपापासून अलिप्त. **सर्वां घटीं**–सर्व प्राणिमात्रांच्या ठायीं. **व्योम**–आकाश. अभ्रें आकाशांत येतात आणि जातात, परंतु आकाश त्यांपासून अलिप्त असतें. **राहटी**–संचार, लीला, क्रीडा.

१६. **भिक्षुप्रिय**–साधुसंन्याशांविषयीं प्रेम बाळगणारा. **निष्किंचनवित्त**–अपरिग्रही, सर्व धनद्रव्याचा ज्यांनीं त्याग केला आहे असे. **त्यांचें दास्य करी, समस्त पुरवी**–पहा : ' तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् । ' गीता, ९·२२.

१७. **सुधोपमान**–अमृताप्रमाणें मधुर. **विज्ञापना**–विनंती. **श्रुतिमतें**–वेदविचारांनीं युक्त अशीं (सदुत्तरें–चांगलीं वचनें.)

१८. **नगराज**–श्रेष्ठ म्हणजे मोठे पर्वत. **अघहरा**–पापाचें हरण करणाऱ्या.

१९. **कंथाजिनें**–गोधडीसारखीं ओबडधोबड वस्त्रें आणि हरिणांचीं वा वाघांचीं कातडीं. **वल्कलें**–झाडांच्या पातळ सालींचीं वस्त्रें. **काषायांबर**–भगवें वस्त्र. **जिणति**–जिंकतें. **पद्माक्ष**–कमलबीज. **धात्रीफळ**–धावड्याचें फळ.

२०. **एणनाभि**–कस्तुरी. **काश्मीरपंक**–केशराचा लेप. **विभूति**–भस्म. **भूतिद**–कल्याणकर. **करकंजपात्र**–करमळ हेंच पात्र (ओंजळ). **तोयाचिया प्राशना**–पाणी पिण्यासाठीं. **उपबर्ह**–उशी.

२१. **पुलिन**–वाळवंट. **शाद्वल**–हिरवळ. **राकाचंद्र**–पौर्णिमेचा चंद्र हाच आमचा उत्तम दिवा. **मंदानिळीं**–मंद वाहणाऱ्या वायूंत आम्हांला चामरें ढाळल्याचें सुख प्राप्त होतें. **भोगूं...स्त्रिया**–विरक्ति, मुक्ति, तुर्यानुभूति (जागृति, स्वप्न, सुषुप्ति यांच्यापलीकडची अवस्था) याच जणुं स्त्रिया–त्यांचा उपभोग घेऊं; म्हणजे परमानंदांत निमग्न राहूं.

२२. **जडजंगम**–जडचेतन, स्थावरजंगम. **समुद्या**–सर्व. **सर्वाद्य**–सर्वांत प्रथम. **अंतर्विविक्तस्थळीं**–निर्जन प्रदेशाच्या गाभ्यांत अथवा चित्ताच्या शुद्ध व एकाग्र अवस्थेंत.

२३. **कैं**–कसें; कशा प्रकारें. **मायी**–मायायुक्त, मायेचा स्वामी. परमेश्वर आपल्या मायेच्या द्वारां या अनंत नटनाट्यानें रंगलेल्या विश्वचक्राचें प्रवर्तन करतों.

२४. **चिद्गगन**–चिदाकाश, चैतन्याची सार्वत्रिक व्याप्ति. **गुण**–धागा. **पट**–वस्त्र. धागा जसा वस्त्राला व्यापून राहिलेला असतो, त्याप्रमाणें परमेश्वरानें हें सर्व विश्व व्यापलेलें आहे. **भांडीं मृत्**–भांड्यांमध्यें (मडक्यांमध्यें) सर्व मातीच (मृत्) व्याप्त असते. **कनकेंचि...आभूषणीं**–अलंकारांत सर्व सोनेंच व्याप्त असतें. **धणी**–स्वामी.

२५. **ब्रह्मा आदि पिपीलिकांतकरुनी**–ब्रह्मयापासून मुंगीपर्यंत. **चेष्टेना**–हालचाल करीत नाहीं. **तूळतंतु**–कापसाचा लहानसा धागा. त्याच्या महान् सत्तेविना कापसाचा लहानसा धागाहि हलूं शकत नाहीं.

२६. **संचित, प्रारब्ध व क्रियमाण**–संचित म्हणजे पूर्वकर्मांचें फळ. हें प्रत्येकालाच या जन्मीं भोगावें लागतें. जें भोगायला प्रारंभ झाला आहे तें प्रारब्ध आणि जें या जन्मीं भोगायचें आहे अथवा प्रारब्धाचें कारणरूप चालू जन्मांतील कर्मांचें जें फळ तें क्रियमाण. साधक प्रभुचिंतनांत जसजसा रमत जातो, तसतसा त्याचा देहभाव गळूं लागतो आणि प्रारब्धाचे भोग केवळ देहापुरते उरतात–त्यांचा लेप त्याला लागत नाहीं. अशा प्रकारें त्याचें संचितच एक प्रकारें जळून गेल्यावर क्रियमाण हें भाजलेल्या (भर्जित) बीजांप्रमाणें निर्जीव होऊन जातें. **डोहीं...भय दे**–डोहांत बुडून राहिलेल्या हत्तीला कडक उन्हाळ्यांतलें ऊन कसें भिववूं शकणार ?

२७. ' आमचें मन संतुष्ट असल्यामुळें आम्हांला ही दरीच (डोंगरांतली गुहाच) इंद्राच्या अमरावतीप्रमाणें आहे; हीं अरण्येंच नंदनवनासारखीं आहेत; हे वृक्ष कल्पवृक्षासारखे आहेत. ' हा भाव प्रथम श्लोकार्धांत व्यक्त झाला आहे. **ऐंद्री संपदा**–इंद्राचें वैभव.

२८. **वृकी**–लांडगीण. **सोनें आणि शिळा मृदासम गणूं**–पहा : ' सोनें नाणें आम्हां मृत्तिकेसमान । '- तुकाराम.

२९. **जें युक्त प्रत्युत्तरें**–(संन्याशाच्या बोलण्याच्या पार्श्वभूमीवर) जें परत बोलणें योग्य ठरेल तें.

३०. **गृहवंत त्यां गति तुम्ही**–जे गृहस्थाश्रमी सामान्य जन आहेत, त्यांना तुमच्यावांचून (म्हणजे सत्संगावांचून) अन्य गति (उद्धाराचा मार्ग) नाहीं. **सर्वग**–सर्वगामी, सर्वत्र.

३१. **अव्यंग प्रार्थना**–निर्मळ, प्रांजळ विनंती. **ते साम्य सर्वां स्थितीं**–सर्व अवस्थांत अथवा सर्व द्वंद्वात्मक अनुभवांत साधूंच्या चित्ताची समता ढळत नाहीं. (त्याचें स्पष्टीकरण पुढील श्लोकांत आलेलें आहे.)

३२. **पेचुमंद**–कडूनिंब. **आजगरी व्रताचरण**–अजगराप्रमाणें स्वस्थ पडून राहण्याचें व्रत. **बाधी वना निग्रहो**–(विषयांच्या ठायीं उदास असल्यामुळें विषयांपासून मनाला निवृत्त करण्याचा) निग्रह करण्याचा त्रास होतच नाहीं.

३४. **सध्यानयोग्य**–ध्यानधारणेला योग्य असें (एकांतमय). **जनसंघबाध**–लोकसंपर्काची बाधा. **ये ना वधूमंडळी**–(जेथें) स्त्रिया येणार नाहींत.

३५ **बीजे कीजे**–गमन करावें, जावें. **युक्तसी**–योग्य अशी.

३६. **त्रिजनां**–त्रैलोक्यांतील लोकांना. **एकत्वीं...दावितां**–तुम्ही दोघे (श्रीकृष्ण आणि बलराम) बंधु एकाच परमतत्त्वाचे आविष्कार आहांत. मायेनें तुम्ही एकत्वाच्या ठायीं दोन रूपें दाखवीत आहांत.

३७. **सर्व भूमि धरिसी...मस्तकीं**–बलराम हा शेषाचा अवतार मानला जातो. शेषानें मस्तकावर पृथ्वी धारण केली आहे, अशी पौराणिक धारणा आहे. **वक्त्रानळीं**–मुखांतील अग्नींत. **कल्पान्त**–प्रलयकाल. प्रलयाच्या वेळीं परमेश्वर सर्व विश्वाचा संहार करून आणि विश्वप्रेरक माया आवरून केवळ एकटाच राहतो.

३८. **निलांबरालंकृत**–निळ्या वस्त्रानें सुशोभित, बलराम. बलरामाचा वेश निळा असल्यामुळें त्याला 'नीलांबर' म्हणत असत. **सर्वाढ्य**–सर्वश्रेष्ठ. **देव आपुण घडे स्वच्छंद तो सारथी**–देव (बलराम) स्वेच्छेनें सारथी झाला.

३९. **हेमरथी**–सोन्याच्या रथांत. **वळघवी**–चढवी. **दृष्टी घडे पारणें**–दृष्टीला परम सुख लाभलें; जें अनुभवण्यासाठीं दृष्टि भुकेजली होती, तें तिला अनुभवायला मिळालें. **पृथाकुमार**–पृथेचा म्हणजे कुंतीचा पुत्र, अर्जुन.

४०. **आनकदुंदुभी**-वसुदेव (कृष्ण-बलरामांचा पिता). **उग्रसेन**–कंसाचा पिता.

४१. **हृष्ट**–हर्षभरित. **सुष्टप्रदा**–कल्याण करणाऱ्याला.

♠ ♠ ♠

सर्ग पांचवा

१. **तालांक**–बलराम. **काळत्रयीं**–त्रिकाळ (सकाळ, दुपार, संध्याकाळ); सर्व वेळ. **अति गुह्य ठायीं**–अत्यंत एकांतमय ठिकाणीं. **जनांची गति**–लोकांची वर्दळ, ये-जा.

२. **श्रीधर**–श्रीकृष्ण. **विभवें**–वैभवानें. **ब्रह्मेंद्र**–ब्रह्मा, इंद्र, इ. देव. **पादाब्जप्रक्षाळण**–पाय धुणें, पायांवर पाणी घालणें. (पाद = पाय, अब्ज = कमळ, पादाब्ज = चरणकमळ, **प्रक्षाळण**–धुऊन स्वच्छ करणें.) **श्रीपदतोय**–चरणतीर्थ. **सिरसा**–मस्तकानें; मस्तक नमवून. **पादतोय**–चरणतीर्थ. **प्रमोदें**–आनंदानें.

३. **प्रतिवासरीं**–रोज. **सायंप्रात**–सकाळ-संध्याकाळ. (सायं=संध्याकाळ, प्रातः = सकाळ.) **अविस्मरेंचि**–न विसरतां, न चुकतां. **सद्वंदना**–साधुवंदन करण्यासाठीं. **विजय**–अर्जुन. **सौख्याब्धि चित्तीं भरें**–(अर्जुनाच्या) मनांत सुखाचा समुद्र उचंबळत असे.

४. **द्वारवतीनिवास**–ज्यांचा निवास द्वारकेंत आहे, असे. **समुदे**–सर्व. **भोजांधकीं**–भोज आणि अंधक कुळांतील यादवांनीं. **शूरसेन**–वसुदेवाचा पिता, कृष्ण- बलरामांचा आजा. **मोहांध**–मोहानें अंध झालेले, अर्जुनाच्या यतिवेशाला भुललेले.

५. **सद्धर्मवेत्ता**–सद्धर्म जाणणारा. **लभसी**–प्राप्त करशील. **बलभाषण**–बलरामाचें बोलणें.

६. **निशिवार**–रात्रंदिवस. **भक्तिपरमें**–अत्यंत भक्तिभावानें. **खपवी**–घालवी, व्यतीत करी. **काळीं**–योग्य वेळीं, आवश्यक त्या त्या वेळीं. **शौच**–प्रातर्विधि. **मज्जन**–स्नान. **तृषानाश**–तहान शमविणें. **काषायांबर**–भगवें वस्त्र. **कौपीन**–लंगोटी. **सत्करें**–शुभहस्तें.

७. **तापितमनीं**–तपस्व्याच्या (तापसी वेशांतील अर्जुनाच्या) मनांत. **कंदर्प कांडे**–कामभाव उसळूं लागे. **मना संमता**–मनाजोगती, मनपसंत. **सुदती**–जिचे दांत सुंदर आहेत, अशी (सुभद्रा). **विजय**–अर्जुन. **तद्रूप**–त्याच्यासारखा.

८. **धर्मनृपासमीप**–धर्मराज युधिष्ठिराच्या सान्निध्यांत. **गिरा**–वाणी, बोलणें. **समीप वसतां**–जवळ राहिल्यामुळें. **भीडही फिटली**–भीडहि चेपली, संकोचहि दूर झाला. **धर्मनिकटीं**–धर्मराजाच्या सान्निध्यांत.

९. **निजदिठीं लक्षिला**–आपल्या दृष्टीनें पाहिला. **श्रीमुखपद्म**–सुंदर मुखकमळ. **लक्षिन**–पाहीन.

१०. **गुणनिधी**–गुणांचा सांठा ज्याच्या ठिकाणीं आहे असा (अर्जुन). **कांत**–पति. **मातें**–मला. **घडो**–होवो, लाभो. **मद्भाग्य हें ऊघडो**–माझा भाग्योदय होवो. **नेच्छी**–इच्छीत नाहीं. **साचें**–खरोखर. **पदाब्जयुगलीं**–चरणकमळीं, पायांशीं. (तुमच्या पायांची मी शपथ घेतें.) **आण वाहणें**–शपथ घेणें.

११. **प्रेमरसांतरा गिरा**–प्रेमरसानें युक्त अशी वाणी. **भामिनी**–स्त्री. **कुंतिभोजकुमरीगर्भाकरींचा मणी**–(कुंतिभोज = शूरसेन यादवाचा मित्र राजा.

याला अपत्य नसल्यामुळें यानें शूरसेनाची कन्या कुंती हिला दत्तक घेतलें होतें. त्यामुळें कुंती ही कुंतिभोजकुमरी = कुंतिभोजाची कन्या बनली. गर्भाकर = गर्भ हाच समुद्र. मणी = रत्न.) कुंतीपुत्र अर्जुन. **कामिनी**–सुंदर स्त्री.

१२. **बंधू पांचसमेत अर्जुन असे**–अर्जुन हा पांच भावांतील एक आहे. **त्वां कामिला मानसें**–तूं मनांतून इच्छिलास. **पृथ्वीमंडण**–पृथ्वीचें भूषण असा. **राजराजमुकुटालंकार**–(राजराज = सम्राट्) सम्राटांच्या शिरोभागीं शोभणारा, सम्राटांचा सम्राट्. **सुललना**–सुंदर स्त्री.

१३. **सत्पराक्रम**–विक्रमशाली. **शंबरारिसम**–(शंबर = एक असुर, याला कृष्णपुत्र प्रद्युम्नानें मारलें.) प्रद्युम्नासारखे पराक्रमी. **स्वाधीन त्या मेदिनी**–पृथ्वी त्याच्या (दुर्योधनाच्या) आधिपत्याखालीं आहे. **कर्ण सैंधव**–कर्ण आणि (सिंधु देशाचा राजा) जयद्रथ.

१४. **वसुमती**–पृथ्वी. **भूप**–राजा. **समर्थ नोहति कदां**–कधींहि समर्थ होणार नाहीं.

१५. **पार्थभाषण**–अर्जुनाचें बोलणें. **मंदाक्षरें**–हळुवार आवाजांत. **सुयोधन**–दुर्योधनाचें शोभन नांव. **नेच्छी**–इच्छीत नाहीं. **देवेंद्रादिक अष्टदिक्पति**–इंद्रादि अष्ट दिशांचे स्वामी. अनुक्रमें असे : पूर्व–इंद्र, आग्नेय–अग्नि. दक्षिण–यम, नैर्ऋत्य–निर्ऋति, पश्चिम–वरुण, वायव्य–मरुत्, उत्तर–कुबेर आणि ईशान्य–ईश.

१६. **पंचानन**–सिंह. **बलधी**–बलवान् आणि बुद्धिमान्. **यांसीं न कोणी तुके**–यांची बरोबरी कोणी करूं शकणार नाहीं; यांच्याशीं कोणाची तुलना होऊं शकणार नाहीं. **साम्यता**–बरोबरी. (साम्य अथवा समता असा शब्द हवा. 'साम्यता' हें रूप सदोष आहे.) **पार्थ**–अर्जुन. **धनुष्टंकर**–धनुष्याच्या दोरीचा टणत्कार. **मूढता पावती**–हतबुद्ध होतात.

१७. **जिणती**–जिंकतात. **मेदिनी**–पृथ्वी. **भगा**–भिकारी, कंगाल. **पूर्ण करिते आहेति**–पूर्ण करणारे आहेत. **आतेचा सुत**–आत्येचा मुलगा अर्जुन. कुंती ही सुभद्रेची आत्या होय. आतेभाऊ आणि मामेबहीण यांचा विवाहसंबंध अवश्य घडविण्याची प्रथा अनेक कुळांत आजहि रूढ आहे. **कामसुंदर**–कामदेवासारखा सुंदर. **कोदंडदीक्षागुरु**–(कोदंड = धनुष्य) धनुर्विद्येचा आचार्य, धनुर्विद्यानिपुण. **अतिमित्र**–घनिष्ठ मित्र. **वरु**–श्रेष्ठ, पति.

१८. **एकानें**–एकट्यानें, एकट्या अर्जुनानें. **द्रुपदात्मजा**–द्रुपदकन्या द्रौपदी. **पृथ्वीभुज्**–राजा. **वीरांतरीं**–वीरांच्या उपस्थितींत. द्रौपदीस्वयंवरप्रसंगीं मत्स्यवेधाचा पण अनेक राजांच्या व कर्णादि वीरपुरुषांच्या उपस्थितींत एकट्या अर्जुनानें

जिंकलां. **खांडवदाह**–खांडव नामक वन जाळणें. पांडव लाक्षागृहांतून संकटांतून सहीसलामत सुटून बाहेर पडल्यावर अर्जुनानें स्वयंवरांत द्रौपदीला जिंकलें आणि त्यायोगें पांडवांचा बलाढ्य द्रुपदांशीं संयोग झाला. त्यानंतर धूर्त धृतराष्ट्रानें पांडवांना खांडववनाचा निर्जन भाग देऊन तिथें राज्य करायला सांगितलें. अर्जुनानें अग्न्यस्त्रानें खांडव वन जाळलें आणि तो भाग वसवून इंद्रप्रस्थाचें नवें राज्य उभारलें. **देवेंद्रही पाहतां**–इंद्र पाहत असतांना. (सति सप्तमी–' पश्यति देवेन्द्रे । ') **सुरां देखतां**–देव पाहत असतांना.

१९. **धनद**–कुबेर. **सरी**–बरोबरी. **अनंत**–श्रीकृष्ण. **समते**–बरोबरीला. **दुर्बुद्धि**- वाईट वृत्तीचा.

२०. **खद्योत**–काजवा **सूकर**–डुक्कर. **दिग्गज**–दिशांचा आधार असलेल्यांपैकीं हत्ती. आठ दिशांना आठ हत्तींनीं (अष्ट दिग्गजांनीं) पृथ्वी आपल्या पृष्ठांवर सांवरली आहे, अशी समजूत आहे. ऐरावत, पुंडरीक, वामन, कुमुद, अंजन, पुष्पदंत, सार्वभौम आणि सुप्रतीक हीं अष्ट दिग्गजांचीं नांवें होत. **श्वान**–कुत्रा. **उच्चैःश्रवस्**–इंद्राचा घोडा. हा समुद्रमंथनांतून निघालेल्या चौदा रत्नांपैकीं एक होय. **खर**–गाढव. गाढवानें उच्चैःश्रवसाशीं बरोबरी कशी करावी ?

२१. **शेष**–नागांचा प्रमुख. याला हजार जिभा असून यानें आपल्या मस्तकावर पृथ्वी धारण केली आहे, अशी समजूत आहे. **अलगर्द**–पाणसाप, विरोळा. **कूप**–आड, विहीर. **किंशुक**–पळस. **उन्मत्तवृक्षोद्भव सुमन**–धोतऱ्याचें फूल. धोतऱ्याचें बी अफूप्रमाणें मादक आणि विषारी असल्यामुळें त्याला ' उन्मत्तवृक्ष ' म्हटलें आहे. **काका**–कावळ्याला. **कोकिलसाम्यता**–कोकिळाची बरोबरी.

२२. **सुरेंद्रदेशिक**–देवगुरु, बृहस्पति. **अंधात्मज**–आंधळ्या धृतराष्ट्राचा पुत्र, दुर्योधन. **मेदिनी**–पृथ्वी.

२३. **सुरांत हरिसा**–देवांत जसा हरि तसा. **मणी**–रत्न. **चतुष्पदगणीं**–पशूंच्या समूहांत. **वनमृगीं**–वन्य प्राण्यांमध्यें.

२४. **पंचास्य**–(पंचानन) सिंह. **सुधा**–अमृत. **मनुष्यनिवहीं**–मनुष्यांच्या समूहांत. **यती आश्रमीं**–चार आश्रमांत (ब्रह्मचारी, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यासी यांमध्यें) संन्यासी जसा श्रेष्ठ तसा. **तुरंगमेध**–अश्वमेध नामक यज्ञ. हा सर्वश्रेष्ठ यज्ञ मानला जातो. **विप्रोत्तम**–चारी वर्णांत ब्राह्मण हा श्रेष्ठ वर्ण होय, अशी धारणा होती.

२५. **सुभद्रामुख...हंसवाहिनी**–सुभद्रेच्या मुखकमळांतून प्रकटलेली राजहंसाच्या कलरवासारखी मधुर वाणी. (हंसवाहिनी=सरस्वती, वाणी. हंस हें सरस्वतीचें वाहन मानलें जातें.) **चतुरतरसमाजमुकुटरत्न**–अत्यंत चतुर जनांमध्यें श्रेष्ठ असा अर्जुन. **नारीवचनसरणी**–स्त्रीच्या (सुभद्रेच्या) बोलण्यांतला भाव.

२६. **राजबाळी**–राजकुमारी. **निग्रहें**–हट्टानें.

२७. **हलायुध**–हल म्हणजे नांगर हें ज्याचें आयुध आहे तो, बलराम. **अर्जुनवत्**–गवताप्रमाणें, क्षुद्र (तृणप्राय). **रामपक्षपातें**–बलरामाच्या पाठिंब्यानें.

२८. **सस्मितविकसितरदनदीप्ती**–मंद हास्यामुळें जिच्या दांतांची झळाळी अस्फुटपणें प्रकटली आहे अशी, सुभद्रा. **संदेशवचनें विप्राहातीं**–रुक्मिणीनें सुदेव नामक ब्राह्मणाच्या हातीं कृष्णाला पत्रिका पाठविली होती. **भूपाळपंक्ती सन्नद्ध असतां**–शिशुपालपक्षाचे अनेक राजे शस्त्रसज्ज असतांना, अंबिकेच्या मंदिरांत दर्शनासाठीं आलेल्या रुक्मिणीला श्रीकृष्णानें रथांत घालून नेलें. **हंसगती**–हंसासारखी डौलदार चाल जिची आहे अशी, रुक्मिणी. **पृथानंदन**–पृथेचा (कुंतीचा) पुत्र, अर्जुन (पार्थ). **फाल्गुन**–अर्जुन.

२९. **गांडीवधन्वा**–ज्याच्या हातीं गांडीव नामक धनुष्य आहे तो, अर्जुन. **मज निमित्तें**–माझ्यासाठीं. **अंशुमाळी**–सूर्य. चक्रवाक आणि चक्रवाकी यांचा वियोग रात्रीच्या वेळीं होतो, असा कविसंकेत आहे. सूर्योदय होतांच तीं परस्परांना भेटूं शकतात. **तमप्राय**–अंधाराप्रमाणें. **मृगराज स्वभाग बस्तमेळीं हरी**–मेंढरांच्या समूहांतून सिंह आपला वाटा जसा उचलून नेतो, त्याप्रमाणें. (भागवतांतील सुभद्राहरणप्रसंगांतहि भागवतकारांनीं 'स्वभागं मृगराडिव' असेच शब्द वापरले आहेत.– भा. १०·८६·१०· निरंजनांनीं इथें भागवतांतील कल्पना शब्दशः उचलली आहे.)

३०. **निजदेहस्थित भूतांश**–देह हा पंचमहाभूतांनीं बनलेला आहे. जर अर्जुनानें माझ्या विनंतीला मान देऊन मला नेलें नाहीं, तर मी प्राणत्याग करीन आणि माझ्या देहांतील पंच महाभूतांच अंश माझ्या आंतरिक निष्ठेमुळें अर्जुनाच्या सेवेंत जातील, असा सुभद्रेचा भाव इथें व्यक्त झाला आहे. **विंदाण**–चातुर्य, लाघव, वेध, निग्रह, लक्ष.

३१. **नर**–अर्जुन. **आप**–पाणी. **तोय**–पाणी. **तदीय**–त्याच्या. **मुकुर**–आरसा. **लक्षी**–पाही. **तालवृंत**–पंखा. या श्लोकांत सुभद्रेची अर्जुनाविषयींची अपार्थिव प्रीति प्रकटली आहे. जर अर्जुनाला प्राप्त करण्यांत मला अपयश आलें, तर अर्जुन जिथें संचार करतो, तिथें तिथें माझ्यांतील पृथ्वीतत्त्व विलीन होईल; तो जें जल प्राशन करतो, त्यांत माझ्यांतील आपतत्त्व मिळेल; तो ज्या आरशांत आपलें मुख न्याहाळतो, त्यांत माझ्यांतील तेज जाऊन राहील; त्याच्या पंख्यामध्यें माझ्यांतील वायुतत्त्व निवास करील आणि त्याच्या प्रासादांतील आंगणांत माझ्या ठायींचें आकाशतत्त्व नांदत राहील, असा मनोभाव सुभद्रेनें इथें व्यक्त केला आहे.

३२. **तनुमात्र**–केवळ शरीर (मन नव्हे). **निर्वचा**–सांगा. **रामादि**–बलरामादि विरोधक. **सर्पत्वचा**–सापाची कात.

३३. **विजय**–अर्जुन. **कामिला**–इच्छिला. **कीजे**–करावी.

३४. **मानसांतर**-अंतरींचें गूज, हृद्गत. **तां**–त्वां. **मथुनी**–पराभूत करून, निर्दाळून. **भीमकनंदिनी**–रुक्मिणी. **तांही**–त्वांहि, तूंसुद्धां.

३५. **यतिशेखर**–यतिश्रेष्ठ, श्रेष्ठ संन्यासी.

३६. श्लोक क्र. ३६ ते ४३ मध्यें सुभद्रा आपल्या पुण्यकर्मांचें स्मरण करून, त्या कर्मांचें फल म्हणून अर्जुनाच्या प्राप्तीची अपेक्षा करीत आहे. **अति-मानदान**–अति मान देणें. **अत्युत्सवें**–अत्यंत उत्साहानें.

३७. **रम्यवाचा**–गोड बोलणें. **क्षुधित**–भुकेला. **तृषातुर**–तहानेला.

३८. **ठाव**–आश्रय. **उष्ण-शीत-जळ-पीडित**–(निराश्रित असल्यामुळें) ऊन, थंडी व पाऊस यांच्या माऱ्यामुळें पीडलेले.

३९. **स्वसदनांतरिं**–स्वतःच्या घरांत. **आर्तमात्र**–केवळ दुःखी जन.

४०. **मार्जिले असति**–प्राप्त केले आहेत.

४१. **विपन्न**–संकटग्रस्त. **आपूर्त इष्ट**–(इष्टापूर्त) इष्ट आणि पूर्त हे पुण्यकर्मांचे दोन वर्ग आहेत. अग्निहोत्र, तप, सत्य, वेदरक्षण, आतिथ्य व वैश्वदेव हीं इष्ट कर्में होत आणि देऊळ बांधणें, धर्मशाळा उभारणें, तळें खोदणें, अन्नदान करणें, इत्यादि पूर्त कर्में होत.

४२. **पुण्यें तया**–त्या पुण्यबळावर. **गांडिवचापपाणी**–ज्याच्या हातीं (पाणि) गांडिवनामक धनुष्य (चाप) असतें, तो अर्जुन.

४३. **ब्रह्मेशमुख्यमशकान्त**–(आब्रह्मपिपीलिका) ब्रम्ह्यापासून मुंगीपर्यंत. **जन्मशतीं**–शंभर जन्मांतरीं.

४४. **एकनिष्ठ घडली** = एकनिष्ठ बनली-झाली.

४५. **विपिनीं**–अरण्यांत. **मंत्र**–सल्ला, युक्ति. **बळें**–अनिच्छेनें. **यदु-मंदिरीं**–यादवांच्या राजवाड्यांत.

४६. **घडे**–होई. **सांग**–संपूर्ण. **तैं**–तेव्हां.

४७. **पादसरोज**–चरणकमळ. **अंतराय**–दुरावा, उणेपणा. **सगुण**–गुणवान्.

४८. **संबोखणें**–हांक मारणें, सांत्वन करणें, आश्वासन देणें. **निगादिलें**–सांगितलें.

४९. **पुष्पायुध**–काम, मदन. (मदनाचीं आयुधें फुलांचीं असतात.) **नेत्रप्रांतविलोकन**–कटाक्ष. **कल्पान्त होतीं पळें**–युगें पळांसारखीं होतात.

५०. **हली**–बलराम. **कृष्णमाया**–कृष्णाचें लीलालाघव, कृष्णाचें कारस्थान.

५१. **घनसांवळा**–मेघाप्रमाणें सांवळा श्रीकृष्ण. **स्मराविव्हळा**–कामपीडित.

५२. **विष्णुमाया देखतां नारी**–जणुं परमेश्वराची विश्वमोहक मायाच अशी स्त्री पाहतां. **संयोग सन्निकर्ष**–घनिष्ठ सहवास.

५३. **तारुण्यमदमंडिता**–यौवनाच्या भरामुळें सुंदर दिसणारी. **निरता**–मग्न. **नियत**–नेमानें. **जैं**–जेव्हां. **तां**–त्वां. **भूभृत्**–राजा. **उचितीं न पडे**–योग्य ठरणार नाहीं. **सत्कुळप्रसूतां**–चांगल्या कुळांत जन्मलेल्यांना. **झगटतां**–चिकटतां. अंगास लागतां. **तीर्थसलिल**–तीर्थांचें जल. **निंद्यता**–हीनपण, वदनामी. **कज्जल-प्राय**–काजळासारखी.

५४. **घृतभांड**–तुपाचें भांडें. **प्रदीप**–मोठा दिवा. **कामिनीवाग्जल्प**–तरुण स्त्रीचें लाघवी बोलणें. **कुसुमायुधप्रताप**–कामप्रभाव. **अमूप**–पुष्कळ.

५५. **योषिता म्हणिजे...कैंवि मानिजे**–स्त्री म्हणजे जणुं मदनाची ज्वाळाच आहे. तिला सौंदर्याचें इंधन (स्वरूपेंधन) लाभलें कीं ती अतिशय भडकते (प्रदीप्त विशाळा). अशी ही भडकलेली ज्वाळा तिच्याभोंवतीं झेपावणाऱ्या पुरुषचित्तांच्या चंचल पतंगांचे समूह न जाळतां राहील, हें कसें खरें मानावें ?

५६. **प्रमदासहवास**–तरुण स्त्रीचा सहवास. **चलन पावले**–चळले. **उदेला**–उदय पावला, उद्भवला. **लेखणें**–गणणें, मोजणें, पर्वा करणें.

५७. **अहिल्याकामी पाकशासन**–अहिल्येचा उपभोग घेण्याची इच्छा बाळगणारा इंद्र (पाकशासन) अजून (गौतमाच्या शापानें) अंगावर भगें वाहत आहे. **तारारमण**–चंद्र. चंद्रानें गुरुपत्नीचा मोह धरल्यामुळें त्याला कलंक लागला, अशी कथा आहे. **तिलोत्तमाव्याजें मरण सुंदोपसुंद पावले**–सुंद आणि उपसुंद हे दोघे राक्षस बंधु प्रल्हादाचे नातू (निकुंभाचे पुत्र) होते. यांनीं ब्रह्मदेवापासून असा वर मिळविला होता कीं, ' आम्हीं एकमेकांस मारल्याशिवाय आम्हांला मरण येऊं नये. ' या वरानें उन्मत्त होऊन ते लोकांना फार छळूं लागले. तेव्हां इंद्रानें तिलोत्तमा नांवाची एक लावण्यवती अप्सरा त्यांच्याकडे पाठविली. तिला पाहून ते दोघेहि मोहित झाले आणि तिच्या प्राप्तीच्या स्पर्धेंत त्या दोघांनीं एकमेकांना ठार केलें. **सदाशिव मोहिनीविलासगुणें मोहित घडला**–शंकराच्या वरानें मातलेल्या भस्मासुराला नष्ट करण्यासाठीं विष्णूनें मोहिनी रूप घेतलें. मोहिनीनें भस्मासुराचें भस्म त्याच्याच हातानें करविलें; परंतु नंतर मोहिनीला पाहून शिव मोहित होऊन तिच्यामागें धांवत सुटला.

५८. **ब्रह्मा कन्याभिलाषी**–शारदा ही ब्रह्मदेवाची कन्या. ब्रह्मदेवानें तिचाच अभिलाष धरला. **विष्णु वृंदास्मशानवासी**–जालंदर दैत्याची पत्नी वृंदा. तिच्या पातिव्रत्यामुळें जालंदर देवांनाहि अजिंक्य बनला होता. म्हणून विष्णूनें कपट-कारस्थान करून वृंदेचा पातिव्रत्यभंग केला. याचमुळें विष्णूला पुढें (तुळशीच्या

रूपानें नांदणाऱ्या) वृंदेशीं एकनिष्ठ रहावें लागलें. तुळस ही विष्णुपत्नी बनली आणि कृष्णावतारांत विष्णूचा निवास वृंदावनांतच झाला.

५९. **कंबुकंठी**–जिचा कंठ शंखासारखा आहे, अशी. **पद्मनेत्रा**–कमलाक्षी. **सुवर्णगोरटी**–सोन्यासारखी गोरी. **मोहनांगी**–जिची काया मोहक आहे अशी.

६०. **धृति**–धैर्य. **सर्ववेत्ता**–सर्वज्ञ.

६१. **आपातमात्रें**–आपाततः, सहजीं **त्रिगुणजनित**–सत्त्व, रज, तम यांच्यापासून जन्मलेली. **अविद्या**–प्रपंचबुद्धि. **अप्रमत्त**–निर्दोष, विवेकयुक्त. **शल्यतुल्य घडत**–शल्याप्रमाणें बोचत राहतें.

६२. **स्थानचलन**–ठिकाणावरून हलविणें. **श्रुतिगिरी**–वेदवचन. **अंतःपुरचत्वरनारीनरां**–अंतःपुरांत वावरणाऱ्या स्त्री-पुरुषांना. **शासनपूर्वक**–निग्रहपूर्वक, कटाक्षानें.

६४–६५. **वैराग्यदीप...विझों न सके**–यतीच्या हृदयमंदिरांत प्रकाशमान झालेला वैराग्याचा दीप अनेक विकल्पांचें पतंग झेपावल्यानें अथवा तरुण स्त्रियांच्या विलासरूपी वायूच्या स्पर्शानें विझूं शकणार नाहीं.

६६. **जगन्नाटकचक्रवर्ती**–विश्वाचें नाटक चालविणारा श्रेष्ठ सूत्रधार. **अग्रज**–ज्येष्ठ बंधु, बलराम. **अमंदसा**–मूढासारखा.

♠ ♠ ♠

सर्ग सहावा

१. **वर्षाकाळ**–पावसाळा. **निरसला**–संपला. **शरत्**–शरद्ऋतु. **साजिरा**–सुंदर. **अंबर**–आकाश. **गोजिरा**–दर्शसुख देणारा. **तत्कालोद्भव**–त्या (शरद्) ऋतूंत निर्माण होणारीं **सत्फळ**–उत्तम फळ. **सस्य**–तृण. **वसुमती**–पृथ्वी. **संफुल्लल्या**–प्रफुल्लित झाल्या.

२. **सरोजसहितें**–कमळांनीं युक्त अशीं. **पद्माकरें**–कमलसरोवरें. **पावनें**–पवित्र अशीं. **मरालवृंद**–हंसममूह. **करिती सेवावया धावनें**–कमळांतील परागांचें सेवन करण्यासाटीं हंसांचे समूह धावत येऊं लागले. **पर्व**–पुण्यकाळ. **पूर्णशशी**–पूर्ण चंद्र. **चकोरकगण**–चकोर पक्ष्यांचा समूह. **सुधापारणें**–अमृताचें पारणें. शरद्ऋतूंत पूर्ण चंद्र पौर्णिमेच्या पर्वदिनीं चकोरांना अमृताचें पारणें घालतो. (चकोर हे केवळ चांदण्याचें सेवन करून राहणारे पक्षी आहेत, असा कविसंकेत आहे–'जैसे शारदीयेचे चंद्रकळे । माजी अमृतकण कोवळे । ते वेचिती मनें मवाळें । चकोरतळगें ॥ ॥'–ज्ञा. १ ५६.) **षट्पद**–भुंगे. **तैं**–तेव्हां. **परागपर**–परागसेवन करण्यासाटीं प्रवृत्त झालेले. **सत्पक्षझंकारणें**–भ्रमरांचा गुंजारव.

३. **शिखी**–मोर. **अर्थीजन**–इच्छा करणारे. **शाड्वलें**–तृणें. **श्रीमंत**–शोभायुक्त. **गिरी**–पर्वत. **कृषा**–(रोड) ज्यांतील पाणी कमी झालें आहे अशा. **सरिता**–नद्या. **स्वच्छांबुसंधारणें**-स्वच्छ पाणी धारण करण्यामुळें. **लंघनशक्य**–ओलांडण्यास सुगम. **शैत्य**–शीतलता.

४. **नव्यतृणें**–कोवळीं गवतें. **मृगगणें**–प्राण्यांचे समूह. **नूतनसंपदा-मदभरें**–नव्यानें लाभलेल्या संपदेनें मत्त झालेले. **कामाथिले**–कामानें युक्त असलेले. **दुर्वृत्त**–त्यांचें वर्तन वाईट आहे असे. **मदोद्धत**–मदानें धुंद झालेले. **ग्रामीणसे**–कुत्र्यांसारखे.

५. औदार्यानें उन्नत झालेले दांभिक लोक दान देतांना त्याचा गाजावाजा करतात आणि त्यामुळें त्यांचें दानाचें पुण्य लोप पावून त्यांना काठिमा लागतो. परंतु तेच लोक सज्जनांची संगति लाभतांच पुनश्च शुद्ध होतात. त्याचप्रमाणें वर्षा-काळीं लोकांना जळाचें दान करणारे काळे मेघ शरद् ऋतूची संगति लाभल्यानें मूक आणि शुद्ध होऊन राहतात.

६. **द्विज**–पक्षी. **नीड**–घरटें. **सद्विप्र**–श्रेष्ठ ब्राह्मण. **जैत्ररथावरोह**–जयशील अशा रथावर आरोहण. **वाणिज्यार्थ**–व्यापारासाठीं. **वणिग्जनीं**–व्यापाऱ्यांनीं. **वृषगणीं**–बैलांच्या समूहावर. **उद्यमलाभ**–व्यापारांतील फायदा.

७. **स्वस्थकुलांगना**–सुखी कुलीन स्त्रिया. **पतिकुळा**–पतीच्या घरीं. **सौभाग्यकामी**-सौभाग्याची इच्छा करणाऱ्या. **सती**–पतिपरायण, शीलवती. **क्षत्री**–क्षत्रिय. **भूपतिसेवनार्थ**–राजसेवा करण्यासाठीं. **गेह**–घर. **व्यापारीं**–व्यवहारांत, उद्योगांत. **रत**–मग्न. **शरत् सांवळा**–शरद्ऋतूंत आकाश स्वच्छ निळें आणि भूमि सस्य-श्यामल असते, म्हणून त्याला सांवळा म्हटलें आहे.

८. **तोषें**–संतोषानें. **हळीकारणें**–(हळी = हलधर बलराम. हल म्हणजे नांगर हें बलरामाचें आयुध आहे, म्हणून त्याला हलधर, हलिन् अशीं नांवें आहेत.) बलरामापाशीं. **सप्रेम संरक्षण**–स्नेहानें केलेली जपणूक. **दीस**–दिवस. **गेह**–घर. **तेणें...संन्यासिया**–संन्यासी अधिक काळ गृहस्थाघरीं राहून सुखभोगांत मग्न झाला, तर त्याच्या नेमाचा लोप होतो–त्याचें संन्यस्त जीवन बाधित होतें.

९. **कोमलें तृणें**–कोवळीं गवतें. **जीवांवी ..पावली** (पावसाळ्यांत निर्माण झालेले) असंख्य अतिसूक्ष्म जीव (कृमि = कीटक) शरद् ऋतूंत नाहींसे झाले. **अंबर**–आकाश. **स्वकळा**–स्वतःच्या कळांनीं. **संपन्न**–प्रकाशानें युक्त.

१०. **राम**–बलराम. **गिरा**–(वाणी, वचन, उद्गार, बोलणें) म्हणणें. **गेहातुरां**–गृहस्थांना. **रैवतपर्वतोत्सव**–द्वारकेजवळच्या रैवतक पर्वताचा उत्सव. (प्राचीन काळीं असे पर्वतांचे उत्सव होत असत, त्यांना ' गिरिमह ' असें म्हणत असत.) **साच**–खरोखर.

११. **यतीश्वरें**–श्रेष्ठ यतीनें–यतिरूपी अर्जुनानें. **संतोषयुक्तांतरें**–संतुष्ट मनानें. **स्वपुरी**–स्वतःची नगरी, द्वारका. **श्रीकृष्णाहुक**–श्रीकृष्ण आणि आहुक. आहुक हा एक पराक्रमी यादव असून कृष्णाचें शाल्वाबरोबर युद्ध झालें, त्या वेळीं यानें द्वारकेचें रक्षण केलें होतें. **देवकोद्धव**–देवक आणि उद्धव. देवक हा आहुकाचा पुत्र होय. उद्धव हाहि एक यादव असून. तो कृष्णाचा चुलतभाऊ होता. **अक्रूर**–एक यादव–आहुकाचा जांवई. **सात्यकी**–वृष्णिकुळांतील सत्यकाचा पुत्र युयुधान, अर्जुनाचा धनुर्विद्येतील शिष्य. **आनकदुंदुभी**–वसुदेवाचें दुसरें नांव. याच्या जन्मकाळीं देवांनीं आनक व दुंदुभी हीं वाद्यें वाजविलीं होतीं, म्हणून याला हें नांव पडलें. **योषिद्गण**–स्त्रीसमूह.

१२. **कृष्णांतःपुर**–कृष्णाचें अंतःपुर, कृष्णाच्या स्त्रिया. **नारीमणी**–स्त्रीरत्न. **रेवती**–बलरामाची पत्नी. **यादवदेवराजमहिषी**–कृष्ण व बलराम यांच्या मुख्य राण्या. **सद्भूषण**–मूल्यवान् अलंकार. **दासिका**–दासी. **देवलोकवनिता**–स्वर्गांतील स्त्रिया, देवांगना, अप्सरा. **जवें**–वेगानें.

१३. **हेममणीविराजित**–सोन्यांत रत्नें जडवून सुशोभित केलेला. **आरूढल्या**–स्वार झाल्या. **शिबिका**–पालखी, मेणा. **वहन**–वाहन. **शोभजेल्या**–शोभल्या. **भेरी, झांकृति, दुंदुभी**–मिरवणुकीपुढें वाजवलीं जाणारीं वाद्यें. **रवभरें**–आवाजाच्या भरानें. **संनाद**–मोठा संमिश्र नाद. **बहुसाल**–पुष्कळ.

१४. **भद्रांगी**–सुंदर (जिचीं अंगें सुंदर आहेत अशी). **मणिरहिंवरीं**–(मणि = रत्न, रहंवर = श्रेष्ठ रथ) रत्नखचित श्रेष्ठ रथांत. **वळघली**–चढली, आरूढ झाली. **निघाली...भली**–रत्नखचित श्रेष्ठ रथांत बसून सुभद्रा सागराच्या जळांतून (जळनिधिजळापासुनि) निघणाऱ्या लक्ष्मीप्रमाणें (लक्ष्मीसी) निघाली. **समस्तालंकारें**–सर्व अलंकारांनीं. **हेमपुतळी**–सोन्याची पुतळी. (सुभद्रेच्या गौर कांतीमुळें तिला हेमपुतळी म्हटलें आहे.) **रत्नस्तोमीं**–रत्नसमूहानें युक्त अशी. **कुशल विधीनें**–चतुर विधात्यानें, ब्रह्मदेवानें.

१५. **सौंदर्यांबुधिजनित लावण्यलहरी**–सौंदर्याच्या सागरावर उसळलेली लावण्याची लाट. **मुखांभोज**–मुखकमल. **तरुणनयनाली**–तरुणांच्या नेत्रांचे भ्रमर. तिच्या मुखकमलावर तरुणांच्या नेत्रांचे भ्रमर झेपावतात. **तदां**–तेव्हां. **नासाचंपाकुसुमवरदर्पें** (नासा–नाक, चंपाकुसुमवर–सोनचांफ्याचें श्रेष्ठ फूल, दर्प–उग्र गंध) चांफेकळीसारख्या नाकांतून येणाऱ्या निःश्वाससुगंधाच्या उग्रतेनें. **मुरडती**–परत फिरतात. सुभद्रेच्या मुखकमलावर झेपावणारे तरुणांच्या नेत्रांचे भ्रमर तिच्या निःश्वासांच्या उग्र सुगंधानें परत फिरतात. (सोनचांफ्याच्या वासापासून भ्रमर परावृत्त होतात, ही वस्तुस्थिति आहे.)

१६. **सज्जीकृत**-सज्ज केलेला. **हंसमणि**–परमहंसांत–संन्याशांत श्रेष्ठ, संन्यासी बनलेला अर्जुन. **लक्षामध्यें**–लाखांत, लाखों वीरांमध्यें. **गणिला**–मोजला गेला. **संदोहीं**–समूहांत. **यतिवर**-श्रेष्ठ संन्यासी-अर्जुन. **दंडधर**–हातीं दंड धरलेला आहे असा. **दंडधर**–यम; मृत्युदंड धारण करणारा.

१७. **रणचतुर**–युद्धकुशल. **पदाती**–पायदळांतील सैनिक. **अमित**-असंख्य. **चतुरंगें**–(सैन्याचीं) चार अंगें – गजदल, रथदल, अश्वदल व पायदळ. **बळवती**–बलसंपन्न. **बलाध्यक्ष**–सैन्याचा प्रमुख, सेनापति. **रणवेत्ते**-युद्धकुशल.

१८. **तालांक**–बलराम. **गजरें**–वाद्यांच्या गजरांत. **दिठीं**–दृष्टीनें. **चित्ताची मिठी पडणें**–चित्त जडणें.

१९. **जवानें–वेगानें. दृप्त**–अभिमानी, गर्विष्ठ. **गाढे**–श्रेष्ठ. **हरिपरिग्रहदीप्ति**–हरि म्हणजे श्रीकृष्ण त्यांचाच असल्यामुळें यादवांचें वाढलेलें तेज.

२० **स्यंदन**–रथ. **ततक्षणीं**–तत्क्षणीं. **बळघली**–आरूढ झाली, चढली.

२१. **घडे हे वासुदेवी स्वयें**-ही सुभद्रा (वासुदेवी) स्वतः सारथी बनली. **वरदोर**-लगाम. **द्रुतगतीं**-वेगानें, जलद गतीनें. **चापबाण**–धनुष्यबाण. **सन्नद्ध**–सज्ज. **युद्धांगणा**–रणांगणाला, युद्ध करण्याला.

२२. **मृगराज**–सिंह. **स्वात्मप्रतापें**–पराक्रमानें. **हरी**–हरण करतो, घेऊन जातो. **कुरुवीर**–कुरुकुळांतील वीर–अर्जुन. **एकसरेंचि**–एकदमच. **अंतःपुरीं**-स्त्रीसमूहांत, राणीवशामध्यें.

२३. **अट्टहास**–(मूलार्थ–खदखदा हसणें, हसण्याचा मोठा आवाज) आरडाओरडा. **भूमि-अंबर-दिशा-गर्भांत**–पृथ्वी, आकाश व दिशा यांच्यामध्यें. **म्हणती कैं राम कैं श्रीपती**–(सर्व स्त्रिया) म्हणूं लागल्या कीं, ' बलराम कुठें आहे ? श्रीकृष्ण कुठें आहे ? '

२४. **तेही**–तीहि, सुभद्राहि. **भिक्षुकरथीं**-संन्याशाच्या रथांत. **सांप्रती**–आतां. **आहा...अती**–स्त्रियांच्या चारित्र्याच्या बाबतींत देवादिकहि कांहीं खात्री देऊं शकत नाहींत–जाणूं शकत नाहींत. (' स्त्रियश्चरित्रं पुरुषस्य भाग्यं देवो न जानाति कुतो मनुष्यः । ') **एकांतीं मतली**–एकान्तांत वश झाली. **सुदती**–जिचे दांत सुंदर आहेत अशी, सुंदर – सुभद्रा.

२५. **तैसा...ना धरे**–ज्याप्रमाणें सागराची भरतीची लाट लोटली म्हणजे पृथ्वी तिला अडवूं शकत नाहीं, (त्याप्रमाणें वेगानें निघालेल्या पराक्रमी अर्जुनाचा रथ यादववीर अडवूं शकले नाहींत).

२६. **स्वसा**–बहीण. **उपोक्षिल**–गय करील. **कैं**–कुठें.

२७. **प्राप्त घडेल**–प्राप्त होईल.

२८. **वनिता**–स्त्री. **बडिश**–माशाचा गळ. **भिक्षुक**–संन्यासी. **मायिक**–ढोंगी, लटका संन्यासी. **क्षुल्लक**–क्षुद्र. **सुदती**–जिचे दांत सुंदर आहेत अशी, सुंदर (सुभद्रा). **नाहीं तैं**–नाहीं तर. **दंडिल**–शिक्षा करील. **दंडी म्हणे ना**–संन्यासी म्हणून गय करणार नाहीं. **बळें**– बळानें) बलवान् असल्यामुळें.

२९. **कासया**–कशाला, कां ? **वेशधर**–केवळ वेश धारण करणारा, ढोंगी, लटका. **हरिच्या लंघूनिया शासना**–श्रीकृष्णाच्या सत्तेची मर्यादा उल्लंघून; श्रीकृष्ण कोण आहे, याचें भय न बाळगतां. **पृथ्वी ते तुज ठाव देइल कशी**–(श्रीकृष्णानें तुला शासन करावयाचें ठरवलें, तर) पृथ्वीहि आपणांस कसा आसरा देईल, याचा विचार कर.

३०. **दिक्पति**–दिक्पाल. हे आठ आहेत. इंद्र, यम, वरुण, कुबेर, ईशान, अग्नी, निर्ऋती, वायु. **आतां प्राणचि मात्र घेउनि पळे**–आतां (सुभद्रेला सोडून देऊन) केवळ आपला जीव घेऊन पळ.

३१. **प्रणमिलें**–प्रणाम केला. **चातुर्मास्यजळागमीं**–पावसाळ्याच्या चार महिन्यांत. **सानंद**–आनंदानें. **निस्तरिला**–फेडला. **दुर्मति**–ज्याची मति वाईट आहे असा.

३२. **रणधीर**–रणांत धैर्य राखणारा, शूर. **रामकृष्ण**–बलराम व श्रीकृष्ण. **पांडव**–पंडुपुत्र. **धर्मबंधु**–धर्माचा म्हणजे युधिष्ठिराचा बंधु. **वरितो मन्मातुळाची सुता**–माझ्या मामाची (मन्मातुळाची) कन्याच (सुता) मी वरीत आहें. (मामाच्या मुलीशीं लग्न करण्याची प्रथा आजहि रूढ आहे – बऱ्याच ठिकाणीं तो हक्क समजला जातो. म्हणूनच अर्जुनानें 'माझी म्यां हरिली,' असें म्हटलें आहे.) **आहे विधो नेमिता**–ब्रह्मदेवानेंच (हा संबंध) निश्चित केला आहे–ही गांठ ब्रह्मदेवानेंच बांधली आहे.

३३. **समरीं**–युद्धांत, युद्धासाठीं. **जरी तुम्हां असे वासना**–जर तुम्हांला युद्धाची खुमखुमी असेल तर. **सज्जोनि**–सज्ज होऊन. **लावीन मी शिक्षणा**–तुम्हांला (चांगलेंच) शासन करीन. **शस्त्रार्थवेत्ता**–शस्त्रें वापरण्यांत कुशल. **फाल्गुन**–अर्जुन. **बुझा**–समजा. **निजमनीं**–मनोमन. **त्यजा**–सोडून द्या. **वाउगी**–अनिष्ट, निरर्थक, व्यर्थ.

३४. **अर्जुनभाषिता**–अर्जुनानें उच्चारलेली. **गिरा**–वाणी. **घेतीच ना धीर ते**–धैर्यच धरीनात. **मृगराज**–सिंह. **नाद**–गर्जना. **क्षुद्र मृगांच्या गणा**–

क्षुद्र प्राण्यांच्या समूहाला. **मदगिरी यांचा घडे ठेंगणा**–(अर्जुनाच्या प्रतापाच्या उंचीपुढें) यादववीरांच्या मदाचा पर्वत ठेंगणा झाला.

३५. **चित्तांतरीं**–मनांतल्या मनांत. **श्रीकृष्ण याचे शिरीं असे**–श्रीकृष्ण याचा पाठीराखा आहे. **विवराविना**–सल्ल्याशिवाय. श्रीकृष्णाच्या सल्ल्याशिवाय अर्जुनानें सुभद्राहरण केलें असेल, असें घडणार नाहीं. **यासी...दोन्हीकडे**–याच्याशीं युद्ध केलें तरी अनिष्ट, न केलें तरी अनिष्ट, अशी दोन्ही बाजूंनीं अडचण (संकष्ट) निर्माण झाली आहे.

३६. **जाणविजे**–कळवावें. **दंडधार**–दंडधारी, संन्यासी. **स्वसा**–बहीण. **सन्मती**–चांगल्या मतीची. **पृथानंदन**–पृथेचा म्हणजे कुंतीचा पुत्र. **मातुळसुता**–मामाची मुलगी. **समाना गुणें**–गुणांनीं अनुरूप.

३७. **अंकीं**–मांडीवर. **प्रेमपुरःसरें**–(त्याच्या) प्रेमाच्या पुढाकारानें. **धृतिमती**–धैर्यवती. **सारथ्यकर्म**–रथ हाकण्याचें काम.

३८. **पातले**–आले. **आतले**–युक्त झाले. **तैं**–तेव्हां. **रैवत पावले**–रैवतक पर्वतावर आले. **धींवसा**–धैर्य.

♠ ♠ ♠

सर्ग सातवा

१. [सुभेद्रला घेऊन जाणारा संन्यासी हा संन्यासी नसून अर्जुन आहे, हें समजतांच परत फिरलेले यादव वीर कृष्ण बलरामांना सांगत आहेत–] **हेही आरूढली उगी रहिंवरीं**–ही (सुभद्रा) सुद्धां निमूटपणें (उगी) रथांत (रहिंवरीं) चढली (आरूढली). **भिक्षु**–संन्यासी. **वीर्य**–सामर्थ्य, शौर्य.

२. **पृथा**–कुंती. **मातुळकन्यका**–मामाची मुलगी. **मम असे हा भाग**–(ही माझ्या मामाची मुलगी असल्यामुळें तिचें हरण करणें) हा माझ्या हक्काचा वांटा आहे. **घाबिरा**–भित्रा.

३. **रोधुनी**–अडवून. **चूर्ण**–चुरा. **गांधर्व**–गंधर्वास्त्र. **संभिन्न**–जखमी, घायाळ. **रथी**–रथांतून लढणारे वीर.

४. **महांत**–मोठा. **रामाचिया मानसा**–बलरामाच्या मनाला. **वळघणें**–चढणें. **हळी**–बलराम. **अतिभरें**–(संतापाच्या) आवेगानें. **शोणाक्ष**–ज्याचे डोळे लाल आहेत असा, बलराम.

५. **भूप**–राजे. **स्वसा**–बहीण. **वंचोनि**–फसवून. **मी देखतां**–मी पाहत असतांना, माझ्या देखत (सति सप्तमी). **झालाही जरि**–असला तरी. **आहवीं**–

युद्धांत. **मत्पुरुषार्थ**–माझा पराक्रम. **पांडवी रक्तसरिता**–पांडवांच्या रक्ताची नदी.

६. **मृत्यूपासुनि... भर्वसा**–त्याला (अर्जुनाला) मृत्यूचें भय कसें वाटलें नाहीं कुणास ठाऊक ! **यादवसत्कुलोद्भव वधू**–यादवांच्या उत्तम कुळांत जन्मलेली मुलगी.

७. **मैंद**–ठक. **विरक्तिविज्ञान**–विरक्तीचें शास्त्र. **मम सदनांत**–माझ्या घरांत.

८. **असंत**–भोंदू, ढोंगी. **बाह्यक्रिया**–पारमार्थिक आचाराचें लटकें बाह्यावडंबर.

९. **गानस्वरें...केला**–शिकारी ज्याप्रमाणें मधुर गायनाच्या स्वरांनीं हरिणाला मोहित करून त्याचा घात करतो, त्याचप्रमाणें (अर्जुनानेंही परमार्थविचार बोलून) माझा घात केला.

१०. **मत्सन्मुख**–माझ्यापुढें. **शतचूर्ण**–शेंकडों लहान लहान तुकडे.

११. **अपांडवी**–पांडवविरहित. **धात्री**–पृथ्वी. **स्वसा**–बहीण. **हेमगात्री**–सुवर्णासारख्या गोऱ्या कांतीची.

१२. **मायिक**–कपटी, फसवा, भोंदू.

१३. **यमाप्रमाणें**–यमाच्या हातीं मृत्युदंड असतो, त्याचप्रमाणें बलरामाच्या हातीं असलेला नांगर (हल) हा अर्जुनाच्या बाबतींत मृत्युदंड ठरेल, हा बलरामाच्या म्हणण्याचा भाव. **जों न लगेति पातीं**–डोळ्याचें पातें लवतें न लवतें तोंच; निमिषमात्रांत.

१४. **वृकोदर**–भीम. **पृथुकोदर**–मोठें पोट. **सद्विप्र गणीना**–पवित्राचरणी ब्राह्मण ज्याप्रमाणें हीन कुलीनाला मानीत नाहीं, त्याप्रमाणें.

१५. **समतोसि**–बरोबरी करायला. **आधीं न ये मानुनि तो अधर्म**–(अर्जुनानें सुभद्रेला बळजबरीनें फसवून आणलें) हा अधर्म आहे, याची जाणीव ठेवून धर्मराज आधीं मुळीं (अर्जुनाच्या बाजूनें) लढायला येणारच नाहीं.

१६. **सत्यात्मक**–सत्य हा ज्याच्या जीवनाचा आत्मा आहे असा, युधिष्ठिर. **भूप**–राजा.

१७. **अनुपम्य**–अतुलनीय, अजोड.

१८. **पितृस्वसाकुमार**–पित्याच्या बहिणीचा–आत्याचा (वसुदेवाची बहीण कुंती हिचा) मुलगा.

१९. **म्हणोनिशाने**–म्हणून. ('म्हनूनशान' या ग्रामीण भाषेंतील शब्दाचें रूप.)

२०. **हळें**–नांगरानें. **विदारणें**–भोसकणें; छिन्नभिन्न करणें.

२१. **दिशां**–दशदिशांना. **बळी टाकणें**–पिशाचें वा क्षुद्र देवता यांना संतुष्ट करण्याच्या उद्देशानें अर्पण करणें. **खाजें**–खाऊ, खाद्यपदार्थ. (खाद्य–खाज्ज–खाजें.) **वृकजंबुक**–लांडगे व कोल्हे. **भूतावळी**–भूतांचे समूह. **शोणित**–रक्त. **अरि**–शत्रु.

२२. **ललित...मोहनांगी**–कोमल, सडसडीत बांध्याची, कमळांसारख्या डोळ्यांची व मोहक कांतीची (सुभद्रा). **त्या वेद...नव्हेचि**–ज्याप्रमाणें वेदवाणी उच्चारायचा शूद्राला अधिकार नाहीं, त्याप्रमाणें.

२३. **संकल्पिली**–द्यायची ठरविली. **सिकारी**–?

२४. **वल्गन**–बडबड. **होयील जैं पार्थ**–तो पार्थ असेल तर.

२५. **विभूला**–आपणांस (प्रभूला).

२६. **तो जिंतिजे . समर्था**–त्याला (अर्जुनाला) जिंकणें हें सामर्थ्य संपन्नालाहि कठीण आहे.

२७. **तृण**–गवत. **जिणाया**–जिंकण्यास.

२८. **महोद्भट**–महापराक्रमी योद्धा. **हुतखांडव**–ज्यानें खांडववन जाळलें, तो (अर्जुन). **रणभैरव**–श्रेष्ठ वीर (रणांत भैरवाप्रमाणें उग्रभीषण).

२९. **मी...कानें**–(जिला दुसऱ्यानें स्पर्श केला आहे, तिला) अन्य कोणी करील, हें मी कांहीं (माझ्या कानांनीं) ऐकलें नाहीं.

३०. **तृणार्ध**–कस्पट, अत्यंत क्षुद्र वस्तु.

३१. **पितृस्वसापुत्र**–आतेभाऊ (पित्याच्या बहिणीचा मुलगा). **गुणाभिराम**–गुणवंत (गुणांचें आश्रयस्थान). **मात**–गोष्ट.

३२. **विधि**–ब्रह्मदेव. पतिपत्नीयोग हें विधिलिखित असतें; त्यांत मानवी कर्तृत्वानें बदल होत नाहीं, अशी जुनी समजूत होती. त्याचमुळें विवाहबंधनाला 'ब्रम्ह्याची गांठ' म्हणण्याची प्रथा होती. **सुदक्ष**–चतुर. **बलीयसी केवळ ईश्वरेच्छा**–'ईश्वरेच्छा बलीयसी' (परमेश्वराची इच्छा हींच कोणत्याहि घटनेंत सर्वसमर्थ ठरते) या संस्कृत वचनाचा अनुवाद.

३३. **माया**–ईश्वरी शक्ति. **अघटें**–अघटित. **विघडणें**–बिघडविणें, मोडणें. **तुच्छ**–क्षुद्र बुद्धीचे वा मंदमतीचे पामर लोक.

३४. **रचणें**–निर्माण करणें. **अणुही**–थोडी सुद्धां.

३६. **यादवी सभा**–यादवांची सभा. **हळी**–बलराम. **तैं**–तेव्हां. **स्तब्धल्या**–मूक झाल्या.

३७. **आनकदुंदुभि**–वसुदेव. **रोषाकुळ**–अतिशय रागावलेला. **उग्रसेन**–मथुरेचा राजा व कंसाचा पिता.

३८. **उद्धव**–वसुदेवाचा पुतण्या. हा कृष्णभक्त होता. **कीरवाणी**–जिचें बोलणें पोपटासारखें चतुर-मधुर आहे अशी, सुभद्रा.

४०. **लोकनुतप्रभाव**–ज्याच्या सामर्थ्याची लोकांनीं स्तुति केली आहे असा, बलराम.

४१. **हें क्षत्रियाचें...स्वमनोभिरामा**–आपल्याला आवडलेल्या वधूचें हरण करणें, हें क्षत्रियोचित कर्म आहे. (त्या काळीं गांधर्वविवाह पद्धति सर्वमान्य होती.) **तां**–त्वां. **खुशाली**–आनंदाची बाब, स्वस्थता, सुखरूपता.

४२. **विधीनें द्यावी**–विधिपूर्वक द्यावी. **विधीनें निर्मिली**–ब्रह्मदेवानें निर्माण केली.

४३. **खर**–गाढव.

४४. **नसे महाकाज विशेषयत्नें**–विशेष प्रयत्न केला, तर कोणतीहि गोष्ट करायला अवघड नसते.

४५. **आहुक**–कृष्णाचे आजोबा (वसुदेवाचा पिता). **मातामह देवक**–कृष्णाची आई देवकी हिचा पिता देवक. **बाहुक**–एक यादव. **हलायुध**–बलराम.

४६. **प्रवृद्ध**–भडकलेला, वाढलेला. **कोपानळ**–रागाचा अग्नि. **दावशिखी**–दावाग्नि (अरण्यांत भडकलेला अग्नि). **समुदी**–सर्व. **येतां.....धनाची**–शरद्ऋतूंत ज्याप्रमाणें मेघ कोरडे होतात, त्याप्रमाणें.

४७. **उद्धव**–कृष्णाचा चुलतभाऊ. **सात्यकि**–एक यदुकुलोत्पन्न योद्धा (पांडवांचा पक्षपाती). **आदरी**–सन्मान करी.

४८. **अंकासनीं**–मांडीवर. **विजय**–अर्जुन.

४९. **तां**–त्वां. **कैं**–कुठें. **अभद्र**–अशुभ, अनिष्ट. **रक्षी...पातीं**–डोळ्यांच्या बुबुळांना ज्याप्रमाणें डोळ्यांचीं पोटें राखतात, त्याप्रमाणें (श्रीकृष्ण अर्जुनाचें रक्षण करतो).

५०. **तालांक**–बलराम. **चक्रांक**–श्रीकृष्ण. **सआहुकाशीं**-आहुकांबरोबर (आजोबांबरोबर). **आलोचन**–विचारविनिमय.

५१. **अति उत्सवार्सीं**–अत्यंत उत्साहानें. **सुतोषें**–संतोषानें. **बळकेशव**–बलराम व कृष्ण.

५२. **परिजणें**–वरणें, लग्न करणें. **भद्रा**–कल्याणकारिणी (सुभद्रा). **नारीमणि**–स्त्रीरत्न. **कामलता**–जणुं कामाची वेलच; सुंदरी, **स्वगेह**–स्वतःचें घर. **अतितोषचित्तें**-अत्यंत संतुष्ट मनानें. **समर्पिली घेऊन रत्नवित्तें**–आंदण म्हणून दिलेले रत्नालंकार बरोबर घेऊन.

५३. **पुरुषार्थसिंधु**–पराक्रमाचा जणुं सागरच. **धर्मबंधु**–धर्मराज युधिष्ठिराचा भाऊ. **पृथा**–कुंती. **जनित्री**–आई. **तापोर्मि**–दुःखाची वा त्रासाची लाट.

५४. **स्नेहार्द्र**–स्नेहानें ओलावलेलें. **आलोकनिमेषण**–दृष्टिक्षेप. **सन्मान-सौहार्द-सुतोषण**–सन्मानानें व स्नेहशील वर्तनानें संतुष्ट करणें.

५५. **आप्तोक्ति**–वडिलधाऱ्यांचें वा नातलगांचें बोलणें. **सव्यसाची**–अर्जुन (डाव्या-उजव्या दोन्ही हातांनीं धनुष्यबाण वापरूं शकणारा). **वासवि भूषण**–मूळचा अर्जुनवेश (वासवि = इंद्रपुत्र अर्जुन). अर्जुनानें यतिवेश टाकून आपला मूळचा वेश धारण केला.

५६. **काषाय कौपीन**–भगवी लंगोटी. **मृगाजिन**–हरिणाचें कातडें. **धात्री**–आवळी अथवा धावडा.

५७. **उष्णीष**–मुकुट. **सत्कंचुक**–भारी अंगरखा. **नीहारनिर्मुक्त दिनेश**–अभ्रांनीं न झाकलेला सूर्य.

५८. **दिव्ययान**–मूल्यवान् वाहन; उत्तम रथ.

५९. **तालांक**–बलराम.

६०. **दीपावली**–दिव्यांच्या ओळी. **तम**–अंधार.

६१. **पूग**–पोफळी. **रंभा**–केळी. **वृक्षपंक्ती**–झाडांच्या रांगा. **गेहपंक्ती**–घरांच्या रांगा. **मढिले सुवर्णीं**–सोन्यानें मढवलेले.

६२. **निर्जराळीं**–देवलोकांतील. **तैं**–तेव्हां. **सदसीं**–सभागृहांत, दिवाणखान्यांत. **वारांगना**–वेश्या.

६३. **कैं**–कसें. **कवि-अल्प-बोल**–कवीची असमर्थ वाणी.

६४. **अखिलांडखाणी**–सर्व विश्वाचा कर्ता, श्रीकृष्ण. **सविस्मित**–आश्चर्यासह. **देवराणी**–देवस्त्रिया अथवा इंद्राणी. **निगमीं पुराणीं**–वेदांत व पुराणांत.

६५. **मानवी लघुतरा वाणी**–मानवाची अति क्षुद्र वाणी. **फणि**–शेष. **विधि**–ब्रह्मदेव. **ते काय...पसारे**–कवीची वाणी (प्रभुचरित्र वर्णन करण्याइतकी) व्यापक बनूं शकेल काय ? नाहीं, हा भाव.

६६. **तैं**–तेव्हां. **नृप**–राजा. **याज्ञसेनी**–द्रौपदी. **वृकोदर**–भीम. **सहानुज**–(नकुळ व सहदेव या दोन) धाकट्या बंधूंसह. **दिव्य यानीं**–श्रेष्ठ वाहनांतून.

६७. **मंटप**–मंडप. **साक्षपीं**–दक्षतेनें. **आनकदुंदुभि**–वसुदेव.

६८. **निर्विशंक**–निःशंकपणें, निःसंकोचपणें.

६९. **धरामरांचा गण**–ब्राह्मणसमुदाय. **आशीर्गिरा**–आशीर्वचन. **वोहर**–वधूवर. **चक्रपाणी**–विष्णु.

७०. **शची**–इंद्राणी. **सुरेंद्र**–इंद्र, देवांचा राजा. **धनद**–कुबेर.

७१. **धर्म क्रियेशीं अति शोभताहे**–धर्म हा क्रियेनें म्हणजे आचारानेंच शोभतो. ' आचारप्रभवो धर्मः । ' **क्रतु**–संकल्प. कोणत्याहि गोष्टीचा विधिपूर्वक संकल्प सोडतांना दक्षिणा द्यावी लागते. **जय**–अर्जुन. **यादवी**–सुभद्रा.

७३. अर्जुनरूपी वृक्षाला सुभद्रारूपी सुकोमल वेलीनें जणुं प्रेमानें आलिंगन दिलें. पुष्ट स्तन हीं जणुं त्या वेलीवर लगडलेलीं फळें आहेत; नेत्रकमळें हीं तिच्यावर फुललेलीं जणुं फुलें आहेत; लालचुटुक ओठ ही जणुं तिची लालसर पालवी आहे; पांढरे शुभ्र दांत या जणुं तिच्यावरच्या सुंदर कळ्या आहेत; आणि काळाभोर केशसंभार हा जणुं तिच्याभोंवतीं रुंजी घालणारा भ्रमरांचा थवा आहे !

७४. **वोहर**–वधूवर. **नागरी**–नगरांतील स्त्रिया. **अक्षयबाण**–अक्षयवाण अथवा औक्षण. **लिंबलोण**–कडू निंबाचीं पानें व मीठमोहरी उतरून टाकणें. (दृष्ट लागूं नये म्हणून).

७६. **आंदण**–वधूकडच्या लोकांनीं वधूवरांना द्यावयाच्या भेटवस्तु.

७७. **केयूर**–वांकी, बाजूबंद. **हेपसूत्रें**–सोन्याच्या माळा (गोफ). **झषाकृती कुंडल**–मकरकुंडलें. **हस्तमात्रा**–हातांतील कडीं. **कामसमानगात्रा**–सुंदर शरीराची, सुभद्रा.

७९. **पृथा**–कुंती. **वृकोदर**–भीम. **माद्रीसुत**–माद्रीचे पुत्र नकुल व

~~सहदेव~~

८०. **फाल्गुन**–अर्जुन. **आलयाला**–घराकडे. **मनोरथाब्धी तरला धनंजय**–अर्जुन मनोरथांचा सागर तरून गेला; अर्जुनाच्या इच्छा तृप्त झाल्या.

८१. **धनंजय**–अर्जुन.

८२. **देवेंद्रप्रस्थ**–इंद्रप्रस्थ नगरी. **सुतोषीं**–संतोषानें. **यम**–यमधर्माचा पुत्र (वा अवतार) युधिष्ठिर. या श्लोकांतील व्यक्तिगणनेंत धर्माचा उल्लेख अगोदर येऊन गेला असल्यामुळें धर्मराजासाठीं हा शब्द अकारण पुनरुक्त झाला आहे. **महानंदसिंधु**–अपार आनंदाचा सागर.

८३. **जगीं तोचि ज्याला**–तोच जगांत जिवंत राहिला अथवा जन्मास आल्याचें सार्थक पावला. (ज्याला = जियाला.)

८४. **गाथा**–ग्रंथ, काव्यग्रंथ. **सांवशर्व**–शिवशंकर. **इहामुत्र**–इहलोकींचें व परलोकींचें सुख.

८५. **वीणकण्ठें**–कष्टावांचून.

८६. **पुनित घडलों मी शतकुळें**–माझ्या शंभर कुळांसह मी पावन झालों.

८७. **हरीलाही जैसा प्रिय विजय**–कृष्णाला जसा अर्जुन प्रिय आहे, तसा. **नाम्नी**–नांवाची. **रमारंग**–विष्णु, कृष्ण.

८८. **विश्वामित्रकुलारविंदतरणी ऋग्वेदसिंधूमणी**–विश्वामित्रगोत्री कुलाचें कमल खुलविणारा सूर्य आणि देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मणशाखेच्या समुद्रांत गवसलेला मणि (रत्न)–माधवराव. **जनिता**–पिता. **गंगासागरसंगमीं**–दक्षिण-गंगा गोदावरी समुद्राला जिथें मिळते, त्या प्रांतांत.

८९. **लक्ष्मीधर व बापदेव**–निरंजन माधवांचे दोन गुरु. (पहा–प्रस्तावना, पृ. १३–२१). **सांइखडें**–कठपुतळी (छायाक्रीडनक). **मद्रसना**–माझी वाणी.

९०. **दिव्यनिरंजनाभिधपद**–निरंजन नामक दिव्य पद; अवधूतावस्था. **संतारिलें**–सहजपणें तारलें. **हृत्तम**–हृदयांतील अंधार. **बोधचंडकिरण**–बोध-सूर्याचे प्रखर किरण. **प्राक्तनकोटिजन्म-अघ**–पूर्वींच्या कोटिजन्मांतील पाप. **परतें**–पलीकडे.

९१. **विवाहकामी तरि**–आपला विवाह व्हावा अशी इच्छा असेल तर. या श्लोकांतील फलश्रुति विवाहेच्छु पुरुषांसाठीं आहे. एकनाथांचें 'रुक्मिणीस्वयंवर' विवाहेच्छु स्त्रिया वाचतात.

९४. **बनाजी**–निरंजन माधवांचें मूळ नांव. **युग्महस्त**–दोन्ही हात. **कृपार्णवीं**–कृपेचा सागर असलेल्या–कृपावंत–श्रोत्यांनीं.

९५. 'सुभद्रास्वयंवरा' वरून शुभाशुभ शकुन पाहण्याची रीति या श्लोकांत कवीनें सांगितली आहे; परंतु ती संदिग्ध आहे: प्रथम तांदुळाच्या सात राशी

करायच्या. नंतर मनांत प्रश्न योजून तिथें (म्हणजे कुठें ?) तीन सुपाऱ्या व फुलें ठेवायचीं. नंतर सर्गक्रमांक आणि श्लोकक्रमांक पहायचा (कसा ?) आणि त्या श्लोकांतील अर्थात योजलेल्या प्रश्नाचें शुभाशुभ उत्तर प्राप्त करायचें.

९६. **श्रीमच्छालिवहीं शकीं**–शालिवाहन शकांत. **ख-नव-सा-एकांक** (ख = ०, नव = ९, सा = ६, एकांक = १)–१६९० (' अंकांनां वामतो गतिः । ' या नियमानुसार). **सर्वधारी वत्सर**–सर्वधारी नामक संवत्सर. (संवत्सरें साठ आहेत. त्यांतील हें एक.) **मार्गशिरीं मासीं**–मार्गशीर्ष महिन्यांत. **सुकृष्ण दशमी**–वद्य पक्षांतील दशमी. **पूर्णेंदुवार**–सोमवार.

९७. **काव्यगी (?)रंगभू**–काव्यरूपी रंगभूमि. **तांडव**–एक रौद्र नृत्यप्रकार. **सखी घडती**–सखी होतात.

काव्यसमाप्तिमुद्रेनंतर नोंदविलेला प्रतलेखनकाल फाल्गुन व. ७, गुरुवार, शके १६९० असा आहे. म्हणजे ही प्रत (श्री. ल. रा. पांगारकरांना उपलब्ध झालेली) काव्यनिर्मितीनंतर अवघ्या दोन महिन्यांच्या आंतच तयार झालेली आहे.

□ □ □

सुभद्रा स्वयंवर

परिशिष्टें

करायच्या. नंतर मनांत प्रश्न योजून तिथें (म्हणजे कुठें ?) तीन सुपाऱ्या व फुलें ठेवायचीं. नंतर सर्गक्रमांक आणि श्लोकक्रमांक पहायचा (कसा ?) आणि त्या श्लोकांतील अर्थात योजलेल्या प्रश्नाचें शुभाशुभ उत्तर प्राप्त करायचें.

९६. **श्रीमच्छालिवहीं शकीं**–शालिवाहन शकांत. **ख-नव-सा-एकांक** (ख = ०, नव = ९, सा = ६, एकांक = १)–१६९० (' अंकांनां वामतो गतिः । ' या नियमानुसार). **सर्वधारी वत्सर**–सर्वधारी नामक संवत्सर. (संवत्सरें साठ आहेत. त्यांतील हें एक.) **मार्गशिरीं मासीं**–मार्गशीर्ष महिन्यांत. **सुकृष्ण दशमी**–वद्य पक्षांतील दशमी. **पूर्णेंदुवार**–सोमवार.

९७. **काव्यगी** (?)**रंगभू**–काव्यरूपी रंगभूमि. **तांडव**–एक रौद्र नृत्यप्रकार. **सुखी घडती**–सुखी होतात.

काव्यसमाप्तिमुद्रेनंतर नोंदविलेला प्रतलेखनकाल फाल्गुन व. ७, गुरुवार, शके १६९० असा आहे. म्हणजे ही प्रत (श्री. ल. रा. पांगारकरांना उपलब्ध झालेली) काव्यनिर्मितीनंतर अवघ्या दोन महिन्यांच्या आंतच तयार झालेली आहे.

□ □ □

सुभद्रा स्वयंवर

परिशिष्टें

परिशिष्ट पहिलें

'सुभद्रास्वयंवरां'तील वृत्तें

पंडितकवि निरंजन माधव हे वृत्तप्रभु होते. 'वृत्तमुक्तावली' व 'वृत्तावतंस' हे दोन वृत्तविषयक ग्रंथ त्यांनीं रचले असून, उपजातीच्या चौदा उपभेदांत नामोल्लेखांसह 'महालक्ष्मीस्तोत्र' रचलें आहे. त्यांनीं 'सुभद्रास्वयवरां'त योजलेल्या अक्षरगणवृत्तांचीं लक्षणें आणि त्या त्या वृत्ताची श्लोकगणना पुढें देत आहें.

स्रग्धरा

चरणांत अक्षरें २१. गण : म, र, भ, न, य, य, य.
यति : ७, ७, ७.
श्लोक क्र. १. १; ३. ४, २३, २४.

वसंततिलका

चरणांत अक्षरें १४. गण : त, भ, ज, ज, ग, ग.
यति : पादान्तीं.
श्लोक क्र. १·२-३, ५-९; २·३८-४९; ५·३६-४३; ६·१९; ७·६४-६६.

शार्दूलविक्रीडित

चरणांत अक्षरें १९. गण : म, स, ज, स, त, त, ग.
यति : १२, ७.
श्लोक क्र. १. ४, १०; २·२२-२६; ३·१४-२२, २५; ४·३-४१; ५·२-२४, ३१-३५, ४४-५०; ६·१-१३, २०-३८; ७·१-६, ७३, ८८-९१, ९५-९७.

शिखरिणी

चरणांत अक्षरें १७. गण : य, म, न, स, भ, ल, ग.
यति : ६, ११.
श्लोक क्र. १·१३-४७; ६·१४-१८.

स्वागता

चरणांत अक्षरें ११. गण : र, न, भ, ग, ग.

यति : पादान्तीं.

श्लोक क्र. १. ४८.

इंद्रवंशा

चरणांत अक्षरें १२. गण : त, त, ज, र.

यति : पादान्तीं.

श्लोक क्र. : २. ८, ११, ३५-३६.

उपेंद्रवज्रा

चरणांत अक्षरें ११. गण : ज, त, ज, ग, ग.

यति : पादान्तीं.

श्लोक क्र. २. ९; ७. ७६.

इंद्रवज्रा

चरणांत अक्षरें ११. गण : त, त, ज, ग, ग.

यति : पादान्तीं.

श्लोक क्र. २. १०, १३; ५. १; ७. ८-९, १२, १४, १७-१८, २३-२४, २६, २९-३१, ३६-३७, ४२-४३, ४६, ४९, ५४-५६, ६०-६३, ७९.

वंशस्थ

चरणांत अक्षरें १२. गण : ज, त, ज, र.

यति : पादान्तीं.

श्लोक क्र. २. १२, ७. ९३-९४.

मृदंग

चरणांत अक्षरें १५. गण : त, भ, ज, ज, र.

यति : ८, ७.

श्लोक क्र. २. ३७

उपजाति (इंद्रमाला)

चरणांत अक्षरें ११. गण : इंद्रवज्रा व उपेंद्रवज्रा यांचें मिश्रण.

यति : पादान्तीं.

श्लोक क्र. ७. ७, १०-११, १३, १५-१६, १९-२२, २५, २७-२८, ३२-३५, ३८-४१, ४४, ४७-४८, ५०-५३, ५७-५९, ६९-७२, ७४-७५, ७७-७८, ९२.

उपजाति (इंद्रवंशा-इंद्रमाला यांचें मिश्रण)

श्लोक क्र. ७. ४५.

उपजाति (वंशस्थ-इंद्रवंशा-इंद्रमाला यांचें मिश्रण)

श्लोक क्र. ७. ६७-६८, ८०-८१.

भुजंगप्रयात

चरणांत अक्षरें १२. गण : य, य, य, ।.

यति : ६, ६.

श्लोक क्र. ७. ८२-८५.

अनुष्टुभ्

चरणांत अक्षरें ८. गण : अनियमित

यति : पादान्तीं.

श्लोक : क्र. ७. ९८.

♧ ♧ ♧

दुरुस्ती : पृष्ठ क्र. १०० वर श्लोकांक ५·५० नंतर ' चूर्णिका ' हें शीर्षक टाकायचें राहून गेलें आहे आणि पृष्ठ क्र. १२० वर श्लोकांक ७·७१ नंतर ' इंद्रमाला ' (उपजाति) हें शीर्षक अकारण पुनः पडलें आहे.

परिशिष्ट दुसरें

'सुभद्रास्वयंवरां'तील चूर्णिका

'चूर्णिका' हें प्राचीन गद्यशैलीचें नांव आहे. या शैलीला चूर्णक, चूर्ण, चूर्णी अशींहि नांवें आहेत. या संज्ञेचा आढळ भरताच्या 'नाट्यशास्त्रां'त (१८.५१), वामनाच्या 'काव्यालंकारां'त (१. ३।३४), जयकीर्तीच्या 'छंदोनुशासनां'त, शार्ङ्गधराच्या 'संगीतरत्नाकरां'त (२. १८४–१९२), 'प्राकृतपैंगलां'त (काव्यमालावृत्ति, २।२४१, २४३, २४६) आणि गंगादासाच्या 'छंदोमंजरीं'त (७।३) होतो. 'प्राकृतपैंगलां'त या शैलीची व्याख्या अशी दिली आहे--

अकठोराक्षरं स्वल्पसमासं चूर्णकं विदुः ।
तत्र वैदर्भरीतिस्थं गद्यं हृद्यतरं भवेत् ।।

मृदु अक्षरांनीं आणि स्वल्पसमासांनीं युक्त असें वैदर्भी रीतींतील हृद्य गद्य म्हणजे 'चूर्णक' होय, असा प्राचीन छंदःशास्त्रज्ञांचा अभिप्राय आहे. गद्य हें काव्याचें वाहन म्हणून स्वीकारलें गेल्यानंतर गद्याला हें हृद्य स्वरूप प्राप्त होणें स्वाभाविकच होतें. बाणभट्टाच्या 'कादंबरीं'त या हृद्य गद्याचा मोहक विलास अनुभवायला मिळतो.

प्राचीन छंदःशास्त्रज्ञांनीं हृद्य गद्याचे–काव्याचें वाहन बनलेल्या गद्याचे–चूर्णिका, उत्कलिकाप्राय व वृत्तगन्धि हे तीन प्रकार मानले आहेत. जेव्हां अक्षरें अकठोर (मृदु) आणि समास स्वल्प (कमी) असतात, तेव्हां तें गद्य चूर्णक अभिधान पावतें; तेंच कठोर वर्णांनीं भरलेलें आणि समासांनीं खचलेलें असलें म्हणजे 'उत्कलिकाप्राय' (कल्लोलप्राय) बनतें आणि जेव्हां त्यांत वृत्ताचा आभास होतो, तेव्हां हृद्यतेच्या सुवर्णाला वृत्तसुगंधाचा लाभ होऊन तें 'वृत्तगंधि' अशी सार्थ संज्ञा पावतें. उदाहरणार्थ, 'पातालतालुतलवासिषु दानवेषु' या शब्दसमूहाला वसंततिलकेचा वृत्तगंध लाभलेला आहे.

डॉ. ना. ग. जोशी यांनीं 'आवर्तनहीन पण आंदोलित, साघात, प्रवाही स्वैर शैली' अशी चूर्णिकेची व्याख्या केली आहे. त्यांच्या मतें ही 'अर्वाचीन मुक्तशैलीसदृश प्राचीन गद्यशैली' आहे.

चूर्णक आणि तत्सदृश 'हृद्य' गद्य हें लोककथेच्या गद्यशैलींतून उत्क्रांत झालें असावें, असें साधार अनुमान श्रीमती दुर्गा भागवत यांनीं केलें आहे. त्या अश।

गद्याला ' तालबद्ध, छन्दःसमन्वित गद्य ' म्हणतात. हें गद्य प्रथम प्राचीन उपनिषदांत आढळतें. " सत्यं वद । धर्मं चर । स्वाध्यायान्मा प्रमदः । " या वचनांत अथवा " असतो मा सद् गमय । तमसो मा ज्योतिर्गमय । मृत्योर्माऽमृतं गमय । " यांसारख्या अन्य अनेक वचनांत या छन्दःसमन्वित गद्याचें वैभव दृग्गोचर होतें.

ही नादमय लोकगद्याची शैली अतिप्राचीन काळापासून अव्याहत नांदत आलेली आहे. तिचा प्रभाव व्यापक आहे. समाजाभिमुख चिंतकांना आणि तत्त्व-प्रचारकांना या शैलीचाच आश्रय घ्यावा लागला आहे. शंकराचार्यांच्या भाष्यांत आणि चक्रधरांच्या सूत्रांत याच हृद्य शैलीचा प्रभाव स्पष्टपणें उमटलेला दिसतो. आपल्या कहाणी-वाङ्मयांत सर्वत्र हीच हृद्य गद्याची शैली वापरलेली आहे—

ऐका परमेश्वरा गणेशा, तुमची कहाणी.
निर्मळ मळे, उदकाचें तळें,
बेलावृक्ष सुवर्णाचीं कमळें,
विनायकाचीं देवळें-रावळें.
मनचा गणेश मनीं वसावा.
हा वसा कधीं घ्यावा ?
श्रावण्या चौथीं घ्यावा, माही चौथीं पूर्ण करावा.
संपूर्णाला काय करावें ?
पशापायलीचें पीठ कांडावें, अठरा लाडू करावे.
सहा ब्राह्मणाला, सहा देवाला.
सहांचें सहकुटुंबीं भोजन करावें.
अल्पदान महापुण्य !
असा गणराज मनीं ध्याइजे, मनीं पाविजे.
चिंतिलें लाभिजे, मनकामना कार्यसिद्धी निर्विघ्न करिजे.
ही साठा उत्तरांची कहाणी
पांचा उत्तरीं सुफळ संपूर्ण.

महारांच्या घरगुती लावण्यांतहि ही चूर्णशैली आजपर्यंत टिकून आहे. कहाणी-शैलीचें उत्कृष्ट गद्य रमावल्लभदासांनीं लिहिलें आहे. तें कांहींसें अलक्षित असल्यामुळें येथें मुद्दाम, विस्ताराचें भय दूर सारून, उद्धृत करीत आहें—

परिशिष्ट दुसरें

'सुभद्रास्वयंवरां'तील चूर्णिका

'चूर्णिका' हें प्राचीन गद्यशैलीचें नांव आहे. या शैलीला चूर्णक, चूर्ण, चूर्णी अशींहि नांवें आहेत. या संज्ञेचा आढळ भरताच्या 'नाट्यशास्त्रां'त (१८. ५१), वामनाच्या 'काव्यालंकारां'त (१. ३।३४), जयकीर्तीच्या 'छंदोनुशासनां'त, शार्ङ्गधराच्या 'संगीतरत्नाकरां'त (२. १८४–१९२, 'प्राकृतपैंगलां'त (काव्यमालावृत्ति, २।२४१, २४३, २४६) आणि गंगादासाच्या 'छंदोमंजरीं'त (७।३) होतो. 'प्राकृतपैंगलां'त या शैलीची व्याख्या अशी दिली आहे--

अकठाराक्षर स्वल्पसमासं चूर्णकं विदुः ।
तत्र वैदर्भरीतिस्थं गद्यं ह्रद्यतरं भवेत् ।।

मृदु अक्षरांनीं आणि स्वल्पसमासांनीं युक्त असें वैदर्भी रीतींतील ह्रद्य गद्य म्हणजे 'चूर्णक' होय, असा प्राचीन छंदःशास्त्रज्ञांचा अभिप्राय आहे. गद्य हें काव्याचें वाहन म्हणून स्वीकारलें गेल्यानंतर गद्याला हें ह्रद्य स्वरूप प्राप्त होणें स्वाभाविकच होतें. बाणभट्टाच्या 'कादंबरीं'त या ह्रद्य गद्याचा मोहक विलास अनुभवायला मिळतो.

प्राचीन छंदःशास्त्रज्ञांनीं ह्रद्य गद्याचे–काव्याचें वाहन बनलेल्या गद्याचे–चूर्णिका, उत्कलिकाप्राय व वृत्तगन्धि हे तीन प्रकार मानले आहेत. जेव्हां अक्षरें अकठोर (मृदु) आणि समास स्वल्प (कमी) असतात, तेव्हां तें गद्य चूर्णक अभिधान पावतें; तेंच कठोर वर्णांनीं भरलेलें आणि समासांनीं खचलेलें असलें म्हणजे 'उत्कलिकाप्राय' (कल्लोलप्राय) बनतें आणि जेव्हां त्यांत वृत्ताचा आभास होतो, तेव्हां ह्रद्यतेच्या सुवर्णाला वृत्तसुगंधाचा लाभ होऊन तें 'वृत्तगंधि' अशी सार्थ संज्ञा पावतें. उदाहरणार्थ, 'पातालतालुतलवासिषु दानवेषु' या शब्दसमूहाला वसंततिलकेचा वृत्तगंध लाभलेला आहे.

डॉ. ना. ग. जोशी यांनीं 'आवर्तनहीन पण आंदोलित, साघात, प्रवाही स्वैर शैली' अशी चूर्णिकेची व्याख्या केली आहे. त्यांच्या मतें ही 'अर्वाचीन मुक्तशैलीसदृश प्राचीन गद्यशैली' आहे.

चूर्णक आणि तत्सदृश 'ह्रद्य' गद्य हें लोककथेच्या गद्यशैलींतून उत्क्रांत झालें असावें, असें साधार अनुमान श्रीमती दुर्गा भागवत यांनीं केलें आहे. त्या अशा

गद्याला ' तालबद्ध, छन्दःसमन्वित गद्य ' म्हणतात. हें गद्य प्रथम प्राचीन उपनिषदांत आढळतें. " सत्यं वद । धर्मं चर । स्वाध्यायान्मा प्रमदः । " या वचनांत अथवा " असतो मा सद् गमय । तमसो मा ज्योतिर्गमय । मृत्योर्माऽमृतं गमय । " यांसारख्या अन्य अनेक वचनांत या छन्दःसमन्वित गद्याचें वैभव दृग्गोचर होतें.

ही नादमय लोकगद्याची शैली अतिप्राचीन काळापासून अव्याहत नांदत आलेली आहे. तिचा प्रभाव व्यापक आहे. समाजाभिमुख चिंतकांना आणि तत्त्व-प्रचारकांना या शैलीचाच आश्रय घ्यावा लागला आहे. शंकराचार्यांच्या भाष्यांत आणि चक्रधरांच्या सूत्रांत याच हृद्य शैलीचा प्रभाव स्पष्टपणें उमटलेला दिसतो. आपल्या कहाणी-वाङ्मयांत सर्वत्र हीच हृद्य गद्याची शैली वापरलेली आहे—

ऐका परमेश्वरा गणेशा, तुमची कहाणी.
निर्मळ मळे, उदकाचें तळें,
बेलावृक्ष सुवर्णाचीं कमळें,
विनायकाचीं देवळें-रावळें.
मनचा गणेश मनीं वसावा.
हा वसा कधीं घ्यावा ?
श्रावण्या चौथीं घ्यावा, माही चौथीं पूर्ण करावा.
संपूर्णाला काय करावें ?
पशापायलीचें पीठ कांडावें, अठरा लाडू करावे.
सहा ब्राह्मणाला, सहा देवाला.
सहांचें सहकुटुंबीं भोजन करावें.
अल्पदान महापुण्य !
असा गणराज मनीं ध्याइजे, मनीं पाविजे.
चिंतिलें लाभिजे, मनकामना कार्यसिद्धी निर्विघ्न करिजे.
ही साठा उत्तरांची कहाणी
पांचा उत्तरीं सुफळ संपूर्ण.

महारांच्या घरगुती लावण्यांतहि ही चूर्णशैली आजपर्यंत टिकून आहे. कहाणी-शैलीचें उत्कृष्ट गद्य रमावल्लभदासांनीं लिहिलें आहे. तें कांहींसें अलक्षित असल्यामुळें येथें मुद्दाम, विस्ताराचें भय दूर सारून, उद्धृत करीत आहें—

निर्गुणवल्ली सगुण भली,
श्यामस्वरूपें विराजली,
चढतां ध्यान, उतरतां ज्ञान;
अधिक होय सद्गुरुचें महिमान,
पूर्णबोध बाणेपर्यंत मंत्रयुक्त अंगीकारणें ।
हे अमृतवेळेसी, चारी पांच घटिका रात्र उरलिया,
तेव्हां उठावें, मुखमार्जन करावें,
जें अनुकूल होय, तें आसन घालावें ।
निर्मळ मानस करुनि मग, ' ब्रह्माहमस्मि ' म्हणावें,
उगेंचि वैसावें, कांहींच नाठवावें,
जें जें आठवेल, तें तें वेगळें करावें,
सर्व आपणचि व्हावें !
अथवा चतुर्भुजपीतांबरधारी एकचि जाणावें,
सर्व कर्मीं न विसरावें,
विश्वाकारें तेंचि पहावें,
मग अष्टमहासिद्धी दासी होती ।....
या सिद्धींसी न भुलावें,
आत्मसुखापुढें विषयसुख मृगजळ मानावें,
साधकें आलस्य न करावें, परी अखंडता साधावें,
एक निमिष न विसरावें,
विसराल तरी साक्षात्कार न घडे ।
हें वेदशास्त्रपुराणांचें अंतरसार
सद्गुरूनें प्रगट करूनि सांगितलें ।
सिद्धा—याविणें नव्हे मुक्ति कदा ।
आदीं सेवणें, मग पावणें, सद्यःस्वानंदमदा !
नाहीं तरी दुःखरूप भवभय पावों नेदी सिद्धपदा ।

श्रीरमावल्लभदास म्हणे, घ्या घ्या हें गुप्त सदा ।
यालागीं सदा आठवावें,
अनुष्ठान नित्य करावें, पूर्णप्राप्तीसी पावावें ।
याचि देहीं यासि पहावें ।
जनक-विदेहासम सुख भोगावें ।
सत्य सत्य माझी आण मजचि संपूर्ण ।

रमावल्लभदासांनीं याच शैलींत आणखीहि एक लघुकृति रचली आहे.

निरंजन माधवांच्या पूर्वी चूर्णकाचा वा अन्य प्रकारच्या हृद्य गद्यशैलीचा वापर पंडित सूरिजन, आनंदतनय, अमृतराय, रघुनाथ पंडित, इत्यादि पंडित-कवींनीं केला आहे. निरंजन माधवांच्या सुभद्रास्वयंवरचंपूचें एकमेकाद्वितीयत्व हिरावून घेणारी 'परमहंसकथा' ही पंडित सूरिजनांची धार्मिक रूपककथा चूर्णिकांनीं युक्त आहे. या कथेंत चूर्णिकांना 'वचनचाली' म्हणून उल्लेखिलें आहे. वचन-चालीचा हा एक नमुना पहा—

तीन सिंघासने । अधरु बैसला ।
इंद्र नागेंद्र नरेंद्रु ।
हे तिघे छत्रधरु ।
येक शत इंद्र सेवा करिति ।
चउसस्टी चवरे ढलति ।
साडेबारा कोडी वाजांत्रे वाजति—
वाजविल्याविनु ।

या वचनचालींत ओवीचा 'गंध' अनुभवास येतो. असाच ओवी-गंध निरंजन माधवांच्या 'सुभद्रास्वयंवरां'तील चूर्णिकांत सर्वत्र अनुभवायला मिळतो. उदाहरणार्थ—

त्यानंतर नारदवाक्यमर्यादापाळणीं ।
पुरुषार्थसागर अर्जुन प्रतिज्ञासिद्धकरणीं ।
प्रायश्चित्तनिमित्तें तीर्थभ्रमणीं ।
भ्रमण करितां पुण्य अवनी ।
गंगादि सकळतीर्थनिषेवणीं ।
कार्पटिकवेषग्रहणी ।

पादचारी संचार करित वीरशिखामणी ।
प्रभासक्षेत्रीं पातला ।। २·३३

निरंजन माधवांच्या चूर्णिका तालबद्ध, समासप्रचुरतेनें आशयघन बनलेल्या आणि कथौघाला गति देणाऱ्या आहेत. ' सुभद्रास्वयंवरां 'त २·१-७, १४-२१, २७-३४; ३·१-३, ५-१३, २६-४१; ४·१-२; ५·२५-३०, ५१-६६ एवढ्या चूर्णिका वापरलेल्या आहेत. केवळ या चूर्णिकांच्या वापरामुळेंच हें काव्य ' महाकाव्या 'ऐवजीं ' चंपूकाव्य ' असें अभिधान पावलें आहे.

[**संदर्भ** : छंदोरचना, मराठी छंदोरचना, मराठी छंदोरचनेचा विकास, लोकसाहित्याची रूपरेषा, प्राचीन मराठी पंडिती काव्य, पंडित सूरिजनविरचित परमहंसकथा, श्रीरमावल्लभदासांची गाथा, आनंदतनयकृत कवितासंग्रह, अमृतरायकृत कवितासंग्रह, रघुनाथ पंडितविरचित दमयंतीस्वयंवर.]

♣ ♣ ♣

महादेव

(अनाम) (अनाम) तिमाजी (+ गोदावरी) (अनाम)

भीमराय व्यंकटेश माधवराय हनुमंतराय भगवती

(+ भागीरथी)

बापूजी बनाजी (+ गंगावती)

(निरंजन माधव)

कृष्णराव भिवराव

भगवंतराव नारायणराव तिमाजी बापूजी विश्वासराव

(नक्कल) (नक्कल) (दत्तक गेले.) (नक्कल)

भगवंतराव बापूजी (भिवराव-पुत्र)

(अकालीं मृत) (दत्तक)

कृष्णराव

रामराव नारायणराव विश्वासराव बनाजी

लक्ष्मण यशवंतराव वामन गोविंदराव (नारायणपुत्र)

(दत्तक)

केशवराव गोविंदराव नरसिंगराव रामचंद्र नारायणराव बापूराव

(बनाजीस दत्तक) (नक्कल)

कृष्णराव माधवराव

श्यामराव शरच्चंद्र गोपाळराव गोविंदराव विष्णु भगवान रावसाहेब

प्रशांत रघुनाथ मिलिंद

अशोक माधव विनायक शशिकांत

निरंजन माधवांच्या पूजेंतील श्रीदत्तात्रेय

निरंजन माधवांच्या पूजेतील श्रीलक्ष्मी-नारायण



निरंजन माधवांच्या
राहत्या घराचें
एक जुनें दार
[६१, शनिवार पेठ,
पुणें २]

निरंजन माधवांचे एक वंशज
कै. श्रीमंत कृ. के. पारसनीस
[इ. स. १८८२ – १९६५]



परिशिष्ट तिसरें

निरंजन माधवांचें घर, देवघर व घराणें

निरंजन माधवांचें घर आज पुणें येथें मुठा नदीच्या कांठीं अमृतेश्वराच्या मांदिराजवळ (६१, शनिवार पेठ, पुणें २) आहे. या प्रचंड वाड्यांत गेल्या दोनशें वर्षांत कालप्रभावानें अनेकवार दर-भर झालेली असली, तरी मूळ वास्तूच्या भव्यतेच्या कांहीं खुणा आजहि विद्यमान आहेत. निरंजनांचा आणि त्यांच्या ज्येष्ठ बंधूंचा इ. स. १७२४ पासूनच बाजीरावाशीं आणि त्यामुळें पुण्याशीं संबंध आला होता. ते स्वतः पेशव्यांचे राजदूत होते आणि त्यांचे बंधु फारसनवीस होते. त्यामुळें त्यांचें प्रारंभापासूनच पुणें हें केंद्रीय निवासस्थान (Head Quarters) होतें. ही पार्श्वभूमि ध्यानीं घेतां कदाचित् त्यांचें पुण्यांतील घर बहुशः शनिवार-वाड्याच्या उभारणीपूर्वींच (इ. स. १७२९ पूर्वींच) उभारलें गेलें असावें. इ. स. १७२५ हें स्थूलपणें त्यांच्या घराच्या उभारणीचें वर्ष मानायला हरकत नाहीं.

निरंजन माधवांच्या घरांत आज त्यांच्या उपासनेंतील षड्भुज सायुध दत्त आणि लक्ष्मीनारायण यांच्या मूर्ति आहेत. त्यांची पहिली गुरुपरंपरा (लक्ष्मीधर गुरूंकडून लाभलेली) दत्त-संप्रदायी असल्यामुळें दत्त हें त्यांचें उपास्य असणें स्वाभाविक आहे. लक्ष्मीनारायणाच्या मूर्ति त्यांना दक्षिणयात्रेंत गोकर्ण-महाबळेश्वर येथें (बेलूर मठांतून सुंदर कृष्णाची मूर्ति घेऊन पुण्याकडे येतांना) एका ब्राह्मणानें दिल्या होत्या. त्यांच्या दुसऱ्या परंपरेच्या (सिद्धेश्वर संप्रदायाच्या) बेलूर मठांत त्यांना अत्यंत अद्भुत रीतीनें प्राप्त झालेली सुंदर कृष्णाची सुंदर मूर्ति त्यांनीं पुण्यांतील घरांत आणून स्थापिली होती. ही उत्कृष्ट मूर्ति गंडकी शिळेची होती. ' पाहोनि मूर्तीचें दिव्यरूप । हरपला कंदर्पाचा दर्प । ' असें तिच्या सौंदर्याचें वर्णन संप्रदायपरिमळकारांनीं (सं. प. ३. १५२) केलें आहे. ही मूर्ति मात्र आज निरंजन माधवांच्या घरांत अस्तित्वांत नाहीं. तीं केव्हां, कोणीं वा कुठें नेली, याचा पत्ता नाहीं. गेल्या पिढींतील कांहीं वंशजांनीं या मूर्तीचा शोध घेण्याचा प्रयत्न केला, परंतु पत्ता लागला नाहीं.

निरंजन माधवांचें मूळ आडनांव एकबोटे. ते देशस्थ ऋग्वेदी, विश्वामित्र-गोत्री, त्रिप्रवरी (विश्वामित्र, अघ र्षण व कौशिक) ब्राह्मण होते. त्यांच्या ज्येष्ठ बंधूंना पेशव्यांची फारसनवीसी मिळाल्यामुळें त्यांच्या घराण्याला फारसनवीस (पारसनीस) हें आडनांव प्राप्त झालें. आज त्यांच्या घरांत राहणारे त्यांचे वंशज

पारसनीस याच आडनांवानें ओळखले जातात. स्वतः निरंजन माधवांना कांहीं संतति नसावी. सर्व वंशविस्तार त्यांचे चुलतबंधु बापूजी भीमराव यांचा आहे. ' संप्रदायपरिमळां 'त उल्लेखिलेले, शाहू व बाजीराव यांच्या कृपेला पात्र ठरलेले निरंजनांचे ज्येष्ठ बंधु म्हणजे हे ज्येष्ठ चुलतबंधु तर नसावे ? कारण वंशावळींत निरंजनांना सख्खा भाऊ असल्याचें दिसत नाहीं.

या घराण्यांतील कै. कृष्णाजी केशवराव पारसनीस हे उत्तम कवि आणि ज्योतिषी होते. त्यांच्या ज्योतिषज्ञानाचा लौकिक विशेष होता. त्यांनीं रचलेलें प्रदीर्घ अध्यात्मपर काव्य १९६१ च्या पानशेत-जलप्रलयांत दुर्दैवानें नष्ट झालें. त्यांनीं सुंदर कृष्णाच्या मूर्तींचा शोध घेण्याचा आटोकाट प्रयत्न केला. त्यांच्या हयातींतच पारसनीस दप्तराचा मोठा भाग सरकारी दप्तरखान्यांत समाविष्ट झाला. परंतु उर्वरित बराच संग्रह पानशेत-जलप्रलयांत वाहून गेला ! प्रलयानंतरच्या काळांत वंशजांनीं निरंजन माधवांच्या पुरातन घराला ' निरंजनमहाल ' असें नांव देऊन त्या परमार्थप्रवण विदग्ध कवीची स्मृति जागवली आहे.



♣ ♣ ♣

परिशिष्ट चौथें

संदर्भ-साहित्य

१. **निरंजन माधवांचा कवितासंग्रह, भाग पहिला (स्तोत्रसंग्रह व संप्रदायपरिमळ)** : संपा. ल. रा. पांगारकर. पुणें, १९१९.

२. **निरंजन माधवांचा कवितासंग्रह, भाग दुसरा (श्रीज्ञानेश्वर-विजय)** : संपा. ल. रा. पांगारकर. पुणें, १९२५.

३. **निरंजन माधवांचा कवितासंग्रह, भाग तिसरा (चिद्बोध-रामायण, स्फुट प्रकरणें व सुभद्राचंपू)** : संपा. ल. रा. पांगारकर. पुणें, १९२७.

४. **प्राचीन मराठी कविपंचक** : प्रा. द. सी. पंगू. कोल्हापूर, १९४४.

५. **प्राचीन मराठी पंडिती काव्य** : डॉ. के. ना. वाटवे. पुणें, १९६४.

६. **स्फुट संग्रह, भाग दुसरा (महाराष्ट्रकाव्यग्रंथ : १४)** : संपा. वि. ल. भावे. ठाणें, श. १८२९.

७. **पेशवे दप्तर, भाग २१, २२, २५, २६, २८, ३०** : संपा. गो. स. सरदेसाई. मुंबई, १९३२-३३.

८. **श्री. पांगारकर स्मारक ग्रंथ, भाग पहिला (साहित्य-गौरव)** : संपा. डॉ. य. खु. देशपांडे व ग. त्र्यं. बगदे. नाशिक, १९४९.

९. **स्कन्दमहापुराणम् (प्रथमो भागः)** : प्रका. मनसुखराय मोर. कलकत्ता, १९५९.

१०. **सार्थ सटीप महाभारत, भाग दुसरा (आदिपर्व, अध्याय ९४ ते २३४)** : संपा. चिं. वि. वैद्य. मुंबई, १९३२.

११. **सुलभ सार्थ श्रीमद्भागवत, भाग पांचवा (स्कंध १० वा–उत्तरार्ध** : प्रका. दामोदर सावळाराम आणि मंडळी. मुंबई, १९२८.

१२. **छंदोरचना** : डॉ. मा. त्रिं. पटवर्धन. मुंबई, १९३७.

१३. **मराठी छंदोरचना** : डॉ. ना. ग. जोशी. बडोदें, १९५५.

१४. **मराठी छंदोरचनेचा विकास** : डॉ. ना. ग. जोशी. मुंबई, १९६४.

१५. **मराठी छंद** : वि. का. राजवाडे. पुणें, श. १८४८.

१६. **देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण परिचयग्रंथ** : विद्यानिधि सिद्धेश्वरशास्त्री चित्राव. पुणें, १९४४.

१७. **महाराष्ट्र-सारस्वत** : वि. ल. भावे, पुरवणी-लेखक डॉ. शं. गो. तुळपुळे. पुणें, १९६३.

१८. **त्र्यंबकरायकृत बालबोध** : संपा. गों. का. चांदोरकर. धुळें, श. १८३५.

१९. **भा. इ. सं. मंडळ वार्षिक इतिवृत्त, शके १८३६.**

२०. **विविधज्ञानविस्तार, ५९. ८ (ऑगस्ट १९२८)**

२१. **' मुमुक्षु ' साप्ताहिक, वर्ष ९–१०.**

२२. **निरंजन माधवांच्या स्तोत्रसंग्रहावर टीकात्मक निबंध** : प्रा. चिं. नी. जोशी. हैद्राबाद, १९३५.

♣ ♣ ♣

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. [illegible]
अनुक्रम ... [illegible] ... दि. ... [illegible]
क्रमांक ... [illegible] ... नोंद दि. ... [illegible]

REFBK-0016301

REFBK-0016301

निरंजन माधवांची वंशपरंपरा